सत्यमेव जयते

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
# यांचा
# मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षाचा
# अनुपालन लेखापरीक्षा अहवाल

**SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA**

लोकहितार्थ सत्यनिष्ठा

Dedicated to Truth in Public Interest

## महाराष्ट्र शासन

**वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 3**

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
# यांचा
# मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षाचा
# अनुपालन लेखापरीक्षा अहवाल

## महाराष्ट्र शासन
## वर्ष 2023 चा अहवाल क्रमांक 3

# अनुक्रमणिका


| | संदर्भ | |
|---|---|---|
| | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
| उपोद्घात | | xi |
| कार्यकारी सारांश | | xiii - xviii |
| **प्रकरण-I**<br>**प्रस्तावना** | | |
| या अहवालासंबंधी | 1.1 | 1 |
| लेखापरीक्षण केलेल्या घटकांची प्रोफाइल | 1.2 | 2 |
| लेखापरीक्षणासाठी प्राधिकार | 1.3 | 3 |
| प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयांची संघटनात्मक संरचना | 1.4 | 3 |
| लेखापरीक्षणाचे नियोजन आणि आयोजन | 1.5 | 3 |
| लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद | 1.6 | 4 |
| **प्रकरण II**<br>**व्यवहारांचे लेखापरीक्षण**<br>**(राज्य शासकीय विभाग)** | | |
| **सार्वजनिक बांधकाम विभाग** | | |
| सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेतलेली इमारती आणि रस्ते ठेवी कामे | 2.1 | 9 |
| दुरुस्तीच्या कामांवर विभागाने केलेल्या खर्चाची वसुली करण्यास विलंब झाल्यामुळे सवलतदारांना ₹ 1.44 कोटींचा अनुचित लाभ | 2.2 | 30 |
| राष्ट्रीय राजमार्ग म्हणून अधिसूचित केलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणावर ₹ 3.48 कोटींचा टाळता येण्याजोगा खर्च | 2.3 | 32 |
| **महसूल व वन विभाग** | | |
| स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती योजनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी | 2.4 | 35 |
| **वस्तू आणि सेवा कर विभाग** | | |
| वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिट्स | 2.5 | 52 |
| वस्तू आणि सेवा कर परतावा | 2.6 | 70 |

| | संदर्भ | |
|---|---|---|
| | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
| कराची कमी आकारणी | 2.7 | 100 |
| चुकीच्या परिगणनेमुळे व्याजाची कमी आकारणी | 2.8 | 101 |
| महाराष्ट्र मूल्यवर्धित करांतर्गत परताव्याचे ज्यादा प्रदान | 2.9 | 102 |
| **मुद्रांक शुल्क आणि नोंदणी विभाग** | | |
| भाडेपट्टा विलेखाच्या प्रकरणांत मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10 | 103 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11 | 110 |
| महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम आणि वार्षिक दर विवरणाच्या चुकीच्या/लागू न केलेल्या प्रावधानांमुळे अभिहस्तांतरण पत्रामध्ये मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.12 | 118 |
| एका संलेखात विविध बाबींचा विचार न करणे आणि गहाण खताचे एकत्रीकरण यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.13 | 121 |
| हक्क सोड विलेखावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.14 | 122 |
| **प्रकरण III<br>व्यवहारांचे लेखापरीक्षण<br>(राज्य सार्वजनिक उपक्रम)** | | |
| **ऊर्जा विभाग** | | |
| **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित** | | |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या उज्जवल डिस्कॉम अॅश्युरन्स योजनेच्या (उदय) पूर्वीची आणि नंतरची कामगिरी | 3.1 | 125 |
| **परिवहन विभाग** | | |
| **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ** | | |
| ‘महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ई-तिकिटींग प्रणालीचे संगणकीकरण’ यावरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाचे पाठपुरावा लेखापरीक्षण | 3.2 | 145 |
| ₹ 4.05 कोटींचा निष्फळ खर्च | 3.3 | 164 |

| परिशिष्टे | परिशिष्ट क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रांतर्गत क्लस्टर-निहाय विभागांची, स्वायत्त संस्थाची आणि सार्वजनिक उपक्रमांची यादी दर्शविणारे विवरण | 1.1 | 167 |
| डिसेंबर 2020 पर्यंत निर्गमित परंतु 30 जून 2021 रोजी विभाग-निहाय प्रलंबित असलेले निरीक्षण अहवाल/ परिच्छेद | 1.2 | 170 |
| प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापन/अनौपचारिक संदर्भांची स्थिती | 1.3 | 172 |
| लोक लेखा समिती/सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची क्लस्टर-निहाय स्थिती, ज्यावर कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रतीक्षा होती | 1.4 | 173 |
| नमुना घेतलेल्या विभागांची यादी | 2.1.1 | 174 |
| निधीचे अल्प विमोचन | 2.1.2 | 175 |
| अपूर्ण कामे आणि निधीची कमतरता यामुळे थांबलेली कामे | 2.1.3 | 176 |
| सिमेंट कॉन्क्रीट क्यूब्सच्या तपासणीला झालेल्या विलंबाचा तपशील | 2.1.4 | 177 |
| जोखीम आणि खर्चावर केलेली सामान्य दुरूस्ती दर्शविणारे विवरण | 2.2.1 | 178 |
| निवडलेल्या 15 जिल्ह्यांमध्ये निर्मितीसाठी हाती घेतलेल्या जैव-विविधता उद्यानांचा तपशील | 2.4.1 | 181 |
| तक्ता 5 c नुसार कलम 140(1), 140(4)(a) अंतर्गत अग्रेषित जास्त क्रेडिट | 2.5.1 | 182 |
| तक्ता 5 c प्रमाणे लेगसी रिटर्न दाखल न करता कलम 140(1), 140(4) (a) अंतर्गत अग्रेषित अनियमित क्रेडिट | 2.5.2 | 189 |
| पूर्व लेगसी रिटर्न पासून क्रेडिटचा अनियमित लाभ | 2.5.3 | 190 |
| तक्ता 6(b) नुसार कलम 140(2) अंतर्गत भांडवली वस्तूंच्या संदर्भात लाभ न घेतलेल्या केंद्रीय मूल्यवर्धित कर क्रेडिटचे अनियमित अग्रेषण | 2.5.4 | 191 |

| परिशिष्टे | परिशिष्ट क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| बांधकाम व्यावसायिक आणि विकासकांनी कलम 140 (4)(b), 140(6), 140(7) अंतर्गत स्टॉकमध्ये ठेवलेल्या इनपुटवर किंवा स्टॉकमध्ये ठेवलेल्या अर्धतयार अथवा तयार वस्तूंमधील इनपुटवर करांच्या क्रेडिटचा अनियमित लाभ | 2.5.5 | 192 |
| दुसऱ्यांदा पेमेंट ॲडवाईस जारी केल्यामुळे जास्तीचे वस्तू व सेवा कर परतावा भरणा झाल्याची प्रकरणे दर्शविणारे विवरण (करदात्याने जास्तीच्या परताव्याची परतफेड केली) | 2.6.1 | 193 |
| दुसऱ्यांदा पेमेंट ॲड्व्हाईस जारी केल्यामुळे वस्तू व सेवा कराच्या परताव्याचे जास्तीचे पेमेंट दर्शविणाऱ्या प्रकरणांचे विवरण (करदात्याने जास्तीच्या परताव्याची परतफेड केली नाही) | 2.6.2 | 195 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (अर्जाच्या पोचपावतीत विलंब) स्वयंचलित प्रणाली पूर्व | 2.6.3 | 196 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (अर्जाच्या पोचपावतीत विलंब) स्वयंचलित प्रणाली पश्चात | 2.6.4 | 197 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (शून्य रेटेड पुरवठयाच्या कारणास्तव तात्पुरता परतावा वेळेत मंजूर झाला नाही) स्वयंचलित प्रणाली पूर्व | 2.6.5 | 199 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (शून्य रेटेड पुरवठयामुळे तात्पुरता परतावा वेळेत मंजूर झाला नाही) स्वयंचलित प्रणाली पश्चात | 2.6.6 | 200 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (देय व्याज-प्रदान केलेले/न केलेले) स्वयंचलित प्रणाली पूर्व | 2.6.7 | 202 |

| परिशिष्टे | परिशिष्ट क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (अंतिम परतावा आदेश वेळेत निर्गमित केलेला नाही (देय व्याज-प्रदान केलेले/न केलेले) स्वयंचलित प्रणाली पश्चात | 2.6.8 | 203 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (शून्य रेटेड समायोजित उलाढाल न जुळल्यामुळे परताव्याचे अतिरिक्त प्रदान) | 2.6.9 | 205 |
| कमतरता लक्षात आलेल्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण (शून्य रेटेड वस्तू/सेवांच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे अतिरिक्त परतावा-चुकीचे इनपुट टॅक्स क्रेडिट) | 2.6.10 | 206 |
| शून्य रेटेड वस्तू/सेवांच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे अतिरिक्त परतावा मंजूर केलेल्या प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण - भांडवली वस्तूंवर परताव्याचे अनियमित प्रदान | 2.6.11 | 207 |
| इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चरच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे अतिरिक्त परतावा दर्शविणारे विवरण पत्र (विवरण 1-A/संलग्नक-B/GSRT 3B सोबत इन्व्हर्टेड उलाढाल न जुळणे) | 2.6.12 | 208 |
| इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चरच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे अतिरिक्त परतावा दर्शविणारे विवरण (समायोजित एकूण उलाढालीचे चुकीचे निर्धारण) | 2.6.13 | 209 |
| इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चरच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे जास्तीचा परतावा दर्शविणारे विवरण (निव्वळ ITC न जुळणे) | 2.6.14 | 211 |
| पुन:क्रेडिटच्या सूचनांचे अनुपालन न करण्यासंबंधी आणि चुकीच्या/अयोग्य ITC च्या वसुलीच्या परतावा प्रकरणांची यादी दर्शविणारे विवरण | 2.6.15 | 212 |
| इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर अंतर्गत परताव्यासाठी करदात्याने बीजक तपशील सादर न करता परतावा मंजूर केलेल्या परतावा प्रकरणांची सूची दर्शविणारे विवरण (परिशिष्ट ब) | 2.6.16 | 215 |

| परिशिष्टे | परिशिष्ट क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| कराची कमी आकारणी | 2.7.1 | 223 |
| चुकीच्या गणनेमुळे व्याजाची कमी आकारणी | 2.8.1 | 224 |
| महाराष्ट्र मूल्यवर्धित करांतर्गत परताव्याचे अतिरिक्त प्रदान | 2.9.1 | 225 |
| बांधलेल्या क्षेत्राचा विचार न केल्यामुळे भाडेपट्टीवर ₹ 1.06 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.1 | 229 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 1.16 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.2 | 230 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 12.29 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.3 | 231 |
| भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणाच्या कालावधीचा विचार न केल्यामुळे ₹ 16.26 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.4 | 232 |
| भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणाच्या कालावधीचा विचार न केल्यामुळे ₹ 21.93 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.5 | 233 |
| भाडेपट्टाकराराच्या नूतनीकरणावर ₹ 4.00 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.10.6 | 234 |
| बाजार मूल्याची चुकीची परिगणना केल्यामुळे ₹ 39.39 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11.1 | 235 |
| मालकाच्या हिश्श्याची चुकीची परिगणना झाल्यामुळे ₹ 55.13 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11.2 | 236 |
| मालकाच्या हिश्श्याची चुकीची परिगणना केल्यामूळे ₹ 1.07 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11.3 | 238 |
| मालकाच्या हिश्श्याची चुकीची परिगणना केल्यामूळे ₹ 10.27 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11.4 | 240 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 91.43 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.11.5 | 241 |
| मोबदल्याच्या चुकीच्या परिगणनेमुळे ₹ 17.70 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी-सोसायटीचा पुनर्विकास | 2.11.6 | 242 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 40.96 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.12.1 | 246 |

| परिशिष्टे | परिशिष्ट क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 56.06 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.12.2 | 247 |
| गहाणखतांचे एकत्रीकरण केल्यामुळे ₹ 30.00 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.13.1 | 248 |
| मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे ₹ 23.12 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी | 2.14.1 | 249 |

# उपोद्घात

31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 151 अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

हा अहवाल भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 आणि त्या अंतर्गत निर्गमित लेखापरीक्षा व लेखा विनियम, 2020 यांच्या तरतुदींतर्गत आयोजित महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम यांच्या लेखापरीक्षणाशी संबंधित आहे. हा अहवाल भारतीय राज्यघटनेच्या कलम 151(2) अंतर्गत राज्य विधान मंडळासमोर सादर करणे आवश्यक आहे.

या अहवालात नमूद केलेली प्रकरणे ही वर्ष 2019-20 आणि 2020-21 या कालावधीतील चाचणी तपासणी करते वेळी निदर्शनास आलेल्या परंतु मागील लेखापरीक्षा अहवालांमध्ये ज्यांचा परामर्श घेणे शक्य झाले नाही, अशा प्रकरणांपैकी आहेत, वर्ष 2020-21 नंतरच्या कालावधीशी संबंधित प्रकरणे देखील आवश्यक तेथे समाविष्ट करण्यात आली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी निर्गमित केलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार (मार्च 2017) लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.**

# कार्यकारी सारांश

## कार्यकारी सारांश

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल, शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमांच्या अनुपालन लेखापरीक्षणामुळे उद्भवलेल्या बाबींशी संबंधित आहे. अनुपालन लेखापरीक्षण म्हणजे भारताचे संविधान, लागू कायदे, नियम, विनियम आणि अधिकाऱ्यांनी जारी केलेले विविध आदेश आणि सूचनांचे अनुपालन केले जात आहे की नाही हे तपासण्यासाठी, लेखापरीक्षित संस्थांच्या खर्चाची आणि महसुलाची केलेली तपासणी.

लेखापरीक्षणाचे महत्त्वपूर्ण परिणाम राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती करण्यास सक्षम करणे आणि धोरणे आणि निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संस्थेच्या कार्यचालन कार्यक्षमतेत आणि वित्तीय व्यवस्थापनात सुधारणा होईल आणि अशा प्रकारे चांगल्या प्रशासनाला हातभार लागेल.

या अहवालात तीन प्रकरणांमध्ये लेखापरीक्षण निष्कर्षांचा समावेश आहे. **प्रकरण I** मध्ये "प्रस्तावना, लेखापरीक्षण केलेल्या घटकांची प्रोफाइल, लेखापरीक्षणाचे नियोजन आणि आयोजन, लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद", **प्रकरण II** मध्ये शासकीय विभागांशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणे आणि **प्रकरण III** सार्वजनिक उपक्रमांशी संबंधित लेखापरीक्षण निरीक्षणे समाविष्ट आहेत.

या अहवालातील प्रमुख निष्कर्षांचा सारांश खाली सादर केला आहे:

**प्रकरण I: प्रस्तावना**

अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे 14 विभाग, नऊ स्वायत्त संस्था आणि 64 सार्वजनिक उपक्रम आहेत ज्यांचे लेखापरीक्षण महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर द्वारे केले जाते.

लेखापरीक्षण अहवालामध्ये अंतर्भूत असलेले 112 परिच्छेद आणि पुनरावलोकनांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन प्रतीक्षित होते. लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीच्या 319 शिफारशींवर कारवाई केलेल्या टिप्पण्या 14 विभागांकडून प्रतीक्षित होत्या.

**प्रकरण II: व्यवहारांचे लेखापरीक्षण: राज्य शासकीय विभाग**

**सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेतलेली इमारती आणि रस्ते ठेवी कामे**

सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेतलेल्या इमारती आणि रस्ते ठेवी कामांच्या लेखापरीक्षणात असे दिसून आले की कामे रखडण्यासाठी आणि सार्वजनिक बांधकाम विभागासाठी दायित्व निर्माण करण्यासाठी निधीचे अपुरे विमोचन कारणीभूत आहे.

ठेवी कामे पूर्ण झाल्यानंतरही दुर्मिळ सरकारी निधीमधील ₹ 22 कोटी इतका मोठा निधी सार्वजनिक बांधकाम विभागांकडे अखर्चित राहिला. सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे विद्युतीकरण, पाणी पुरवठा आणि पूर्ण झालेल्या इमारती हस्तांतरित करण्यात न आल्यामुळे वापरकर्ता विभाग वांछित उद्देशासाठी बांधकाम केलेल्या इमारती/पायाभूत सुविधांचा वापर करू शकले नाही. अपुरे सर्वेक्षण आणि अयोग्य अंदाजाच्या परिणामी टाळता येण्याजोग्या अतिरिक्त बाबी आणि परिमाणाचे आधिक्य याची उदाहरणे आढळून आली. विनिर्दिष्ट गुणवत्ता नियंत्रण निकषांचे पालन करण्यात कमतरता निदर्शनास आल्या. निधीचे वळतीकरण, एकाच कामासाठी एकापेक्षा अधिक ओळख पत्र तयार करणे आणि ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली (DCMS) मध्ये कामाची स्थिती प्रदर्शित न करणे या घटनाही लक्षात आल्या. ठेवी कामांवर देखरेख आणि नियंत्रणाच्या अभावी महाराष्ट्र शासनाची दुर्मिळ आर्थिक संसाधने अपुऱ्या कामांमुळे विनावापर किंवा अवरोधित राहिली.

**महाराष्ट्रात स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उद्यान निर्माण करण्याच्या योजनेची अंमलबजावणी**

'स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उद्यान' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आणि महाराष्ट्र शासनाच्या योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या 67 जैव-विविधता उद्यानांपैकी केवळ 15 जैव-विविधता उद्याने पूर्णत्वास जाऊ शकली आणि हस्तांतरित करण्यात (मार्च 2021) आली. जागांच्या अयोग्य निवडीमुळे अयशस्वी वृक्षारोपण आणि अशासकीय जमिनीवर उद्यानांची निर्मिती झाली. अंदाजपत्रक आणि खर्च यावर नियंत्रणाचा अभाव होता. निधी कमी दिल्यामुळे योजनेची मुदत वाढली आणि बहुतांश उद्याने अपूर्ण राहीली. निर्धारित कालावधीत जैव-विविधता उद्याने पूर्ण न झाल्यामुळे आणि जैव-विविधता उद्यानांच्या निर्मिती दरम्यान तयार केलेल्या मालमत्तेच्या देखभालीसाठी तपशीलवार प्रकल्प अहवालात कोणतीही तरतूद नसल्यामुळे निर्मित मालमत्तेचा ऱ्हास झाल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

**वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिट्स**

"वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिट्स" च्या लेखापरीक्षणात असे दिसून आले आहे की करदात्यांनी वस्तू आणि सेवा कर TRAN-1 मध्ये अनियमित घोषणेमुळे ट्रांझिशनल क्रेडिट्सचा अतिरिक्त लाभ घेतल्याची प्रकरणे लेखापरीक्षणाला आढळून आली. करदात्यांनी सर्व विहित रिटर्न्स भरले नसतानाही अनियमित ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ घेतला. भांडवली वस्तू, ट्रांझिटमधील वस्तू आणि प्रगतीपथावरील कामे/ तयार वस्तूंमध्ये समाविष्ट असलेल्या इनपुटवर ट्रांझिशनल क्रेडिटच्या अनियमित लाभाची प्रकरणे देखील लेखापरीक्षणाला दिसून आली. वारंवार मागणी करूनही करदात्यांनी प्राप्त केलेल्या ट्रांझिशनल क्रेडिटच्या दाव्यांच्या पडताळणीशी संबंधित अभिलेख

तपासणीसाठी सादर करण्यात राज्य कर आयुक्त अयशस्वी ठरले त्यामुळे विभागाद्वारे ट्रांझिशनल क्रेडिटच्या पडताळणी बाबतच्या परिणामकारकतेची आणि आंतरिक नियंत्रण यंत्रणेची लेखापरीक्षा खात्री करू शकले नाही.

**वस्तू आणि सेवा कर परतावा**

"वस्तू आणि सेवा कर परतावा" च्या लेखापरीक्षणातून उघडकीस आले की परतावा अर्जाचा अर्ज संदर्भ क्रमांक तयार करण्यापूर्वी करदात्याचे इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजर डेबिट केले गेले नाहीत, परिणामी अनियमित परतावा मंजूर झाला. परतावा आदेश जारी करण्यास विलंब झाल्याची प्रकरणे होती, ज्यामुळे व्याज भरण्याची जबाबदारी निर्माण होते. एकूण देय रकमेपेक्षा जास्तीचे तात्पुरते परतावे दिल्याचेही लक्षात आले. निर्यातीचा पुरावा घेतल्याशिवाय शून्य रेटेड निर्यातीचे परतावे विभागाने दिले. भांडवली वस्तूंवरील इनपुट टॅक्स क्रेडिट, इनपुट सेवा आणि वस्तू व सेवा कर-पूर्व बीजके, जेथे लागू असेल तेथे परतावा मंजूर करण्यात विभागाने चूक केली. समायोजित एकूण उलाढाल, निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट, बीजकांचे मूल्य यासारख्या घटकांचे चुकीचे मूल्य विचारात घेतल्याची प्रकरणे लक्षात आली ज्याचा परिणाम जास्त परतावा देण्यात झाला. सदर क्रेडिटच्या अपात्रतेमुळे अप्रयुक्त इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा दावा नाकारल्यावर, विभागाने दावेदाराच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये नाकारलेल्या रकमेचे पुन्हा क्रेडिट सुनिश्चित केले नाही. विभागाने परतावा आदेशांच्या संप्रेषणाचा डेटा समकक्ष कर अधिकाऱ्यांना सादर केला नाही, परताव्याच्या दाव्यांच्या उत्तर-लेखापरीक्षणाशी संबंधित डेटा आणि करदात्याला वस्तू आणि सेवा कर परताव्याच्या भुगतान पद्धतीचा डेटा वारंवार विनंती करूनही लेखापरीक्षण पडताळणीसाठी सादर केला नाही.

**वैयक्तिक लेखापरीक्षण निरीक्षणे**

- विभागाकडून दुरुस्तीच्या कामांवर झालेल्या खर्चाच्या वसुलीतील विलंबामुळे सवलतदाराला ₹ 1.44 कोटींचा अनुचित लाभ आणि दुसऱ्या प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग म्हणून अधिसूचित केलेल्या रस्त्याच्या लांबीच्या रुंदीकरणावर ₹ 3.48 कोटी टाळता येण्याजोगा खर्च लेखापरीक्षणात निदर्शनास आला.
- मूल्यवर्धित कर कार्यालयांच्या लेखापरीक्षणात कराच्या चुकीच्या दर आकारणीमुळे मूल्यवर्धित कर आणि त्यावरील व्याज ₹ 11.72 लाखांची कमी आकारणी दिसून आली. तसेच आणखी दोन प्रकरणांमध्ये महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 30(3) अंतर्गत ₹ 47.06 लाखांची कमी व्याज आकारणी आणि कारखाना इमारतीच्या बांधकामात वापरल्या जाणाऱ्या इनपुट्सवर अयोग्य सेट-ऑफ मंजूर केल्यामुळे ₹ 21.56 लाखांचा जास्त परतावा दिसून आला.

- मुद्रांक शुल्क आणि नोंदणी विभागांतर्गत कार्यालयांच्या लेखापरीक्षणात एका प्रकरणात बांधलेल्या क्षेत्राचा विचार न केल्यामुळे, दोन प्रकरणांमध्ये नूतनीकरणाच्या कलमाचा विचार न केल्यामुळे आणि 11 प्रकरणांमध्ये बाजार मूल्याचे अवमूल्यन केल्यामुळे भाडेपट्टा विलेखाच्या 14 प्रकरणांमध्ये ₹ 6.72 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी उघडकीस आली.
- तीन प्रकरणांमध्ये लेखापरीक्षणात मालमत्तेचे योग्य बाजार मूल्य किंवा मोबदला उत्पन्न विभागणी करारांमध्ये योग्यरित्या परिगणित न केल्यामुळे ₹ 2.02 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी लक्षात आली. अन्य दोन प्रकरणांमध्ये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, 1958 आणि वार्षिक विवरणपत्राच्या तरतुदी चुकीच्या पद्धतीने लागू केल्यामुळे/लागू न केल्यामुळे परिवहन विलेखामध्ये ₹ 0.97 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. तसेच एका प्रकरणात गहाण खताच्या एकत्रीकरणामुळे ₹ 0.30 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी आणि रिलीझ डीडच्या एका प्रकरणात ₹ 0.23 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी लक्षात आली.

**प्रकरण III: व्यवहारांचे लेखापरीक्षण: राज्य सार्वजनिक उपक्रम**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या उज्ज्वल डिस्कॉम ॲश्युरंस योजनेच्या (उदय) पूर्वीची आणि नंतरची कामगिरी**

उदय योजनेच्या लेखापरीक्षणात हे उघड झाले की महावितरणला त्याच्या उच्च किंमतीच्या ऋणाची परतफेड करण्यासाठी योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून ₹ 4,960 कोटी रक्कम मिळाली असली तरी विविध कार्यचालनात्मक मापदंड साध्य करण्यासाठी इतर कोणताही समर्पित निधी प्राप्त झाला नाही. परिणामी, महावितरणकडे त्याच्या स्वत:च्या संसाधनांद्वारे किंवा इतर केंद्र/राज्य योजनांतर्गत कार्यचालनात्मक मापदंड सुधारणे भाग पडले. महावितरणने शासन निर्णय (डिसेंबर 2016) नुसार ₹ 1,653 कोटींचा निधी उभारण्यासाठी हमी मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधला (मार्च 2017), महाराष्ट्र शासनाने निधी उभारणीसाठी महावितरणला हमी देण्यास सहमती नाकारली. महावितरणची थकबाकी भरण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विभागांकडून कोणतीही दृढ वचनबद्धता नव्हती. एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक तोटा अपेक्षित पातळीपर्यंत खाली आणण्याचे आपले उद्दिष्ट महावितरण साध्य करू शकले नाही. याउलट, मुख्यत: कृषी ग्राहकांकडून आणि राज्य शासनाच्या विविध विभागांकडून कमी संकलनामुळे महावितरणचा एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक तोटा 2018-19 मधील 16.94 टक्क्यांवरून 2020-21 मध्ये 20.73 टक्क्यांपर्यंत वाढला होता.

अशा प्रकारे, उदय योजना राबवूनही महावितरणचे वित्तीय आणि कार्यचालनात्मक प्रत्यावर्तन साध्य करण्याचे मुख्य उद्दिष्ट साध्य झाले नाही.

**'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ई-तिकीटिंग प्रणालीचे संगणकीकरण' वरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाचे पाठपुरावा लेखापरीक्षण**

'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ई-तिकीटिंग प्रणालीचे संगणकीकरण' वरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाच्या पाठपुरावा लेखापरीक्षणातून असे दिसून आले आहे की सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींचे दोन महिन्यांच्या विहित कालावधीत पूर्णपणे अनुपालन केले गेले नाही. लेखापरीक्षणात हे देखील उघड झाले की कराराची जाहिरात निश्चित करण्यात विलंब झाल्यामुळे तिकीटांच्या विक्रीवरील संभाव्य महसूली तोटा आणि इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन[1] द्वारे विविध सवलतींशी संबंधित समस्यांचे निराकरण केले गेले नाही. इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी पूर्ण आणि विश्वासार्ह डेटा ठेवण्यासाठी पुरेशी इनपुट नियंत्रणे आणि प्रमाणीकरण तपासण्या नव्हत्या.

**वैयक्तिक लेखापरीक्षण निरीक्षण**

- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे मंचर येथे स्वतःच्या धोरणाच्या विरोधात विद्यमान दोन डेपोंच्या 30 किमी मध्ये डेपोच्या बांधकामामुळे ₹ 4.05 कोटींचा निष्फळ खर्च झाला.

***मुख्य शिफारशी***

***प्रकरण-II: व्यवहारांचे लेखापरीक्षण: राज्य शासकीय विभाग***

***सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेतलेली इमारती आणि रस्ते ठेवी कामे***

*__1.__ शासन हे सुनिश्चित करू शकते की वापरकर्ता विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळेत निधी जमा करेल जेणेकरुन कामे विलंबाशिवाय कार्यान्वित होतील.*

*__2.__ कामे वेळेवर पूर्ण करणे आणि पूर्ण केलेली कामे वापरकर्ता विभागांना सुपूर्द करणे हे शासन सुनिश्चित करू शकेल.*

*__3.__ ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली सुव्यवस्थित करणे आणि ठेवी कामांचे आंतरिक नियंत्रण आणि देखरेख प्रणालीचे बळकटीकरण हे शासन सुनिश्चित करू शकते.*

[1] इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन नावाच्या मशीनद्वारे वाहकाने बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांना जारी केलेल्या सर्व तिकीटांचे तपशील हस्तगस्त करण्यासाठी अनुप्रयोग (ॲप्लिकेशन) विकसित केले आहे.

***वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिट्स***

**1**. *लेखापरीक्षणास अभिलेखे वेळेवर सादर करणे विभागाने सुनिश्चित करावे.*

**2.** *विभाग 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्रमांक 23A च्या तरतुदींवर पुनर्विचार करू शकतो आणि भांडवली वस्तूंवरील न घेतलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटवर स्पष्टीकरण जारी करू शकतो.*

**3.** *करदात्याद्वारे अनियमित/अतिरिक्त इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेणे/उपयोग टाळण्यासाठी करदात्याद्वारे ट्रांझिशनल क्रेडिट मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अटींचे पालन करणे विभागाने सुनिश्चित केले पाहिजे.*

**4.** *ट्रांझिशनल क्रेडिटच्या अनियमित अतिरिक्त लाभाच्या वसुलीसाठी संबंधित करदात्याला डिमांड नोटीसेस जारी करण्यासाठी विभागाने कारवाई सुरू करणे आवश्यक आहे.*

***वस्तू आणि सेवा कर परतावा***

**1.** *अर्ज संदर्भ क्रमांक तयार करण्यापूर्वी आणि परतावा आदेश जारी करण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजरमध्ये डेबिट करणे विभागाने सुनिश्चित केले पाहिजे.*

**2**. *विभागाने लेखापरीक्षणासाठी मागणी केलेल्या अभिलेखे/विवरणांची उपलब्धता आणि सादारीकरणाची खात्री करावी.*

**3.** *योग्यरित्या आणि वेळेवर परतावा प्रकरणे निकाली काढण्यासाठी कोडल तरतुदी आणि शासनाद्वारे वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांचे अनुपालन सुनिश्चित करावे.*

***प्रकरण III: व्यवहारांचे लेखापरीक्षण: राज्य सार्वजनिक उपक्रम***

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या उज्ज्वल डिस्कॉम ॲश्युरंस योजनेच्या (उदय) पूर्वीची आणि नंतरची कामगिरी**

**1.** *स्थानिक स्वराज्य संस्था आणि विभागांकडून महावितरणची सार्वजनिक जलप्रदाये आणि पथदिवे यांच्या संदर्भात सर्व विद्युत थकबाकी निर्धारित वेळेत भरली गेली हे शासन सुनिश्चित करेल.*

**2.** *महावितरणने डीटी मीटरिंग, फीडर सेग्रीगेशन मोहीम पूर्ण करावी आणि बिलिंग आणि संकलन कार्यक्षमता सुधारून एकूण तांत्रिक आणि व्यावसायिक तोटा 15 टक्के किंवा त्यापेक्षा कमी करावा.*

# प्रकरण ।

## प्रस्तावना

# प्रकरण I

## प्रस्तावना

### 1.1 या अहवालासंबंधी

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अखत्यारीतील विविध क्लस्टर्स अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र शासनाचे शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांच्या अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवलेल्या प्रकरणांशी संबंधित आहे. या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केले जाणारे विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची क्लस्टर-निहाय यादी **तक्ता 1.1** मध्ये दर्शविली आहे व तपशील ***परिशिष्ट 1.1*** मध्ये दिलेला आहे.

**तक्ता 1.1: या कार्यालयाद्वारे लेखापरीक्षण केलेले विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची क्लस्टर-निहाय यादी**

| क्लस्टरचे नाव | विभागांची संख्या | स्वायत्त संस्थांची संख्या | सार्वजनिक उपक्रमांची संख्या |
|---|---|---|---|
| ऊर्जा व वीज | 1 | 2 | 8 |
| उद्योग आणि वाणिज्य | 2 | 1 | 32 |
| परिवहन/वाहतूक | 2 | 1 | 6 |
| पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान | 2 | 2 | 4 |
| सार्वजनिक बांधकाम | 2 | 1 | 9 |
| वित्त | 2 | -- | 3 |
| माहिती तंत्रज्ञान व दळणवळण | 1 | -- | 1 |
| कायदा व सुव्यवस्था | 2 | 2 | 1 |
| **एकूण** | **14** | **9** | **64** |

भारतीय संविधानातील तरतुदी, लागू कायदे, नियम, विनियम आणि सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले विविध आदेश व सूचना यांचे अनुपालन केले जाते आहे हे तपासण्यासाठी लेखापरीक्षण केलेल्या संस्थांच्या खर्चाची आणि महसुलाची तपासणी म्हणजे अनुपालन लेखापरीक्षण.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षण मानके ही अहवालासाठी भौतिकतेची पातळी व व्यवहारांचे स्वरूप, व्याप्ती आणि परिमाण यांच्याशी सुसंगत असणे आवश्यक आहेत. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारिणीला सुधारात्मक कृती तसेच धोरणे आणि निर्देश तयार करण्यास सक्षम करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संस्थांची

कार्यचालन क्षमता आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारले जाईल आणि त्यामुळे चांगल्या प्रशासनास हातभार लागेल.

## 1.2 लेखापरीक्षण केलेल्या घटकांची प्रोफाइल

राज्यातील सचिवालय स्तरावरील विभागांचे प्रमुख अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव असतात आणि त्यांना संचालक/आयुक्त आणि अधीनस्थ अधिकारी मदत करतात.

वर्ष 2020-21 दरम्यान राज्य शासनाच्या राजकोषीय व्यवहारांचा मागील वर्षांशी तुलना केलेला सारांश **तक्ता 1.2** मध्ये दिला आहे.

**तक्ता 1.2: वर्ष 2019-20 आणि 2020-21 मधील राजकोषीय व्यवहारांचा सारांश**

**(₹ कोटींमध्ये)**

| जमा | 2019-20 | 2020-21 | | वितरण | 2019-20 | 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|
| **विभाग-अ: महसूल** | | | | | | |
| **महसूल प्राप्ती** | **283190** | **269468** | | महसुली खर्च | **300305** | **310610** |
| कर महसूल | 188948 | 164255 | | सामान्य सेवा | 100050 | 103854 |
| करेतर महसूल | 14297 | 15976* | | सामाजिक सेवा | 122947 | 122024* |
| केंद्रीय कर/ शुल्काचा हिस्सा | 36220 | 36504 | | आर्थिक सेवा | 56044* | 64336 |
| भारत सरकार कडून अनुदान | 43725 | 52733 | | अनुदान आणि अंशदान | 21264 | 20396 |
| **विभाग ब: भांडवल आणि इतर** | | | | | | |
| संकीर्ण भांडवली जमा | 0 | 0 | | भांडवली परिव्यय | 36416 | 29687 |
| कर्जे आणि अग्रिमांची वसुली | 1615 | 1612 | | कर्जे आणि अग्रिमे संवितरीत | 1970 | 2342 |
| लोक ऋण जमा@ | 55396 | 87357 | | लोक ऋणाची परतफेड@ | 22868 | 26427 |
| आकस्मिक निधीतून विनियोग | 7350 | 11500 | | आकस्मिक निधीसाठी विनियोग | 15350 | 1500 |
| आकस्मिकता निधी | 15350 | 10500 | | आकस्मिकता निधी | 16350 | 11500 |
| लोक लेखे जमा | 119634 | 88531 | | लोक लेखे संवितरण | 100329 | 74787# |
| सुरुवातीची रोख शिल्लक<br>अ) कर्ज निवारण निधी<br>ब) रोख शिल्लक | <br>34488<br>32781 | <br>41427<br>15055$ | | अंतिम रोख शिल्लक<br>अ) कर्ज निवारण निधी<br>ब) रोख शिल्लक | <br>41427<br>14789 | <br>45738<br>22859 |
| **एकूण** | **549804** | **525450** | | **एकूण** | **549804** | **525450** |

@अर्थोपाय अग्रिम (₹ 1,757.61 कोटी) आणि अधिकर्ष अंतर्गत निव्वळ व्यवहार वगळून: (निरंक) (2019-20) अर्थोपाय अग्रिम आणि अधिकर्ष अंतर्गत निव्वळ व्यवहार वगळून (जमा आणि संवितरण ₹ 31,159 कोटी) (2020-21)

#निम्न राऊंडिंग

*उच्च राऊंडिंग

$चुकीचे वर्गीकरण सुधारल्यामुळे ₹ 266.57 कोटी समायोजित प्रोफॉर्मामध्ये फरक आहे

स्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

## 1.3 लेखापरीक्षणासाठी प्राधिकार

नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याद्वारे लेखापरीक्षण करण्याचे अधिकार भारतीय संविधानाच्या कलम 149 आणि 151 आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 मधून प्राप्त झाले आहेत. नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती अधिनियम आणि लेखापरीक्षण आणि लेखाविषयक नियमन, 2020 च्या तरतुदींतर्गत महाराष्ट्र शासनाचे विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम यांचा खर्च आणि महसूल यांचे लेखापरीक्षण नियंत्रक व महालेखापरीक्षक करतात.

## 1.4 प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयांची संघटनात्मक संरचना

नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या निर्देशांनुसार, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांची कार्यालये त्यांच्या अंतर्गत येणारे विविध सरकारी विभाग आणि कार्यालये, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रम (लेखापरीक्षण केलेल्या संस्था) यांचे लेखापरीक्षण करतात. प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात आठ क्लस्टर्स येतात, तर उर्वरित आठ क्लस्टर्स **तक्ता 1.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात आहेत.

**तक्ता 1.3: क्लस्टर्सचे तपशील**

| अनु. क्र. | प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रात येणारे क्लस्टर्स | महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात येणारे क्लस्टर्स |
|---|---|---|
| 1. | आरोग्य व कल्याण | ऊर्जा व वीज |
| 2. | शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार | उद्योग आणि वाणिज्य |
| 3. | ग्रामीण विकास | परिवहन/वाहतूक |
| 4. | कृषी, अन्न व संलग्न उद्योग | पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान |
| 5. | जलसंपदा | सार्वजनिक बांधकाम |
| 6. | नगर विकास | वित्त |
| 7. | संस्कृती व पर्यटन | माहिती तंत्रज्ञान व दळणवळण |
| 8. | सामान्य प्रशासन | कायदा व सुव्यवस्था |

## 1.5 लेखापरीक्षणाचे नियोजन आणि आयोजन

लेखापरीक्षित संस्थांनी केलेला खर्च आणि महसूली उत्पन्न यांवर आधारित जोखमीचे मूल्यमापन, कार्यांची गंभीरता आणि जटिलता, सोपवलेल्या आर्थिक अधिकारांची पातळी आणि अंतर्गत नियंत्रण व भागधारक यांनी दाखवलेल्या चिंता यांच्या मूल्यमापनाच्या आधारे लेखापरीक्षण प्रक्रियेची सुरुवात होते. या अभ्यासामध्ये मागील

लेखापरीक्षा निष्कर्षांचा देखील विचार केला जातो. यावरून लेखापरीक्षणाची वारंवारता आणि व्याप्ती ठरवली जाते.

प्रत्येक युनिटचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर तपासणी केलेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना लेखापरीक्षण निष्कर्षांसह निरीक्षण अहवाल पाठविले जातात. तपासणी केलेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखापरीक्षण निष्कर्षांना उत्तरे देण्याची विनंती केली जाते. उत्तरे प्राप्त झाल्यानंतर लेखापरीक्षण निष्कर्ष निकाली काढले जातात किंवा अनुपालनासाठी पुढील कारवाईचा सल्ला दिला जातो. या निरीक्षण अहवालामधील महत्त्वपूर्ण निरीक्षणे भारतीय राज्यघटनेच्या कलम 151(2) अंतर्गत राज्यपालांना सादर करण्यात येणाऱ्या अहवालांमध्ये समाविष्ट करण्याची प्रक्रिया केली जाते.

## 1.6 लेखापरीक्षणाला शासनाचा प्रतिसाद

### 1.6.1 प्रलंबित निरीक्षण अहवाल

शासकीय विभाग, स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांची नियतकालिक तपासणी ही त्यांनी केलेले व्यवहार आणि महत्त्वपूर्ण लेखे तसेच इतर नोंदी विहित नियम व कार्यपद्धतीनुसार असल्याची पडताळणी करण्यासाठी केली जाते. या तपासण्यांचा पाठपुरावा निरीक्षण अहवालासह केला जातो जो तपासणी झालेल्या कार्यालयांच्या प्रमुखांना दिला जातो व त्याच्या प्रती पुढील उच्च अधिकाऱ्यांना दिल्या जातात. प्रलंबित निरीक्षण अहवालांची अर्धवार्षिक तपशीलवार विवरण पत्रे त्यात समाविष्ट असलेल्या लेखापरीक्षण निरीक्षणांवर केलेल्या कारवाईवर नियंत्रण ठेवण्याच्या सोईसाठी संबंधित विभागांच्या सचिवांना पाठवले जातात.

जून 2021 पर्यंत, 4848 निरीक्षण अहवाल (14,420 परिच्छेद) निपटाऱ्यासाठी प्रलंबित होते. निरीक्षण अहवाल आणि परिच्छेदांचे वर्ष-निहाय तपशील ***परिशिष्ट 1.2*** मध्ये दर्शविले आहेत.

### 1.6.2 विभागीय लेखापरीक्षण समिती

वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाने (डिसेंबर 1985) सर्व प्रशासकीय विभागांना लेखापरीक्षण समिती स्थापन करण्याचे, प्रलंबित निरीक्षण अहवाल आणि परिच्छेदांचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि त्यांच्या निपटाऱ्याकरिता त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले. लेखापरीक्षण समितीचे अध्यक्ष प्रशासकीय विभागाचे सहसचिव असतात. सहसंचालक, लेखा व कोषागारे, सदस्य आणि उपसंचालक लेखा व कोषागारे संयोजक असतात. लेखापरीक्षा कार्यालयातील उपमहालेखाकार या पदापेक्षा कमी नसलेले प्रतिनिधी म्हणून लेखापरीक्षा समित्यांना मदत करतात. प्रत्येक तिमाहीत किमान एकदा लेखापरीक्षा समितीची बैठक आयोजित करणे आवश्यक आहे.

वर्ष 2019-20 आणि 2020-21 दरम्यान **तक्ता 1.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सहा लेखापरीक्षा समितीच्या बैठका आयोजित केल्या गेल्या.

**तक्ता 1.4: 2019-20 आणि 2020-21 मध्ये आयोजित केलेल्या लेखापरीक्षा समितीच्या बैठका**

| क्र. | प्रशासकीय विभागाचे नाव | लेखापरीक्षा समितीच्या बैठकांची संख्या | निपटारा झालेल्या तपासणी अहवालांची संख्या | निपटारा झालेल्या परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | वित्त | 01 | निरंक | 396 |
| 2. | महसूल, नोंदणी आणि मुद्रांक | 04 | निरंक | 545 |
| 3. | ऊर्जा | 01 | 04 | 20 |
| **एकूण** | | **06** | **04** | **961** |

**तक्ता 1.4** वरून असे दिसून येते की मोठ्या संख्येने निरीक्षण अहवालातील परिच्छेद प्रलंबित असतानाही विभागाकडून फारच कमी लेखापरीक्षा समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या. महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखापरीक्षा अधिकार क्षेत्रातील 14 प्रशासकीय विभागांपैकी वर्ष 2019-20 आणि 2020-21 या कालावधीत केवळ तीन प्रशासकीय विभागांच्या लेखापरीक्षा समितीच्या बैठका घेण्यात आल्या.

### 1.6.3 प्रारूप परिच्छेद आणि अनुपालन लेखापरीक्षणांना विभागांचा प्रतिसाद

या अहवालात दिसून येणारे 17 प्रारूप परिच्छेद, ज्यामध्ये पाच अनुपालन लेखापरीक्षण परिच्छेद आणि एक पाठपुरावा लेखापरीक्षण परिच्छेद यांचा समावेश आहे, सहा आठवड्यांच्या आत प्रतिसाद पाठविण्याच्या विनंतीसह मे 2021 ते डिसेंबर 2021 दरम्यान संबंधित विभागांच्या प्रधान सचिव/सचिवांना अर्ध-शासकीय पणे पाठविण्यात आले. त्यापैकी आठ लेखापरीक्षा परिच्छेदांच्या संदर्भात कोणतीही उत्तरे प्राप्त झाली नव्हती (ऑगस्ट 2022).

आमच्या लेखापरीक्षण निरीक्षणांच्या प्रतिसादात सात विभागांनी[1] 49 पूर्ण झालेल्या किंवा रद्द केलेल्या ठेव कामांशी संबंधित ₹ 5.92 कोटी इतकी अखर्चित शिल्लक रक्कम परत केली; दोन सार्वजनिक बांधकाम विभाग (अमरावती आणि नागपूर-3) यांनी चार कामांच्या विस्तारीत कालावधीसाठी, ₹ 15.45 लाख विमा अधिमूल्य शुल्क वसूल केले.

### 1.6.4 लेखापरीक्षण अहवालाचा पाठपुरावा

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जानेवारी 2001 मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, प्रशासकीय विभागांनी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण

[1] सार्वजनिक बांधकाम विभाग - भोकर, बुलढाणा, हिंगोली, कोल्हापूर, दक्षिण पुणे; एकात्मिक युनिट (वैद्यकीय) सार्वजनिक बांधकाम नागपूर, विशेष प्रकल्प विभाग, यवतमाळ

अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे, लेखापरीक्षणाद्वारे सत्यापित केलेले स्पष्टीकरणात्मक ज्ञापन, लेखापरीक्षण अहवाल राज्य विधानमंडळास सादर केल्यापासून तीन महिन्यांच्या आत प्रस्तुत करणे आवश्यक आहे. मात्र प्रशासकीय विभागांनी या सूचनांचे पालन केलेले नाही. वर्ष 2014-15 ते 2018-19 मधील प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती **तक्ता 1.5** मध्ये दर्शविली आहे. क्लस्टरनुसार तपशील ***परिशिष्ट 1.3*** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 1.5: वर्ष 2014-15 ते 2018-19 च्या लेखापरीक्षण अहवालांसाठी प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची स्थिती**

| लेखापरीक्षण अहवाल | अहवाल सादर करण्याची तारीख | परिच्छेद आणि समिक्षांची संख्या | प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 2014-15 | 13 एप्रिल 2016 (ES) | 1 | 1 | 0 |
| | 13 एप्रिल 2016 (RS) | 18 | 2 | 16 |
| | 05 ऑगस्ट 2016 (PSUs) | 7 | 3 | 4 |
| 2015-16 | 11 ऑगस्ट 2017 (RS) | 25 | 1 | 24 |
| | 07 अप्रिल 2017 (PSUs) | 7 | 0 | 7 |
| 2016-17 | 28 मार्च 2018 (ES) | 2 | 2 | 0 |
| | 20 जुलै 2018 (RS) | 31 | 5 | 26 |
| | 20 जुलै 2018 (PSUs) | 8 | 0 | 8 |
| 2017-18 | 02 जुलै 2019 (ES) | 4 | 1 | 3 |
| | 4 मार्च 2020 (RS) | 18 | 11 | 7 |
| | 4 मार्च 2020 (PSUs) | 7 | 0 | 7 |
| 2018-19 | 08 सप्टेंबर 2020 (ES) | 4 | 1 | 3 |
| | 08 सप्टेंबर 2020 (RS) | 11 | 6 | 5 |
| | 08 सप्टेंबर 2020 (PSUs) | 2 | 0 | 2 |
| **एकूण** | | **145** | **33** | **112** |
| टीप: ES - आर्थिक क्षेत्राचा अहवाल, RS - महसूल क्षेत्राचा अहवाल, PSUs - सार्वजनिक उपक्रम | | | | |

तक्ता 1.5 वरून हे निदर्शनास येते की लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट केलेल्या 145 परिच्छेद आणि समीक्षांपैकी 112 स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्रलंबित होती.

लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती, लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व समस्यांच्या बाबतीत कार्यकारिणीचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी, किती कालावधीत विभागांनी त्यांच्या शिफारशींवर केलेल्या कारवाईच्या टिप्पण्या पाठवल्या पाहिजेत हे निश्चित करतात.

वर्ष 2015-16 ते 2020-21 दरम्यान लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समितीने 2010-11 ते 2015-16 या वर्षांच्या लेखापरीक्षण अहवालांशी संबंधित 123

परिच्छेदांवर चर्चा केली आणि 355 शिफारशी केल्या ज्यात **तक्ता 1.6** मध्ये दर्शविल्यानुसार 319 शिफारशींवर कारवाई केलेल्या टिप्पण्या प्रलंबित होत्या.

**तक्ता 1.6: लोक लेखा समिती/सार्वजनिक उपक्रम समिती शिफारशींवरील कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रलंबित स्थिती**

| लेखापरीक्षण अहवालाचे वर्ष | लेखापरीक्षण अहवाल | लोक लेखा समिती/ सार्वजनिक उपक्रम समिती अहवाल क्रमांक | लोक लेखा समिती/ सार्वजनिक उपक्रम समितीचे वर्ष | लोक लेखा समिती/ सार्वजनिक उपक्रम समितीद्वारे शिफारशींची संख्या | कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रलंबित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 2010-11 | ES | 12 | 2015-16 | 2 | 1 |
| | PSUs | 1 | 2020-21 | 6 | 6 |
| | | 6, 11, 7 | 2015-16 | 5 | 5 |
| 2011-12 | RS | 33 | 2017-18 | 17 | 17 |
| | | 34 | 2017-18 | 64 | 64 |
| | PSUs | 5 | 2015-16 | 1 | 1 |
| | | 18 | 2017-18 | 3 | 3 |
| | | 6 | 2015-16 | 2 | 2 |
| 2012-13 | RS | 37 | 2017-18 | 34 | 31 |
| | ES | 45, 60 | 2017-18 | 26 | 25 |
| | PSUs | 6 | 2015-16 | 1 | 1 |
| 2013-14 | RS | 15 | 2015-16 | 29 | 6 |
| | PSUs | 16 | 2017-18 | 1 | 1 |
| | | 7 | 2015-16 | 1 | 1 |
| 2014-15 | RS | 66 | 2017-18 | 5 | 5 |
| | | 53 | 2017-18 | 46 | 46 |
| | | 54 | 2017-18 | 37 | 37 |
| | ES | 43 | 2017-18 | 20 | 19 |
| | GSS | 61 | 2017-18 | 13 | 12 |
| | PSUs | 2 | 2020-21 | 5 | 5 |
| | | 18 | 2017-18 | 3 | 3 |
| 2015-16 | RS | 19 | 2015-16 | 9 | 8 |
| | | 56 | 2017-18 | 12 | 12 |
| | ES | 39 | 2017-18 | 13 | 8 |
| **एकूण** | | | | **355** | **319** |

लोक लेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती शिफारशींची विभागवार स्थिती ज्यावर कारवाई केलेल्या टिप्पण्या प्रतीक्षित होत्या (मे 2022) हे ***परिशिष्ट 1.4*** मध्ये दर्शविले आहे. ***परिशिष्ट 1.4*** वरुन दिसून येते की 14 विभागांकडून प्रतीक्षित असलेल्या 319 कारवाई केलेल्या टिप्पण्यांपैकी वित्त क्लस्टरमध्ये सर्वांत जास्त कारवाई केलेल्या टिप्पण्या (129 कारवाई केलेल्या टिप्पण्या) प्रलंबित होत्या.

# प्रकरण II

## व्यवहारांचे लेखापरीक्षण
## राज्य शासकीय विभाग

# प्रकरण II

## व्यवहारांचे लेखापरीक्षण: शासकीय विभाग

शासकीय विभागांच्या व्यवहारांच्या लेखापरीक्षणात संसाधनांच्या व्यवस्थापनातील त्रुटी आणि नियमितता, औचित्य आणि मितव्ययता यांच्या निकषांचे पालन करण्यात अपयश आल्याची उदाहरणे समोर आली आहेत.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### 2.1 सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेतलेली इमारती आणि रस्ते ठेवी कामे

वापरकर्ता विभागाकडून निधीच्या अपुऱ्या संवितरणामुळे कामे रखडली गेली आणि सार्वजनिक बांधकाम विभागासाठी दायित्व निर्माण झाले. ठेवी कामे पूर्ण होऊनही दुर्मिळ शासकीय निधीची मोठी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अखर्चित राहिली. विद्युतीकरण, पाणी पुरवठा यांच्या अभावी व पूर्ण झालेल्या इमारती सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हस्तांतरित करण्यात न आल्यामुळे अपेक्षित उद्देशासाठी बांधकाम केलेल्या इमारती/पायाभूत सुविधांचा वापरकर्ते विभाग वापर करू शकले नाही. अपुरे सर्वेक्षण आणि अयोग्य अंदाजामुळे टाळता येण्याजोग्या अतिरिक्त बाबी आणि परिमाणाचे आधिक्य ह्यांची उदाहरणे आढळून आली. विनिर्दिष्ट गुणवत्ता नियंत्रण निकषांचे पालन करण्यात कमतरता निदर्शनास आल्या. निधीचे वळतीकरण, एकाच कामासाठी एकापेक्षा अधिक ओळख पत्र (ID) तयार करणे आणि ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली (DCMS) मध्ये कामाची स्थिती प्रदर्शित न करणे या घटनाही लक्षात आल्या. ठेवी कामांवर देखरेख आणि नियंत्रणाच्या अभावी महाराष्ट्र शासनाची दुर्मिळ आर्थिक संसाधने अपुऱ्या कामांमुळे विनावापर किंवा अवरोधित राहिली.

#### 2.1.1 प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग राज्यातील रस्ते, पूल आणि शासकीय इमारतींच्या बांधकाम आणि देखभालीसाठी जबाबदार आहे. हा विभाग इतर शासकीय आणि निम-शासकीय विभाग किंवा संस्थांद्वारे 'अंशदान आणि ठेवी कामे' (ठेवी कामे) म्हणून सोपवलेली बांधकामे देखील कार्यान्वित करतो. शासकीय आणि निम-शासकीय विभाग किंवा संस्था ज्यांना वापरकर्ता विभाग/अभिकरण म्हणून संबोधल्या जाते त्यांच्याद्वारे ठेवी कामे म्हणून कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली जाते, जे या उद्देशासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विभागांना निधी देतात. या कामांची निविदा काढण्यापूर्वी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यापूर्वी

सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कामांना तांत्रिक मंजुरी दिली जाते. राष्ट्रीय माहिती केंद्र, पुणे यांनी विकसित केलेल्या "ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली" द्वारे वापरकर्ता अभिकरणाकडून प्राप्त झालेल्या निधीचा डिसेंबर 2017 पासून लेखाजोखा ठेवला जात आहे.

महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे नेतृत्व अतिरिक्त मुख्य सचिव करतात आणि त्यांना रस्ते आणि बांधकाम विभागाचे दोन सचिव मदत करतात. रस्ते आणि इमारतींच्या विविध ठेवी कामांची अंमलबजावणी सात[1] प्रादेशिक मुख्य अभियंत्यांच्या तांत्रिक नियंत्रणाखाली केली जाते, ज्यांना मंडळ स्तरावर 31 अधीक्षक अभियंते मदत करतात व त्यांना विभाग स्तरावर 157 कार्यकारी अभियंते मदत करतात. ठेवी कामांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी विभाग जबाबदार आहेत.

अनुपालन लेखापरीक्षण हे सुनिश्चित करण्यासाठी केले गेले की:

i. वापरकर्ते विभाग/अभिकरण यांच्याकडून मिळालेला निधी कामांच्या अंमलबजावणीसाठी विभागाद्वारे मूल्यांकन केलेल्या आवश्यकतेशी सुसंगत होता आणि त्याचा उपयोग विहित तांत्रिक आणि आर्थिक मानदंड/मानके तसेच वापरकर्ता विभागाच्या आवश्यकतेनुसार होता;

ii. निविदा आणि करार व्यवस्थापन निष्पक्ष, पारदर्शक, स्पर्धात्मक आणि क्षेत्राच्या सर्वोत्तम पद्धती यांच्याशी सुसंगत होते आणि करारातील फरक आणि देयके कराराच्या व आर्थिक नियमांच्या तरतुदींनुसार कार्यक्षमतेने व्यवस्थापित केली गेली; आणि

iii. गुणवत्ता नियंत्रण निकषांनुसार कामांची वेळेवर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी आणि प्रभावी देखरेख प्रणाली अस्तित्वात होती.

2018-2021 या कालावधीत 105 सार्वजनिक बांधकाम विभागांच्या संदर्भात रस्ते आणि इमारतींच्या ठेवी कामांचा तपशील ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली वर उपलब्ध होता. ***परिशिष्ट 2.1.1*** मध्ये तपशीलवार दर्शविल्यानुसार लेखापरीक्षेने 26 विभाग (25 टक्के), सात मुख्य अभियंते आणि 15 अधीक्षक अभियंते तपशीलवार पडताळणीसाठी निवडले. कोविड-19 परिस्थिती आणि त्यावरील निर्बंध लक्षात घेता, 2018-2021 या कालावधीत झालेल्या एकूण खर्चावर आधारित नागपूर प्रदेशातील 17 विभागांपैकी नऊ विभाग (50 टक्के), मुंबई प्रदेशातील दोन विभाग (सर्वात लहान प्रदेश असल्याने) आणि उर्वरित पाच प्रदेशांत प्रत्येकी तीन विभागांचे नमुने आयडिया सॉफ्टवेअर वापरून घेण्यात

[1] अमरावती, औरंगाबाद, कोंकण, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे.

आले. या 26 विभागात एकूण 7184 ठेवी कामांपैकी 385 कामे लेखापरीक्षण[2] पडताळणीसाठी निवडण्यात आले.

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष शासनाला कळविण्यात आले (नोव्हेंबर 2021) आणि सचिव (कामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सोबत निर्गमन परिषदे दरम्यान (डिसेंबर 2021) चर्चा करण्यात आली. विभागाच्या उत्तरांचा अहवालात योग्यरित्या समावेश करण्यात आला आहे.

**लेखापरीक्षा निष्कर्ष**

### 2.1.2 आर्थिक व्यवस्थापन

सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय माहिती केंद्र, पुणे मार्फत ठेवी कामांवरील खर्चावर संनियंत्रण ठेवण्यासाठी "ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली" विकसित केली (डिसेंबर 2017). ठेवींशी संबंधित सर्व व्यवहार (04.12.2017) पासून ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली द्वारे केले जातील. 2018-2021 या कालावधीत ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली द्वारे संपूर्ण राज्य आणि 26 नमुने म्हणून घेतलेल्या विभागांच्या संदर्भात प्राप्त निधी आणि ठेवी कामांवर केलेल्या खर्चाचा तपशील **तक्ता 2.1.1** मध्ये दिला आहे.

**तक्ता 2.1.1: प्राप्त झालेला निधी आणि ठेवी कामांवर केलेला खर्च**

**(₹ कोटीं मध्ये)**

| वर्ष | प्राप्त झालेला निधी | | केलेला खर्च | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | नमुने घेतलेले विभाग | राज्य | नमुने घेतलेले विभाग |
| 2018-19 | 3402.13 | 742.34 | 2858.69 | 481.38 |
| 2019-20 | 3014.02 | 911.43 | 3649.29 | 703.69 |
| 2020-21 | 2319.97 | 605.80 | 2929.83 | 535.02 |
| **एकूण** | **8736.12** | **2259.57** | **9437.81** | **1720.09** |

*स्त्रोतः विभागाद्वारे दिलेली माहिती*

### 2.1.2.1 वापरकर्ता विभागांद्वारे कमी निधी निर्गमित करणे

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद 301 आणि 303 विहित करतो की ठेवी कामांवरील परिव्यय, प्राप्त झालेल्या ठेवी रकमेपर्यंत मर्यादित असणे आवश्यक आहे आणि अशा कामांमुळे कोणतेही दायित्व निर्माण करण्यापूर्वी ठेवीची रक्कम देखील वसूल करणे आवश्यक आहे. कामाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीची वसुली करून ती सरकारी तिजोरीत भरली जावी असेही नमूद केले आहे.

[2] नमूना म्हणून निवडलेल्या कामांसाठी गुणवत्ता नियंत्रण मंडळे आणि विद्युत विभागांचे देखील आवश्यकतेनुसार लेखापरीक्षण करण्यात आले.

सोळा[3] विभागांमध्ये लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की 13 वापरकर्ता विभागांनी ₹ 331.16 कोटींच्या आवश्यकतेच्या तुलनेत 1240 ठेवी कामांसाठी केवळ ₹ 158.12 कोटी प्रदान केले, परिणामी, ***परिशिष्ट-2.1.2*** मध्ये दर्शविल्यानुसार ₹ 173.04 कोटी कमी निधी प्रदान केला गेला. वापरकर्ता विभागांद्वारे कमी निधी प्रदान केल्यामुळे पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केल्याप्रमाणे कामांच्या प्रगतीस विलंब झाला.

राज्य शासनाने वस्तुस्थिती स्वीकारतांना (डिसेंबर 2021) वापरकर्ता विभागाद्वारे निधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले.

***शिफारस 1: वापरकर्ता विभागांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळेत निधी जमा केल्याची खात्री शासन करू शकते, जेणेकरून कामे विना विलंब पूर्ण होतील.***

### 2.1.2.2 पूर्ण झालेल्या ठेवी कामांच्या संदर्भात अखर्चित शिलकीचा परतावा न देणे

महाराष्ट्र शासनाने ठेवी कामांच्या अंमलबजावणीसाठी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे (एप्रिल 2017) सांगतात की जर काम पूर्ण करण्यासाठी झालेला एकूण खर्च ठेवी रकमेपेक्षा कमी असेल तर अखर्चित शिल्लक वापरकर्ता विभागाला परत करणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 11[4] विभागांमध्ये 151 ठेवी कामांशी संबधित ₹ 22 कोटी रक्कम, ही कामे पूर्ण झाल्यापासून दोन महिने ते 58 महिन्यांपर्यंत या विभागांकडे पडून होती. परिणामी, शासनाचा निधी, जो इतर कामांची अंमलबजावणी करण्यासाठी वापरला जाऊ शकला असता, अवरोधित झाला.

राज्य शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की प्रगतीपथावरील कामांच्या पुढील दायित्वासाठी ठेवी पडून होत्या आणि काम पूर्ण झाल्यानंतर पडताळणी करून अखर्चित रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले. उत्तर स्वीकार्य नाही कारण काम पूर्ण झाल्याबरोबर अखर्चित शिल्लक परत करायला पाहिजे होती.

---

[3] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, आर्वी, औरंगाबाद, भंडारा, बुलढाणा, हिंगोली, कोल्हापूर, नाशिक, पालघर, पुणे, वर्धा, एकात्मिक युनिट वैद्यकीय (सार्वजनिक बांधकाम) नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

[4] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, आर्वी, औरंगाबाद, भंडारा, हिंगोली, कोल्हापूर, संगमनेर, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसीडेन्सी मुंबई.

### 2.1.2.3 कामांची अंमलबजावणी न झाल्यामुळे निधी अवरोधित होणे

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की 14[5] सार्वजनिक बांधकाम विभागांनी वापरकर्ता विभागांद्वारे ₹ 43.19 कोटी निधी जमा केल्याच्या तारखेपासून एक महिना ते 67 महिन्यांपर्यंतच्या 270 ठेवी कामांची अंमलबजावणी करण्यास विलंब केला, ज्याची चर्चा पुढील **परिच्छेद 2.1.3.2 (i)** मध्ये केली आहे. परिणामी, शासनाचा मोठा निधी अवरोधित झाला.

शासनाने आश्वासित केले (डिसेंबर 2021) की कामांचा आढावा घेतला जाईल आणि मुख्य अभियंत्यांना आवश्यक कारवाई करण्याचे अन्यथा उर्वरित रक्कम परत करण्याचे निर्देश दिले जातील. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

### 2.1.2.4 अनुदान व्यपगत होऊ नये यांसाठी अर्थसंकल्पीय निधीचे ठेवी शीर्षात अनियमित हस्तांतरण

नियंत्रण अधिकाऱ्यांद्वारे कोणत्याही विशिष्ट शीर्षावरील अतिरिक्त खर्चाची पूर्तता करण्यासाठी किंवा अशा निधीतून पुढील वर्षात कोणतेही नवीन काम हाती घेण्याच्या अपेक्षेने कोणतीही अतिरिक्त रक्कम ठेवण्यास महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प नियम पुस्तिका प्रतिबंधित करते आणि वित्तीय वर्षात कोणतीही अखर्चित रक्कम तात्काळ शासनाच्या प्रशासकीय विभागाकडे परत करण्यात यावी. तसेच, महाराष्ट्र शासन, वित्त विभागाने निर्देश दिले (01.04.2019) की अखर्चित अनुदान शासकीय कोषागारात परत करावे अन्यथा रक्कम शासनाला व्यपगत होईल.

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की चार[6] सार्वजनिक बांधकाम विभागांनी अर्थसंकल्पीय कामांपैकी ₹ 22.50 कोटी वित्तीय वर्षाच्या मार्च महिन्यात (मार्च 2016, मार्च 2018, मार्च 2019 आणि मार्च 2020) विद्युत विभागांकडे हस्तांतरित केले. विद्युत विभागांनी या सार्वजनिक बांधकाम विभागांकडे ₹ 14.24 कोटी 80 दिवस ते 813 दिवसांनी परत केले. सार्वजनिक बांधकाम विभागांनी ही रक्कम ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली मध्ये ठेवली ज्यामुळे नियम पुस्तिकेच्या तरतुदींचे आणि वित्त विभागाच्या निर्देशांचे उल्लंघन झाले. अशाप्रकारे, निधी व्यपगत होऊ नये म्हणून शासनाच्या खात्यात परत करण्याऐवजी अनियमितपणे ठेवी शीर्षांतर्गत ठेवल्या.

---

[5] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, आर्वी, औरंगाबाद, भंडारा, भोकर, कोल्हापूर, मालेगाव, संगमनेर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसीडेन्सी मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) पुणे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

[6] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, औरंगाबाद, पुणे, आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर.

तसेच, आर्वी आणि पालघर या दोन विभागातील तीन अर्थसंकल्पीय[7] कामांमध्ये **तक्ता 2.1.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2018-2021 मध्ये अनुदान व्यपगत होण्यापासून टाळण्यासाठी ₹ 104.78 कोटी खर्च ठेवी शीर्ष (MH- 8443) अंतर्गत नोंदविला गेला.

**तक्ता 2.1.2: ठेवी शीर्षांतर्गत नोंदविलेल्या अर्थसंकल्पीय कामांचा तपशील**

**(₹ कोटीं मध्ये)**

| अनु. क्र. | विभागाचे नाव | कामाचे नाव व वर्ष | मुख्य शीर्ष | रक्कम | मार्च 2021 पर्यंतचा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आर्वी | कारंजा आणि आष्टी येथे नव्याने स्थापन झालेल्या नगर पंचायतीच्या मूलभूत सार्वजनिक सुविधा, वर्ष 2018-19 | 2217-9492 | 6.00 | 4.00 |
| 2. | पालघर | रेल्वे ओव्हर ब्रिजसाठी भूसंपादन, वर्ष 2020-21 | 3054-0238 | 125.53 | 100.78 |
| **एकूण** | | | | **131.53** | **104.78** |
| *स्त्रोत: विभागाद्वारे सादर केलेली माहिती* | | | | | |

यावरून असे दिसून येते की अर्थसंकल्पीय अनुदान केवळ ठेवी अनुदान म्हणून मानले गेले नाही तर कामे ठेवी कामे म्हणून कार्यान्वित करण्यात आली.

तसेच, आर्वी विभागाला मिळालेल्या ₹ सहा कोटी अनुदानापैकी ₹ दोन कोटींची बचत झाली आणि विभागाने ₹ एक कोटी 31 मार्च पूर्वी शासनाच्या खात्यात जमा न करता, मुख्याधिकारी, नगर परिषद, कारंजा यांना परत केले. शिवाय, ₹ एक कोटी विभागाकडेच पडून होते.

शासनाने वस्तुस्थिती स्वीकारली (डिसेंबर 2021) आणि नमूद केले की अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून अतिरिक्त निधी हस्तांतरित केला जाणार नाही याची काळजी घेतली जाईल.

### 2.1.2.5 निधीचा अनियमित वापर

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, चंद्रपूरला वळण रस्त्याच्या बांधकामासाठी कर्नाटक ईस्टर्न मिनरल्स अँड ट्रेडिंग एजन्सी कोळसा खाण मर्यादित (KECML), नागपूर, जी कर्नाटक शासनाची एक सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे, तिच्या कडून जून 2010 ते एप्रिल 2011 दरम्यान ₹ 13.76 कोटी प्राप्त झाले. तथापि, हे काम 2014 मध्ये सवलतदारा द्वारे ‘डिझाईन-बिल्ड-फायनान्स-ऑपरेट आणि ट्रान्सफर’[8] (DBFOT) व्यवस्थेद्वारे कार्यान्वित करण्यात आले.

[7] राज्याच्या एकत्रित निधीवर आकारल्या जाणाऱ्या खर्चासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक आर्थिक विवरणात अंतर्भूत खर्चाचे अंदाज.

[8] सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, चंद्रपूर द्वारे.

विभागाने ठेवीची रक्कम स्वतःजवळ ठेवली आणि ही रक्कम KECML ला परत करण्याऐवजी केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत प्रस्तावित असलेल्या दुसऱ्या रस्त्याच्या कामासाठी (जाम-वरोरा-राजुरा-आसिफाबाद रस्ता 86/100 ते 88/00 किमी रस्त्याची सुधारणा) उपयोगात आणली. परिणामी, ज्यासाठी ती प्राप्त झाली होती त्या उद्देशाशी संबंधित नसलेल्या कामासाठी ठेवी रकमेचा अनियमित वापर झाला.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की निधीच्या वापरासाठी प्रकरण वापरकर्ता विभागाकडे पाठविण्यात आले होते; मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून रक्कम वापरण्यात आली. ठेवीची रक्कम सवलतदारांना व्यवहार्यता अंतर निधी (व्हायबिलिटी गॅप फंडिंग) चा एक भाग म्हणून अदा करण्यात आली ज्यामुळे राज्य शासनाच्या हिश्श्यात बचत झाली. उत्तर स्वीकार्य नाही कारण वर्ष 2014 दरम्यान DBFOT अंतर्गत जेव्हा रस्ता बांधला गेला तेव्हाच ही रक्कम मार्गदर्शक तत्वांनुसार विहित केल्याप्रमाणे वापरकर्ता विभागाला परत करण्यात यायला हवी होती किंवा शासनाच्या खात्यात व्यपगत झालेल्या ठेवी म्हणून परत करायला हवी होती.

### 2.1.2.6 निधी वळवणे

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद 305, अशी तरतूद करते की वापरकर्ता विभागाच्या लेखी विनंतीनुसार एका कामासाठीचे योगदान, जर शिल्लक रहात असेल तर, दुसऱ्या कामाच्या खर्चाच्या पूर्ततेसाठी, ज्यासाठी योगदान थकित असेल, वापरले जाऊ शकते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, सात[9] विभागांमध्ये 49 विविध कामांसाठी आवंटित केलेला ₹ 5.07 कोटीचा निधी पूर्व संमतीशिवाय एकाच वापरकर्ता विभागातील एका कामाकडून दुसऱ्या कामाकडे आणि इतर वापरकर्ता विभागांमध्ये देखील वळवला गेला. परिणामी, वापरकर्ता विभागाच्या संमतीशिवाय निधी अनियमितपणे वळवला गेला.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की वापरकर्ता विभागाकडून आवश्यक परवानगी घेतली जाईल. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

[9] सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक, मालेगांव, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम प्रेसीडेन्सी मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर आणि सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) पुणे.

## 2.1.3 अंदाज तयार करणे आणि ठेव कामांची अंमलबजावणी

सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका आणि वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या सूचनांच्या तरतुदींनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे ठेवींची कामे कार्यान्वित केली जातात.

### 2.1.3.1 अंदाज तयार करणे

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेत अशी तरतूद आहे की ज्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने अंदाज मंजूर केले आहेत अशा कामांच्या बाबतीत, अशी कोणतीही वाढ किंवा फेरफार ज्यांच्यामुळे आधिक्य संभवते, जे त्या प्राधिकरणाच्या अधिकारात येणार नाही, ते उच्च प्राधिकाऱ्याच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाही.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की निवडलेल्या 26 पैकी आठ[10] सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतच्या 15 कामांच्या संदर्भात ₹ 15.76 कोटी रक्कमेचे 125 टक्क्यांपेक्षा अधिक परिमाणांचे काम सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेशिवाय कार्यान्वित करण्यात आले. ही वाढ मूळ कामाच्या व्याप्तीत बदल झाल्यामुळे झाली आहे जसे की स्तंभाचा पाया, आर.सी.सी. पायाऐवजी राफ्ट पाया, स्थानाच्या जागेत बदल, वापरकर्ता विभागाकडून मागणी इत्यादि.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की सक्षम अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेण्यासाठी विभागांना आवश्यक सूचना निर्गमित केल्या जातील आणि भविष्यात काळजी घेतली जाईल.

### 2.1.3.2 कामांची अंमलबजावणी

#### i) जमिनीशी संबधित समस्यांमुळे बाधित झालेली कामे

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिच्छेद 251 मध्ये अशी तरतूद आहे की जी जमीन जबाबदार नागरी अधिकाऱ्याकडे रितसर सोपवली गेली नाही अशा जमिनीवर कोणतेही काम सुरू करण्यात येऊ नये. काम सुरू करण्याचे आदेश निर्गमित करण्यापूर्वी ती जमीन सर्व बोज्यांपासून मुक्त असावी. तसेच, शासकीय जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतींच्या बाबतीत कामाचे प्रभारी असलेल्या उप-विभागीय अधिकाऱ्यांनी याबाबत स्वतःचे समाधान करणे आवश्यक आहे की देण्यात आलेले लाईन-आऊट[11] हे पूर्णपणे मंजूर आराखड्यानुसार सरकारी जमिनीच्या आत आहे.

---

[10] सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, भंडारा, भोकर, एकात्मिक (वैद्यकीय) यूनिट मुंबई, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गडचिरोली आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

[11] सीमांकन.

अभिलेख्यांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की मोकळ्या जमीनीचा ताबा नसतांना कामे सुरू केल्यामुळे कामे एकतर विलंबाने झाली किंवा अपूर्ण राहिली.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की आठ[12] विभागांमधील 13 कामांवर अतिक्रमणामुळे विपरित परिणाम झाला. परिणामी, काम पूर्ण होण्यास विलंब, कामाच्या व्याप्तीत बदल, अपूर्ण कामे, काम बंद होणे असे प्रकार घडले.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की वापरकर्ता विभागाने अतिक्रमण मुक्त जमीन उपलब्ध करून दिली नाही. शासनाचे उत्तर मान्य करण्याजोगे नाही कारण वरील तरतुदींच्या दृष्टीने मोकळी जमीन उपलब्ध असल्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागाने काम सुरू करायला नको होते.

**ii) कामे अपूर्ण राहणे**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिच्छेद 318 नुसार दुसऱ्या विभागाच्या वतीने मूळ काम पूर्ण केल्यानंतर, सार्वजनिक बांधकाम 561 या मानक स्वरुपात परिपूर्ती प्रमाणपत्र कार्यकारी अभियंत्याद्वारे संबंधित नागरी किंवा लष्करी प्राधिकाऱ्यास सादर करावे जे त्यांनी हस्ताक्षरीत करून कार्यकारी अभियंत्यास परत करावे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्णय क्र.BDG-2017/सीआर-50/Bldg-2 दिनांक 06.04.2017 मार्फत ठेवी कामांची अंमलबजावणी करतांना अवलंबिल्या जाणाऱ्या प्रक्रियेचा पुनरुच्चार केला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमध्ये अशी तरतूद आहे की ठेवी कामांवरील परिव्यय, प्राप्त ठेव रक्कमेपर्यंत मर्यादित असणे आवश्यक आहे आणि एका कामावरील बचती संबंधातील योगदान वापरकर्ता विभागाच्या संमतीने दुसऱ्या कामाच्या योगदानाबाबतचा परिव्यय पूर्ण करण्यासाठी वापरले जाऊ शकते, ज्याचे योगदान थकित असेल.

➢ दोन विभागांत दोन इमारती जसे मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, पुलगांव, वर्धा आणि मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, चामोर्शी, गडचिरोली अनुक्रमे ₹ 5.51 कोटी आणि ₹ 6.84 कोटी खर्च करून बांधण्यात आल्या, परंतु चामोर्शी येथे निधीची कमतरता आणि पुलगाव येथील हाय टेंशन वायर्स न हलवल्यामुळे इमारतींचे विद्युतीकरण होऊ न शकल्याने अनुक्रमे 17 आणि 25 महिन्यांपासून वापरण्यात आल्या नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विद्युत विभाग यांच्यातील

---

[12] सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा, कोल्हापूर, मालेगांव, नाशिक, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

समन्वयाच्या अभावी इमारती विना वापर पडून राहिल्या. परिणामी, ₹ 12.35 कोटींचा निष्क्रिय खर्च झाला.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की विद्युतीकरणाचे काम मार्च 2022 पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

➢ ***परिशिष्ट 2.1.3*** मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाच विभागांच्या सहा कामांमध्ये लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या ठेवी प्राप्त झाल्या नसतांना कामे सुरू करण्यात आली होती.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की काम पूर्ण करण्यासाठी वापरकर्ता विभागाकडून निधी मागविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. उत्तर स्वीकार्य नाही कारण वापरकर्ता विभागाकडून ठेव मिळाल्यानंतरच कामे सुरु करायला पाहिजे होती.

➢ मालेगांव सार्वजनिक बांधकाम विभागात तालुका क्रीडा संकुलच्या बांधकामाचे ठेवी काम ₹ 0.92 कोटी किंमतीत कार्यादेशापासून 12 महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याकरिता एका कंत्राटदाराला बहाल करण्यात आले (जानेवारी 2015). कंत्राटदाराने नोव्हेंबर 2016 पर्यंत ₹ 0.96 कोटींचे काम निष्पादित केले. प्रत्यक्ष पूर्ण झालेले (नोव्हेंबर 2016) बांधकाम वापरकर्ता विभागाकडे सुपूर्द करण्यात आले होते (जानेवारी 2021). लेखापरीक्षेस असे लक्षात आले की विद्युतीकरणाच्या कामासाठी विद्युत विभागाकडे कोणताही निधी सुपूर्द करण्यात आला नव्हता. इमारत नोव्हेंबर 2016 मध्ये पूर्ण झाली असली तरी विद्युतीकरणाचे काम बाकी होते; त्यामुळे संपूर्ण क्रीडा संकुल अकार्यान्वित होते आणि ₹ 0.96 कोटींचा संपूर्ण खर्च निष्फळ ठरला.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की विद्युतीकरणासाठी निधी उपलब्ध होताच विद्युत काम निष्पादित करण्यात येईल. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (मार्च 2022).

***शिफारस 2: कामे वेळेवर पूर्ण करणे आणि पूर्ण झालेली कामे वापरकर्ता विभागांना सुपूर्द करणे शासन सुनिश्चित करू शकते.***

**iii) करारांच्या अटींचे पालन न करणे**

➢ **नुकसान भरपाई आणि दंड वसूल न करणे**: B-2 [13] आणि ईपीसी [14] (EPC) करारानुसार, काम पूर्ण करण्यात विलंब किंवा महत्वाचा टप्पा न गाठणे (निर्धारित कालावधीनुसार) प्रकरणांत, कंत्राटदाराला देय असलेल्या रकमेतून करार मूल्याच्या 10 टक्क्यांपर्यंत मर्यादित विहित दराने नुकसान भरपाई वजा करण्याची तरतूद करतात.

[13] शेड्यूल कंत्राटासाठी वापरलेले फॉर्म जेथे कंत्राटदाराने निश्चित दरांवर कामे पूर्ण करण्याचे काम हाती घेतले.

[14] अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम.

तसेच B-2 करारामध्ये काम पूर्ण होण्यास विलंब झाल्याबद्दल किंवा कामाची अंमलबजावणी करतांना अपेक्षित गती न ठेवल्याबद्दल कंत्राटदाराच्या देयकातून दंड/ शास्ती वजा करण्याची तरतूद आहे. सहा[15] विभागांच्या नऊ कामांमध्ये लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की कंत्राटदाराने जरी करारात नमूद केलेल्या टप्प्यांनुसार कामाची गती कायम राखली नाही तरी ₹ 3.09 कोटींची निर्धारित नुकसान भरपाई वसूल करण्यात कार्यकारी अभियंता अयशस्वी ठरले. तसेच चार[16] विभागांतील आठ कामांमध्ये असेही निदर्शनास आले की कंत्राटदाराने करारात नमूद केलेल्या कालावधीनुसार कामाची गती कायम ठेवली नाही आणि सुधारित कामाचा आराखडा विभागाकडे सादर केला नाही. तथापि, ₹ 0.56 कोटीच्या विहित दंड/शास्तीची रक्कम वजा करण्यात कार्यकारी अभियंता अयशस्वी ठरले.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की वैध मुदतवाढीच्या कागदपत्रांसह तपशीलवार उत्तर सादर केले जाईल. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (मार्च 2022).

➢ **विमा शुल्काची वसुली न करणे:** विमा संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी निर्देश दिले (मार्च 2015) की कंत्राटदाराने काम सुरू करण्यापूर्वी विमा पॉलिसी घ्यावी अन्यथा कामाच्या मूल्याच्या एक टक्का रक्कम कंत्राटदाराच्या पहिल्या चालू खाते बिलातून वजा केली जाईल आणि ती रक्कम वजावटीच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत सरकारी खात्यात जमा करण्यात येईल. पुढे, निर्देश देण्यात आले (जुलै 2015) की कंत्राटदाराने कामाच्या वाढीव कालावधीसाठी विमा पॉलिसी घ्यावी अन्यथा कामाच्या मूल्यावर वाढीव कालावधीसाठी (महिन्यांत) विहित केलेल्या दरानुसार वजावट कंत्राटदाराच्या त्यानंतरच्या चालू खाते बिलामधून वजा केली जाईल आणि वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाच्या विमा निधीमध्ये जमा केली जाईल.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की डिसेंबर 2014 ते सप्टेंबर 2020 दरम्यान सहा[17] विभागांमध्ये 385 चाचणी तपासणी केलेल्या कामांपैकी नऊ कामांच्या बाबतीत ना कंत्राटदाराने विमा पॉलिसी सादर केली, ना विभागाने कंत्राटदाराच्या चालू खाते बिलातून कामांच्या मूल्याची विहित रक्कम वजा केली, त्यामुळे काम विमा-रहित राहिले आणि कंत्राटदाराला ₹ 0.76 कोटींचा गैरवाजवी लाभ मिळाला. तसेच, चार[18]

---

[15] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, मालेगांव, संगमनेर, वर्धा, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर आणि एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर.

[16] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, आर्वी, भंडारा, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर.

[17] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, औरंगाबाद, भंडारा, मालेगाव, संगमनेर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर.

[18] सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, औरंगाबाद, पालघर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर.

विभागांच्या नऊ कामांमध्ये कंत्राटदाराने, वाढीव कालावधीसाठी विमा पॉलिसीही सादर केली नाही किंवा या कामांमध्ये ₹ 0.45 कोटी रक्कमेच्या कामाच्या मूल्याच्या संदर्भात विहित प्रमाणशीर विमा मूल्य सुद्धा वसूल केले नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराकडून विमा पॉलिसी मिळविण्याकरिता योग्य ती कारवाई केली जात होती.

➢ **मोबिलायझेशन अग्रिमाची वसुली न होणे:** अभियांत्रिकी, खरेदी, बांधकाम कराराच्या बाबतीत त्रैमासिक चक्रवाढीनुसार 14 टक्के वार्षिक व्याज दर मोबिलायझेशन खर्चासाठी आगाऊ देयकाच्या वसुलीसह वसूल केले जाईल. लेखापरीक्षेस निदर्शनास आले की पालघर विभागाच्या पाच ठेवी कामांमध्ये यंत्रसामग्री, उपकरणे, स्टेजिंग, सेंटरिंग (₹ 0.63 कोटी) आणि स्थळ कार्यालय, स्थळ प्रयोगशाळा, संगणक, फर्निचर इत्यादीं (₹ 0.69 कोटी) च्या बांधकामासाठी कंत्राटदारांना ₹ 1.32 कोटीच्या मोबिलायझेशन अग्रिमाचे भुगतान करण्यात आले. तथापि, त्यानंतरच्या बिलामधून व्याजासह मोबिलायझेशन अग्रिम वजा करण्यात आले नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की मोबिलायझेशन अग्रिम वसूल करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यात येईल. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

➢ **कंत्राटदाराच्या बिलामधून रीटेंशन रकमेची वसूली न करणे:** B-2 आणि अभियांत्रिकी, खरेदी, बांधकाम कराराच्या संबंधातील करार अटीमध्ये कामाच्या अंतिमीकरणापर्यंत कंत्राटदाराद्वारे कंत्राटीय बंधनाच्या पूर्ततेची खात्री करण्याकरिता अंतिम करार किंमतीच्या जास्तीत जास्त पाच टक्क्यांच्या अधीन राहून प्रत्येक बिलामधून सहा टक्के रक्कम राखून ठेवण्याची तरतूद आहे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की चार[19] विभागातील 13 कामांमध्ये कंत्राटदाराच्या चालू खाते बिलामधून रीटेंशन रक्कम वसूल करण्यात आली नाही. परिणामी, कंत्राटदारांना ₹ 4.29 कोटींचा अवाजवी आर्थिक लाभ झाला.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराच्या पुढील चालू खाते बिलामधून रीटेंशन रक्कम वसूल करण्याबाबत कारवाई केली जाईल. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

➢ **रिफायनरीकडून डांबराच्या (बिटूमन) बीजकांची पडताळणी न करणे:** महाराष्ट्र शासनाने रिफायनरीतून खरेदी करण्यात येणाऱ्या आणि कंत्राटदाराद्वारे रस्त्यांच्या कामांत वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या बीजकांच्या पडताळणीसाठी तरतूद केली आहे (एप्रिल 2017 आणि मार्च 2019). चालू खात्यांच्या बिलांसोबत मूळ बिटूमेन बीजके जोडणे आवश्यक होते. ही पडताळणी चालू खाते बिल सादर केल्यानंतर सार्वजनिक

[19] सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद, मालेगांव, पालघर आणि संगमनेर.

बांधकाम विभागांद्वारे करण्यात येणे आवश्यक आहे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की तीन[20] विभागांतील नऊ कामांमध्ये विभागाद्वारे रिफायनरीतून खरेदी करण्यात येणाऱ्या डांबराच्या 30 बीजकांची पडताळणी न करता आणि बिलांसोबत न जोडता डांबराच्या कामासंदर्भात ₹ 1.21 कोटींचे भुगतान केले.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की बीजकांची पडताळणी करण्यात आली होती. तथापि, रिफायनरीकडून पडताळणी अहवालांची प्रतिक्षा होती.

➢ **सेंटेज शुल्काची[21] वसुली न करणे:** महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनांनुसार (ऑक्टोबर 2003) ठेवी कामांच्या अंदाजित किंमतीच्या पाच टक्के दराने सेंटेज शुल्काची वसुली करण्याची तरतूद आहे. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 2018-2021 दरम्यान करण्यात आलेल्या पाच[22] विभागांमधील 22 कामांमध्ये विभागाद्वारे नियोजन, गृह, आदिवासी, उद्योग व खनिकर्म, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य, ग्राम विकास, नगर विकास विभागांकडून ₹ 1.66 कोटी सेंटेज शुल्क वसूल करण्यात आले नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की काही वापरकर्ता विभागांसाठी सेंटेज शुल्क न आकारण्याची सवलत मिळण्यासाठी आधारभूत कागदपत्रे सादर करण्यात येत आहेत. तथापि, लेखापरीक्षणाला कोणतीही आधारभूत कागदपत्रे सादर केली गेली नाहीत.

➢ **देखभाल शुल्काची वसुली न करणे:** सामग्रीसाठी कलम 30(i) च्या अतिरिक्त अटींनुसार कंत्राटदाराला काम पूर्ण झाल्यानंतर नमूद केलेल्या कालावधीसाठी कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय पूर्ण झालेल्या कामाची देखभाल करावी लागेल. रस्त्याच्या देखभालीसाठी आणि रस्ते चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी, देखभाल शुल्क म्हणून, केलेल्या एकूण कामाच्या पाच टक्के रक्कम, काम प्रत्यक्षपणे पूर्ण झाल्याच्या तारखेपासून रोखली जाईल. सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद मध्ये लेखापरीक्षणात असे आढळून आले की दोन ठेवी कामांमध्ये चालू खात्याच्या बिलामधून देखभाल शुल्क वसूल करण्यात आले नाही. परिणामी, कंत्राटदाराला ₹ 0.91 कोटींचा अवाजवी लाभ झाला.

---

20 सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, औरंगाबाद आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर.

21 सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे अशासकीय संस्था, सरकारचे इतर विभाग, खासदार/आमदार निधी आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने कार्यान्वित केलेल्या कामांवर आकारले जाणारे शुल्क.

22 सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद, हिंगोली, पालघर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2 यवतमाळ.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराच्या चालू खात्याच्या पुढील बिलामधून देखभाल शुल्क वसूल करण्याबाबत योग्य कारवाई करण्यात येईल. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (मार्च 2022).

➢ **सुरक्षा अग्रिमाचे अनियमित प्रदान:** स्थळावर आणलेल्या सामग्रीच्या सुरक्षिततेसाठी अग्रिमाची आवश्यकता असते, अशा तयार बांधकाम कंत्राटाव्यक्तिरिक्त, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता, कंत्राटदारांना अग्रिमाचे भुगतान करण्यास प्रतिबंधित करते. यासाठी कंत्राटदाराने सामग्री खरेदीचा पुरावा देणारी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पाच[23] विभागांतील सहा कामांमध्ये लेखापरीक्षणास निदर्शनास आले की कंत्राटदारांना ₹ 2.79 कोटीच्या सुरक्षा अग्रिमाचे भुगतान करण्यात आले होते. परंतु कंत्राटदाराने सामग्री खरेदीबाबतचे बीजक सादर केले नाही. परिणामी, कंत्राटदाराला सुरक्षा अग्रिमाचे अनियमित भुगतान करण्यात आले.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराच्या चालू खाते बिलामधून सुरक्षा अग्रिमाची वसुली करण्याबाबतची योग्य कारवाई करण्यात येईल.

➢ **कंत्राटदाराच्या बिलातून स्वामीत्वधन शुल्काची वसुली न करणे:** महाराष्ट्र शासनाने नैसर्गिक खनिजांच्या (गिट्टी, बजरी, रेती, मुरूम इत्यादी) पुरवठ्याच्या बाबींसाठी ₹ 400 प्रति ब्रास (₹ 141.34 प्रति घन मीटर) स्वामीत्वधन शुल्क आकारण्याचे आदेश निर्गमित केले (मे 2015) जे अंदाजामध्ये दर विश्लेषणाच्या परिगणनेकरिता वापरले जाणार होते. कंत्राटदाराला हे शुल्क थेट महसूल विभागात भरावयाचे होते आणि मूळ चालान संबंधित कार्यकारी अभियंत्याकडे सादर करायचे होते. कंत्राटदार दस्तावेज सादर करण्यात अपयशी ठरल्यास स्वामीत्वधन शुल्क कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येणार होते. लेखापरीक्षणास निदर्शनास आले की 2017-18 ते 2020-21 या कालावधी दरम्यान चार[24] विभागांतर्गतच्या नऊ कामांसंदर्भात कंत्राटदाराच्या चालू खाते बिलांमधून ₹ 2.31 कोटींचे स्वामीत्वधन शुल्क वसूल करण्यात आले नाही, परिणामी कंत्राटदाराला अवाजवी लाभ झाला.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराच्या चालू खाते बिलांमधून स्वामीत्वधन शुल्क वसूल करण्याबाबत योग्य कारवाई करण्यात येत आहे.

➢ **अतिरिक्त कार्यनिष्पादन सुरक्षेची वसूली न करणे**: महाराष्ट्र शासनाने आदेश निर्गमित केले (सप्टेंबर 2019) की बोली लावलेल्या अंदाजित किंमतीपेक्षा 14 टक्के

---

[23] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, औरंगाबाद, भंडारा, बुलढाणा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर.

[24] सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, औरंगाबाद, भंडारा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर.

कमी रकमेत देकार (offer) देण्याचा कंत्राटदाराचा हेतू असेल तर त्याने निविदेमध्ये नमूद केलेल्या किंमतीच्या पाच टक्के अतिरिक्त कार्यनिष्पादन सुरक्षा जमा करावी.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की चार कामांचा समावेश असलेल्या तीन[25] विभागांमध्ये ₹ 7.83 कोटींच्या अतिरिक्त कार्यनिष्पादन सुरक्षा आवश्यकतेच्या तुलनेत ₹ 5.08 कोटींची वसुली करण्यात आली. परिणामी, कंत्राटदाराद्वारे अतिरिक्त कार्यनिष्पादन सुरक्षा म्हणून ₹ 2.75 कोटींचे कमी भुगतान करण्यात आले.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदाराच्या चालू खाते बिलामधून अतिरिक्त कार्यनिष्पादन सुरक्षा वसूल करण्याबाबत आवश्यक कारवाई करण्यात येत आहे.

**iv) निष्पादन करतांना गुणवत्ता नियंत्रण मापदंडाचे पालन न करणे**

कराराची अतिरिक्त सर्वसाधारण अट, बांधकाम साहित्यासाठी नमुना चाचणीची वारंवारता आणि क्षेत्र आणि सरकारी प्रयोगशाळेतील चाचणी तपासणीची टक्केवारी निर्धारित करते. कराराच्या खंडानुसार, दराच्या 15 टक्के रक्कम रोखली जाईल आणि ठोस बाबी वगळता निर्दिष्ट केले असतील तेथे समाधानकारक चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संवितरित केली जाईल.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की सात[26] विभागांच्या 14 कामांमध्ये सामग्रीची तपासणी कंत्राटाच्या अटीनुसार करण्यात आली नव्हती. दहा प्रकरणांमध्ये संपूर्ण रक्कम अदा करण्यात आली आणि उर्वरित चार प्रकरणांमध्ये, बिलाच्या रक्कमेपैकी 15 टक्के रक्कम कार्यकारी अभियंत्याने कापून घेतली. चाचणी अहवालाअभावी सामग्री आणि बांधकामाची गुणवत्ता निर्धारित करता आली नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की गुणवत्ता नियंत्रण मापदंडाचे पालन करण्यासाठी योग्य काळजी घेण्यात येईल.

**v) सिमेंट काँक्रिट क्यूब्सची चाचणी करण्यास विलंब:** निविदा अटीनुसार निष्पादनाच्या वेळी कंत्राटदराने सिमेंट काँक्रिटचा नमूना गोळा करणे आवश्यक आहे आणि किमान तीन क्यूब्स बनवून (कास्टिंग करून) त्याची सात दिवस ते 28 दिवसांच्या आयुर्मानासाठी जिल्हा चाचणी प्रयोगशाळेमधून चाचणी करावी. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की बुलढाणा विभागातील चार कामांमध्ये कंत्राटदाराने कास्टिंग पश्चात ***परिशिष्ठ 2.1.4*** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 67 ते 294 दिवसांदरम्यानच्या

---

25 सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, पालघर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर.

26 सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, बुलढाणा, भोकर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

कालावधीनंतर क्यूब्स सादर केले. त्यामुळे कास्टिंगपासून बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर क्यूब्सची चाचणी केल्यामुळे क्यूब्सची प्रत्यक्ष मजबूती पडताळता आली नाही.

सिमेंट काँक्रिट क्यूब्सच्या चाचणीमध्ये विलंब झाला हे शासनाने मान्य केले (डिसेंबर 2021) आणि भविष्यात आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

**vi) क्षेत्रीय प्रयोगशाळेची स्थापना न करणे**: क्षेत्रीय प्रयोगशाळेच्या विशिष्ट अटींनुसार, विचाराधीन कामाच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय संयंत्र येथील प्रयोगशाळेत उपकरणे उपलब्ध असतील. कंत्राटदार क्षेत्रीय/संयंत्र प्रयोगशाळा स्थापित करण्यात अयशस्वी ठरला तर त्यांच्या प्रथम चालू खाते बिलामधून ₹ पाच लाख वसूल करण्यात यावे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडाराच्या एका कामामध्ये आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वीच्या दोन कामांमध्ये कंत्राटदारांने करार मानदंडानुसार क्षेत्रीय प्रयोगशाळा स्थापित केली नव्हती आणि असे करण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांच्याकडून विभागाद्वारे ₹ 15 लाखाची वसुली करण्यात आली नव्हती.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की वस्तुस्थितीची पडताळणी करण्यात येईल आणि क्षेत्रीय प्रयोगशाळा स्थापन करण्याबाबतचे आवश्यक दस्तावेज योग्य वेळी सादर करण्यात येतील. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (मार्च 2022).

**vii) कामाचे विभाजन केल्यामुळे कामांवर झालेला जास्त खर्च**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका अशी तरतूद करते की कामाचा समूह किंवा बदल किंवा खरेदी, ज्याची एकूण किमंत एखाद्या अधिकाऱ्याच्या मंजुरी देण्याच्या अधिकारापेक्षा जास्त आहे, त्यांना त्या अधिकाऱ्याच्या मंजुरीच्या अधिकारात आणण्यासाठी विभाजित केले जाऊ नये. कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांच्याकडे अनुक्रमे ₹ 50 लाखांपर्यंत, ₹ 50 लाख ते ₹ 2.50 कोटी आणि ₹ 2.50 कोटीच्या वरील निविदा स्वीकारण्याचे अधिकार आहेत.

मौजे सिंहगड, गोळेवाडी रस्त्यावरील खडक पडण्यापासून संरक्षण देण्याच्या कामास वन विभागाद्वारे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती (जून 2017). लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की कामासाठी एकच अंदाजपत्रक तयार करून मंजूर करण्याऐवजी पुणे विभागाने तीन विविध साखळ्यांसाठी वेगवेगळे दर आकारून तीन वेगवेगळी अंदाजपत्रके तयार केली. ही कामे नागरी ठेवी कामे अंतर्गत हाती घेण्यात आली आणि वन विभागाने 2014-15 ते 2018-19 दरम्यान वरील कामांकरीता ₹ 4.26 कोटीचे संपूर्ण अनुदान संवितरित केले. विभागाने 0/700 किमी ते 0/800 साखळीसाठी 2018-19 दरम्यान अभिकरणाचा ₹ 9,225 प्रति चौरस मीटर (वस्तू व सेवा कर समाविष्ट) हा सर्वात कमी दर मान्य केला तथापि इतर दोन साखळ्यामध्ये विभागाने

स्वतंत्र दरपत्रक मागविले आणि **तक्ता 2.1.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्याच अभिकरणाचे उच्च दराचे दरपत्रक स्वीकारले.

**तक्ता 2.1.3: कामाचे विभाजन केल्यामुळे प्रदान करण्यात आलेल्या अतिरिक्त रकमेचे विवरण**

**(रक्कम ₹ मध्ये)**

| अनु. क्र. | करार क्र. | चेनेज (साखळी) | परिमाण (चौ. मी.) | दर (₹/चौ.मी.) | दरामधील फरक | अतिरिक्त खर्च | भुगतान केलेली एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7 (6*4)** | **8** |
| 1 | B1/503/ 2018-19 | 0/700 ते 0/800 | 1194.53 | 8118* | - | - | 9697194 |
| 2 | B1/47/ 2020-21 | 0/00 ते 1/500 | 574 | 15551 | 7433 (15551-8118) | 4272282 | 8926274 |
| 3 | B1/49/ 2020-21 | 2/00 ते 2/500 | 650.25 | 15551 | 7433 | 4833308 | 10112037 |
| | | | 390.15 | 15481 | 7363 (15481-8118) | 2872674 | 6039919 |
| **एकूण अतिरिक्त किंमत** | | | | | | **1,19,78,264** | |
| * वस्तू व सेवा कर वगळून | | *स्त्रोत: विभागाद्वारे दिलेली माहिती* | | | | | |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की विभागाने तीन विविध साखळ्यांसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून एका कामाची अनियमितपणे तीन विविध कामांमध्ये विभागणी केली आणि अधीक्षक अभियंत्याकडून मंजुरी प्राप्त करणे टाळण्यासाठी वेगवेगळ्या वर्षांमध्ये कामाची निविदा काढली. साखळ्या 0/00 ते 1/500 आणि 2/00 ते 2/500 मध्ये उच्च दराच्या स्वीकृतीचा परिणाम ₹ 1.20 कोटीच्या अतिरिक्त खर्चात झाला.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की एप्रिल 2018, मे 2019, जून 2020 आणि जून 2021 या चार हप्त्यांमध्ये निधी प्राप्त झाला. परिणामी निधीच्या प्राप्तीनुसार कामाचे विभाजन करण्यात आले. ते पर्यटन स्थळ असल्यामुळे काही भागात काम हाती घेण्यात आले. उत्तर मान्य करण्याजोगे नाही कारण त्याकरिता एकच प्रशासकीय मान्यता आहे ही वस्तुस्थिती असून देखील विभागाने तीन भागांमध्ये कामाचे विभाजन केले आणि वरील कामांसाठी ₹ 4.26 कोटींचा संपूर्ण निधी 2018-19 पर्यंत विभागाकडे उपलब्ध होता.

## 2.1.4 आंतरिक नियंत्रण आणि देखरेख

आंतरिक नियंत्रण यंत्रणा हे वित्तीय आणि क्रियान्वयन नियंत्रणासाठी आणि त्रुटी आणि फसवणुकी विरुद्ध सुरक्षा उपयोगासाठी एक साधन आहे. शासनाच्या संहिता, नियमावली आणि कार्यकारी सूचनांच्या विविध तरतुदींमध्ये नियंत्रणे अंतर्भूत आहेत. ठेवींच्या कामांची भौतिक आणि आर्थिक स्थिती, कार्यक्षमता, त्याच्या निष्पादनाची परिणामकारकता आणि लागू नियम, विनियमन, कराराची अट इत्यादिंचे अनुपालन

याची वाजवी खात्री देण्यासाठी पुरेशी आणि प्रभावी आंतरिक यंत्रणा आणि देखरेख यंत्रणा अस्तित्वात असावी.

ठेवी कामांसंबंधातील सार्वजनिक बांधकाम विभागातील आंतरिक नियंत्रण आणि देखरेख यंत्रणेवरील लेखापरीक्षा निष्कर्ष खाली चर्चिले आहेत:

### 2.1.4.1 ठेव रजिस्टर नोंदवही न राखणे

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहिता, प्रत्येक विभागाद्वारे ठेव रजिस्टरचा रखरखाव प्रदान करते ज्यामध्ये प्रत्येक ठेव बाबीची दरमहा एकूण प्राप्ती, समायोजन आणि अंतिम शिल्लक दर्शविली जाते, तथापि, ठेवी कामांच्या संबंधात अशा सर्व ठेवींसाठी एकत्र नोंद घेणे पुरेसे आहे.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की अठरा[27] विभागांमध्ये ठेव नोंदवही राखली जात नव्हती. चार[28] विभाग ठेव नोंदवही राखत होते परंतु नोंदवही अद्ययावत नव्हती.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की ठेव नोंदवहीचा रखरखाव आणि अद्ययावत ठेवण्याकरिता संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात येतील.

### 2.1.4.2 वापरकर्ता विभागाला खर्चाची प्रगती सादर न करणे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेनुसार जेव्हा खर्च प्राप्त झालेल्या अंशदानाच्या आत असेल आणि प्रत्येक महिन्याला जेव्हा अतिरिक्त रक्कम नियमित होईपर्यंत अंशदानावरील अतिरिक्त खर्च अपेक्षित असेल तेव्हा कार्यकारी अभियंत्यांनी खर्चाचे विवरण प्रत्येक तिमाहीत ठेवीदारास विहित प्रपत्रात पुरवावे.

---

[27] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, आर्वी, औरंगाबाद, भंडारा, चिपळूण, मालेगाव, पुणे, संगमनेर, वर्धा, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गडचिरोली, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसिडेंसी मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

[28] सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर, नाशिक, पालघर आणि एकात्मिक (वैद्यकीय) युनिट मुंबई.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की फक्त दोन[29] विभागांद्वारे खर्चाची आवश्यक प्रगती दर्शविणारे विवरण वापरकर्ता विभागाला सादर करण्यात आले आणि 16[30] विभागांनी ते वापरकर्ता विभागाकडे सादर केले नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की प्रक्रियेचे पालन करण्यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित केल्या जातील.

**2.1.4.3 कामांचा प्रगती अहवाल सादर न करणे**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 289 अनुसार अंदाजे ₹ 10 लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या सर्व कामांचा प्रगती अहवाल प्रत्येक तिमाहीत अधीक्षक अभियंत्याकडे सादर केला जावा, जो ₹ 50 लाखांपेक्षा जास्त किमंत असलेल्या कामांच्या संदर्भात मुख्य अभियंत्याकडे अग्रेषित करण्यात यावा. ज्या प्रकरणांत निधी नियंत्रित करणारा प्रशासकीय विभाग या विभागापेक्षा वेगळा असेल व त्यांच्याद्वारे निर्देश असतील तर, सर्व कामांचा त्रैमासिक प्रगती अहवाल त्या विभागाकडे सादर करावा. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की ₹ 10 लाखांहून अधिक खर्चाच्या सर्व कामांचा प्रगती अहवाल दर तिमाहीत फक्त कोल्हापूर विभागाकडून अधीक्षक अभियंत्याकडे सादर केला गेला. 18[31] विभागांमध्ये सर्व कामांचा प्रगती अहवाल प्रत्येक तिमाहीत अधीक्षक अभियंत्याकडे सादर केला गेला नव्हता.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की प्रक्रियेचे पालन करण्यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित करण्यात येतील.

**2.1.4.4 चालू ठेवी कामांची माहिती सादर न करणे**

ठेवी कामांची योग्य अंमलबजावणी करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे यासाठी महाराष्ट्र शासनाने चालू ठेवी कामांच्या संदर्भात संकलन आणि माहिती सादर करण्याच्या प्रत्येक स्तरासाठी एक प्रपत्र आणि कालमर्यादा विहित केली आहे

---

[29] सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली आणि कोल्हापूर.

[30] सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर, बुलढाणा, चिपळूण, मालेगांव, नाशिक, पालघर, पुणे, संगमनेर, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसिडेंसी मुंबई आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

[31] सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी, औरंगाबाद, भोकर, चिपळूण, हिंगोली, मालेगांव, पालघर, पुणे, संगमनेर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसिडेंसी मुंबई, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग.क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

(एप्रिल 2017). प्रत्येक विभागाने प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेला वर्षनिहाय माहिती (प्रपत्र-अ), संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे आणि त्यानंतर प्रत्येक परिमंडळ कार्यालयाद्वारे प्रादेशिक कार्यालयाला प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला संकलित माहिती (प्रपत्र-ब) सादर करणे आवश्यक आहे. अंतिमतः प्रत्येक मुख्य अभियंत्याद्वारे ती माहिती संकलित करून सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की 26 पैकी एकाही विभागाने चालू ठेवी कामांची माहिती संबंधित परिमंडळ कार्यालयांना सादर केली नाही. त्यामुळे, संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयांनी मुख्य अभियंता कार्यालयांना आवश्यक माहिती (प्रपत्र-ब) सादर केली नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की प्रक्रियेचे पालन करण्यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित केल्या जातील. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (मार्च 2022).

**2.1.4.5 ठेवी कामांच्या वेळापत्रकातील उणीवा**

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग संहितेमध्ये, प्रपत्र-76, ज्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व ठेवी कामांचे महत्वपूर्ण एकत्रित दस्तावेज आहेत, त्यामध्ये ठेवी कामांचे वेळापत्रक तयार करण्याची तरतूद आहे. नोंदी घेण्याच्या सूचना सुद्धा प्रपत्र-76 मधील वेळापत्रकात प्रदान केल्या आहेत आणि जेव्हा वेळापत्रकात प्रथमच काम समाविष्ट केले जाते तेव्हा लाल शाईने मंजुरीची नोंद केली पाहिजे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेवी कामांचे (प्रपत्र-76) वेळापत्रक तयार करण्यासाठी लेखा व्यवस्थापन प्रणाली (AMS) नावाचे सॉफ्टवेअर मोडयुल स्वीकारले आहे जे C-DAC, पुणे ने निर्मित आणि विकसित केले आहे. कॅश-बुक ची डेटा एंट्री ऑनलाइन केली गेली आणि त्यानुसार वेळापत्रक स्वयंचलितपणे निर्माण केले गेले आणि AMS मोड्यूल मधून संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पासवर्डद्वारे काढले जाऊ शकते. प्रणाली निर्मित प्रपत्र-76 मध्ये खालील त्रुटी निदर्शनास आल्या.

i) असे लक्षात आले की प्रणाली निर्मित वेळापत्रकात अंदाजाचे तपशीलवार वर्गीकरण आणि काम पूर्ण झाल्याची तारीख/महिना यासाठी रकाना उपलब्ध नव्हता. अखर्चित शिल्लक, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम अग्रिमांसाठी आकारण्यात आलेला अतिरिक्त खर्च आणि त्याच्या समायोजनासाठी उचललेली पावले यांचा तपशील प्रविष्ट केलेला नाही. अशा प्रकारे, नवीन समाविष्ट केलेले काम तसेच पूर्ण झालेले काम ओळखले जाऊ शकत नव्हते आणि त्यापश्चात वापरकर्ता विभागाकडे ठेवीची अखर्चित रकम परत करण्यास झालेला विलंब, जर असेल तर, यांवर संनियंत्रण ठेवले जाऊ शकत नव्हते. अखर्चित शिल्लक आणि प्राप्त ठेवीपेक्षा जास्त करण्यात आलेला खर्च यावरील माहितीच्या अभावी त्यात समाविष्ट असलेली रक्कम आणि त्याच्या समायोजनासाठी उचललेली पावले निश्चित करता आली नाहीत. यावरून असे सूचित

होते की ठेवी कामांच्या प्रणाली निर्मित वेळापत्रकाचे स्वरूप ठेवी कामांच्या देखरेखीसाठी अपुरे होते.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की मोडयूल सुधारित करण्यासाठी ही बाब C-DAC कडे संदर्भित करण्यात येत आहे. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

ii) अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि व्यवस्थापन प्रणाली (BEAMS) यावरील संबंधित उपयोगिता प्रमाणपत्रांसंबंधात त्या महिन्या दरम्यान झालेल्या ठेवी कामांच्या खात्याच्या सत्यतेची खात्री करण्यासाठी लेखापरीक्षणाने ठेवी कामांवरील प्राप्त ठेवी आणि झालेल्या खर्चाची पडताळणी केली. असे निदर्शनास आले की 13[32] विभागांमध्ये उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये दर्शविलेले कामांच्या प्राप्त निधी आणि खर्चाचे आकडे प्रपत्र-76 मध्ये दर्शविलेल्या संबंधित आकड्यांशी जुळत नव्हते.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की सॉफ्टवेअरच्या अद्ययावतीकरणासाठी ही बाब C-DAC कडे संदर्भित करण्यात येत आहे. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

**2.1.4.6 ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणालीतील उणीवा**

वास्तविक वेळेवर आधारित ठेवी कामांवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने (सार्वजनिक बांधकाम विभाग), राष्ट्रीय माहिती केंद्र, पुणे द्वारे "ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली" विकसित केली. ही प्रणाली चालू कामांची प्रगती, प्राप्त निधी, झालेला खर्च आणि अखर्चित रक्कम याबाबत वास्तविक वेळेवर आधारित माहिती प्रदान करते. ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणालीमध्ये ठेवींच्या कामांची नोंद करणे आणि त्याचे भुगतान करणे यांकरीता ठेवी कामांचे नियंत्रण आणि संनियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या (डिसेंबर 2017).

ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणालीमध्ये खालील उणीवा लेखापरीक्षेस निदर्शनास आल्या.

➢ **काम पूर्ण झाल्याची तारीख उपलब्ध नसणे:** ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली वर काम पूर्ण झाल्याची तारीख असायला हवी जेणेकरून कामांची भौतिक आणि आर्थिक स्थिती ओळखता येईल आणि परिणामी वापरकर्ता विभागांना खर्च न केलेल्या रकमेचा वेळेवर परतावा मिळेल. तथापि, ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणालीमध्ये अशी कोणतीही माहिती पुरविण्यात आली नाही.

---

[32] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, भोकर, बुलढाणा, हिंगोली, मालेगांव, संगमनेर, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गडचिरोली, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

➢ **एका कामाची अनेक ओळख पत्र:** लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की सात[33] विभागांमधील नऊ ठेवी कामांमध्ये ठेवी ओळख पत्रांचे दोनदा वाटप करण्यात आले. अशा प्रकारे, एकाच कामासाठी अनेक ओळख पत्र तयार केल्यामुळे कामावर प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणे किंवा निधी वळतीकरणाची शक्यता नाकारता येत नाही.

➢ **कोणतीही ठेव प्राप्त न होता खर्च किंवा शिल्लक दर्शविणे:** सहा विभागांमध्ये लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की 44 कामांच्या बाबतीत विभागांना कोणतीही ठेव रक्कम प्राप्त झाली नाही. परंतु, अशा कामांच्या पुढे ठेवी अंतर्गत झालेला खर्च किंवा शिल्लक रक्कम दाखविली जात होती. यावरून असे निर्देशित होते की ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणालीने कोणत्याही निधीची प्राप्ती न होता ठेव कामांवर खर्च दर्शविला.

➢ **उणे ठेव शिल्लक:** पंधरा[34] विभागांमध्ये लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की 158 कामांच्या बाबतीत ठेवी अंतर्गत ₹ 55.46 कोटी उणे शिल्लक होती.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की सॉफ्टवेअर अद्ययावत करण्यासाठी प्रकरण C–DAC कडे पाठविले जात आहे. पुढील प्रगती प्रतीक्षित होती (मार्च 2022).

***शिफारश 3: ठेव-अंशदान संनियंत्रण प्रणाली सुव्यवस्थित करणे आणि ठेवी कामांची आंतरिक नियंत्रण आणि देखरेख प्रणाली मजबूत करणे याबाबत शासन खात्री करू शकते.***

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### 2.2 दुरुस्तीच्या कामांवर विभागाने केलेल्या खर्चाची वसुली करण्यास विलंब झाल्यामुळे सवलतदारांना ₹ 1.44 कोटींचा अनुचित लाभ

मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम विभाग) महाराष्ट्र शासन, नवी मुंबई (मुख्य अभियंता) यांनी मेसर्स गॅनोन डंकर्ले आणि कंपनी मर्यादित, मुंबई सवलतदार) यांना अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम कराराच्या अनुक्रमे

---

[33] सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद, हिंगोली, कोल्हापूर, मालेगांव, पुणे, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 ठाणे.

[34] सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, औरंगाबाद, भंडारा, बुलढाणा, चिपळूण, मालेगांव, नाशिक, पुणे, संगमनेर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1 चंद्रपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 गोंदिया, एकात्मिक (वैद्यकीय) युनिट नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 नागपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3 नागपूर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 यवतमाळ.

₹ 151.61 कोटी आणि ₹ 145.26 कोटी रकमेच्या दोन कामांसाठी[35] स्वीकृती पत्रे निर्गमित केली (15 मार्च 2017 आणि 13 एप्रिल 2017). दोन्हीही अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम करार, मुख्य अभियंता (भारत सरकारच्या वतीने, मार्ग परिवहन आणि महामार्ग मंत्रालय) आणि सवलतदार यांच्यात कार्यान्वित झाले (20 डिसेंबर 2016). कामे पूर्ण करण्याचा निर्धारित कालावधी स्वीकृति पत्रे निर्गमित केल्यापासून अनुक्रमे 18 महिने आणि 24 महिने होता. मुख्य अभियंता आणि प्रादेशिक अधिकारी, मार्ग परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, मुंबई यांनी ₹ 127.10 कोटी (ऑगस्ट 2021) आणि ₹ 70.66 कोटी (जून 2021) सवलतदारांना प्रदान केले.

अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम करारांमध्ये अशी तरतूद होती की बांधकामाच्या कालावधी दरम्यान, सवलतदाराने त्यांच्या खर्चाने प्रकल्प महामार्गाचे विद्‌यमान मार्ग राखले पाहिजेत, जेणेकरून रहदारीची पात्रता आणि सुरक्षितता त्यांच्या कराराच्या तारखेच्या दहा दिवस आधीच्या स्थितीच्या तुलनेत कोणत्याही वेळी भौतिकदृष्ट्या निकृष्ट राहणार नाही. तसेच, सवलतदाराने या उद्देशासाठी आवश्यक दुरुस्ती आणि देखभालीची कामे हाती घेतली पाहिजे; जर कामाच्या कार्यक्षम प्रगतीसाठी आणि चांगल्या उद्‌योग पद्धतीला अनुसरून व्यत्यय आणि वळवणे आवश्यक असेल तर सवलतदार त्याच्या खर्चाने वाहतुकीच्या प्रवाहात व्यत्यय आणू शकतो किंवा वळवू शकतो.

लेखापरीक्षणाला असे दिसून आले की कामांच्या अंमलबजावणी दरम्यान करारामध्ये तरतूद केल्यानुसार विद्‌यमान वाहतूक मार्ग आणि रहदारीची पात्रता राखण्यात सवलतदार अयशस्वी ठरला. अशाप्रकारे, राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभाग, नांदेड यांनी (डिसेंबर 2017 आणि मार्च 2018) ₹ 1.76 कोटी खर्चून (मार्च 2018) रस्त्यांच्या त्याच साखळीवर 63 सामान्य दुरुस्तीच्या कंत्राटांद्‌वारे देखभाल कामे केली ***(परिशिष्ट-2.2.1)***. अशाप्रकारे, विभागाने स्वतःच्या खर्चाने सवलतदाराचे दायित्व पूर्ण केले. तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटल्यानंतर देखील (सप्टेंबर 2021) सवलतदाराकडून रक्कम वसूल करण्यात आली नाही.

कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभाग, नांदेड यांनी नमूद केले (सप्टेंबर 2021) की सवलतदार रस्त्याची देखभाल करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे

[35] "बारसगाव ते रहाटी बु.चे पुनर्वसन आणि उन्नतीकरण राष्ट्रीय राजमार्ग-222 चा (महाराष्ट्र/आंध्रप्रदेश सीमा भाग 558/200 ते किलोमीटर 615/000 मध्ये विद्‌यमान ते दोन लेन पक्की खांद्‌यासह ईपीसी आधारावर राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम-VI" आणि "महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय राजमार्ग-222 च्या कोल्हा ते नसरतपुर चे पुनर्वसन आणि उन्नतीकरण भाग किलोमीटर 444/00 ते किलोमीटर 463/545 आणि किलोमीटर 481/00 ते किलोमीटर 513/1300 मध्ये विद्‌यमान ईपीसी तत्वावर पक्क्या खांद्‌यासह दोन लेन राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम-IV" .

लवकरात लवकर रस्ता सुरक्षित आणि वाहतुकीस योग्य बनविण्यासाठी सामान्य दुरुस्तीची कामे केली गेली आणि या कामांवर खर्च केलेली रक्कम सवलतदाराकडून वसूल करायची होती. परंतु, कोरोना महामारीमुळे वसुली करणे शक्य झाले नाही आणि आतापर्यंत वसूल केलेले ₹ 0.32 कोटी वगळून (2017-18 चे बी-1 क्र. 32 ते 45 कामांच्या संदर्भात) अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम कामांना अंतिम स्वरूप देण्यापूर्वी वसुली करण्यात येईल.

उत्तर स्वीकार्य नाही कारण सामान्य दुरुस्तीच्या कामांशी संबंधित भुगतान मार्च 2018 मध्ये केले गेले आणि कोरोना महामारीशी संबंधित निर्बंध मार्च 2020 पासून सुरू झाले. म्हणजेच, या दोन्ही घटनांमध्ये दोन वर्षांचे अंतर होते आणि तीन वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही केवळ ₹ 0.32 कोटी वसूल झाले असून ₹ 1.44 कोटी शिल्लक आहेत. दुरुस्तीच्या कामांवर विभागाने केलेल्या खर्चाची वसुली करण्यास विलंब झाल्यामुळे सवलतदारांना ₹ 1.44 कोटींचा अवाजवी लाभ झाला, जो सामान्यतः सवलतदाराने स्वतःच्या खर्चाने करायला पाहिजे होता.

ही बाब शासनाकडे संदर्भित केली (नोव्हेंबर 2021). उत्तर प्रतीक्षित आहे.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### 2.3 राष्ट्रीय राजमार्ग म्हणून अधिसूचित केलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणावर ₹ 3.48 कोटींचा टाळता येण्याजोगा खर्च

भारत सरकार, मार्ग परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांनी मुलताई (मध्य प्रदेशात) जवळील राष्ट्रीय महामार्ग 47 जंक्शन पासून सुरु होऊन वरूड, आष्टी, आर्वी, पुलगाव, वर्धा सेवाग्राम, सोनेगाव, हिंगणघाट, जांब यांना जोडणारा आणि वरोरा जवळील (महाराष्ट्रात) राष्ट्रीय राजमार्ग-930 जंक्शन ला संपणारा राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग म्हणून अधिसूचित केला (जानेवारी 2017). त्यानुसार, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांनी (फेब्रुवारी 2017) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम क्षेत्र, नागपूर यांना राष्ट्रीय महामार्ग म्हणून अधिसूचित केलेल्या रस्त्यांवरील सर्व कामे त्वरित थांबवण्याचे निर्देश दिले. सिमेंट काँक्रीटचे रस्ते टाकण्यासाठी सध्याच्या रस्त्यांचे खोदकाम लवकरच केले जाणार असल्याने शासनाची जबाबदारी वाढू नये यासाठी निर्देश दिले. असे रस्ते संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होईपर्यंत योग्य दुरुस्ती आणि देखभालीची कामे करून रहदारीयोग्य स्थितीत ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले. त्यावर्षी पावसाळयात टिकून राहाण्यासाठी सध्याच्या वाहतूक मार्गावर उपचार केल्यानंतर या रस्त्यांवर सुरु असलेली सर्व कामे थांबवण्याच्या सूचनांसह निर्देशांचा पुनरूच्चार करण्यात आला (मार्च 2017).

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांच्या पडताळणी दरम्यान असे दिसून आले (सप्टेंबर 2019) की नाचणगाव-देवळी-वायगाव-हिंगणघाट-नंदोरी-कोरा रस्ता (एसएच-322) 34/500 ते 55/500 किमी मध्ये रुंदीकरणाचे आणि सुधारणा करण्याच्या कामाची अंदाजे ₹ 34.02 कोटी खर्चाची निविदा काढण्यात आली (ऑगस्ट 2016) आणि 18 महिन्यात पूर्ण करण्याच्या कालावधीसह ₹ 26.32 कोटीच्या कंत्राट किंमतीत कंत्राटदाराला[36] काम देण्यात आले[37] (जानेवारी 2017).

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी मध्ये हे निरीक्षण केले (फेब्रुवारी 2018) की पुलगांव-आर्वी-तळेगांव-दुर्गावसा रस्त्याचे (एसएच 295) 59/600 ते 61/800 किमी मध्ये बळकटीकरण व काळ्या टॉपींगसह आर्वी शहरात चौपदरीकरणासह उड्डाण-पुलाचे बांधकाम ₹ 4.05 कोटींच्या खर्चासह कंत्राटदाराला[38] देण्यात आले (जानेवारी 2017).

मुख्य अभियंत्यांनी तपासणी दरम्यान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा (फेब्रुवारी 2017) आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी (जानेवारी 2018) यांना कामाची व्याप्ती कमी करण्याचे आणि योग्य दुरूस्ती आणि देखभालीचे काम करून हे रस्ते रहदारीयोग्य स्थितीत ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, या दोन्ही रस्त्यांच्या कामांची व्याप्ती कमी करून खाली दर्शविल्यानुसार पूर्ण करण्यात आले:

| सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाव आणि काम | मूळ कामाचा खर्च आणि व्याप्ती | कमी झालेला कामाचा खर्च आणि व्याप्ती | कार्यादेशाची आणि पूर्ण झाल्याची तारीख |
|---|---|---|---|
| वर्धा आणि एस एच-347A रुंदीकरणाचे (40/500 ते 55/500 किमी) आणि सुधारणांचे (34/500 ते 55/500 किमी) काम | 15 किमी लांबीच्या रुंदीकरणासह 21 किमी लांबीच्या सुधारणेसाठी ₹ 26.32 कोटी | 15 किमी (40/500 ते 55/500 किमी) लांबीसाठी ₹ 8.11 कोटी रुंदीकरण सुधारणे 5 किमी (40/500-45/500 किमी) रुंदीकरण (₹ 3.12 कोटी) | जानेवारी 2017 आणि जुलै 2018 |
| आर्वी आणि एसएच-295 च्या भागाच्या रुंदीकरणाचे आणि सुधारणेचे (किमी 59/600-61/800) काम | 2.2 किमी लांबीच्या रुंदीकरणासह सुधारणेसाठी ₹ 4.05 कोटी | 1.7 किमी (किमी 59/600-61/300) लांबीत सुधारणा करण्यासाठी ₹ 0.88 कोटी आणि 0.7 किमीच्या (किमी 59/600-60/300) भागाचे रुंदीकरण (₹ 0.36 कोटी) | जानेवारी 2017 आणि मार्च 2018 |

36 मे. जसवंत सिंह ओबेरॉय कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, यवतमाळ.

37 करार क्र बी-1/523/डीएल/2016-17.

38 मे. डी के कन्स्ट्रक्शन, आर्वी.

कंत्राटदाराला वर्धा विभागातील रुंदीकरणाच्या कामासाठी ₹ 3.12 कोटींसह कार्यान्वित केलेल्या कामासाठी पाचव्या आणि अंतिम चालू खाते बिलातून ₹ 8.11 कोटींचे भुगतान करण्यात आले (सप्टेंबर 2019). आर्वी विभागाने रुंदीकरणाच्या कामासाठी ₹ 0.36 कोटींसह ₹ 0.88 कोटींचे भुगतान केले (ऑगस्ट 2018) आणि राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूरला रस्ता हस्तांतरित केला (जुलै 2018).

या विभागांद्वारे विद्यमान रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामांची अंमलबजावणी, सचिवांच्या वरील निर्देशांप्रमाणे नव्हती, ज्यात राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झालेले रस्ते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होईपर्यंत, त्यांची फक्त योग्य दुरूस्ती आणि देखभाल करण्याचे निर्देश दिले होते. असे असतानाही, वर्धा आणि आर्वी विभागांनी हे काम देखभाली पुरते मर्यादित ठेवण्याच्या सचिवांच्या निर्देशाचे पालन करण्यासाठी कोणतीही कारवाई न करता रस्त्याच्या रुंदीकरणाच्या नवीन कामाचा समावेश केला. रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामावर ₹ 3.48 कोटी (3.12+0.36 = 3.48) खर्च केला गेला.

शासनाने सांगितले (जुलै 2022) की सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा यांच्या कामाच्या बाबतीत, 2017 च्या पावसाळयात रस्ता रहदारीयोग्य स्थितीत ठेवता यावा यासाठी किमान संभाव्य खर्च करून कामाची व्याप्ती कमी करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वीच्या बाबतीत राईडिंग गुणवत्ता राखण्यासाठी काम करण्यात आले.

उत्तर स्वीकार्य नाही कारण कामाची कमी झालेली व्याप्ती केवळ अस्तित्वात असलेल्या वाहतूक मार्गाची दुरूस्ती आणि देखभाल करण्यापुरती मर्यादित नव्हती तर अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे नवीन कामही करण्यात आले. सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या बांधकामासाठी हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून अधिसूचित (जानेवारी 2017) झाल्यामुळे, राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी संपूर्ण रस्ता खोदण्यात येणार होता. त्यामुळे अस्तित्वात असलेला रस्ता रहदारीयोग्य स्थितीत ठेवणे गरजेचे होते, परंतु राष्ट्रीय महामार्गाचा सिमेंट काँक्रीटचा रस्ता पाहता रस्त्याचे रुंदीकरण टाळता येण्यासारखे होते. परिणामी, रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या कामाच्या अंमलबजावणीमुळे ₹ 3.48 कोटींचा टाळता येण्याजोगा खर्च झाला.

## महसूल व वन विभाग

## 2.4 स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उद्यान निर्मिती योजनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी

**स्वर्गीय उत्तमराव पाटील जैव-विविधता वन उद्याने म्हणून संबोधल्या जाणाऱ्या आणि निर्मितीसाठी हाती घेण्यात आलेल्या 67 जैव-विविधता उद्यानांपैकी केवळ 15 जैव-विविधता उद्याने पूर्णत्वास जाऊ शकली आणि हस्तांतरित करण्यात (मार्च 2021) आली. जागांच्या अयोग्य निवडीमुळे अयशस्वी वृक्षारोपण आणि अशासकीय जमिनीवर उद्यानांची निर्मिती करण्यात आली. अंदाजपत्रक आणि खर्च यांवर नियंत्रणाचा अभाव होता. निधी कमी दिल्यामुळे योजनेची मुदत वाढली आणि बहुतांश उद्याने अपूर्ण राहीली. निर्धारित कालावधीत जैव-विविधता उद्याने पूर्ण न झाल्यामुळे आणि जैव-विविधता उद्यानांच्या निर्मिती दरम्यान तयार केलेल्या मालमत्तेच्या देखभालीसाठी तपशीलवार प्रकल्प अहवालात कोणतीही तरतूद नसल्यामुळे निर्मित मालमत्तेचा ऱ्हास झाल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.**

### 2.4.1 प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने जैव विविधता उद्यानांच्या निर्मितीसाठी 'स्वर्गीय उत्तमराव पाटील वन उद्यान' म्हणून संबोधल्या जाणारी राज्य पुरस्कृत योजना सुरू केली (जून 2015). वन विभागाच्या अंतर्गत विद्यमान राष्ट्रीय आणि इतर उद्यानांच्या श्रेणी सुधारासह ही जैव-विविधता उद्याने प्रत्येक जिल्हयात दोन (एकूण 68 जैव-विविधता उद्याने) यांप्रमाणे राज्यातील 34 जिल्हयांमध्ये (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळून) तयार केली जाणार होती. ही योजना वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेद्वारे 2015-2016 ते 2018-19 या कालावधीत राबविण्यात येणार होती, जी ₹ 134.14 कोटी अर्थसंकल्पीय तरतुदींसह आणखी चार वर्षांनी म्हणजेच 2022-2023 पर्यंत वाढविण्यात आली (जून 2019).

या योजनेची उद्दिष्टे:

- जैव-विविधता आणि निसर्गाचे संवर्धन करणे,
- दुर्मिळ आणि सुंदर वनस्पतींचे रोपण, संरक्षण आणि संवर्धन करणे,
- उपवने निर्माण करणे (विविध प्रकारच्या वनस्पतींचे छोटे गट असलेले),
- लोकांना निसर्गासोबत आनंदाचे क्षण घालविण्यात सुलभता,
- मनोरंजन आणि करमणुकीची साधने उपलब्ध करून देणे,
- भावी पिढीसाठी सुरक्षित वातावरण निर्मिती,

- झाडांचे महत्व अधोरेखित करणाऱ्या पुस्तकांसह एका छोट्या वाचनालयाची स्थापना आणि त्यांचा प्रसार करणे ही होती.

जैव-विविधता उद्याने पूर्ण झाल्यानंतर स्थानिक लोकांच्या सहभागातून शक्यतो संयुक्त वन व्यवस्थापन समिती, जेथे ती कार्यरत होती, त्याद्वारे चालवायची आणि देखरेख करायची होती. अन्यथा उद्याने चालविण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी गाव पातळीवर स्थानिक लोकांचा समावेश असलेली समिती किंवा स्थानिक संस्था आवश्यक होती.

या योजनेची अंमलबजावणी विभाग स्तरावर विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, मंडळ स्तरावर सहा[39] वन संरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्या देखरेखी खाली आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

जैव-विविधता उद्याने निर्मिती योजनेची अंमलबजावणी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार झाली आणि योजनेची देखरेख यंत्रणा कार्यरत आणि प्रभावी होती हे तपासण्यासाठी अनुपालन लेखापरीक्षण करण्यात आले. वन संवर्धन अधिनियम 1980, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले शासकीय निर्णय/आदेश/परिपत्रके आणि जैव-विविधता उद्यानांचे तपशीलवार प्रकल्प अहवाल निकष म्हणून वापरण्यात आले**.**

ही उद्याने निर्माण करण्याचे ठरविण्यात आलेल्या 34 पैकी 15 [40] जिल्हयांची (44 टक्के), लेखापरीक्षा विश्लेषणासाठी निवड करण्यात आली होती. कोविड-19 महामारीमुळे जास्तीत जास्त लेखापरीक्षा चाचणी तपासणी नजीकच्या परिमंडळांसाठी नियोजित केली होती, जसे, अमरावती (पाच पैकी तीन जिल्हे) आणि नागपूर (सहापैकी पाच जिल्हे). तसेच, उर्वरित चार परिमंडळात (औरंगाबाद, नाशिक, पुणे आणि ठाणे) 23 पैकी सात जिल्हयांची निवड साध्या यादृच्छिक नमुना पद्धतीने करण्यात आली होती. निवडलेल्या जिल्ह्यांतील विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांच्या एप्रिल 2015 ते मार्च 2021 या कालावधीतील अभिलेख्यांच्या चाचणी तपासणी व्यतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, पुणे यांच्यासह चार वन संरक्षक, सामाजिक वनीकरण (अमरावती, नागपूर, पुणे आणि ठाणे) कार्यालयांमध्ये लेखापरीक्षा तपासणी करण्यात आली. ऑक्टोबर 2020 आणि सप्टेंबर 2021 या कालावधीमध्ये लेखापरीक्षण करण्यात आले.

---

[39] अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, पुणे आणि ठाणे.

[40] भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर आणि वर्धा (नागपूर मंडळ), अकोला, अमरावती आणि यवतमाळ (अमरावती मंडळ), जालना, नांदेड, उस्मानाबाद (औरंगाबाद मंडळ), धुळे, नाशिक (नाशिक मंडळ) सोलापूर (पुणे मंडळ) आणि ठाणे (ठाणे मंडळ).

राज्यात ₹ 134.14 कोटी खर्चून 68 जैव-विविधता उद्याने निर्माण करण्याच्या प्रस्तावित कामांपैकी 67 जैव-विविधता उद्यानांच्या निर्मितीचे काम हाती घेण्यात आले होते. तथापि, लेखापरीक्षेला असे लक्षात आले की मार्च 2021 पर्यंत ₹ 96.52 कोटी (72 टक्के) इतका खर्च करण्यात आला आणि केवळ 15 जैव-विविधता उद्याने (22 टक्के) पूर्ण केली जाऊ शकली (मार्च 2021). ऑगस्ट 2022 पर्यंत 35 जैव-विविधता उद्याने (52 टक्के) पूर्ण झाली होती आणि उर्वरित 32 जैव-विविधता उद्यानांचे काम प्रगतीपथावर होते. तसेच 35 पूर्ण झालेल्या जैव-विविधता उद्यानांपैकी 21 जैव-विविधता उद्याने हस्तांतरित करण्यात आली (ऑगस्ट 2022).

***परिशिष्ट* 2.4.1** मध्ये तपशीलवार दर्शविल्याप्रमाणे निवडलेल्या 15 जिल्ह्यांमध्ये 32 जैव-विविधता उद्याने निर्माण करण्याकरिता हाती घेण्यात आली होती, ज्यांचा लेखापरीक्षणात अंतर्भाव करण्यात आला होता.

अनुपालन लेखापरीक्षेचे निष्कर्ष राज्य शासनाला निर्गमित करण्यात आले (नोव्हेंबर 2021) व मुख्य सचिव (वने) यांच्या समवेत 25 नोव्हेंबर 2021 रोजी आयोजित निर्गमन बैठकीत त्यावर चर्चा करण्यात आली. विभागाची मते/उत्तरे योग्यरित्या अंतर्भूत करण्यात आली आहेत.

**लेखापरीक्षा निष्कर्ष**

निवडलेल्या 15 जिल्ह्यांमध्ये निर्मितीसाठी हाती घेण्यात आलेल्या 32 जैव-विविधता उद्यानांपैकी केवळ 15 जैव विविधता उद्याने पूर्ण झाली आणि 17 जैव-विविधता उद्यानांमध्ये काम प्रगतीपथावर होते (ऑगस्ट 2022).

जैव-विविधता उद्याने निर्मितीचे उद्दिष्ट साध्य न होण्याची कारणे पुढील परिच्छेदांमध्ये दर्शविण्यात आली आहेत.

### 2.4.2 जागेचे नियोजन आणि निवड

प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांनी जागेची निवड आणि योजनेचा तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सूचना निर्गमित केल्या (एप्रिल आणि जून 2015). या सूचनांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की जैव-विविधता उद्याने गावा लगतच्या केवळ सरकारी जमिनी (वन जमीन/वनेतर जमीन), ज्या उपयोगात नाही किंवा विद्यापीठे/महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी उद्यानासाठी आरक्षित केलेल्या जागेवर निर्माण केली जावी. जैव-विविधता उद्यान 5 ते 10 हेक्टर क्षेत्रफळाच्या जागेत वस्ती/गावाच्या 500 मीटरच्या आत असावे आणि जमीन खडकाळ किंवा निकृष्ट दर्जाची नसावी.

### 2.4.2.1 विहित अंतराच्या पलीकडे स्थित जैवविविधता उद्याने

निवडलेल्या 32 जैव-विविधता उद्यानांपैकी बारा[41] उद्याने 500 मीटर अंतराच्या पलीकडे आणि मानवी निवास/गावापासून पाच किलोमीटर अंतरापर्यंत ग्रामीण क्षेत्रात स्थित असलेली आढळली, जे प्रधान मुख्य वन संरक्षक, पुणे ह्यांनी जैव-विविधता उद्यानांच्या निर्मितीसाठी दिलेल्या सूचनांच्या (एप्रिल 2015) विपरीत होते. जैव-विविधता उद्याने विहित अंतरापेक्षा जास्त अंतरावर स्थित असल्यामुळे कमी अभ्यागतांच्या भेटीची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही, जे त्यांच्या परिसरात मनोरंजन आणि पर्यावरण शिक्षण सुविधेच्या तरतुदीद्वारे लोकांमध्ये निसर्ग संवर्धनाला चालना देण्याच्या योजनेच्या उद्देशाला विफल करते.

राज्य शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की, मुख्य रस्त्याला लागून किंवा काही ऐतिहासिक अथवा धार्मिक स्थळांच्या जवळ, जेथे समर्पित अभ्यागतांच्या भेटी अपेक्षित होत्या, अशा ठिकाणी जैव-विविधता उद्यानांच्या जागांची निवड करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला.

तथापि, हे नमूद केले की या 12 जैव-विविधता उद्यांनांपैकी फक्त एक (तीर्थ जैव-विविधता उद्यान) धार्मिक स्थळाजवळ आणि चार जैव-विविधता उद्याने (गोंडपिंपरी, कुरुम, मदलाबाद आणि नवाटोला) हे मुख्य रस्त्यालगत होते आणि उर्वरित जैव-विविधता उद्याने जवळच्या गावांपासून दूर स्थित होते ज्यामुळे उद्यानाला भेट देणाऱ्या लोकांची संख्या कमी होण्याची शक्यता आहे.

### 2.4.2.2 जमिनीच्या खंडित भागावर निर्मिलेली जैवविविधता उद्याने

खाली तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे लेखापरीक्षणास असे निदर्शनास आले की तीन जैव-विविधता उद्यानांसाठी निवड करण्यात आलेली जागा दोन किंवा अधिक भागांत विभागली गेली होती आणि हे भाग जोडलेले नव्हते ज्यामुळे लोकांना प्रत्येक भागाला स्वतंत्रपणे भेट द्यावी लागणार होती.

- असे निदर्शनास आले की रस्त्याच्या बाजूने 1.10 किमी लांबी असलेले माजीवाडे जैव-विविधता उद्यान (जिल्हा ठाणे) चार नाल्यांमुळे पाच भागात विभागले होते, त्यापैकी फक्त दोन भाग एका पुलामुळे जोडलेले होते. ह्या जैव-विविधता उद्यानाच्या तपशीलवार प्रकल्प अहवालात भागांच्या एकमेशांची आंतर जोडणीसाठी कोणतीही तरतूद नव्हती.

[41] 500 मीटर ते 1 किमी-3 उद्याने (उपटखेडा, नवाटोला, तीर्थ), 1 किमी ते 5 किमी- 5 उद्याने (गराडा, जोंधळणी, कळंब, गोंडपिंपरी, मलोली), 3 किमी ते 5 किमी-1 उद्यान (कुरुम-4 किमी), 5 किमी च्या वर-3 उद्याने (मदलाबाद, डोंगर्ला, बोंधर).

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले (डिसेंबर 2021) की न जोडलेल्या भागांची आंतर-जोडणी करण्यासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल सुधारित केला जाईल.

- वर्धा जिल्ह्यातल्या राजनी जैव-विविधता उद्यानाला दोन स्वतंत्र न जोडलेले भाग होते कारण हे दोन भाग जोडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेला पूल निधीच्या अभावी बांधण्यात आला नाही.

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की निधी उपलब्ध झाल्यावर तो बांधण्यात येईल.

- जामखेळ (धुळे जिल्हा) मध्ये उपलब्ध करून दिलेले क्षेत्र 10 हेक्टर असले तरी एका नाल्याने जमीन विभाजित केली आणि 0.31 हेक्टर मध्ये ₹ 66.77 लाख खर्चून एक वाचनालय खोली, खेळण्याचे उपकरण, निरीक्षण झोपडी तयार केली गेली आणि जैव-विविधता उद्यानाच्या इतर भागात ₹ 30.01 लाख खर्चून 9.69 हेक्टर जमिनीवर केवळ वृक्षारोपणाचे काम करण्यात आले. ₹ 2.14 कोटींच्या तपशीलवार प्रकल्प अहवालाच्या तुलनेत एकूण ₹ 96.78 लाख खर्च केल्यानंतर जैव-विविधता उद्यान पूर्ण झाल्याचे घोषित करण्यात आले आणि कार्यचालन आणि रखरखावासाठी ग्राम पंचायतीच्या (मे 2020) सुपूर्द करण्यात आले. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की तयार केले गेलेले विविध घटक[42] जैव-विविधता उद्यानाच्या तपशीलवार प्रकल्प अहवालामध्ये निर्धारित केलेल्या घटकांपेक्षा आकाराने खूपच लहान होते. तसेच या जैव-विविधता उद्यानासाठी खरेदी केलेली उपकरणे, जसे की, बाक, पथदिवे, प्राण्यांच्या मूर्ती एका खोलीमध्ये टाकून दिल्या होत्या. अशाप्रकारे जागेच्या छोट्या भागात (एकूण क्षेत्रफळाच्या केवळ 0.30 टक्के) जैव-विविधता उद्यान कार्यान्वित केल्यामुळे उपकरणांची स्थापना झाली नाही आणि घटकांची अंमलबजावणी उपलब्ध असलेल्या कमी जागेत करावी लागली. शिवाय, मोठ्या भागात केलेल्या वृक्षारोपणाचा, त्या भागात मार्ग किंवा रस्ता नसल्याने जनता लाभ घेऊ शकत नव्हती.

राज्य शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की जैव-विविधता उद्यानाच्या सुविधा लहान क्षेत्रांकरिता मर्यादित होत्या आणि उर्वरित क्षेत्रांवर वृक्षारोपण करण्यात आले.

उत्तर स्वीकार्य नाही कारण लोकांसाठी प्रवेश नसलेल्या, नाल्याद्वारे विभक्त केलेल्या जागेच्या मोठ्या भागावर वृक्षारोपण करण्यात आले.

[42] खेळण्याची उपकरणे, आंतरिक रस्ते, माहिती केंद्र, वाचनालय, कुंपण इत्यादि.

### 2.4.2.3 वृक्ष लागवडीसाठी अयोग्य जागा

**छायाचित्र सं 2.4.1: मालोली जैव-विविधता उद्यान (23.06.2021)**



सोलापूर जिल्ह्यातील मालोली जैव-विविधता उद्यानाच्या बाबतीत लेखापरीक्षणास आढळले (जून 2021) की जैव-विविधता उद्यानात केलेले वृक्षारोपण सफल नव्हते (जगण्याची टक्केवारी 29 टक्के होती) आणि निवडलेली जागा/जमीन खडकाळ असल्यामुळे तेथे फक्त उंच गवतच आढळले, जे प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण यांच्या जागा निवडीच्या सूचनेचे (एप्रिल व जून 2015) उल्लंघन करणारे होते.

राज्य शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की सोलापूर जिल्ह्यांतील अवर्षणग्रस्त क्षेत्रातील बहुतांश जमीन बसाल्ट दगडापासून उत्पन्न झाली आहे आणि त्याची खोली उथळ ते मध्यमच्या दरम्यान बदलते त्यामुळे सामान्य पोषक तत्व उपलब्ध होतात आणि मर्यादित ओलावा असल्यामुळे वाढ खुंटते. म्हणून निवडलेली झाडे आणि वनस्पती ह्या क्षेत्रासाठी योग्य होत्या. शासनाने पुढे असे सांगितले की जगण्याची टक्केवारी आता 70 टक्के इतकी वाढली आहे (डिसेंबर 2021).

तथापि, वाढलेल्या जगण्याच्या टक्केवारीला सिद्ध करण्यासंबधी दस्तावेज लेखापरीक्षेला सादर करण्यात आले नाहीत (ऑगस्ट 2022).

### 2.4.2.4 जैव-विविधता उद्यानाच्या संचालनाच्या कोणत्याही आराखड्याशिवाय त्यांची निर्मिती

जैव-विविधता उद्याने त्यांच्या पूर्णतेनंतर सर्वसामान्य जनतेच्या उपयोगासाठी नियोजित केली होती आणि म्हणून हे शासकीय जमिनीवर निर्मित करण्याचे विहित केले होते. लेखापरीक्षणाला खालील विचलन आढळले ज्यामुळे जैव-विविधता उद्यानांपासून योजलेले लाभ साध्य करण्यात अपयश आले.

- **अशासकीय जमिनीवर निर्मित जैव-विविधता उद्याने**

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की उस्मानाबाद जिल्ह्यातील दोन जैव-विविधता उद्याने, तीर्थ जैव-विविधता उद्यान आणि ढोकी जैव-विविधता उद्यान अनुक्रमे ₹ 99.01 लाख आणि ₹ 142.15 लाख खर्चून दोन वेगवेगळ्या मंदिर

ट्रस्टच्या[43] जागेवर पूर्ण करण्यात आले. दोन्ही जैव-विविधता उद्याने पूर्ण झाल्यानंतर संबंधित ट्रस्टच्या (जून 2020 आणि जुलै 2020) सुपूर्द करण्यात आले. अशाप्रकारे, अशासकीय जमिनीवर जैव-विविधता उद्यानांची निर्मिती प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) द्वारे निर्गमित केलेल्या (एप्रिल आणि जून 2015) जागेच्या निवडी संदर्भातील निर्देशांचे उल्लंघन करणारी होती.

- **वृक्षारोपणाच्या उद्देशाकरिता दिलेल्या जमिनीवर निर्माण केलेले जैव-विविधता उद्यान**

अकोला जिल्हयातील काटी-पाटी जैव-विविधता उद्यानाची निर्मिती ज्या जमीनीवर केली ती जमीन स्थानिक ग्रामपंचायतीने विभागाला फक्त तीन वर्षांकरीता केवळ वृक्षारोपणाच्या कामासाठी दिली (फेब्रुवारी 2017) होती. जैव-विविधता उद्यानाच्या निर्मितीचे काम वर्ष 2018-19 मध्ये सुरू झाले आणि तपशीलवार प्रकल्प अहवालाच्या एकूण 38 घटकांपैकी 13 घटकांची अंमलबजावणी ₹ 67.41 लाख खर्च करून करण्यात आली. तथापि, उर्वरित कामे स्थानिक लोकांच्या जबरदस्त विरोधामुळे पूर्ण होऊ शकली नाही, कारण जैव-विविधता उद्यानाची जागा त्यांना त्यांच्या गुराढोरांना चरण्यासाठी हवी होती. उर्वरित कामांची अंमलबजावणी न करता, जैव-विविधता उद्यान (जुलै 2020) पुढील कार्यचालन आणि रखरखावासाठी ग्राम पंचायतीला हस्तांतरित करण्यात आले. लेखापरीक्षणाला प्रत्यक्ष जागेच्या भेटीनंतर असे लक्षात आले (डिसेंबर 2020) की जैव-विविधता उद्यान म्हणून कार्य करण्यापेक्षा, ते क्षेत्र पशुधनाच्या चरण्याचे मैदान म्हणून वापरण्यात येत होते. उद्यानांतर्गत निर्मित मालमत्ता उदा. पाइपलाईन, बसण्याचे बाक इत्यादी सुद्धा तोडफोड केलेले आढळले.

**छायाचित्र सं. 2.4.2: काटी-पाटी जैव-विविधता उद्यान (28.12.2020)**



**उद्यानातील बाक तोडफोड केलेल्या स्थितीत**

अशा प्रकारे, जैव-विविधता उद्यानाची निर्मिती करण्यासाठी ग्राम पंचायतीच्या संमतीशिवाय जागेची निवड केल्यामुळे ते अपूर्णावस्थेत ग्राम पंचायतीच्या सुपूर्द करावे लागले आणि झालेला खर्च व्यर्थ ठरला.

शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना हा मुद्दा सोडविण्यास सूचित करण्यात आले आहे.

[43] ढोकी जैव-विविधता उद्यानाची जागा साखर कारखान्याची आहे परंतु जमिनीचा काही भाग मंदीर ट्रस्ट सोबत आहे ज्याला जैव-विविधता उद्यान सुपूर्द केले.

### 2.4.3 वित्त व्यवस्थापन

महसूल व वन विभागाने 2015-2019 दरम्यान 68 जैव-विविधता उद्याने तयार करण्यासाठी ₹ 134.14 कोटी प्रक्षेपित केलेला परिव्यय होता, ज्याच्या तुलनेत केवळ ₹ 87.83 कोटी म्हणजेच आवश्यक निधीच्या केवळ 65 टक्के निधी 2015-2019 या योजनेच्या कालावधीत प्रदान करण्यात आला.

हे देखील निदर्शनास आले की 2019-21 दरम्यान जैव-विविधता उद्याने पूर्ण करण्यासाठी ₹ 46.31 कोटी आवश्यक निधीच्या तुलनेत केवळ ₹ 10.34 कोटी प्रदान करण्यात आले. अशाप्रकारे, एकूण ₹ 98.17 कोटी प्रदान केले (मार्च 2021) ज्यापैकी ₹ 96.52 कोटी खर्च झाले आहे.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की लक्ष्यित 68 च्या तुलनेत निर्मितीसाठी हाती घेण्यात आलेल्या 67 जैव-विविधता उद्यानांपैकी केवळ 15 जैव-विविधता उद्याने पूर्ण होऊ शकली (मार्च 2021). ऑगस्ट 2022 पर्यंत 35 जैव-विविधता उद्याने पूर्ण झाली आहेत आणि 21 जैव-विविधता उद्याने कार्यचालन आणि रखरखावासाठी हस्तांतरित करण्यात आली.

#### 2.4.3.1 निधी कमी प्रदान करणे

निवडलेल्या 15 जिल्ह्यांमध्ये 2015-2021 दरम्यान आवश्यक निधी, प्रदान केलेला निधी आणि झालेला खर्च **तक्ता 2.4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे होता.

**तक्ता 2.4.1: आवश्यक निधी, प्रदान केलेला निधी आणि झालेला खर्च**

**(₹ कोटीं मध्ये)**

| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | जैव विविधता उद्यानांची संख्या | निधीची आवश्यकता | निधी प्रदान केला | खर्च केला | कमी निधी प्रदान केला |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अकोला | 3 | 9.90 | 6.10 | 5.67 | 3.80 |
| 2 | अमरावती | 2 | 5.48 | 4.10 | 4.10 | 1.38 |
| 3 | भंडारा | 1 | 2.01 | 0.93 | 0.93 | 1.08 |
| 4 | चंद्रपूर | 3 | 6.86 | 6.62 | 6.61 | 0.24 |
| 5 | धुळे | 1 | 2.14 | 0.97 | 0.97 | 1.17 |
| 6 | गोंदिया | 4 | 7.32 | 4.87 | 4.87 | 2.45 |
| 7 | जालना | 2 | 3.90 | 3.10 | 3.10 | 0.80 |
| 8 | नागपूर | 1 | 2.96 | 1.79 | 1.79 | 1.17 |
| 9 | नांदेड | 2 | 4.57 | 3.35 | 3.35 | 1.22 |
| 10 | नाशिक | 3 | 6.05 | 2.92 | 2.49 | 3.13 |
| 11 | उस्मानाबाद | 2 | 2.79 | 2.41 | 2.41 | 0.38 |
| 12 | सोलापूर | 2 | 2.80 | 2.65 | 2.65 | 0.16 |
| 13 | ठाणे | 2 | 13.22 | 11.05 | 11.05 | 2.17 |
| 14 | वर्धा | 2 | 3.92 | 2.28 | 2.15 | 1.64 |
| 15 | यवतमाळ | 2 | 2.27 | 1.95 | 1.95 | 0.32 |
| | **एकूण** | **32** | **76.20** | **55.10** | **54.09** | **21.10** |

*स्त्रोत:- विभागांनी सादर केलेली माहिती*

- निवडलेल्या जैव-विविधता उद्यानांना पुरवलेल्या निधीमध्ये ₹ 21.10 कोटींची (27 टक्के) कमतरता होती. 32 पैकी केवळ 9 जैव-विविधता उद्याने पूर्ण झाली होती ज्यात तीन जैव-विविधता उद्याने अंशतः (45 टक्के) कामे केल्यानंतर पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले होते आणि 23 जैव-विविधता उद्याने अद्यापही अपूर्ण होती (जून 2021).

राज्य शासनाने मान्य केले (डिसेंबर 2021) की निधीच्या अनुपलब्धतेमुळे जैव-विविधता उद्याने अपूर्ण राहीली.

#### 2.4.3.2 आवंटीत निधीचा वापर न करणे

वर्ष 2019-20 मध्ये महाराष्ट्र शासनाने ₹ 6.33 कोटी (सर्व 67 जैव-विविधता उद्यानांना) आवंटित केले होते. त्यापैकी ₹ 89.26 लाख प्रत्यर्पित करण्यात आले आणि ₹ 68.26 लाख 31 मार्च 2020 रोजी शासनाला व्यपगत झाले व अर्थसंकल्प वितरण प्रणाली 27 मार्च 2020 पासून वित्तीय वर्षाअखेर (31 मार्च 2020) पर्यंत बंद पडल्यामुळे विभागीय वन अधिकारी, औरंगाबाद यांना ₹ 7.99 लाख काढता आले नाही. अशा प्रकारे, ₹ 1.66 कोटींची रक्कम उपलब्ध असूनही 2019-20 मध्ये योजनेसाठी उपयोगात आणता आली नाही.

वर्धा जिल्ह्यात 2016-17 मध्ये प्राप्त झालेल्या ₹ 70.64 लाखांपैकी ₹ 10 लाखांची रक्कम मुख्य प्रधान वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) ला प्रत्यार्पित करण्यात आली (जानेवारी 2017) आणि अकोला जिल्ह्यात 2015-16 आणि 2019-20 मध्ये संवितरीत अनुक्रमे ₹ 12 लाख आणि ₹ 31.16 लाख निधी त्या वर्षांमध्ये वापरता आला नाही.

राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले (डिसेंबर 2021) की प्रस्तावित कामांच्या ई-निविदेला विलंब झाल्यामुळे निधी अखर्चित राहिला.

### 2.4.4 जैव-विविधता उद्यानांची निर्मिती, कार्यचालन आणि रखरखाव

लेखापरीक्षणात निदर्शनास आले की निवडलेल्या 15 जिल्ह्यात निर्मितीसाठी हाती घेण्यात आलेल्या 32 जैव-विविधता उद्यानांपैकी 9 जैव-विविधता उद्याने पूर्ण झाली आणि 23 जैव-विविधता उद्यानांचे काम प्रगतीपथावर होते. ऑगस्ट 2022 पर्यंत 15 उद्याने पूर्ण झाली होती ज्यापैकी तीन अपूर्णावस्थेत असतांनाही पूर्ण झालेली दाखवण्यात आली होती. पूर्ण झालेल्या 15 जैव-विविधता उद्यानांपैकी 10 जैव-विविधता उद्याने प्राधिकरण/स्थानिक संस्था/वन विभागाला कार्यचालन आणि रखरखावासाठी हस्तांतरित करण्यात आले होते.

### 2.4.4.1 अद्याप पूर्ण न झालेल्या जैव-विविधता उद्यानांमध्ये संपत्तीची दुरावस्था

लेखापरीक्षणाने विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरणच्या संबंधित कर्मचाऱ्यांसोबत अपूर्ण जैव-विविधता उद्यानांच्या स्थळाला भेट दिली असता (ऑक्टोबर 2020 आणि जुलै 2021 दरम्यान) असे निदर्शनास आले की 15 निवडलेल्या जिल्हयांपैकी 10 जिल्हयांमधील 12 जैव-विविधता उद्यानां मध्ये निर्मित साधनसंपत्तीची दुरावस्था झाली, नुकसान झाले किंवा चोरी झाली आहे जे **तक्ता 2.4.2** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 2.4.2: अपूर्ण जैव-विविधता उद्यानात दुरावस्था झालेली, नुकसान झालेली किंवा चोरीला गेलेली संपत्ती किंवा उपकरणे**

| अनु. क्र. | बघितलेली दुरावस्था/नुकसान | लेखापरीक्षा निरीक्षण |
|---|---|---|
| 1. | वृक्षारोपण आढळले नाही आणि उंच गवत आढळले | **जोंधळणी जैव-विविधता उद्यान (यवतमाळ):** वृक्षारोपण जसे की नक्षत्रवन, मिश्र वृक्षारोपण, ₹ 7.41 लाख खर्च करून करण्यात आलेली 400 बांबू रोपट्यांची लागवड दिसली नाही आणि 6 फुटांपेक्षा उंच गवत दिसून आले.<br>**कुडवा जैव-विविधता उद्यान (गोंदिया):** विविध वनांत केलेले वृक्षारोपण अस्तित्वात नव्हते, ज्याची वन संरक्षक, नागपूर यांनी देखील त्यांच्या भेटी दरम्यान (फेब्रुवारी 2019) पुष्टी केली.<br>**डोंगर्ला जैव-विविधता उद्यान (भंडारा):** नक्षत्र वन, पंचवटी वन, राशी वन, नव ग्रह वन आणि औषधी वनस्पती दिसून आले नाही, फक्त उंच गवतशिवाय काहीच नव्हते.<br>**मदलाबाद जैव-विविधता उद्यान (अमरावती):** बहुतेक सर्व वनातील (मेळघाट वन औषधी वन, रेशीम शेती वन, तेल वन, लाख वन, बांबू वन) सर्व वनस्पती मृत आढळल्या आणि फक्त उंच गवत दिसून येत होते.<br>**वाशिंबा जैव-विविधता उद्यान (अकोला):** पादचारी मार्ग जंगली गवत/ झुडपांनी झाकले गेले होते.<br>**कुरुम जैव-विविधता उद्यान (अकोला):** जंगली गवत/झुडपे विविध वनात उगवले होते ज्यामुळे वृक्षारोपणाच्या वाढीत अडथळा निर्माण होत होता.<br>**अर्जुनी-मोरगाव, कुडवा, नवाटोला आणि गराडा जैव-विविधता उद्यान (गोंदिया):** सगळ्या ठिकाणी उंच गवत आढळले ज्यामुळे झाडांच्या वाढीवर परिणाम झाला आणि अंतर्गत रस्ते पण निरूपयोगी झाले होते.<br>**वेणा निमजी जैव-विविधता उद्यान (नागपूर) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वर्धा जैव-विविधता उद्यान:** खेळाची साधने आणि शौचालये खराब झाली होती आणि सहा फुटांपेक्षा उंच गवतामुळे उपयोगात आणण्यासारखी नव्हती. |

| | | |
|---|---|---|
| | नमूना छायाचित्र | **छायाचित्र सं.2.4.3 जोंधळणी जैव-विविधता उद्यान (4.12.2020)**<br><br>नक्षत्रवना ऐवजी गवत<br><br>**छायाचित्र सं.2.4.4 महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वर्धा जैव-विविधता उद्यान (12.11.2020)**<br><br>जैव-विविधता उद्यानात सगळीकडे उंच गवत |
| 2. | खेळण्याची उपकरणे आणि इतर निर्मित मालमत्ता क्षतीग्रस्त आढळले | **मालोली जैव-विविधता उद्यान (सोलापूर):** जैव-विविधता उद्यानासाठी स्वागत कक्ष आणि स्वच्छता गृह जैव-विविधता उद्यानाच्या जागेला लागून असलेल्या रोपवाटिकेमध्ये बांधण्यात आले. ₹ 2.38 लाख खर्च करून उद्यानात उभारण्यात आलेल्या दहा सौर ऊर्जा दिव्यांपैकी आठ दिवे (₹ 1.90 लाख) गहाळ झाले होते आणि केवळ दोन सौर दिवे आढळले. जैव-विविधता उद्यानांच्या सुरक्षिततेसाठी कोणतेही कुंपण आढळले नाही.<br>**कुंभारी जैव-विविधता उद्यान (सोलापूर):** देखभाल न केल्यामुळे शेततळे, अभ्यागत खोली, शौचालय, पाण्याची टाकी, झाडांचे ओटे, आंतरिक रस्ते आणि साईन बोर्ड क्षतिग्रस्त झाले आणि त्यांची दुरावस्था झाली. उद्यानाचे संरक्षण करण्यासाठी खंदक काम (₹ 2.69 लाख खर्च करून) 2015-16 मध्ये करण्यात आले जे व्यर्थ ठरले कारण नंतर 2017-18 मध्ये ₹ 10.83 लाख खर्चून साखळी-दुवा कुंपणाचे काम करण्यात आले.<br>**डोंगर्ला जैव-विविधता उद्यान (भंडारा):** ₹ 2.99 लाख खर्च करून तयार केलेले उद्यान लॉन अस्तित्वात नव्हते, खेळण्याची उपकरणे (₹ 2.98 लाख किंमतीचे) पॅगोडा व पादचारी मार्ग क्षतिग्रस्त होते.<br>**मदलाबाद जैव-विविधता उद्यान (अमरावती):** साखळी दुवा कुंपणाचे (103 मीटर) काम प्रलंबित होते, रस्ते, पादचारी मार्ग, सौर ऊर्जा दिवे क्षतिग्रस्त होते आणि ₹ 6.69 लाख खर्च करून स्थापन केलेली वीज प्रणाली काम करण्याच्या स्थितीत नव्हती.<br>**वाशिंबा जैव-विविधता उद्यान (अकोला):** ₹ 2.53 लाख खर्च करून बागेत उभारण्यात आलेले फवारे चालू स्थितीत नव्हते.<br>**कुरुम जैव-विविधता उद्यान (अकोला):** बाक आणि झाडांचे ओटे (₹ 9.80 लाख किंमतीचे) क्षतिग्रस्त अवस्थेत आढळले.<br>**कंधाने जैव-विविधता उद्यान (नाशिक):** प्राण्यांच्या मूर्ती, झाडांचे ओटे, खेळण्याची उपकरणे, पाण्याच्या टाक्या क्षतिग्रस्त अवस्थेत आढळल्या.<br>**अर्जुनी-मोरगाव, कुडवा, नवाटोला आणि गराडा जैव-विविधता उद्याने (गोंदिया):** पाण्याच्या टाक्या, खेळण्याची उपकरणे, ओटे आणि पादचारी मार्ग क्षतिग्रस्त/खराब झाले होते. सौर दिवे (₹ 2.83 लाख किंमतीचे) चालू स्थितीत नव्हते. |

<table>
<tr><td></td><td></td><td>माजीवडे जैव-विविधता उद्यान (ठाणे): पादचारी मार्ग, अंतर्गत रस्ते (दगडी ब्लॉक), बाक आणि खेळाची साधने माहिती केंद्राच्या बांधकामासाठी आणलेल्या यंत्रसामग्रीच्या हालचालीमुळे क्षतिग्रस्त झाले होते.</td></tr>
<tr><td></td><td>नमूना छायाचित्रे</td><td>
<table>
<tr><td>छायाचित्र सं. 2.4.5: कुरूम जैव-विविधता उद्यान (22.12.2020)</td><td>छायाचित्र सं. 2.4.6: कुरूम जैव-विविधता उद्यान (22.12.2020)</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td>क्षतिग्रस्त बाक</td><td>क्षतिग्रस्त झाडांचे ओटे</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

जैव-विविधता उद्याने अपूर्ण असल्यामुळे आणि जैव-विविधता उद्यानांच्या निर्मिती दरम्यान तयार झालेल्या मालमत्तेची देखभाल करण्याची तरतूद तपशीलवार प्रकल्प अहवालात नसल्यामुळे ती मालमत्ता खराब झाली, क्षतिग्रस्त झाली किंवा चोरीला गेली.

राज्य शासनाने वरील तथ्य मान्य केले (डिसेंबर 2021) आणि नमूद केले की, निधीची कमतरता, कोविड दरम्यान मजुरांची अनुपलब्धता आणि कर्मचाऱ्यांच्या हालचालींवरील बंदीमुळे मागील 2 वर्षात पायाभूत सुविधांवर विपरीत परिणाम झाला.

### 2.4.4.2 पूर्ण झालेली जैव-विविधता उद्याने सुपूर्द न करणे

लेखापरीक्षेने निरीक्षण केले (जानेवारी 2021) की वन रक्षक प्रशिक्षण शाळा, जालना येथील जैव-विविधता उद्यान ₹ 2.14 कोटी खर्च करून (मार्च 2019) पूर्ण करण्यात आले, परंतु कार्यचालन आणि देखभालीसाठी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा स्थानिक संस्थांच्या सुपूर्द करण्यात आले नाही. स्थळ भेटीदरम्यान (जानेवारी 2021) लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, कार्यचालन आणि देखभालीच्या अभावी जैव-विविधता उद्यान खराब स्थितीत होते आणि खेळांची उपकरणे, सौर दिवे, पक्ष्यांची घरटी, आणि केराचा डबा यांसारख्या वस्तू खालील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे एका खोलीमध्ये टाकून दिले होते.

**छायाचित्र क्रमांक 2.4.7 आणि 2.4.8: वन रक्षक प्रशिक्षण शाळा, जालना जैव-विविधता उद्यान (27.01.2021)**



**खोलीमध्ये टाकून दिलेली खेळांची उपकरणे**



**खोलीमध्ये टाकून दिलेल्या वस्तू**

असेही लक्षात आले (जानेवारी 2021) की ₹ 1.91 कोटी मंजूर किंमतीचे हाती घेण्यात आलेले जालना जिल्ह्यातील दहीपूरी जैव विविधता उद्यान, 45 टक्के काम (₹ 0.86 कोटींचे) झाल्यावर पूर्ण म्हणून घोषित करण्यात आले (मार्च 2019). ग्रामपंचायत इच्छुक नसल्यामुळे ते कार्यचालन आणि देखभालीसाठी हस्तांतरित होऊ शकले नाही.

**छायाचित्र क्रमांक 2.4.9: दहीपूरी जैव-विविधता उद्यान (28.01.2021)**



**वृक्षारोपण जगले नाही**

तसेच, जैव-विविधता उद्यानांच्या निर्मितीच्या सुरूवातीला रोपवनाच्या संरक्षणाकरिता आणि अतिक्रमणापासून संरक्षण करण्याकरिता आवश्यक असलेले कुंपणाचे काम हाती घेण्यात आले नाही ज्यामुळे विविध प्रकारची ₹ 36.14 लाख किंमतीची 10,170 रोपटी आणि 75,500 डुरांटा झाडांची रोपटी लगतच्या छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे मृतप्राय झाली. वृक्षारोपणाच्या ठीबक सिंचन कामासाठी बसविण्यात आलेले ₹ 14.64 लाख किंमतीचे पाईप्स देखील अकार्यक्षम आणि उध्वस्त झाले होते.

अशा प्रकारे, पूर्ण झालेली जैव-विविधता उद्याने पुढील कार्यचालन आणि देखभालीसाठी हस्तांतरित न केल्यामुळे वन रक्षक प्रशिक्षण शाळा, जालना जैव-विविधता उद्यानामध्ये निर्मित मालमत्तेची दुरावस्था व नुकसान झाले आणि दहीपूरी जैव-विविधता उद्यानामध्ये वृक्षारोपण टिकले नाही.

राज्य शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की वन रक्षक प्रशिक्षण शाळा, जालना जैव-विविधता उद्यानाच्या बाबतीत हस्तांतरणाचे काम प्रगतीपथावर आहे व दहीपूरी जैव-विविधता उद्यानाच्या बाबतीत ग्राम पंचायतला हस्तांरणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. ग्रामस्थांचा विरोध असतांनाही संबधित अधिकाऱ्यांना उद्यानाचे काम पूर्ण करण्यास सांगण्यात आले होते.

उत्तर पटण्यायोग्य नाही कारण वन रक्षक प्रशिक्षण शाळा, जालना जैव-विविधता उद्यान मार्च 2019 मध्ये पूर्ण झाले आणि त्यानंतर विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, जालना द्वारे उद्यान सुपूर्द करण्यासाठी किंवा उद्यानाची देखभाल करण्याबाबत वेळेत कारवाई करण्यात आली नाही. मार्च 2019 मध्ये अर्धवट कामाच्या अंमलबजावणी नंतर दहीपूरी जैव-विविधता उद्यान पूर्ण झाल्याचे घोषित करण्यात आले आणि त्यानंतर ते सुपूर्द करण्यात आले नाही किंवा त्याची देखभाल देखील करण्यात आली नाही.

**2.4.4.3 हस्तांतरित केलेल्या जैव-विविधता उद्यानांच्या देखभालीचा अभाव**

योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पूर्ण झालेल्या जैव-विविधता उद्यानांना संयुक्त वन व्यवस्थापन समितीला जर उपलब्ध असेल आणि कार्यरत असेल तर किंवा कोणत्याही स्थानिक संस्थांना (ग्राम पंचायत किंवा नगर परिषद) त्याच्या पुढील देखभाल आणि कार्यचालनासाठी हस्तांतरित करणे विहित केले आहे. जैव-विविधता उद्यानात प्रवेश शुल्क आकारण्याचे उद्दिष्ट जैव-विविधता उद्यानाला स्वयं-शाश्वत बनविण्याचे होते.

**छायाचित्र क्र. 2.4.10: तीर्थ जैव-विविधता उद्यान (08.07.2021)**



**सोडून दिलेला ठिबक सिंचन पंप**

न्यास/स्थानिक संस्था/प्रादेशिक वन विभाग यांच्याकडे कार्यचालन आणि देखभालीसाठी सुपूर्द केलेल्या 10 जैव-विविधता उद्यानांपैकी **परिच्छेद 2.4.2.4** मध्ये चर्चा केल्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील दोन जैव-विविधता उद्याने (तीर्थ आणि ढोकी), पूर्ण झाल्यानंतर मंदिर न्यासाला हस्तांतरित करण्यात आले. तीर्थ जैव-विविधता उद्यानाच्या स्थळ भेटी दरम्यान (जुलै 2021) लेखापरीक्षणाला असे आढळून आले की प्राण्यांच्या मूर्ती, खेळाची उपकरणे, शौचालये, सौर दिवे आणि ठीबक सिंचन पंप छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे नासधूस झालेले किंवा खराब स्थितीत होते.

**छायाचित्र क्र. 2.4.11: ढोकी जैव-विविधता उद्यान (07.07.2021)**



**चालण्याच्या मार्गामध्ये भेगा**

ढोकी जैव-विविधता उद्यानात सहाय्यक वनरक्षक, उस्मानाबाद यांच्यासोबत स्थळ भेटी दरम्यान (जुलै 2021) लेखापरीक्षेला असे आढळून आले की, चालण्याचा मार्ग, प्राण्यांच्या मूर्ती आणि पॅगोडा नुकसान झालेल्या स्थितीत होते.

धुळे जिल्ह्यातील जामखेळ जैव-विविधता उद्यान आणि अकोला जिल्ह्यातील काटी-पाटी जैव विविधता उद्यान, जी संबधित ग्राम पंचायतीला हस्तांतरित करण्यात आली होती त्यांची दयनीय अवस्था आणि अपूरी देखभाल याबद्दल अनुक्रमे ***परिच्छेद 2.4.4.2 आणि 2.4.2.4*** मध्ये चर्चा करण्यात आली आहे.

राज्य शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2021) की तीन जैव-विविधता उद्यानांच्या बाबतीत (जालना येथील दहीपूरी, धूळे येथील जामखेळ आणि अकोला येथील काटी-पाटी) चौकशीची सुरुवात केली जाईल. राज्य शासनाने पुढे नमूद केले (डिसेंबर 2004) की तीर्थ आणि ढोकी जैव-विविधता उद्यानांच्या बाबतीत व्यवस्थापन आणि संरक्षणाची जबाबदारी प्राधिकरण/अभिकरणाची होती ज्यांच्याकडे जैव-विविधता उद्याने हस्तांतरित केली होती आणि उपकरणे दुरुस्त करण्यासाठी न्यासाला सूचित केले गेले होते.

### 2.4.4.4 कंत्राटदाराला कामाचे अनियमित वाटप

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, 1984 नुसार कंत्राटावर देण्यात येणाऱ्या सर्व कामांसाठी नेहमी निविदा आमंत्रित केल्या पाहिजेत.

गोंदिया जिल्हातील चार जैव-विविधता उद्यानांमध्ये (अर्जुनी-मोरगाव, कुडवा, नवाटोला आणि गराडा) तांत्रिक सेवा आणि बहुउद्देशीय कर्मचारी पुरवण्यासाठी निविदा न मागविता अभिकरणाची नियुक्ती (सप्टेंबर 2016) करण्यात आली होती आणि ऑक्टोबर 2016 ते मार्च 2019 या कालावधीत अभिकरणाला ₹ 0.55 कोटींचे भुगतान करण्यात आले.

राज्य शासनाने चूक मान्य केली (डिसेंबर 2021) आणि वनसंरक्षक, नागपूर यांना जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यास सांगितले.

### 2.4.4.5 कामांचे अनियमित विभाजन

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नोव्हेंबर 2014 च्या ठरावानुसार निर्देश दिले की ₹ 3 लाखापेक्षा अधिक किंमतीच्या निविदांसाठी ई-निविदा पद्धती अनुसरली पाहिजे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, 1984 मध्ये असे देखील नमूद केले आहे की जर एका कामाचे छोट्या छोट्या कामांमध्ये विभाजन केले गेले तर संबधितांना संपूर्ण कामाची निविदा स्वीकारण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्ण परवानगी घ्यावी लागेल.

लेखापरीक्षेच्या असे लक्षात आले की पाच[44] जैव-विविधता उद्यानात 12 कामे (एकूण किंमत ₹ 1.06 कोटी) ₹ 3 लाखांपेक्षा कमी असलेल्या प्रत्येक कामामध्ये विभाजित करण्यात आली होती. ह्या कामांच्या बाबतीत कुठल्याही ई-निविदा प्रक्रियेचे अनुसरण केले नाही. पुढे, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरणाने केलेल्या कामाच्या या विभाजनासाठीच्या संपूर्ण कामासाठी निविदा स्वीकार करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडून मंजुरी घेतली नाही.

राज्य शासनाने ही वस्तुस्थिती मान्य केली (डिसेंबर 2021) आणि वनसंरक्षक, औरंगाबाद आणि ठाणे यांना जबाबदारी निश्चित करण्याच्या आणि शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

## 2.4.5 संनियंत्रण यंत्रणा

संनियंत्रण हे लवकर सुधारात्मक कारवाईच्या दृष्टीने विचलन शोधण्यासाठी आणि भविष्यातील नियोजनासाठी धडे शिकण्याच्या दृष्टीकोणातून कोणत्याही योजना, कार्यक्रम किंवा प्रक्रियेच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आवश्यक आहे. लेखापरीक्षणात योजनेच्या संनियंत्रणात खालील उणिवा आढळून आल्या.

### 2.4.5.1 जैव-विविधता उद्यानांचे निरीक्षण/संनियंत्रण

प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे ह्यांनी सूचना दिल्या (ऑक्टोबर 2015) की वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांनी प्रत्येक जैव-विविधता उद्यानाला योजनेच्या पहिल्या वर्षात भेट द्यावी. वन संरक्षक किंवा विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांच्या जैव-विविधता उद्यानांच्या नियतकालीक निरीक्षणाची इतर कोणतीही तरतूद नव्हती.

**तक्ता 2.4.3** मध्ये चार वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) यांच्या 2015-2021 दरम्यान भेटीचे तपशील दर्शविण्यात आले आहेत.

**तक्ता 2.4.3: वनसंरक्षकांच्या जैव-विविधता उद्यानांना क्षेत्र भेटींची संख्या**

| वनसंरक्षकाचे नाव | जैव-विविधता उद्यानांची संख्या | एकूण भेटींची संख्या | पहिल्या वर्षी भेट न दिलेली जैव-विविधता उद्याने | कधीही भेट न दिलेली जैव-विविधता उद्याने | फक्त एकदा भेट दिलेली जैव-विविधता उद्याने |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | 11 | 47 | 3 | 1 (काटी-पाटी) | 0 |
| नागपूर | 12 | 33 | 10 | 1 (अर्जुनी-मोरगाव) | 2 |
| ठाणे | 10 | 81 | 4 | 0 | 1 |
| पुणे | 10 | 19 | 9 | 0 | 3 |
| **एकूण** | **43** | **180** | **26** | **2** | **6** |

*स्त्रोत: विभागाने सादर केलेली माहिती*

[44] वाडेपूरी आणि बोंधार (नांदेड), माजीवाडे, आणि कानविंदे (ठाणे) आणि वन रक्षक प्रशिक्षण शाळा (जालना).

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की पहिल्या वर्षी 43 जैव-विविधता उद्यानांपैकी या चार वनसंरक्षकाच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या 26 उद्यानांना संबधित वनसंरक्षकांनी भेटी दिल्या नाहीत. तसेच, 2015-21 दरम्यान या संबधित वनसंरक्षकांनी उद्यानांना दिलेल्या 180 भेटींचे तपशील, जसे निरीक्षण नोंदी इत्यादी कागदोपत्री उपलब्ध नव्हते.

राज्य शासनाने नमूद केले (नोव्हेंबर 2021) की या जैव-विविधता उद्यानांच्या निरीक्षणाची अद्ययावत माहिती लेखापरीक्षणाला पुरविण्यात येईल.

**2.4.5.2 जैव-विविधता उद्यानांचे मध्यावधी मूल्यमापन**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) यांनी सूचित केले (नोव्हेंबर 2015) की आवश्यक सुधारात्मक कारवाई करण्यासाठी जैव-विविधता उद्यानाचे मध्यावधी मूल्यमापन करण्यात यावे.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की केवळ दोन विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (गोंदिया आणि नाशिक) यांच्याद्वारे त्यांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या जैव-विविधता उद्यानांचे मध्यावधी मूल्यमापन करण्यात आले परंतु कोणतेही मूल्यमापन अहवाल किंवा दस्तावेज लेखापरीक्षेला पडताळणीसाठी सादर करण्यात आले नाही. उर्वरित 13 जिल्ह्यांत, मध्यावधी मूल्यमापनाशी संबंधित कोणतेही दस्तावेज लेखापरीक्षणास पुरवले नाहीत.

तसेच, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी कधीही योजनेचे असे कोणतेही मध्यावधी मूल्यमापन केले नाही. तथापि योजनेच्या मार्गदर्शक तत्वांची चर्चा करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी एक बैठक (मे 2017) बोलावली होती ज्यात महाराष्ट्र राज्य जैव-विविधता मंडळ आणि भारताचे वनस्पती शास्त्रीय सर्वेक्षण ह्या संस्थांचे प्रतिनिधी देखील आमंत्रित होते. ह्या बैठकीत जागांची निवड, ज्यांची लागवड केली पाहिजे अशा झाडांच्या प्रजाती आणि पाण्याच्या उपलब्धतेबाबत निष्पन्न झालेल्या शिफारशी सर्व वनसंरक्षकांना पाठविण्यात (जून 2017) आल्या होत्या.

राज्य शासनाने नमूद केले (डिसेंबर 2021) की यापुढे वेळेत मूल्यमापन करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यात येईल.

## वस्तू आणि सेवा कर विभाग

## 2.5 वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिट्स

**लेखापरीक्षणाला विभागीय परिपत्रकात भांडवली वस्तूंच्या संदर्भात अनुपलब्ध क्रेडिटला परवानगी देणाऱ्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 च्या तरतुदींमध्ये विसंगती दिसून आली ज्यामुळे अभिकर्त्यांना ट्रांझिशनल क्रेडिट्सचा लाभ मिळण्यात अडथळा निर्माण होत होता. करदात्यांद्वारे GST TRAN-1 मध्ये करण्यात आलेल्या अनियमित घोषणेमुळे ₹ 26.92 कोटी ट्रांझिशनल क्रेडिट्सचा अतिरिक्त लाभ घेतल्याची प्रकरणे लेखापरीक्षणाला दिसून आली. करदात्यांनी सर्व विहित रिटर्न्स भरले नसले तरीही त्यांच्याद्वारे ₹ 7.99 कोटींच्या अनियमित ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ घेण्यात आला. लेखापरीक्षणाला ट्रांझिटमधील वस्तू, प्रगतीपथावरील कार्य/तयार वस्तूंमध्ये असलेले इनपुट, TRAN फॉर्म पेक्षा जास्त रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये जमा इत्यादि बाबींवर ट्रांझिशनल क्रेडिटच्या अनियमित लाभाची प्रकरणे देखील निदर्शनास आली. लेखापरीक्षेद्वारे वारंवार मागणी करूनही करदात्याद्वारे घेण्यात आलेल्या ट्रांझिशनल क्रेडिट्सच्या दाव्याच्या पडताळणीबाबत अभिलेख सादर करण्यात राज्य कर आयुक्त अपयशी ठरले. त्यामुळे विभागाद्वारे ट्रांझिशनल क्रेडिटच्या पडताळणी बाबतच्या परिणामकारकतेची लेखापरीक्षा खात्री करू शकले नाही.**

### 2.5.1 प्रस्तावना

वस्तू आणि सेवा कर लागू करणे ही आपल्या देशातील अप्रत्यक्ष करांच्या क्षेत्रातील एक लक्षणीय सुधारणा आहे, ज्यामुळे केंद्र आणि राज्यांकडून आकारले जाणारे आणि संकलित केले जाणारे अनेक कर एकत्र केलेत. वस्तू आणि सेवा कर हा वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या पुरवठ्यावरील गंतव्य आधारित कर आहे, जो अनेक टप्प्यात आकारला जातो, ज्यामध्ये कर आणि पुरवठा पूरक असतात. पुरवठा स्थान ज्या अधिकार क्षेत्रात असेल त्या कर आकारणी प्राधिकरणाकडे कर जमा होईल.

समान कर आधारावर केंद्र आणि राज्य एकाच वेळी कर आकारतात. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर आणि राज्य वस्तू आणि सेवा कर/केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा कर हा राज्यांतर्गत पुरवठा आणि एकात्मिक वस्तू आणि सेवा कर हा आंतरराज्य पुरवठ्यावर आकारला जातो.

केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या राज्यांतर्गत पुरवठ्यावर कर आकारणी आणि संकलन करण्याची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबंधित किंवा प्रासंगिक बाबींसाठी महाराष्ट्र

वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 लागू केला आणि 1 जुलै 2017 पासून अंमलात आला.

### 2.5.1.1 ट्रांझिशनल क्रेडिट

इनपुट, इनपुट सेवा आणि भांडवली वस्तूंवर विक्रेत्याद्वारे भरलेल्या करांचे इनपुट टॅक्स क्रेडिट हे आउटपुट कर दायित्वावरील सेट ऑफसाठी उपलब्ध असते, हे वस्तू आणि सेवा कराच्या प्रमुख वैशिष्ट्यांपैकी एक आहे. विद्यमान अधिनियमातून (मूल्यवर्धित कर शासन पद्धती) वस्तू आणि सेवा कर शासन पद्धतीमध्ये इनपुट टॅक्स क्रेडिटचा अखंड प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी आणि विद्यमान करदात्यांच्या स्थलांतराशी संबंधित ट्रांझिशनल तरतुदी आणि विद्यमान अधिनियमांतर्गत भरलेल्या योग्य कर किंवा शुल्काच्या संदर्भात इनपुट टॅक्सचा दावा करण्याच्या अधिकारासाठी आणि पद्धतीसाठी निर्दिष्ट इनपुट कर क्रेडिटची व्यवस्था प्रदान करण्यासाठी महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमामध्ये[45] 'इनपुट करासाठी ट्रांझिशनल व्यवस्था' समाविष्ट करण्यात आली. लेगसी रिटर्न (मूल्यवर्धित कर शासन पद्धती) मधून जमा झालेल्या क्रेडिट्सचे अखंड ट्रांझिशन, कच्च्या मालाच्या संदर्भात इनपुट कर, प्रगतीपथावरील कार्य, नियुक्त दिवशी संग्रही ठेवलेला तयार माल तसेच भांडवली वस्तूंच्या संदर्भात वस्तू आणि सेवा कर शासन पद्धतीमध्ये लाभ न घेतलेले क्रेडिट यांची खात्री करण्यासाठी ट्रांझिशनल क्रेडिटच्या तरतुदी, शासन आणि व्यवसाय दोघांसाठी महत्वाच्या आहेत. या तरतुदी करदात्यांना, अशा इनपुट क्रेडिट्स हस्तांतरित करण्यास सक्षम करतात जेव्हा ते फक्त सामान्य व्यवसायात किंवा व्यवसायाच्या प्रगतीसाठी वस्तू आणि सेवा कर अंतर्गत करपात्र पुरवठ्यासाठी वापरले जातात.

### 2.5.2 ट्रांझिशनल क्रेडिटची प्रक्रिया

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140 मधील तरतुदींनुसार नोंदणीकृत व्यक्ती (कलम 10 अंतर्गत कर भरण्याची निवड करणाऱ्या व्यक्तींव्यतिरिक्त) वस्तू आणि सेवा कर पूर्व शासन पद्धतीशी संबंधित शेवटच्या रिटर्नमध्ये अग्रेषित करण्यात आलेले ट्रांझिशनल क्रेडिट घेण्यास पुढील बाबींच्या अधीन राहून पात्र असेलः

**1)** या अधिनियमांतर्गत क्रेडिटची रक्कम इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून पात्र आहे;

**2)** करदात्याने नियुक्त तारखेच्या आधीच्या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विद्यमान कायद्यानुसार आवश्यक असलेले सर्व रिटर्न्स सादर केले आहेत;

---

[45] महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाचे कलम 139 ते 142.

**3)** हे क्रेडिट महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियमाच्या नियम 79 अंतर्गत सेट ऑफचा दावा करण्यास पात्र असलेल्या युनिट्सशी संबंधित आहे;

**4)** भांडवली वस्तूंच्या संदर्भात लाभ न घेतलेले इनपुट टॅक्स क्रेडिट;

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140 नुसार, कलम 10 अंतर्गत कर भरण्याची निवड करणाऱ्या व्यक्ती व्यतिरिक्त नोंदणीकृत व्यक्ती त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये मूल्यवर्धित कराच्या रकमेचे क्रेडिट आणि प्रवेश कर, जर असेल तर, प्रपत्र GST TRAN-I मध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने घोषणा दाखल करून विद्यमान कायद्यांतर्गत[46] विहित केलेल्या पद्धतीनुसार त्याने सादर केले असेल तर, त्यांनी भरलेल्या नियोजित दिवसापूर्वी[47] संपलेल्या कालावधीशी संबंधित रिटर्नमध्ये अग्रेषित करण्यास पात्र असतील.

करदाते, महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या संबंधित कलमांतर्गत TRAN-I च्या योग्य तक्त्यांमध्ये ट्रांझिशनल क्रेडिटच्या विविध घटकांवर दावा करू शकतात, जे खाली **तक्ता 2.5.1** मध्ये दिले आहे.

**तक्ता 2.5.1**

| महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाचे कलम | TRAN-I तक्ता क्र. | ट्रांझिशनल क्रेडिट घटक |
|---|---|---|
| 140(1) | 5 (ब) | कालावधीसाठी (01.04.2015-30.06.2017) प्राप्त वैधानिक प्रपत्राचे तपशील ज्यासाठी क्रेडिट पुढे नेले |
| 140(1), 140(4) | 5(क) | राज्य कर म्हणून इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर कडे अग्रेषित केलेल्या क्रेडिटची रक्कम |
| 140(2) | 6(ब) | भांडवली वस्तूंवर लाभ न घेतलेले क्रेडिट |
| 140(3), 140(4) | 7(अ)ब | शुल्क भरलेल्या स्टॉकवर क्रेडिट- बीजकांशिवाय |
| 140(5) | 7(ब) | इनपुटवर क्रेडिट/ट्रांझिटमधील इनपुट सेवा |
| 140(3), 140(4), 140(6) | 7(क) | शुल्क भरलेल्या स्टॉकवर क्रेडिट- बीजकांसह |
| 141(4) | 9(अ) | मुख्य माल म्हणून जॉब वर्करला पाठविलेल्या मालाचा तपशील |
| 141(4) | 9(ब) | जॉब वर्करने मुख्य मालाच्या वतीने स्टॉकमध्ये ठेवलेल्या मालाचा तपशील |
| 142(14) | 10(अ) | अभिकर्त्याने मुख्य मालाच्या वतीने स्टॉकमध्ये ठेवलेल्या मालाचा तपशील |
| 142(11)(क) | 11 | कामाच्या करारा अंतर्गत मूल्यवर्धित करावर लाभ घेतलेल्या क्रेडिटचा तपशील |
| 142(12) | 12 | मंजुरीच्या आधारावर पाठवलेल्या मालाचा तपशील |
| *स्त्रोतः महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाचे कलम 140 ते 142* | | |

46 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, 2005.

47 01 जुलै 2017.

ट्रांझिशनल क्रेडिट हे मागील शासन पद्धतीमधून वस्तू आणि सेवा कर शासन पद्धतीमध्ये इनपुट क्रेडिटचा एक वेळचा प्रवाह आहे.

### 2.5.3 लेखापरीक्षेची व्याप्ती, कार्यपद्धती आणि नमुना निवड

कंपोझिशन योजने[48] अंतर्गत कर भरण्याची निवड केलेले करदाते सोडून सर्व नोंदणीकृत करदाते FORM GST TRAN-I दाखल करून ट्रांझिशनल क्रेडिटचा दावा करण्यास पात्र होते. एप्रिल 2021 आणि सप्टेंबर 2021 दरम्यान ट्रांझिशनल क्रेडिट दाव्यांच्या निवडलेल्या प्रकरणांशी संबंधित अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले. ट्रांझिशनल क्रेडिट्स दाव्यांच्या सत्यापनाच्या पद्धतीमध्ये मूल्यांकन अधिकाऱ्यांकडे उपलब्ध अभिलेख आणि सिस्टीम ॲप्लिकेशनस् ॲंड प्रॉडक्टस् इन डेटा प्रोसेसिंग (SAP)[49] पोर्टल मध्ये उपलब्ध माहितीचे डेटा विश्लेषण/सत्यापन तसेच राज्य वस्तू आणि सेवा कर विभागाच्या बॅक ऑफीस प्रणालीचा समावेश आहे. 25 फेब्रुवारी 2021 रोजी उपसचिव (कर आकारणी), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सोबत एमएस टीमस् द्वारे ऑनलाईन प्रवेश परिषद आयोजित करण्यात आली होती. राज्य कर विभागाचे सहा अतिरिक्त आयुक्त, चार सह आयुक्त आणि उप आयुक्त (आंतरिक लेखापरीक्षा) हे उपस्थित होते.

महामारी लक्षात घेता सांख्यिकीय क्रमरहित किंवा यादृच्छिक नमुना पद्धतीचा अवलंब करून मुंबई, मुंबई उपनगर, नागपूर, पुणे आणि ठाणे विभागातील प्रमुख आर्थिक केंद्रे/ औद्योगिक केंद्रे येथून ₹ 2,270 कोटी एकूण ट्रांझिशनल क्रेडिटचा समावेश असलेल्या एकूण 52,669 प्रकरणांपैकी ₹ 756.57 कोटींचा समावेश असलेल्या 1,366 प्रकरणांची निवड करण्यात आली. नागपूर विभागातील 124 प्रकरणांचे भौतिक लेखापरीक्षण एप्रिल-जून 2021 दरम्यान करण्यात आले आणि निवडलेल्या विभागीय कार्यालयांमधील उर्वरित प्रकरणांचे ऑनलाईन लेखापरीक्षण जुलै 2021 ते सप्टेंबर 2021 दरम्यान खालील लेखापरीक्षण उद्दिष्टांसह करण्यात आलेः

### 2.5.4 लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

वस्तू आणि सेवा कर ट्रांझिशनल क्रेडिटचे विषय विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण, खालील बाबींची खात्री करण्यासाठी आयोजित केले गेलेः

ट्रांझिशनल क्रेडिट दाव्यांची निवड आणि पडताळणी करण्यासाठी विभागाद्वारे निर्माण केलेली यंत्रणा पुरेशी आणि प्रभावी होती (प्रणाली समस्या).

[48] महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमा कलम 10.

[49] सिस्टीम ॲप्लीकेशन्स आणि प्रॉडक्ट्स इन डेटा प्रोसेसिंग.

वस्तू आणि सेवा कर शासन पद्धतीमध्ये करपात्र व्यक्तीने दिलेली ट्रांझिशनल क्रेडिट्स वैध आणि स्वीकार्य होती (अनुपालन समस्या).

### 2.5.5 लेखापरीक्षणाचे निकष

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष खालील निकषांवर आधारित आहेतः

- महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 चे अनुच्छेद 139-142;
- महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियम, 2017 चे नियम 117-119;
- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 मधील संबंधित तरतुदी;
- महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, 2005;
- राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना/ परिपत्रके/आदेश.

### 2.5.6 विभागाचा प्रतिसाद

आम्ही 1366 प्रकरणांशी संबंधित अभिलेख्यांसाठी विभागीय प्रणाली वापरण्याची परवानगी मागितली असता विभागाने, वापरकर्त्यांच्या ओळख पत्राद्वारे प्रणाली वापरण्याची तरतूद केली. तपासणी दरम्यान लेखापरीक्षणाने विभागीय आणि नियंत्रक अधिकाऱ्यांना मागितलेल्या विविध माहितीवरून लेखापरीक्षण मेमो दिलेत. तथापि, विभागाकडून आजपर्यंत बहुतांश लेखापरीक्षण मेमोंचा प्रतिसाद प्राप्त झाला नव्हता (ऑगस्ट 2022). डिसेंबर 2021 मध्ये एक प्रारूप विषय विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण अहवाल शासनाला पाठविला, ज्यामध्ये समाविष्ट केलेल्या लेखापरीक्षण निष्कर्षांवर शासनाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. निर्गमन परिषद जानेवारी 2022 मध्ये आयोजित करण्यात आली होती.

### लेखापरीक्षणाचे निष्कर्ष

ऑनलाईन लेखापरीक्षणासाठी 1,366 ट्रांझिशनल क्रेडिट प्रकरणांची निवड करण्यात आली होती. 1,095 प्रकरणांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की 86 प्रकरणांत अंतिम रिटर्नमध्ये अग्रेषित क्रेडिटच्या तुलनेत अतिरिक्त ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ झाला होता, परिच्छेद 2.5.8.1, 2.5.8.2, 2.5.8.3 आणि 2.5.8.4 मध्ये वर्णन केल्याप्रमाणे आठ प्रकरणांत लेगसी रिटर्न दाखल केले गेले नाही तर तीन प्रकरणांत करदात्यांनी मागील रिटर्नमधून आवश्यक प्रमाणपत्राशिवाय अनियमित/ अतिरिक्त क्रेडिट घेतले. भांडवली वस्तू, ट्रांझिटमधील वस्तू, अर्ध-तयार आणि तयार वस्तूंमध्ये असलेल्या इनपुट्स यावर ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ आणि TRAN च्या रकमेपेक्षा जास्त रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये जमा करणे

यावरील लेखापरीक्षा निरीक्षणांची चर्चा परिच्छेद 2.5.8.5, 2.5.8.6, 2.5.8.7 आणि 2.5.8.8 मध्ये केली आहे.

लेखापरीक्षण निरीक्षणांचा सारांश **तक्ता 2.5.2** मध्ये दिला आहे:

**तक्ता 2.5.2: कमतरतांची व्याप्ती (विचलन)**

**(₹ कोटी मध्ये)**

<table>
<tr><th rowspan="2">अनु. क्रं.</th><th rowspan="2">परिच्छेद क्रं.</th><th rowspan="2">लेखापरीक्षण निष्कर्षांचे स्वरूप (फक्त सूचक)</th><th colspan="2">लेखापरीक्षण नमुना</th><th colspan="2">दिसून आलेल्या कमतरतांची संख्या</th><th colspan="2">नमून्याची टक्केवारी म्हणून कमतरता</th></tr>
<tr><th>संख्या</th><th>रक्कम</th><th>संख्या</th><th>रक्कम</th><th>संख्या</th><th>रक्कम</th></tr>
<tr><td>1</td><td>2.5.8.1</td><td>वस्तू व सेवा कर पूर्व शासन पद्धतीतील शेवटच्या रिटर्नमध्ये अग्रेषित केलेल्या क्रेडिटच्या तुलनेत ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ</td><td rowspan="5">1095</td><td rowspan="5">594.35</td><td>86</td><td>26.92</td><td rowspan="5">9.13</td><td rowspan="5">9.11</td></tr>
<tr><td>2</td><td>2.5.8.2</td><td>लेगसी रिटर्न न भरता ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ मिळविला</td><td>8</td><td>7.99</td></tr>
<tr><td>3</td><td>2.5.8.3</td><td>मागील लेगसी रिटर्न्समधून क्रेडिटचा अनियमित लाभ</td><td>2</td><td>5.54</td></tr>
<tr><td>4</td><td>2.5.8.4</td><td>आवश्यक प्रमाणपत्र नसतांना ट्रांझिशनल क्रेडिटचा अतिरिक्त लाभ</td><td>1</td><td>0.22</td></tr>
<tr><td>5</td><td>2.5.8.5</td><td>भांडवली वस्तूंच्या संदर्भात अनुपलब्ध क्रेडिटला परवानगी देणाऱ्या MGST अधिनियमाच्या तरतुदींच्या संदर्भात विभागाचे विसंगत परिपत्रक</td><td>3</td><td>13.51</td></tr>
<tr><td>6</td><td>2.5.8.6</td><td>ट्रांझिट मधील इनपुट सेवांवर ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ</td><td>118</td><td>112.57</td><td>1</td><td>1.57</td><td>0.85</td><td>1.39</td></tr>
<tr><td>7</td><td>2.5.8.7</td><td>प्रगतीपथावरील काम किंवा तयार वस्तूंमध्ये समाविष्ट असलेल्या इनपुटवर ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ</td><td rowspan="2">210</td><td rowspan="2">139.52</td><td>12</td><td>4.25</td><td>5.71</td><td>3.05</td></tr>
<tr><td>8</td><td>2.5.8.8</td><td>TRAN च्या रकमेपेक्षा जास्त रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये जमा</td><td>1</td><td>0.29</td><td>0.48</td><td>0.21</td></tr>
</table>

### 2.5.7.1 विभागाद्वारे ट्रांझिशनल क्रेडिट पडताळणीशी संबंधित माहिती सादर न करणे

करदात्याने इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेण्यासाठी TRAN-I दाखल करणे आवश्यक आहे जे जून 2017 रोजी संपलेल्या कालावधीसाठी दाखल केलेल्या रिटर्नमध्ये दर्शविले आहे. विक्रेत्याद्वारे TRAN-I दाखल करण्यात आल्यावर ते करदात्याच्या वस्तू व सेवा कर इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये दर्शविले जाते. अशाप्रकारे, इनपुट टॅक्स क्रेडिटचा व्यवहार विश्वासावर आधारित आहे. विभागाच्या आर्थिक गुप्तचर युनिटने इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये घेतलेल्या ट्रांझिशनल क्रेडिटचा डेटा संबंधित राज्य कर सह

आयुक्तांकडे सादर करावयास पाहिजे, ज्यांनी तो डेटा TRAN–I क्रेडिटच्या पडताळणीसाठी पुढे सबंधित नोडल अधिकाऱ्यांकडे सादर करावा.

राज्य कर आयुक्तांनी नोडल अधिकाऱ्यांना TRAN–I मार्फत घेण्यात आलेल्या ट्रांझिशनल क्रेडिटच्या दाव्यांची पडताळणी 25 सप्टेंबर 2018 पर्यंत पूर्ण करण्याचे आणि 10 नोव्हेंबर 2018 पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले (जानेवारी 2018[50] ते सप्टेंबर 2018[51]). पुढे असेही निर्देश देण्यात आले की TRAN-I क्रेडिटच्या पडताळणीची देखरेख प्रभावीपणे केली जात असल्याचे सर्व अतिरिक्त राज्य कर आयुक्त आणि संबंधित राज्य कर सह आयुक्त सुनिश्चित करतील आणि अतिरिक्त राज्य कर आयुक्त या प्रक्रियेचा साप्ताहिक आढावा घेतील.

राज्य कर आयुक्तांद्वारे निर्देशित केल्यानुसार विभागीय सह आयुक्तांद्वारे करण्यात आलेली पडताळणी (राज्य प्राधिकरणांना वाटप केलेल्या ट्रांझिशनल क्रेडिटचा राज्य वस्तू आणि सेवा कर घटक) आणि क्षेत्रीय अतिरिक्त आयुक्तांद्वारे करण्यात आलेले संनियंत्रण याबाबतची व्याप्ती सुनिश्चित करण्याकरिता राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाकडून संबंधित डेटा मागविण्यात आला (जुलै 2021).

राज्य कर आयुक्तांनी राज्य कर विभागाच्या अधिकाऱ्यांना वितरित केलेल्या ₹ 2,270 कोटींच्या ट्रांझिशनल क्रेडिटच्या एकूण 52,669 प्रकरणांपैकी ₹ 1,970 कोटींच्या 9,043 प्रकरणांचा (5,637 प्रकरणे राज्य अधिकार क्षेत्राशी संबंधित आणि 3,406 प्रकरणे केंद्रीय अधिकार क्षेत्राशी संबंधित) ट्रांझिशनल क्रेडिट दाव्यांचा तपशील पडताळणीसाठी जानेवारी 2022 मध्ये सादर केला. तथापि, पडताळणी केलेली प्रकरणे आणि त्याचा परिणाम लेखापरीक्षेला सादर केला नाही. त्यामुळे विभागाने केलेल्या पडताळणीची पर्याप्तता आणि परिणामकारकता लेखापरीक्षण निश्चित करू शकले नाही.

शासनाला लेखापरीक्षण निरीक्षणे कळविण्यात आली (फेब्रुवारी 2022 आणि एप्रिल 2022). तथापि, त्यांची उत्तरे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

### 2.5.7.2 बीजके/बीजकांची यादी प्रस्तुत न करणे

निवडलेल्या चार[52] युनिट्स मधील संबंधित 255 प्रकरणांपैकी 93 प्रकरणांत करदात्यांनी TRAN-1 प्रपत्रामध्ये कर बीजकांचा तपशील सादर करणे आवश्यक असलेल्या बीजकांची यादी आणि नमुना बीजकांची यादी लेखापरीक्षणाने मागितली (जून 2022). तथापि, 71

---

[50] 2018 चे आंतरिक परिपत्रक 1A दिनांक 01 जानेवारी 2018.

[51] 2018 चे आंतरिक परिपत्रक 23A दिनांक 01 सप्टेंबर 2018.

[52] सह आयुक्त राज्य कर, माझगांव, सह आयुक्त राज्य कर, एल टी यु-I, मुंबई, सह आयुक्त राज्य कर, एल टी यु-II, मुंबई आणि सह आयुक्त राज्य कर, एल टी यु-II, पुणे.

प्रकरणांमध्ये संबंधित बीजकांची आणि नमुना बीजकांची यादी लेखापरीक्षणास सादर केली नाही.

संबंधित राज्य कर विभागाच्या सह आयुक्तांनी असे उत्तर दिले की मागणी केलेले आवश्यक अभिलेख कर निर्धारकांकडून प्राप्त केले जातील आणि वेळेत लेखापरीक्षणास सादर केले जातील. तथापि, ते अद्याप प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022). ही बाब राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र राज्य (ऑगस्ट 2022) यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. अनुपालन प्रतीक्षित आहे.

मागणी केलेले अभिलेख लेखापरीक्षणास सादर न केल्यामुळे त्या प्रकरणांत लाभ घेतलेल्या ट्रांझिशनल क्रेडिटसच्या अचूकतेचे मूल्यांकन करता आलेले नाही.

***शिफारस 1: विभागाने लेखापरीक्षेस वेळेवर दस्तावेज सादर करणे सुनिश्चित करावे.***

### 2.5.8 अनुपालन बाबी

#### 2.5.8.1 वस्तू आणि सेवा कर पूर्व शासन पद्धतीतील शेवटच्या रिटर्नमध्ये अंतिम शिलकीपेक्षा अधिक ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140 च्या पोटकलम (1) नुसार कलम 10 अंतर्गत कर भरणाऱ्या व्यक्तीं व्यतिरिक्त, नोंदणीकृत व्यक्ती, नियुक्त केलेल्या दिवसाच्या[53] लगेच आधी संपलेल्या कालावधीसाठी विहित केलेल्या पद्धती नुसार त्याच्याद्वारे विद्यमान कायद्यांतर्गत[54] सादर करण्यात आलेल्या रिटर्नमध्ये मूल्यवर्धित कर आणि प्रवेश कराचे क्रेडिट, जर असेल तर, त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये घेण्यास पात्र असेल.

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम 20(4) नुसार, ज्याने रिटर्न भरले आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा विक्रेता रिटर्न भरल्यानंतर त्यात कोणतेही वगळलेले किंवी चुकीचे विधान आढळून आल्यास, ज्या कालावधीच्या संदर्भात चुकीचे विधान आढळले त्या संदर्भातील विहित कालावधी समाप्त होण्यापूर्वी तो सुधारित रिटर्न सादर करू शकतो;

आंतरिक परिपत्रक क्र. 35A दिनांक 19 ऑक्टोबर 2019 च्या परिच्छेद 2 नुसार, राज्य कर आयुक्तांनी 30 जून 2017 रोजी संपलेल्या कालावधीसाठीच्या मूळ रिटर्नमध्ये अग्रेषित केलेल्या रकमेचा उल्लेख चुकीने 'परताव्याचा दावा' म्हणून केला गेलेल्या चार

---

[53] 01 जुलै 2017.

[54] महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम आणि नियम.

बाबीं स्पष्ट केल्या आहेत. यानुसार सुधारित रिटर्नमध्ये खालील **तक्ता 2.5.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ट्रांझिशनल क्रेडिट देण्याचा विचार केला गेला:

**तक्ता 2.5.3**

| परि-स्थिती | दावा केलेली रक्कम | 30.06.2017 रोजी संपलेल्या कालावधीसाठी रिटर्नमध्ये दावा केलेली रक्कम | | राज्य कर आयुक्ताच्या परिपत्रकानुसार क्रेडिटला ट्रांझिशनल क्रेडिट म्हणून दिलेली परवानगी | |
|---|---|---|---|---|---|
| | | **मूळ (₹)** | **सुधारित (₹)** | **सूचना** | **रक्कम (₹)** |
| 1 | परतावा | 1,00,000 | 0 | मूळ रिटर्नमध्ये **'परतावा'** म्हणून दावा केला परंतु सुधारित रिटर्नमध्ये त्याच रकमेसाठी परताव्या ऐवजी **'अग्रेषित'** असा दावा केला आहे. | 1,00,000 |
| | अग्रेषित | 0 | 1,00,000 | | |
| | अग्रेषित | 0 | 1,50,000 | मूळ रिटर्नमधील **'परतावा'** रकमेऐवजी सुधारित रिटर्नमध्ये **'अग्रेषित'** म्हणून अधिक रकमेचा दावा. | 1,00,000 |
| | अग्रेषित | 0 | 80,000 | मूळ रिटर्नमधील **'परतावा'** रकमेच्या तुलनेत सुधारित रिटर्नमध्ये **'अग्रेषित'** म्हणून कमी रकमेचा दावा. | 80,000 |
| 2 | अग्रेषित | 1,00,000 | 1,20,000 | मूळ रिटर्नपेक्षा सुधारित रिटर्नमध्ये **'अग्रेषित'** म्हणून अधिक रकमेचा दावा. | 1,00,000 |
| 3 | अग्रेषित | 1,00,000 | 90,000 | मूळ रिटर्नपेक्षा सुधारित रिटर्नमध्ये **'अग्रेषित'** म्हणून अधिक रकमेचा दावा. | 90,000 |
| 4 | परतावा | 1,00,000 | 1,50,000 | मूळ रिटर्नमध्ये **'अग्रेषित'** तसेच **'परतावा'** या दोन्हीचा दावा केला आहे परंतु सुधारित रिटर्नमध्ये दोन्हीसाठी वेगळ्या रकमेचा दावा केला आहे. | 1,50,000 (मूळ किंवा सुधारित रिटर्न यापैकी जी कमी असेल ती रक्कम मान्य करण्यात येईल). |
| | अग्रेषित | 2,00,000 | 1,50,000 | | |

असेही स्पष्ट करण्यात आले की नोडल अधिकारी यांनी सुनिश्चित करावे की कोणत्याही प्रकरणांत करदाता हा महाराष्ट्र मूल्यवर्धित कर परतावा तसेच त्याच क्रेडिटवर ट्रांझिशनल क्रेडिटसाठी पात्र नाही. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की करदात्यांद्वारे जून 2017 रोजी संपलेल्या कालावधीसाठी त्यांच्या संबंधित मूळ आणि सुधारित मूल्यवर्धित कर रिटर्नसच्या तुलनेत वस्तू आणि सेवा कर TRAN-I **तक्ता-5(क)** मधील अतिरिक्त घोषणेमुळे 1,095 प्रकरणांपैकी 86 प्रकरणांत इलेक्ट्रॉनिक

क्रेडिट लेजर मध्ये ***(परिशिष्ट 2.5.1)*** ₹ 26.92 कोटी अतिरिक्त ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ देण्यात आला.

लेखापरीक्षा निरीक्षणे संबंधित मूल्यांकन अधिकाऱ्यांना कळविण्यात आली (एप्रिल 2021 ते सप्टेंबर 2021). एका प्रकरणांत[55] विभागाने सुधारात्मक कारवाई करून एक निर्धारण आदेश पारित केला (फेब्रुवारी 2022) ज्यामध्ये निर्धारकाद्वारे करण्यात आलेला परतावा नाकारण्यात आला. उर्वरित प्रकरणांतील उत्तरे अद्याप प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

**उदाहरण:**

विक्रेत्याने[56] जून 2017 च्या मूळ मूल्यवर्धित कर रिटर्नमध्ये, जुलै 2017 मधील मूल्यवर्धित कर इनपुट क्रेडिटची अंतिम शिल्लक म्हणून अग्रेषित करून मूल्यवर्धित कर क्रेडिट रक्कम निरंक दर्शविली आणि ₹ 1.48 कोटीचा परतावा तक्ता 5(क) मधील परतावा रकान्यात दर्शविला. त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये 28 सप्टेंबर 2017 रोजी ₹ 0.76 कोटी आणि 27 डिसेंबर 2017 रोजी ₹ 0.84 कोटी रक्कम दिसून आली. अशाप्रकारे, इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये अग्रेषित ट्रांझिशनल क्रेडिट ₹ 1.60 कोटी होते. पुढे, ऑगस्ट 2019 मध्ये विक्रेत्याने जून 2017 या महिन्यासाठी सुधारित रिटर्न दाखल केले ज्यामध्ये त्यानंतरच्या कर कालावधीसाठी अग्रेषित अतिरिक्त क्रेडिट पुन्हा 'निरंक' दाखविण्यात आले आणि दावा केलेला परतावा ₹ 1.61 कोटी दाखविण्यात आला. त्यामुळे विक्रेत्याने मूळ किंवा सुधारित रिटर्नमध्ये क्रेडिट अग्रेषित केले नाही. अशाप्रकारे, ₹ 1.60 कोटी रकमेचा अनियमित ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ घेण्यात आला.

### 2.5.8.2 लेगसी रिटर्न न भरता ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ

कलम 140(1) च्या तरतूद (ii) नुसार वस्तू आणि सेवा कराच्या लेगसी रिटर्न मधून क्रेडिटच्या ट्रांझिशनसाठी करदात्याने नियुक्त तारखेच्या आधीच्या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विद्यमान अधिनियमांतर्गत आवश्यक सर्व रिटर्न्स भरलेले पाहिजेत अशी पूर्व अट आहे.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, 1095 प्रकरणांपैकी आठ प्रकरणांमध्ये करदात्याने नियोजित तारखेच्या आधीच्या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सर्व निर्धारित रिटर्न्स भरले नव्हते तरी ₹ 7.99 कोटी ***(परिशिष्ट 2.5.2)*** अनियमित ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ देण्यात आला.

[55] मेसर्स बोरा अँड बोरा टेक्नॉलॉजिस एलएलपी,GSTIN-27AAPFB2057B1ZP, एल टी यु-II, पुणे.

[56] मुंबई एल टी यु-502 विभागांतर्गत GSTIN-27AAACF0253H1ZO असलेले एफ.डी.सी. लिमिटेड.

एप्रिल ते सप्टेंबर 2021 मध्ये विभागाला निरीक्षणे कळविली. तथापि, त्यांची उत्तरे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

**उदाहरण:**

करदात्याने[57] जानेवारी 2017 ते जून 2017 या कालावधीसाठीचे मूल्यवर्धित कर रिटर्न भरले नाही. तथापि, TRAN-I मध्ये करदात्याने तक्ता 5(क) अंतर्गत ₹ 2.72 कोटी रकमेच्या ट्रांझिशनल क्रेडिटच्या दाव्याची घोषणा केली, जी नोव्हेंबर 2017 च्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये दिसून आली. परिणामी, ₹ 2.72 कोटी ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ झाला.

### 2.5.8.3 मागील लेगसी रिटर्नमधून क्रेडिटचा अनियमित लाभ

दोन करदात्यांच्या मागील सहा महिन्यांच्या रिटर्न्सच्या ***(परिशिष्ट 2.5.3)*** पडताळणीतून असे निदर्शनास आले की विक्रेत्याकडे पुढे अग्रेषित करण्यासाठी इनपुट टॅक्स क्रेडिट शिल्लक नव्हते किंवा त्यांनी मागील रिटर्नमध्ये परताव्याचा दावा केला आहे परंतु ही रक्कम पुढील रिटर्नमध्ये अग्रेषित करण्यात आली आणि इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये ट्रांझिशनल क्रेडिट म्हणून घेण्यात आली. परिणामी, ₹ 5.54 कोटी अनियमित ट्रांझिशनल क्रेडिट गृहित धरण्यात आले.

लेखापरीक्षणाद्वारे ऑगस्ट ते सप्टेंबर 2021 मध्ये निरीक्षणे कळविण्यात आली. तथापि, अद्याप उत्तरे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

**उदाहरणः**

करदात्याने[58] त्याच्या मार्च 2017 च्या मासिक मूल्यवर्धित कर रिटर्नमध्ये ₹ 9.31 कोटींचे इनपुट टॅक्स क्रेडिट पुढील रिटर्नमध्ये अग्रेषित केल्याचे दाखविले उदा. एप्रिल 2017 आणि त्यानुसार, इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये जून 2017 मध्ये क्रेडिट अग्रेषित करण्यात आले. तथापि, वर्ष 2016-17 च्या सुधारित वार्षिक रिटर्न्सच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की करदात्याने अग्रेषित क्रेडिट 'निरंक' दर्शविले आणि मार्च 2017 च्या अखेरीस ₹ 1.51 लाख परताव्याचा दावा केला. तथापि, करदात्याने ₹ 4.41 कोटी इनपुट टॅक्स क्रेडिट अग्रेषित केले. करदात्याने चुकीच्या पद्धतीने घेतलेले ₹ 4.41 कोटी क्रेडिट परत करणे आणि वार्षिक रिटर्न मधील सुधारित आकड्यांवर आधारित रक्कम भरणे आवश्यक होते. लेखापरीक्षणाने मार्च 2017 ते जून 2017 या कालावधीसाठी करदात्याद्वारे देय असलेली ₹ 4.79 कोटी रक्कम पुनः परिगणित केली.

---

57 मुंबईच्या माझगांव विभागांतर्गत GSTIN क्रं 27AAPFS1542Q1ZH असलेले मेसर्स स्टील फॅब इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन.

58 एल टी यु-02, मुंबई अंतर्गत GSTIN क्रं 27AANCS3404N1ZY असलेले शामन व्हिल्स प्रायव्हेट लिमिटेड.

### 2.5.8.4 आवश्यक प्रमाणपत्रे नसतांना ट्रांझिशनल क्रेडिटचा अतिरिक्त लाभ

आंतरिक परिपत्रक क्र. 23 A दिनांक 01 सप्टेंबर 2018 मधील परिच्छेद 3.3 नुसार इनपुट टॅक्स क्रेडिट, आंतरराज्य विक्री, शाखा हस्तांतरण/माल हस्तांतरण किंवा संभाव्य निर्यात, विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये विक्री निर्देशित करते आणि जेथे केंद्रीय विक्रीकर अधिनियम, 1956 अंतर्गत प्रदान करण्यात आलेले घोषणा किंवा प्रमाणपत्रे म्हणजेच प्रपत्र-सी, प्रपत्र-एफ, प्रपत्र-एच आणि प्रपत्र-आय प्राप्त झाले नसतील तर करदात्याला त्या मर्यादेपर्यंत इनपुट टॅक्स क्रेडिटचे क्रेडिट इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये घेण्याचा अधिकार नाही.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की करदात्याने[59] ₹ 0.85 कोटी इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला. सनदी लेखापालाच्या लेखापरीक्षण अहवालातून लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की अनुक्रमे ₹ 0.10 कोटी आणि ₹ 0.41 कोटींचे कर दायित्व समाविष्ट असलेले प्रपत्र-सी आणि प्रपत्र-एफ उपलब्ध नव्हते. त्यामुळे, ₹ 0.51 कोटीचे क्रेडिट अस्वीकार्य होते. करदात्याने नोव्हेंबर 2019 मध्ये ₹ 0.51 कोटींच्या एकूण कर दायित्वामधून ₹ 0.29 कोटींचे इनपुट टॅक्स क्रेडिट परत केले. डिसेंबर 2021 पर्यंत ₹ 0.22 कोटींचे अतिरिक्त क्रेडिट परत केले गेले नाही. त्यामुळे त्याला ₹ 0.22 कोटी इनपुट टॅक्स क्रेडिटचा अतिरिक्त लाभ मिळाला.

लेखापरीक्षेने सप्टेंबर 2021 मध्ये निरीक्षण कळविले. तथापि, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

### 2.5.8.5 भांडवली वस्तूंच्या बाबतीत लाभ न घेतलेल्या क्रेडिटला मान्यता देणाऱ्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या तरतुदींच्या संदर्भातील विसंगत विभागीय परिपत्रक

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(2) नुसार, कलम 10 अंतर्गत कर भरणाऱ्या व्यक्तींव्यतिरिक्त नोंदणीकृत व्यक्तीस, नियुक्त केलेल्या दिवसासह समाप्त झालेल्या कालावधीसाठी विहित केलेल्या पद्धतीनुसार, त्याच्याद्वारे विद्यमान कायद्यांतर्गत सादर करण्यात आलेल्या रिटर्नमध्ये अग्रेषित न केलेल्या भांडवली वस्तूंच्या संदर्भात लाभ न घेतलेल्या इनपुट कराचे क्रेडिट त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये घेण्याचा अधिकार असेल.

---

[59] ठाणे शहर विभागांतर्गत GSTIN क्रं.27AABCC2553QZC असलेले मेसर्स कंसोल निओवॅट पॉवर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड.

जोपर्यंत सदर क्रेडिट नियुक्त केलेल्या दिवसापूर्वी किंवा त्यानंतर इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून अनुज्ञेय नाही तोपर्यंत नोंदणीकृत व्यक्तीला क्रेडिट घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

नियुक्त केलेल्या दिवसापूर्वी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियमांच्या नियम 52 मध्ये भांडवली मालमत्ता असणाऱ्या मालाच्या सदर नोंदणीकृत विक्रेत्याने केलेल्या खरेदीवर कराच्या मार्गाने इतर नोंदणीकृत विक्रेत्याद्वारे दावेदार विक्रेत्याकडून स्वतंत्रपणे गोळा केलेल्या रकमेचा सेट ऑफ मंजूर करण्याची तरतूद आहे.

तसेच, नियम 54(a) मध्ये स्पष्ट केले आहे की, मोटार वाहनांची खरेदी (प्रवासी वाहने) सदर वाहनांच्या संदर्भात कोणत्याही उद्देशासाठी वापरण्याचे अधिकार (विशिष्ट कालावधीसाठी असो किंवा नसो) हस्तांतरित करण्याच्या व्यवसायात गुंतलेल्या दावेदार विक्रेत्या व्यतिरिक्त त्याचे भाग, घटक आणि उपसाधने दावेदार विक्रेता भांडवली मालमत्ता मानतात. नियम 53(11) नुसार जर दावेदार विक्रेता प्रवासी वाहनांच्या कोणत्याही कारणासाठी/उद्देशासाठी वापरण्याचा अधिकार (विशिष्ट कालावधीसाठी असो किंवा नसो) हस्तांतरित करण्याच्या व्यवसायात गुंतला असेल तर तो वापरण्याच्या अधिकाराच्या अशा हस्तांतरणावर देय असलेल्या कराच्या मर्यादेपर्यंत आणि दावेदार विक्रेत्याद्वारे हस्तांतरित करण्यात आलेल्या अशा वापराच्या हक्कांच्या कालावधीत दावा केला असेल तर तो, अशा मोटार वाहनांच्या खरेदीवर प्रदान केलेल्या कराच्या सेट ऑफ चा दावा करण्यास पात्र असेल.

तथापि, राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र यांनी 2018 चे अंतर्गत परिपत्रक क्र.23A दिनांक 01.09.2018 च्या परिच्छेद 4 द्वारे नमूद केले आहे की, केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम, 1944 मध्ये असलेली सुनियोजीतपणे केंद्रीय मूल्यवर्धित कराचा लाभ घेण्याची तरतूद महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाला लागू होत नाही कारण ज्या महिन्यात अशी खरेदी होते त्या महिन्यात भांडवली वस्तूंच्या संदर्भात संपूर्ण सेट ऑफ/इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करण्याची परवानगी होती. त्यामुळे करदाता महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(2) अंतर्गत कोणतेही महाराष्ट्र मूल्यवर्धित कर क्रेडिट, इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये घेण्यास पात्र होणार नाही.

**(अ)** प्रवासी मोटार वाहन वापरण्याचा अधिकार हस्तांतरित करण्याच्या व्यवसायात गुंतलेल्या विक्रेत्यांच्या दोन प्रकरणांमध्ये आम्हाला असे लक्षात आले की ₹ 13.40 कोटींचे (***परिशिष्ट 2.5.4***) ट्रांझिशनल क्रेडिट इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये भांडवली वस्तूंच्या संदर्भात लाभ न घेतलेले इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून घेतले गेले जे 2018 च्या अंतर्गत परिपत्रक 23A च्या परिच्छेद 4 नुसार चुकीचे आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (सप्टेंबर 2021), एका प्रकरणांत[60] सह आयुक्त, एल टी यु-2, मुंबई यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (नोव्हेंबर 2021) आणि नमूद केले की करदाता, भाडे तत्वावर मोटार वाहनाचा पुरवठा करीत असेल आणि त्यालाच भांडवली वस्तू समजत असेल तर तो ₹ 9.66 कोटी TRAN क्रेडिटचा दावा करण्यास पात्र नाही त्यामुळे ते परत करणे आवश्यक आहे. तथापि, दुसऱ्या प्रकरणांत[61] उप-आयुक्त, एल टी यु-2, मुंबई यांनी म्हटले (नोव्हेंबर 2021) की, 01 एप्रिल 2016 च्या अधिसूचनेमधील तरतुदींच्या दृष्टीने करदाता नियुक्त दिवशी उपलब्ध असलेली ₹ 3.74 कोटी इनपुट टॅक्स क्रेडिटची शिल्लक घेण्यास पात्र असेल. त्यानंतर सह-आयुक्त, एल टी यु-2, मुंबई यांनी म्हटले (जानेवारी 2022) की केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियमांतर्गत उपलब्ध असलेल्या भांडवली वस्तूंशी संबंधित क्रेडिटची परवानगी देण्याची तरतूद महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाला लागू नाही आणि वस्तू आणि सेवा कर अंतर्गत इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये कोणतेही महाराष्ट्र मूल्यवर्धित कर क्रेडिट घेण्यास करदाता पात्र नसेल. त्यानुसार दावेदारा विरुद्ध वसुलीची नोटीस देण्यात आली (जानेवारी 2022).

अशाप्रकारे, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियमांच्या नियम 53 नुसार इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा न केलेल्या भागासाठी, दावेदाराचा हक्क, जो नियुक्त दिवशी दावा केला गेला नाही, त्याबाबतीत प्रत्यक्षात प्रदान करण्यात आलेल्या सेवांवर देय कराच्या मर्यादेपर्यंत सुनियोजीतपणे सेट-ऑफ देण्यास परवानगी देतो जे 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र 23(A) च्या परिच्छेद 4 च्या विरोधाभासी तरतुदींमुळे आता नियुक्त दिवसानंतर उपलब्ध नाही.

2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र. 23A च्या तरतुदींवर शासनाने पुनर्विचार करावा आणि अशा प्रकरणांमध्ये दावा न केलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटवर स्पष्टीकरण निर्गमित करावे.

**(ब)** आमच्या असे सुद्धा निदर्शनास आले की एका प्रकरणांत[62] करदात्याने तक्ता 6(b) अंतर्गत वस्तू आणि सेवा कर TRAN-I प्रपत्रामध्ये घोषणापत्र दाखल करून भांडवली वस्तूंवर ₹ 11.46 लाख TRAN क्रेडिटचा दावा केला आणि जानेवारी ते जून 2017 दरम्यान करण्यात आलेल्या खरेदीच्या संदर्भात त्यांच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये नोव्हेंबर आणि डिसेंबर 2017 या महिन्यांत ते घेण्यात आले, जे 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र.23A च्या परिच्छेद 4 च्या तरतुदींच्या विरुद्ध होते.

---

[60] GSTIN क्र. 27AACO256312I असलेले ऑरीक्स ऑटो इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस लिमिटेड.

[61] GSTIN क्र. 27AAGCA5212K1ZR सह अर्वल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड.

[62] GSTIN क्र. 27AAACP4156BIZS सह पिडीलाईट इंडस्ट्रीज.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (सप्टेंबर 2021) उत्तरादाखल असे सांगण्यात आले (सप्टेंबर 2021 आणि एप्रिल 2022) की जानेवारी ते जून 2017 दरम्यान खरेदी करण्यात आलेल्या मालासाठी विक्रेत्याद्वारे घेतलेले क्रेडिट योग्य होते. विक्रेत्याला सदर बीजके जुलै आणि ऑगस्ट 2017 दरम्यान प्राप्त झाले आणि म्हणूनच कर बीजके वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे करदात्याला त्याचे योग्य खाते तयार करता आले नाही आणि मूल्यवर्धित कर रिटर्नमध्ये कर क्रेडिटचा दावा करता आला नाही. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अंतर्गत घ्यायचे बाकी राहिलेले क्रेडिट तक्ता 6(ब) अंतर्गत वस्तू आणि सेवा कर TRAN-1 प्रपत्रामध्ये घोषणापत्र दाखल करून तेच क्रेडिट TRAN क्रेडिट म्हणून घेतले गेले.

तथापि, जरी विक्रेत्याने भांडवली वस्तूंच्या खरेदीवर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर भरला होता आणि महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(2) च्या तरतुदींच्या आधारे त्याचसाठी ट्रांझिशनल क्रेडिट म्हणून लाभ घेतल्या न गेलेले इनपुट टॅक्स क्रेडिट घेण्यासाठी तो पात्र होता, तरी देखील 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र. 23A च्या परिच्छेद 4 नुसार, ज्यामध्ये भांडवली वस्तूंच्या संदर्भात ही खरेदी करण्यात आलेल्या महिन्यात पूर्ण सेट ऑफ/इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करण्याची परवानगी होती, हा दावा नाकारण्यात आला. 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र. 23A च्या तरतुदींवर शासनाने पुनर्विचार करावा आणि भांडवली वस्तूंवर दावा न केलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटवर स्पष्टीकरण निर्गमित करावे.

***शिफारस 2: विभागाने 2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र. 23A च्या तरतुदींवर पुनर्विचार करावा आणि भांडवली वस्तूंवर लाभ न घेतलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटवर स्पष्टीकरण निर्गमित करावे.***

### 2.5.8.6 ट्रांझिट मधील इनपुट सेवांवर ट्रंझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(5) च्या तरतुदींनुसार, नोंदणीकृत व्यक्ती, नियुक्त केलेल्या दिवशी किंवा त्यानंतर प्राप्त झालेल्या इनपुटस् च्या संदर्भात परंतु त्या संदर्भातील कर पुरवठादाराद्वारे विद्यमान अधिनियमांतर्गत भरला गेला आहे त्याच्याच संदर्भातील बीजक किंवा कोणतेही कर भरल्याचे दस्तावेज नियुक्त दिवसापासून तीस दिवसांत अशा व्यक्तीच्या बुक्स ऑफ अकाऊंट मध्ये नोंदवले आहे, या अटीच्या अधीन राहून त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये मूल्यवर्धित कर आणि प्रवेश कराचे क्रेडिट घेण्यास पात्र असेल.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की करदात्याने[63] TRAN-1 तक्ता 7(ब) अंतर्गत ₹ 2.20 कोटी दाव्याची घोषणा केली आणि डिसेंबर 2017 मध्ये इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये त्याचे क्रेडिट घेतले. इनपुट्सच्या सूचीच्या पडताळणीत लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमात तरतूद नसलेल्या इनपुट सेवांवर करदात्याने ₹ 1.57 कोटी रकमेचे क्रेडिट घेतले. अशाप्रकारे, इनपुट सेवांवर ट्रांझिशनल क्रेडिट घेऊन ₹ 1.57 कोटी ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित अतिरिक्त लाभ घेतला.

लेखापरीक्षेने ऑक्टोबर 2021 मध्ये निरीक्षण कळविले. सह आयुक्त, विक्रीकर, एल टी यु-1 मुंबई यांनी उत्तर दिले (जानेवारी 2022) की कारणे दाखवा नोटीस (DRC-01) निर्गमित केली आहे. पुढील अनुपालन प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

### 2.5.8.7 प्रगतीपथावरील काम किंवा तयार मालामध्ये समाविष्ट असलेल्या इनपुटवर ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(6) नुसार, एक नोंदणीकृत व्यक्ती, जी निश्चित दराने कर भरत होती किंवा विद्यमान कायद्यानुसार देय कराच्या बदल्यात निश्चित रक्कम भरत होती, त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये, नियुक्त दिवशी साठ्यामध्ये असलेल्या इनपुट्सच्या संदर्भात आणि साठ्यामध्ये असलेल्या अर्ध-तयार किंवा तयार मालामध्ये असलेल्या इनपुट्स मध्ये खालील अटींच्या अधीन राहून मूल्यवर्धित कराचे क्रेडिट घेण्यास पात्र असेल:

(i) असे इनपुट्स किंवा वस्तू या अधिनियमांतर्गत करपात्र पुरवठा करण्यासाठी वापरलेले आहेत किंवा वापरायचे आहेत;

(ii) सदर नोंदणीकृत व्यक्ती कलम 10 अंतर्गत कर भरत नाही;

(iii) सदर नोंदणीकृत व्यक्ती या अधिनियमांतर्गत अशा इनपुटवर इनपुट टॅक्स क्रेडिटसाठी पात्र आहे;

(iv) सदर व्यक्तीकडे इनपुट्सच्या संदर्भात विद्यमान अधिनियमांतर्गत कराचे प्रदान केल्याचा पुरावा देणारे बीजके किंवा इतर दस्तावेज आहेत;

(v) अशी बीजके किंवा इतर विहित दस्तावेज नियुक्त दिवसाच्या लगेच आधीच्या बारा महिन्यांपूर्वी निर्गमित केले नाहीत.

तसेच राज्य कर आयुक्तांनी स्पष्ट केले (सप्टेंबर 2018)[64] की ‘‘इनपुट्स’ या शब्दाचा अर्थ भांडवली मालमत्तेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू असा होतो. म्हणून “इनपुट्स”

[63] मुंबईच्या एल टी यु-1 विभागांतर्गत GSTIN क्र. 27AAACWO387R1ZN असलेले मेसर्स विप्रो लिमिटेड.

[64] दिनांक 01/09/2018 च्या अंतर्गत परिपत्रक क्र. 23A चा परिच्छेद 8.7.

या शब्दामध्ये भांडवली वस्तूंचा समावेश होणार नाही आणि म्हणून बांधकाम व्यवसायी आणि विकासक 1 जुलै 2017 रोजी साठ्यामध्ये असलेल्या भांडवली वस्तूंच्या संदर्भात मूल्यवर्धित कर क्रेडिटवर दावा करण्यास पात्र राहणार नाहीत. पुढे असेही स्पष्ट करण्यात आले की इमारत किंवा प्रगतीपथावर असलेले काम, म्हणजे अर्ध-तयार किंवा तयार मालामध्ये असलेले “इनपुट्स” महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमांतर्गत परिभाषित केल्यानुसार “वस्तू” या संज्ञेत समाविष्ट होणार नाहीत आणि म्हणून प्रगतीपथावर असलेल्या कामाच्या स्वरूपातील इनपुट म्हणजे अर्ध-तयार आणि तयार मालामध्ये समाविष्ट असलेले, महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या अर्थ आणि व्याप्ती मधील “वस्तू” नाहीत आणि करदाता मूल्यवर्धित कर क्रेडिटचा दावा करण्यास पात्र नसेल.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की बांधकाम व्यावसायिक आणि विकासकाच्या 210 प्रकरणांपैकी 12 प्रकरणांमध्ये करदात्याद्वारे ₹ 4.25 कोटींचे ***(परिशिष्ट-2.5.5)*** ट्रांझिशनल क्रेडिट TRAN-1 च्या तक्ता 7 क अंतर्गत घोषित करण्यात आले आणि अर्ध-तयार किंवा तयार वस्तूंमध्ये असलेल्या इनपुट्सवर त्यांचे इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये क्रेडिट घेण्यात आले. परिणामी, ₹ 4.25 कोटी ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ झाला.

लेखापरीक्षेने जुलै ते सप्टेंबर 2021 पर्यंत निरीक्षणे कळविली. तथापि, त्यांची उत्तरे प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

**उदाहरण:**

करदात्याने[65] TRAN-1 च्या तक्ता 7(क) अंतर्गत अर्ध-तयार वस्तूंमध्ये समाविष्ट असलेल्या इनपुटसाठी ₹ 81.62 लाख ट्रांझिशनल क्रेडिटचा दावा केला होता आणि पुढे ते इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये अग्रेषित केले. करदाता हा बांधकाम व्यावसायिक/विकासक असल्यामुळे तो अर्ध-तयार वस्तूंमध्ये असलेल्या इनपुट्सवर मूल्यवर्धित कर क्रेडिटसाठी पात्र नाही. परिणामी, ₹ 81.62 लाख ट्रांझिशनल क्रेडिटचा अनियमित लाभ झाला.

### 2.5.8.8 TRAN च्या रकमेपेक्षा जास्त रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये जमा

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 140(1) नुसार नोंदणीकृत करपात्र व्यक्ती जून 2017 रोजी संपलेल्या कालावधीसाठी म्हणजे 01 जुलै 2017 पूर्वी दाखल केलेल्या रिटर्नमध्ये दर्शविल्याप्रमाणे इनपुट टॅक्स क्रेडिटची पुढे अग्रेषित केलेली रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये घेऊ शकते. नोंदणीकृत करदात्याने विहित

[65] GSTIN क्र.27AABCB3630P1ZJ असलेले भारत इन्फ्रास्ट्रक्चर अँड इंजीनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड.

प्रपत्रामध्ये म्हणजे TRAN-1 मध्ये निर्धारित तारखेच्या आत रिटर्न भरणे आवश्यक आहे आणि TRAN-1 मध्ये इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून दाखविलेली रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये ट्रांझिशनल क्रेडिट म्हणून घेतली जाईल.

एल टी यु-II, मुंबई (GSTIN-27AAJCS9992H1ZI) शी संबंधीत मेसर्स सिल्वानस प्रॉपर्टीज लिमिटेडद्वारे सादर केलेल्या TRAN-1 च्या पडताळणीत तक्ता 7 क अंतर्गत (बीजकांद्वारे समर्थित इनपुट्सवर भरलेल्या मूल्यवर्धित कराची रक्कम) ₹ 69.39 लाखांचे आणि तक्ता 11(क) अंतर्गत (कलम 142(11(क)) नुसार क्रेडिट) ₹ 14.16 लाखांचे क्रेडिट उघडकीस आले. अशाप्रकारे, TRAN-1 नुसार एकूण क्रेडिट ₹ 83.55 लाख होते. तथापि, लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले (जून 2022) की इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये राज्य करा अंतर्गत ₹ 1.12 कोटींचे ट्रांझिशनल क्रेडिट जमा केले. परिणामी, ₹ 28.79 लाख जास्त ट्रांझिशनल क्रेडिट जमा झाले.

उत्तरादाखल, सह आयुक्त विक्रीकर, एल टी यु-02 मुंबई ने सादर केले (ऑगस्ट 2022) की TRAN-1 मधील इनपुट टॅक्स क्रेडिट दाव्याच्या मुद्द्यावर हे प्रकरण 2017-18 या कालावधीसाठी वस्तू आणि सेवा कर लेखापरीक्षणासाठी निवडण्यात आले आहे.

***शिफारस 3: करदात्याद्वारे इनपुट टॅक्स क्रेडिटच्या अनियमित/अतिरिक्त लाभ/वापर टाळण्यासाठी करदात्याद्वारे ट्रांझिशनल क्रेडिटचा लाभ घेण्यासाठी सर्व आवश्यक अटींचे अनुपालन विभागाने सुनिश्चित करावे.***

***शिफारस 4: ट्रांझिशनल क्रेडिटच्या अनियमित अतिरिक्त लाभाच्या वसुलीसाठी संबंधित करदात्याला डिमांड नोटीस बजावण्यासाठी विभागाने कारवाई सुरू करणे गरजेचे आहे.***

# वस्तू आणि सेवा कर विभाग

## 2.6 वस्तू आणि सेवा कर परतावा

**परतावा अर्जाचा संदर्भ क्रमांक निर्माण करण्यापूर्वी करदात्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजर मध्ये डेबिट करण्यातील अपयशामुळे अनियमित परतावा देण्यात आला. तसेच परतावा आदेश निर्गमित करण्यापूर्वी करदात्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजर मध्ये परतावा दाव्याची रक्कम डेबिट करणे हे सुनिश्चित करण्यात विभाग अयशस्वी झाला. विभागाने समकक्ष कर प्राधिकाऱ्यांना परतावा आदेशांच्या संप्रेषणाचा डेटा सादर केला नाही, तसेच वारंवार निवेदन करून सुद्धा उतर-लेखापरीक्षणाकरिता सादर केलेले परताव्याचे दावे आणि वस्तू आणि सेवा कर परताव्याच्या भुगताना संबंधीचा डेटा पडताळणीकरिता लेखापरीक्षेस सादर केला नाही. त्यामुळे, लेखापरीक्षेला संहिता प्रावधानांचे अनुपालन आणि परतावा आदेश निर्गमित करण्यात अचूकतेची आणि समयसूचकतेची खात्री करता आली नाही. काही प्रकरणांमध्ये परतावा आदेश विलंबाने निर्गमित केला होता, ज्यामुळे व्याजाच्या भुगतानाचे दायित्व निर्माण झाले. विभागाने निर्यातीच्या पुराव्याविना झिरो रेटेड निर्याती संदर्भात परतावा मंजूर केला. विभागाने भांडवली वस्तूंवरील इनपुट टॅक्स क्रेडिट तसेच इनपुट सेवा, जिथे लागू असेल तिथे परतावा मंजूर करताना गृहित धरण्यात चूक केली. समायोजित एकूण उलाढाल, निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट ह्या घटकांचे चुकीचे मूल्य गृहित धरलेली प्रकरणे निदर्शनास आली, ज्याचा परिणाम जास्तीच्या परताव्यात झाला. या क्रेडिटच्या अपात्रतेच्या कारणास्तव न वापरलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा दावा नाकारल्यानंतर विभागाने दावेदारांच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये नाकारलेल्या रकमेचे पुन्हा क्रेडिट सुनिश्चित केले नाही.**

### 2.6.1 प्रस्तावना

वस्तू आणि सेवा कर लागू करणे ही आपल्या देशातील अप्रत्यक्ष करांच्या क्षेत्रातील एक लक्षणीय सुधारणा आहे, ज्याने केंद्र आणि राज्यांकडून आकारल्या आणि संकलित केल्या जाणाऱ्या अनेक करांची जागा घेतली आहे. वस्तू आणि सेवा कर हा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हीच्या पुरवठ्यावरील गंतव्य स्थानावरील आधारित कर आहे, जो अनेक टप्प्यात आकारला जातो, ज्यामध्ये कर आणि पुरवठा पूरक असतात. पुरवठ्याच्या जागेवर अधिकारक्षेत्र असलेल्या कर आकारणी प्राधिकरणाकडे कर उपार्जित होईल.

समान कर आधारावर केंद्र आणि राज्ये एकाच वेळी कर आकारतात. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर आणि राज्य वस्तू आणि सेवा कर/केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा

कर हा राज्यांतर्गत पुरवठ्यावर आणि एकात्मिक वस्तू आणि सेवा कर हा आंतरराज्य पुरवठ्यावर आकारला जातो.

केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात वस्तू किंवा सेवांचा राज्यांतर्गत पुरवठा किंवा दोन्हीवर कर आकारणी आणि संकलनासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा त्यावरील प्रासंगिक बाबींवर तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्र वस्तू आणि सेवा अधिनियम, 2017 हा 1 जुलै 2017 पासून लागू करण्यात आला.

**2.6.1.1** समयोचित परतावा यंत्रणा, कर प्रशासनाचा एक निर्णायक घटक आहे. कारण ती खेळते भांडवल, विस्तार आणि विद्यमान व्यवसायाचे आधुनिकीकरण यासाठी अवरोधित निधी मुक्त करून व्यापार सुलभ करते. वस्तू आणि सेवा कर कायद्यामध्ये असलेल्या परताव्याशी संबंधित तरतुदींचा उद्देश हा शासन पद्धती अंतर्गत वस्तू आणि सेवा कर परतावा प्रक्रिया सुलभ आणि प्रमाणित करणे आहे. महाराष्ट्र शासनाद्वारे हा निर्णय घेतला गेला आहे की दावा आणि मंजूर करण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन असेल. कॉमन पोर्टलवर इलेक्ट्रॉनिक रिफंड मॉड्यूल उपलब्ध नसल्यामुळे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी नोव्हेंबर/डिसेंबर 2017 रोजी परिपत्रके[66] निर्गमित केली, ज्यामध्ये तात्पुरती यंत्रणा तयार करून वस्तू आणि सेवा कर परताव्यांसाठी तपशीलवार प्रक्रिया निर्धारित करण्यात आली. या इलेक्ट्रॉनिक तसेच मॅन्युअल प्रक्रियेमध्ये अर्जदाराने कॉमन पोर्टलवर GST-RFD-01A प्रपत्रामध्ये परतावा अर्ज दाखल करणे, त्याचे प्रिंट काढणे आणि ते सर्व आवश्यक कागदपत्रांसह अधिकार क्षेत्रीय कर कार्यालयात भौतिकदृष्ट्या सादर करणे आवश्यक होते, तसेच त्या परतावा अर्जांची तपासणी करणे, म्हणजेच पोचपावती देणे, कमतरता मेमो निर्गमित करणे, तात्पुरता/अंतिम परतावा आदेश पारित करणे, भुगतान ॲडव्हाइस इत्यादी भौतिकदृष्ट्या केले जात होते. परतावा अर्ज सादर करण्याची प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक बनविण्यासाठी केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी पुढे निर्दिष्ट केले[67] की GST-RFD-01 A प्रपत्रामधील परतावा अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रांसह इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर केले जावेत. तथापि, परतावा अर्जाच्या प्रक्रियेचे सादरीकरणानंतरचे विविध टप्पे मॅन्युअल पद्धतीने चालू राहिले. 01.07.2017 ते 25.09.2019 दरम्यान (म्हणजेच स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी) तांत्रिक अडचणीमुळे ते पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक करता आले नाही.

---

[66] परिपत्रक क्र. 17/17/2017-जी.एस.टी दिनांक 15/11/2017 आणि 24/24/2017-जी.एस.टी दिनांक 21/12/2017.

[67] परिपत्र क्र 79/53/2018-जी.एस.टी दिनांक 31/12/2018.

**2.6.1.2** परतावा प्रक्रियेचे संपूर्ण यांत्रिकीकरण म्हणजेच पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक बनविण्यासाठी आवश्यक क्षमता, ज्यामध्ये परतावा अर्ज सादर करण्यापासून ते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रक्रिया करण्यापर्यंतचे सर्व टप्पे, 26.09.2019 पासून कॉमन पोर्टलवर लागू केले गेले. स्वंयचलित प्रणाली पश्चात केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी नोव्हेंबर 2019 मध्ये इलेक्ट्रॉनिक सादरीकरण आणि परतावा दाव्यांच्या प्रक्रियेसाठी पूर्वीची परिपत्रके/मार्गदर्शक तत्वे[68] रद्द करून मार्गदर्शक तत्वांचा नवीन संच जारी[69] केला. तथापि, 26.09.2019 पूर्वी (म्हणजेच स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी) कॉमन पोर्टलवर दाखल केलेल्या सर्व परतावा अर्जांवर मॅन्युअल प्रक्रिया करणे सुरू होते.

**2.6.1.3 वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी परिस्थिती**

वस्तू आणि सेवा कर परताव्याचा दावा खालील कारणांमुळे उद्भवला:

**(i)** वस्तू किंवा सेवांची निर्यात;

**(ii)** विशेष आर्थिक क्षेत्रातील युनिट आणि विकासक यांना पुरवठा;

**(iii)** मानलेली निर्यात;

**(iv)** संयुक्त राष्ट्र किंवा दूतावास इत्यादींनी केलेल्या खरेदीवरील कराचा परतावा;

**(v)** अपील प्राधिकरण, अपील न्यायाधिकरण किंवा कोणत्याही न्यायालयाचा निर्णय, हुकूम (डिक्री), आदेश किंवा निर्देशामुळे उद्भवलेला परतावा;

**(vi)** इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर/रिव्हर्स चार्ज प्रकरणांमुळे वस्तू आणि सेवा करांच्या जमा इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा;

**(vii)** तात्पुरत्या मूल्यांकनाचे अंतिमीकरण;

**(viii)** इलेक्ट्रॉनिक कॅश लेजरमध्ये शिल्लक परतावा;

**(ix)** पूर्व ठेवींचा परतावा;

**(x)** जास्तीचे वस्तू आणि सेवा कर भुगतान;

**(xi)** आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी भारतातील वस्तूंवर भरलेल्या आणि परदेशात नेलेल्या वस्तूंवर वस्तू आणि सेवा कराचा परतावा;

---

[68] परिपत्र क्र 17/17/2017-जीएसटी दिनांक 15.11.2017; 24/24/2017-जीएसटी दिनांक 21.12.2017; 37/11/2018-जीएसटी दिनांक 15.03.2018; 45/19/2018-जीएसटी दिनांक 30.05.2018 (दिनांक 18.07.2019 च्या शुद्धीपत्रासह); 59/33/2018-जीएसटी दिनांक 04.09.2018;70/44/2018-जीएसटी दिनांक 26.10.2018;79/53/2018-जीएसटी दिनांक 31.12.2018 आणि 94/13/2019-जीएसटी दिनांक 28.03.2019.

[69] मुख्य परिपत्रक क्र 125/44/2019-जीएसटी दिनांक 18.11.2019.

**(xii)** वस्तू किंवा सेवांचा पुरवठा केला गेला नाही त्या अग्रिमांवर भरलेल्या करांसाठी निर्गमित केलेल्या परतावा प्रमाणकांचा परतावा;

**(xiii)** केंद्रीय वस्तू आणि सेवा कर आणि राज्य वस्तू आणि सेवा कराचा परतावा राज्यांतर्गत पुरवठा मानून अदा केला जातो, जो नंतर आंतरराज्य पुरवठा म्हणून ग्राहय धरला जातो आणि उलटपक्षी आंतरराज्य पुरवठा मानून अदा केला जातो, जो नंतर राज्यांतर्गत पुरवठा म्हणून ग्राहय धरला जातो.

### 2.6.2 संघटनात्मक संरचना

शासन स्तरावर वस्तू आणि सेवा कर विभाग वित्त विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्य करते. राज्य कर आयुक्त, महाराष्ट्र राज्य विभागाचे प्रमुख आहेत आणि त्यांना राज्य कराचे विशेष आयुक्त, राज्य कराचे चार अतिरिक्त आयुक्त आणि 12 सह आयुक्त मदत करतात. माझगाव, मुंबई येथील मुख्य कार्यालया व्यतिरिक्त, अतिरिक्त आयुक्त, राज्य कर यांच्या नेतृत्वाखालील आणखी पाच विभागीय कार्यालये आहेत. सह आयुक्त राज्य कर (प्रशासन) यांच्या नेतृत्वाखालील 13 विभागीय कार्यालये आणि 39 राज्य कर कार्यालये[70] राज्याच्या 36 जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत.

### 2.6.3 लेखापरीक्षेची व्याप्ती, पद्धती आणि नमूना निवड

वस्तू आणि सेवा कर नेटवर्क वरून पॅन इंडिया परतावा डेटा प्राप्त करण्यात आला आणि महाराष्ट्र राज्याशी संबंधित परतावा प्रकरणांचा नमूना तपशीलवार तपासणीसाठी काढण्यात आला. 32 वस्तू व सेवा कर विभागांमधील 1954 प्रकरणे सांख्यिकीय यादृच्छिक नमूना पद्धतीद्वारे निवडण्यात आली ज्यात प्रामुख्याने मुंबई, मुंबई-उपनगर, ठाणे, पुणे इत्यादिंमधील प्रमुख आर्थिक केंद्रे/औद्योगिक केंद्रे समाविष्ट होती. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे उपसचिव (वित्त) यांच्या सोबत 09 डिसेंबर 2020 रोजी ऑनलाइन प्रवेश परिषद आयोजित करण्यात आली होती. राज्य कर विभागाचे तीन अतिरिक्त आयुक्त, तीन सह-आयुक्त, चार उप-आयुक्त आणि एक सहाय्यक आयुक्त (आंतरिक लेखापरीक्षा) हे प्रवेश परिषदेला उपस्थित होते.

जुलै 2017 ते जुलै 2020 या कालावधीत निवडलेल्या परतावा प्रकरणांच्या केलेल्या तपासणीसाठी डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021 दरम्यान लेखापरीक्षण करण्यात आले. डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021 या कालावधीत स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीशी संबंधित 886 प्रकरणांचे भौतिक लेखापरीक्षण करण्यात आले आणि सर्व निवडलेल्या

---

[70] राज्य कर कार्यालये एकतर उपायुक्त राज्य कर, सह आयुक्त, राज्य कर किंवा राज्य कर अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली.

स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या 1068 प्रकरणांचे ऑनलाइन लेखापरीक्षण करण्यात आले.

निर्गमन परिषद 04 जानेवारी 2022 रोजी ऑनलाइन आयोजित करण्यात आली. लेखापरीक्षण निरीक्षणांचा समावेश असलेला प्रारूप अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला (डिसेंबर 2021). तथापि उत्तर अद्यापही अप्राप्त आहे (ऑगस्ट 2022).

### 2.6.4 लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

खालील बाबींचे मूल्यांकन हे वस्तू आणि सेवा कर परताव्याच्या विषय विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट होते:

- परताव्याच्या मंजुरी संदर्भात निर्गमित केलेले अधिनियम, नियम, अधिसूचना, परिपत्रके इत्यादींची पर्याप्तता;
- कर अधिकाऱ्यांद्वारे प्रचलित तरतुदींचे अनुपालन आणि करदात्यांकडून अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी परिणामकारक प्रणाली; आणि
- परतावा अर्ज निकाली काढतांना विभागीय अधिकाऱ्यांची कामगिरी तपासण्यासाठी प्रभावी अंतर्गत नियंत्रण यंत्रणा आस्तिवात होती की नाही.

### 2.6.5 लेखापरीक्षा निकष

लेखापरीक्षा निष्कर्ष खालील निकषांवर आधारित आहेत:

i) महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 चे कलम 54 ते 58 आणि कलम 77;

ii) महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियम, 2017 चे नियम 89 ते 97A;

iii) एकात्मिक वस्तू आणि सेवा कर अधिनियम, 2017 चे कलम 15,16 आणि 19;

iv) केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ आणि महाराष्ट्र राज्य कर आयुक्त यांनी निर्गमित केलेल्या अधिसूचना/परिपत्रके;

### लेखापरीक्षा निष्कर्ष

प्रारूप अहवालातील लेखापरीक्षा निष्कर्ष खालील **तक्ता 2.6.1** मध्ये सारांशित केले आहेत:

**तक्ता: 2.6.1**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु. क्र. | लेखापरीक्षा निष्कर्षाचे स्वरूप (फक्त सूचक) | लेखापरीक्षा नमुना | | निदर्शनास आलेल्या कमतरतांची संख्या | | नमुन्याची टक्केवारी म्हणून कमतरता | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| 1 | पोचपावती देतांना झालेला विलंब | 1954 | 3117.57 | 759 | -- | 38.84 | -- |
| 2 | परतावा आदेश देतांना झालेला विलंब | 1954 | 3117.57 | 1091 | -- | 55.83 | -- |
| 3 | झिरो रेटेड पुरवठयामुळे तात्पुरता परतावा मंजूर करण्यास झालेला विलंब | 992 | 2634.86 | 418 | -- | 42.14 | -- |
| 4 | इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चर अंतर्गत अनियमित परतावा | 661 | 277.58 | 125 | 24.16 | 18.91 | 8.70 |
| 5 | शून्य दर पुरवठा प्रकरणांत अनियमित परतावा | 992 | 2634.86 | 50 | 22.73 | 5.04 | 0.86 |
| 6 | समकक्ष कर प्राधिकरणाला परतावा आदेश कळविण्यात आल्याचा डेटा दिला नाही | डेटा दिला नाही | | | | | |
| 7 | उत्तर-लेखापरीक्षण आयोजित केल्याचा डेटा संप्रेषित न करणे | डेटा दिला नाही | | | | | |
| 8 | वस्तू आणि सेवा कर परताव्याच्या भुगतानाचा डेटा उपलब्ध करून न देणे | डेटा दिला नाही | | | | | |

## 2.6.6 प्रणालीगत समस्या

### 2.6.6.1 एका प्रकरणात इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर डेबिट करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे अनियमित परतावा

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी स्पष्ट केले[71] की (नोव्हेंबर 2019) अर्जदाराने वस्तू आणि सेवा कर RFD-01 मध्ये परतावा अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आणि सर्व आवश्यक कागदपत्रे/हमीपत्र/विवरणपत्रे/बंधपत्रे अपलोड केल्यानंतरच अर्ज संदर्भ क्रमांक निर्मित केल्या जाईल आणि आवश्यक असेल तेथे इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजरमधून रक्कम डेबिट केली जाईल.

[71] परिपत्रक क्र.125/44/2019–जीएसटी दिनांक 18.11.2019 चा परिच्छेद 4(ब).

स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधीतील 1068 प्रकरणांपैकी एका प्रकरणात लेखापरीक्षणाला असे आढळून आले की करदात्याने[72] ऑक्टोबर 2019 मध्ये केंद्रीय वस्तू आणि सेवा कर दायित्वाच्या कारणास्तव ₹ 0.69 कोटी जमा केले, वास्तविकतः त्याचे महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर दायित्व केवळ ₹ 0.02 कोटी होते. त्यामुळे त्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये ₹ 0.67 कोटी जास्त जमा झाले. करदात्याने ₹ 0.67 कोटींच्या परताव्यासाठी अर्ज केला आणि नोव्हेंबर 2019 मध्ये अर्ज संदर्भ क्रमांक निर्माण झाला. अर्ज संदर्भ क्रमांकाच्या निर्मितीपूर्वी इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये ₹ 0.67 कोटींचे डेबिट प्रभावित करणे आवश्यक होते. विभागाने ₹ 0.67 कोटींचा परतावा जानेवारी 2020 मध्ये मंजूर केला, जो करदात्याला जानेवारी 2020 मध्ये मिळाला. तथापि, असे आढळून आले की करदात्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर मध्ये परत केलेल्या रकमेचे कोणतेही डेबिट नव्हते. हे अर्ज संदर्भ क्रमांकाच्या निर्मितीपूर्वी इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर डेबिट करण्यात अपयश दर्शविते. तसेच परतावा आदेश निर्गमित करण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये समान रकमेचे डेबिट सुनिश्चित करण्यात विभागाला अपयश आले. याचा परिणाम ₹ 0.67 कोटींचा अनियमित परतावा देण्यात झाला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी 2021), उप-आयुक्त, राज्य कर यांनी नमूद केले (फेब्रुवारी 2021) की सामान्यतः RFD-1 ची प्रक्रिया करताना इलेक्ट्रॉनिक लेजर्समधील जास्तीची शिल्लक रक्कम संबंधित लेजर्समधून डेबिट केली जाते. परंतु वर्तमान प्रकरणांत तांत्रिक त्रुटी किंवा प्रणालीगत त्रुटींमुळे हे घडले नाही. करदात्याने विभागाच्या अनुनयाने, फेब्रुवारी 2021 मध्ये इलेक्ट्रॉनिक कॅश लेजरमध्ये ₹ 0.67 कोटी डेबिटसाठी (DRC-3) दाखल केला.

***शिफारस 1: अर्ज संदर्भ क्रमांक निर्माण होण्यापूर्वी आणि परतावा आदेश निर्गमित करण्यापूर्वी विभागाने इलेक्ट्रॉनिक क्रेडिट/कॅश लेजरमध्ये डेबिटची खात्री करावी***

### 2.6.6.2 दुहेरी भुगतान ॲडव्हाइस निर्गमित केल्यामुळे वस्तू आणि सेवा कर परताव्याचे जास्तीचे प्रदान

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 50(1) आणि 122(2)(a) सह कलम 73(1) नुसार जेथे संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांना[73] असे निदर्शनास येते की कोणताही कर भरला गेला नाही किंवा कमी भरला गेला किंवा चुकून परतावा दिला

[72] ठाणे शहर विभागाच्या अधिकार क्षेत्रात GSTIN क्र.27AAACW0287A1ZN असलेली मेसर्स वाल्वोलीन कमिन्स प्रायव्हेट लिमिटेड.

[73] या अधिनियमांतर्गत पार पाडावयाच्या कोणत्याही कार्यासंबंधात "संबंधित निर्धारण अधिकारी" म्हणजे महाराष्ट्र कराचे आयुक्त किंवा अधिकारी ज्यांना मंडळातील आयुक्तांनी ते कार्य सोपवले आहे.

गेला, किंवा फसवणुकीच्या कारणाशिवाय किंवा कर चुकवण्यासाठी जाणून बुजून चुकीचे विधान किंवा तथ्य लपवणे ह्या कारणाशिवाय इतर कारणांसाठी इनपुट टॅक्स क्रेडिट चा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला गेला किंवा वापरले गेले असेल त्या प्रकरणांत तो कर आकारणीयोग्य व्यक्तीला नोटीस बजावेल, ज्याने कर भरलेला नाही किंवा कमी भरला आहे किंवा ज्याला चुकून परतावा दिला गेला आहे, किंवा ज्याने चुकीच्या पद्धतीने इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला आहे किंवा त्याचा वापर केला आहे, त्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम 18 टक्के वार्षिक दराने व्याजासह का भरू नये याचे कारण सांगावे लागेल.

लेखापरीक्षणात असे आढळून आले (ऑगस्ट 2021 ते ऑक्टोबर 2021) की वस्तू आणि सेवा कर परतावा दाव्याच्या 22 प्रकरणांमध्ये ***(परिशिष्ट 2.6.1 आणि 2.6.2)*** करदात्यांना वस्तू/सेवांच्या झिरो रेटेड पुरवठयावर परतावा मंजूर करण्यात आला. तथापि संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी इलेक्ट्रॉनिक भुगतान ॲडव्हाइस दोनदा निर्गमित केल्यामुळे ₹ 1.83 कोटींच्या परताव्याचे जास्त प्रदान झाले.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (ऑगस्ट 2021 ते ऑक्टोबर 2021), नऊ[74] संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी सांगितले की प्रणाली/तांत्रिक चुकींमुळे दुहेरी भुगतान ॲडव्हाइस निर्गमित केले.

वरील 22 पैकी 15 प्रकरणांमध्ये करदात्यांनी ₹ 3.24 लाख व्याजासह ₹ 1.26 कोटी रक्कमेच्या जास्त परताव्याची परतफेड केली ***(परिशिष्ट 2.6.1).*** ₹ 0.91 लाख व्याज अद्यापही प्रलंबित आहे. ह्या 15 प्रकरणांपैकी सह-आयुक्त, विक्रीकर, मुलुंड, मुंबई आणि सह-आयुक्त, विक्रीकर, नाशिक अंतर्गत दोन प्रकरणांमध्ये[75] लेखापरीक्षणामुळे ₹ 12.19 लाख रक्कम वसूल करण्यात आली.

उर्वरित सात प्रकरणांमध्ये ₹ 0.16 कोटींच्या व्याज दायित्वासह ₹ 0.56 कोटींचा जास्तीचा परतावा देण्यात आला. यापैकी एका[76] प्रकरणांत व्याजासह ₹ 0.26 लाखाची वसुली करण्यात आली ***(परिशिष्ट 2.6.2)*** उर्वरित सहा प्रकरणांपैकी तीन प्रकरणांमध्ये वसुली करण्यात आली आहे असे सांगितले परंतु त्याबाबतचे पुरावे लेखापरीक्षेला सादर केले नाही. उर्वरित दोन प्रकरणांमध्ये अद्यापही उत्तर प्रतीक्षित आहे.

---

[74] JCST, नोडल V, बांद्रा; JCST, घाटकोपर; JCST, मांडवी; JCST, नोडल XIII, मुलुंड; JCST, नाशिक; JCST, नोडल-I, पुणे (पूर्व); JCST, ठाणे शहर; JCST, नागपूर, JCST, कांदीवली.

[75] मुलुंडचे मेसर्स अमित बँगल्स आणि नाशिकचे सोना सिक्का फॅब्रिक्स.

[76] कोल्हापूर विभागाचे एस. आर. नेजे.

**उदाहरण:**

एका करदात्याने[77] मे 2019 या महिन्यासाठी ₹ 0.24 कोटी इनपुट टॅक्स क्रेडिट च्या परताव्यासाठी अर्ज दाखल केला होता (05.10.2019) ज्यासाठी 07.10.2019 रोजी RFD-02 मध्ये पोचपावती निर्गमित करण्यात आली. करदात्याला 14.10.2019 रोजी ₹ 0.22 कोटींचा तात्पुरता परतावा आदेश मंजूर करण्यात आला.

तथापि, विभागाने संख्या ZA2701200610539 आणि ZA270120060996 द्वारे दिनांक 23.01.2020 रोजी दोनदा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने भुगतान ॲडव्हाइस निर्गमित केले. परिणामी, ₹ 0.22 कोटींचा जास्त परतावा दिल्या गेला, जो आजपर्यंत (ऑक्टोबर 2021) करदात्याने परत केला नाही, ज्यावर वसूल करण्यायोग्य व्याज ₹ 0.06 कोटी इतके आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (सप्टेंबर 2021) विभागाने आजपर्यंत कोणतेही उत्तर सादर केले नाही.

### 2.6.7 अनुपालन बाबी

#### 2.6.7.1 परतावा अर्जांची पोचपावती निर्गमित करण्यात झालेला विलंब

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमाच्या नियम 90(2) आणि 90(3) नुसार, जेथे परताव्याचा अर्ज इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरच्या दाव्यांव्यतिरिक्त दुसऱ्या दाव्यांशी संबंधित असेल तर तो संबंधित निर्धारण अधिकाऱ्याकडे पाठवला जाईल, जे तो अर्ज दाखल केल्यापासून 15 दिवसांच्या आत, त्याच्या परिपूर्णतेची पडताळणी करतील आणि जेथे अर्ज पूर्ण असल्याचे आढळून येईल, तेथे अर्जदाराला FORM GST RFD-02 मध्ये पोचपावती कॉमन पोर्टलद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून दिली जाईल. कोणतीही त्रुटी लक्षात आल्यास, संबंधित निर्धारण अधिकारी अर्जदाराला FORM GST RFD-03 मध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कॉमन पोर्टलद्वारे निदर्शनास आणून देईल जेणे करून अर्जदार अशी त्रुटी सुधारल्यानंतर नवीन परतावा अर्ज दाखल करेल.

चाचणी तपासणी केलेल्या 1954 प्रकरणांपैकी इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजर व्यतिरिक्त इतर परतावा संबंधित 759 परताव्याच्या प्रकरणांमध्ये (38.84 टक्के) लेखापरीक्षणाला असे आढळून आले की विभागाकडून पोचपावती देण्यात ***(परिशिष्ट 2.6.3 आणि 2.6.4)*** एक ते 585 दिवसांचा विलंब झाला आहे, जो **तक्ता 2.6.2** मध्ये तपशीलवार दर्शविला आहे.

[77] कांदीवली विभाग, मुंबई अंतर्गत GSTN क्रं. 27AAACC2243CIZB असलेले मेसर्स केमोसिड इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड.

**तक्ता-2.6.2**

| कालावधी | महिन्यांमध्ये विलंबाच्या श्रेणीसह प्रकरणांची संख्या | | | एकूण | *परिशिष्ट* |
|---|---|---|---|---|---|
| | 3 महिन्यां पर्यंत | 3-6 महिने | 6 महिन्यांपेक्षा जास्त | | |
| स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी (01.07.2017 ते 25.09.2017) | 348 | 55 | 43 | 446 | ***2.6.3*** |
| स्वयंचलित प्रणाली पश्चातचा कालावधी (26.09.2017 ते 31.07.2020) | 307 | 06 | 00 | 313 | ***2.6.4*** |
| **एकूण** | **655** | **61** | **43** | **759** | |

लेखापरीक्षणाने निदर्शनास आणून दिल्यावर (डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021) 271 प्रकरणांमध्ये संबंधित सह-आयुक्त, विक्रीकर यांनी मान्य केले की स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीत वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात घडले. पुढे असेही सादर करण्यात आले की करदात्यांनी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न केल्यामुळे हा विलंब झाला. उर्वरित 175 प्रकरणांमध्ये उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या 157 प्रकरणांमध्ये संबंधित सह-आयुक्त विक्रीकर यांनी विविध कारणे सादर केली (जानेवारी-नोव्हेंबर 2021) जसे की नवीन कर प्रणाली लागू करण्यातील तांत्रिक अडचणी, विद्यमान अधिकारांचे हस्तांतरण, वस्तू आणि सेवा कर इमारतीला लागलेली आग आणि ती शांत होण्यास लागलेला अनेक दिवसांचा कालावधी, स्थलांतरणामधील विलंब तसेच कोविड-19 मुळे लागलेला लॉकडाउन ज्यामुळे परताव्याच्या प्रक्रियेस विलंब झाला. उर्वरित 156 प्रकरणांच्या संदर्भात उत्तर प्रतीक्षित आहे.

उत्तर स्वीकार्य नाही कारण परताव्यासाठी दावेदाराकडून नवीन अर्ज प्राप्त करण्याकरीता विभागाद्वारे महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या नियम 90(3) अंतर्गत कमतरता मेमो निर्गमित केला नाही.

**उदाहरणः**

**स्वयंचलित प्रणाली पूर्व:** करदात्याने[78] सप्टेंबर 2017 या महिन्यासाठी ₹ 2.93 लाख रकमेच्या वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 27.10.2018 रोजी अर्ज दाखल केला. तथापि त्याची पोचपावती 18.06.2020 रोजी म्हणजे 585 दिवसांच्या विलंबाने निर्गमित करण्यात आली.

[78] नोडल-4 मांजगांव विभागांतर्गत GST No. 27AAAFJ3818M1Z6 आणि ARN No. AC2709172066370 असलेले मे. जलाराम एक्सपोर्ट.

**स्वयंचलित प्रणाली पश्चात:** करदात्याने[79] जून 2019 या महिन्यासाठी ₹ 1.51 कोटी रकमेच्या वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 24.10.2019 रोजी अर्ज दाखल केला. तथापि त्याची पोचपावती 20.04.2020 रोजी म्हणजे 164 दिवसांच्या विलंबाने निर्गमित करण्यात आली.

### 2.6.7.2 तात्पुरता परतावा आदेश निर्गमित करण्यास विलंब

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमांच्या नियम 91(2) समवेत महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 54(6) मध्ये वस्तू किंवा सेवांच्या झिरो रेटेड पुरवठयासाठीच्या परताव्या संदर्भात, तात्पुरत्या आधारावर, तात्पुरती स्विकारलेली इनपुट टॅक्स क्रेडिटची रक्कम वगळून दावा केलेल्या एकूण रकमेच्या 90 टक्के रक्कम पोचपावतीच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत प्रदान करण्याची तरतूद आहे.

तथापि चाचणी तपासणी केलेल्या 992 प्रकरणांपैकी 418 प्रकरणांमध्ये (42.14 टक्के) ***(परिशिष्ट 2.6.5 आणि 2.6.6)*** लेखापरीक्षेस खालील **तक्ता 2.6.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एक ते 364 दिवसांपर्यंतचा विलंब निदर्शनास आलाः

**तक्ता 2.6.3**

| **कालावधी** | **विलंबाच्या रेंजसह प्रकरणांची संख्या** | | | **एकूण** | ***परिशिष्ट*** |
|---|---|---|---|---|---|
| | **3 महिन्यां पर्यंत** | **3-6 महिने** | **6 महिन्यांपेक्षा अधिक** | | |
| स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी (01.07.2017 ते 25.09.2019) | 219 | 5 | 3 | 227 | ***2.6.5*** |
| स्वयंचलित प्रणाली पश्चात चा कालावधी (26.09.2019 ते 31.07.2020) | 185 | 6 | 0 | 191 | ***2.6.6*** |
| **एकूण** | **404** | **11** | **3** | **418** | |

हे निदर्शनास आणून दिल्यावर (डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021) 133 प्रकरणांत संबंधित सह-आयुक्त विक्रीकर यांनी सांगितले (डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021) की स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी दरम्यान तात्पुरत्या परताव्याच्या मंजुरीमध्ये विविध कारणांमुळे विलंब झाला, जसे, नवीन प्रणाली/पोर्टलच्या कार्यचालनात येणाऱ्या तांत्रिक अडचणी, करदात्याद्वारे संबंधित कागदपत्रे सादर करण्यात विलंब, भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे[80] वर शिपिंग बिलांच्या पडताळणीत विलंब आणि लॉकडाउनमुळे

---

[79] एल टी यु-02 विभाग, मुंबई विभागांतर्गत GST No. 27AAACB4487DIZ5 आणि ARN No. AA2710/9092898H असलेले मे. ब्लू स्टार लिमिटेड.

[80] भारतीय सीमा शुल्क आणि महाराष्ट्र उत्पादन शुल्क इलेक्ट्रॉनिक कॉमर्स/इलेक्ट्रॉनिक डेटा इंटरचेंज (ED/ECI) गेटवे.

पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न करणे इत्यादि 94 प्रकरणांच्या संदर्भातील उत्तरे अद्यापही प्रतीक्षित आहेत.

स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधी संदर्भातील 89 प्रकरणांत संबंधित सह-आयुक्त विक्रीकर यांनी विविध कारणे सादर केली (जानेवारी-नोव्हेंबर 2021) जसे विद्युत पुरवठा आणि इंटरनेट जोडणीची अनुपलब्धता, करदात्यांद्वारे दस्तावेजांचे अपूर्ण/विलंबाने सादरीकरण, भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवेवरील अयोग्य कार्यशीलतेमुळे बीजकांची पडताळणी करण्यात विलंब, इनपुट टॅक्स क्रेडिटच्या बीजकांच्या पडताळणीत विलंब आणि वस्तू आणि सेवा कर भवनाला लागलेली आग इत्यादी. उर्वरित 102 प्रकरणांसंदर्भात उत्तर प्रतीक्षित आहे.

हे उत्तर मान्य नाही कारण अपूर्ण माहिती असलेल्या प्रकरणात जेथे करदात्याद्वारे आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे विलंब झाला तेथे परताव्यासाठी दावेदाराकडून नवीन अर्ज प्राप्त करण्याकरिता विभागाद्वारे महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या नियम 90(3) अंतर्गत कमतरता मेमो निर्गमित केला जाऊ शकला असता.

**उदाहरण:**

**स्वयंचलित प्रणाली पूर्व:** करदात्याने[81] नोव्हेंबर 2018 या महिन्यासाठी ₹ 12.35 कोटी वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 11.03.2019 रोजी अर्ज दाखल केला. RFD-02 मधील पोचपावती 15.04.2019 रोजी निर्गमित करण्यात आली. तथापि तात्पुरता परतावा 240 दिवसांच्या विलंबाने मंजूर करण्यात आला.

**स्वयंचलित प्रणाली पश्चात:** करदात्याने[82] जानेवारी 2019 या महिन्यासाठी ₹ 2.93 कोटी रकमेच्या वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 02.12.2019 रोजी अर्ज दाखल केला. RFD-02 मधील पोचपावती 19.12.2019 रोजी निर्गमित करण्यात आली. तथापि, तात्पुरता परतावा 167 दिवसांच्या विलंबाने 10.06.2020 रोजी मंजूर करण्यात आला.

### 2.6.7.3 अंतिम परतावा आदेश निर्गमित करण्यास विलंब

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 54(7) नुसार परतावा म्हणून दावा केलेली संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग परत करण्यासंदर्भात जर संबंधित निर्धारण अधिकारी समाधानी असेल तर तो अर्ज प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या

---

[81] एल टी यु-03 विभाग, मुंबई अंतर्गत GST No. 27AAICS0137P1ZZ आणि ARN No. B2711180530859 असलेले मे. टाटा कन्सल्टंसी सर्विसेस लिमिटेड.

[82] एल टी यु-02 विभाग, पुणे अंतर्गत GST No. 27AAACW0387R2ZM आणि ARN No. AA271219004068C असलेले मे. विप्रो लिमिटेड.

आत अंतिम परतावा आदेश निर्गमित करू शकतो आणि अशी रक्कम अर्जदारास परत करता येऊ शकते. परताव्याच्या विलंबाकरिता महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 56 नुसार अशा परताव्याच्या अर्जाच्या तारखेपासून साठ दिवसांचा कालावधी लोटल्यानंतरच्या कालावधीसाठी सहा टक्के[83] प्रति वर्ष या दरानुसार व्याज देय राहील.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले (मार्च 2021) की वस्तू व सेवा कर परतावा रक्कम ₹ 2584.29 कोटींची 5614 प्रकरणे मंजुरी/अमान्य आदेश निर्गमित करण्यासाठी प्रलंबित होती. त्यापैकी 3485 प्रकरणात 45 दिवसांपेक्षा कमी, 507 प्रकरणांत 45-60 दिवसांचा आणि 1622 प्रकरणांत 60 दिवसांपेक्षा जास्त विलंब झाला होता. तसेच 1954 प्रकरणांपैकी 1091 अंतिम परतावा प्रकरणांत ***(परिशिष्ट 2.6.7 आणि 2.6.8)*** **तक्ता 2.6.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एक ते 807 दिवसांपर्यंतचा (51.83 टक्के) विलंब आढळला:

**तक्ता-2.6.4**

| कालावधी | विलंबाच्या रेंजसह प्रकरणांची संख्या | | | एकूण | व्याज दायित्व (₹ कोटीं मध्ये) | *परिशिष्ट* |
|---|---|---|---|---|---|---|
| | 3 महिन्यां पर्यंत | 3-6 महिने | 6 महिन्यांपेक्षा अधिक | | | |
| स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधी (01.07.2017 ते 25.09.2017) | 97 | 121 | 346 | 564 | 7.21 | ***2.6.7*** |
| स्वयंचलित प्रणाली पश्चात चा कालावधी (26.09.2017 ते 31.07.2020) | 412 | 107 | 8 | 527 | 1.55 | ***2.6.8*** |
| **एकूण** | **509** | **228** | **354** | **1091** | **8.76** | |

स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीच्या 321 प्रकरणांत हे निदर्शनास आणून दिल्यावर (डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021) संबंधित सह-आयुक्त, विक्रीकर यांनी सांगितले (डिसेंबर 2020 ते सप्टेंबर 2021) की विविध कारणांमुळे विलंब झाला, जसे करदात्यांनी परतावा अर्जासह आवश्यक दस्तावेज सादर केले नाहीत, प्रणालीमधील तांत्रिक अडचणी, कोविड-19 महामारीमुळे लागलेला लॉकडाउन आणि नवीन पोर्टलच्या कार्यचालनातील अडचणी इत्यादी. उर्वरित 243 प्रकरणांच्या संदर्भात उत्तर प्रतीक्षित आहे.

स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधी संदर्भातील 263 प्रकरणांत संबंधित सह-आयुक्त, विक्रीकर यांनी सांगितले (जानेवारी-नोव्हेंबर 2021) की आभासी खाजगी नेटवर्क (VPN) जोडणीची बाब, कोविड-19 महामारी आणि करदात्यांद्वारे दस्तावेजांचे

[83] CBIC द्वारे निर्गमित केलेल्या अधिसूचना क्र. 13/2017-CT मध्ये निर्दिष्ट केल्यानुसार.

विलंबाने सादरीकरण, वस्तू आणि सेवा कर इमारतीला लागलेल्या आगीची घटना इत्यादी कारणांमुळे अंतिम परतावा आदेश निर्गमित करण्यास विलंब झाला. उर्वरित 264 प्रकरणां बाबत उत्तर प्रतीक्षित आहे.

हे उत्तर मान्य नाही कारण जेथे करदात्याद्वारे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे विलंब झाला आहे त्या प्रकरणात परताव्यासाठी दावेदाराकडून नवीन अर्ज प्राप्त करण्याकरिता विभागाने कमतरता मेमो निर्गमित केला नाही.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की विभागाने आजपर्यंत विलंबाच्या परतावा प्रदानाकरिता व्याजाचे कोणतेही प्रदान केले नाही, तर अंतिम परतावा आदेश विलंबाने निर्गमित झाल्यामुळे वरील **तक्ता 2.6.4** मध्ये दर्शविल्यानुसार ₹ 8.76 कोटी व्याज प्रदानाचे दायित्व निर्माण झाले.

**उदाहरण:**

**स्वयंचलित प्रणाली पूर्व :** करदात्याने[84] डिसेंबर 2018 या महिन्यासाठी ₹ 2.34 लाख रकमेच्या वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 19.01.2019 रोजी अर्ज दाखल केला. तथापि, परतावा 807 दिवसांच्या विलंबाने 04.06.2021 रोजी मंजूर झाला. अंतिम परतावा आदेश विलंबाने निर्गमित केल्यामुळे ₹ 0.31 लाख व्याज प्रदानाचे दायित्व निर्माण झाले.

**स्वयंचलित प्रणाली पश्चात:** करदात्याने[85] एप्रिल 2019 या कालावधीसाठी वस्तू आणि सेवा कर परताव्यासाठी 27.09.2019 रोजी अर्ज सादर केला आणि ₹ 54.96 लाख रकमेच्या परताव्याचा दावा केला. तथापि, सह-आयुक्त, विक्रीकर यांनी 03.07.2020 रोजी म्हणजेच 220 दिवसांच्या विलंबाने परतावा मंजूर केला त्यामुळे ₹ 0.20 लाखाच्या व्याज प्रदानाचे दायित्व निर्माण झाले.

### 2.6.7.4 झिरो रेटेड वस्तू/सेवांच्या बाबतीत चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे जास्तीचा परतावा

एकात्मिक वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 16(3) समवेत महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 54(3)(i) नुसार, जेथे कर न भरता झिरो रेटेड पुरवठा केला गेला होता, त्या प्रकरणांत नोंदणीकृत व्यक्ती कोणत्याही कर कालावधीच्या शेवटी कोणत्याही न वापरलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटच्या परताव्याचा दावा करु शकते. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर नियमांच्या नियम 89 मधील पोटनियम

---

[84] ठाणे शहर विभागांतर्गत GST No. 27AATFK1246M1ZS आणि ARN No. AA2701190568033 असलेले मे. के. ई. इन्फ्रास्ट्रक्चर.

[85] नरीमन पॉइंट विभाग, मुंबई अंतर्गत GST No. 27AAACA5326Q2ZD आणि ARN No. AA270919081926C असलेले मे. ॲडनेट इन्फोसिस्टम (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड.

4 मध्ये उपविभागाच्या तरतुदीनुसार बंधपत्र किंवा हमीपत्र अंतर्गत कर न भरता वस्तू किंवा सेवांचा शून्य श्रेणीकृत पुरवठा किंवा दोन्ही बाबतीत इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा मंजूर करण्यासाठी एकात्मिक वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 16 मधील पोटकलम (3) नुसार खालील सूत्र प्रदान केले आहे:

परताव्याची रक्कम=(झिरो रेटेड वस्तूंच्या पुरवठयाची उलाढाल + झिरो रेटेड सेवांच्या पुरवठयाची उलाढाल) X निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट ÷ समायोजित एकूण उलाढाल

सूत्रांचे चुकीचे घटक विचारात घेतल्यामुळे परताव्याचे ज्यादा प्रदान झाल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले, जे खाली सविस्तरपणे दिले आहे:

**(I) एकूण उलाढालीचे चुकीचे समायोजन**

वरील सूत्रात एकूण उलाढालीचे समायोजन म्हणजे एकूण मूल्यांची बेरीज-(अ) सेवांची उलाढाल वगळून राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील उलाढाल; आणि (ब) झिरो रेटेड सेवांचा पुरवठा आणि नॉन झिरो रेटेड सेवांचा पुरवठा वगळून इतर सूट- (i) झिरो रेटेड पुरवठ्या व्यतिरिक्त सूट पुरवठ्याचे मूल्य; आणि (ii) परताव्याचा दावा केला असेल तर त्या संबंधित कालावधी दरम्यान पुरवठ्याची उलाढाल.

वस्तूंच्या झिरो रेटेड निर्याती संबंधी 992 प्रकरणांपैकी चार प्रकरणांत (0.40 टक्के) असे निदर्शनास आले की नियम 89(4) अंतर्गत ठरविण्यात आलेल्या परताव्यानुसार समायोजित उलाढाल GSTR 3B, GSTR (9C) च्या आकडयांशी जुळत नव्हती. परिणामी ***(परिशिष्ट 2.6.9)*** मध्ये दिलेल्या तपशीलानुसार ₹ 0.60 कोटींचा जास्त परतावा देण्यात आला. हा जास्तीचा परतावा लागू असलेल्या व्याजासहित वसूल करण्यात यावा.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (मार्च आणि सप्टेंबर 2021) सह-आयुक्त, विक्रीकर, नोडल-4 यांनी सांगितले (जानेवारी 2022) की हे प्रकरण लेखापरीक्षणासाठी घेण्यात आले आहे आणि GST_ADT_01 प्रपत्र निर्गमित करण्यात आले. दुसऱ्या विभागाचे सह-आयुक्त, विक्रीकर, सांताक्रुज यांनी सांगितले (एप्रिल 2021) की DRC-01 निर्गमित करण्यात आले आहेत. सह-आयुक्त, विक्रीकर, गोरेगांव यांनी सांगितले (मे 2021) की परतावा आदेशाच्या पुनःनिरीक्षणासाठी हे प्रकरण पुनःनिरीक्षण प्राधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले आहे आणि सह-आयुक्त, विक्रीकर, एल टी यु-02, पुणे यांनी सांगितले (सप्टेंबर 2021) की ही बाब पडताळण्यात येईल आणि परताव्याच्या जास्तीच्या प्रदानाची वसुली करण्यात येईल.

**(II) चुकीचे इनपुट टॅक्स क्रेडिट**

केंद्रीय विक्रीकर परिपत्रका[86] नुसार एकात्मिक करांच्या परतावा दाव्यांच्या प्रक्रियेकरिता इनपुट आणि इनपुट सेवांशी (भांडवली वस्तू व्यतिरिक्त) संबंधित बीजके, जिथे

[86] 2018 चे परिपत्रक क्र.33T दिनांक 14.11.2018 चे परिच्छेद 3.1 आणि 3.2.

एकात्मिक करांच्या प्रदानाविना वस्तू अथवा सेवा निर्यात केल्या जातात, सादर करावयास हवे. पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, ज्या आधारावर जोडपत्र-अ मध्ये इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला आहे, दावेदाराने परतावा अर्जासोबत त्या बीजकांचा तपशील देखील सादर करावयास पाहिजे. तसेच GSTR-1,GSTR-2A,GSTR-3B, जोडपत्र-अ आणि परिशिष्ट-VIII नुसार दावा केलेल्या परताव्याच्या रकमेचे सत्यापन संबंधित निर्धारण अधिकारी करतील.

चार विभागांमधील एकूण 992 प्रकरणांपैकी सात परतावा प्रकरणांमध्ये (1.4 टक्के) असे निदर्शनास आले (मार्च-ऑक्टोबर 2021) की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने गृहीत धरलेली निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटची रक्कम जोडपत्र-अ, GSTR-2A आणि GSTR-9 मध्ये दर्शविलेल्या रकमेशी जुळत नव्हती. ह्याचा परिणाम ₹ 19.43 कोटींचा ***(परिशिष्ट 2.6.10)*** जास्त परतावा प्रदान करण्यात झाला जो त्यावरील लागू व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (मार्च-ऑक्टोबर 2021) सह आयुक्त राज्य कर एल टी यु-01, पुणे यांनी एका प्रकरणांत (मेसर्स टेक महिंद्रा) नमूद केले की परतावा दावेदाराच्या एकात्मिक वस्तू आणि सेवा कर इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये अतिरिक्त शिल्लक होती आणि म्हणून चुकीच्या निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटमुळे अतिरिक्त परतावा नव्हता. मेसर्स झार ज्वेलर्सच्या प्रकरणांत सह आयुक्त, राज्य कर, नोडल-4, माझगांव यांनी सांगितले की वसुलीसाठी विक्रेत्याला DRC-01अ निर्गमित करण्यात आले आहे. दुसऱ्या प्रकरणांत (मेसर्स क्लिनेरा कार्पोरेशन) सह आयुक्त, राज्य कर, घाटकोपर यांनी सांगितले (सप्टेंबर 2021) की निव्वळ इनपूट टॅक्स क्रेडिटमध्ये मागील वर्षाच्या बीजकांचा समावेश केल्यामुळे फरक आढळला. तथापि, तथ्यांची पडताळणी करण्यासाठी संबंधित कागदपत्रे सादर केले नाहीत.

सह आयुक्त, राज्य कर, एल टी यु-01, मुंबई यांनी एका प्रकरणांत (मेसर्स सिमेंस हेल्थ केयर प्रायव्हेट लिमिटेड) म्हटले (नोव्हेंबर 2021) की कारकुनी चुकीमुळे GSTR-3B नुसार निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट चूक होते आणि पुढील GSTR-3B मध्ये ही चूक सुधारण्यात आली होती. उत्तर स्वीकार्य नाही कारण चुकीच्या मापदंडाच्या आधारावर परतावा निर्धारित केला गेला.

उर्वरित दोन विभागांनी सांगितले की प्रकरणाची पडताळणी केली जाईल आणि योग्य वेळी परिणाम सूचित केला जाईल.

**उदाहरण:**

परतावा दावेदार[87] जो सेवांचा निर्यातदार आहे त्याने कर कालावधीसाठी परतावा अर्ज भरला (मार्च 2019). दावेदाराने परताव्याच्या अर्जासोबत (RFD-01A) ₹ 15.77 कोटी रकमेच्या त्या बीजकांचे तपशील सादर केले ज्याच्या आधारावर जोडपत्र-अ मध्ये (इनपुट/इनपुट सेवांच्या संदर्भात 255 बीजक सारांश विवरणपत्र) संबंधित कालावधीत इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा पात्र इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून घेतला गेला आणि पात्रता देखील घोषित केली.

असे निदर्शनास आले (ऑगस्ट 2021) की परताव्याच्या जास्तीत जास्त रकमेच्या गणनेसाठी संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट ₹ 15.77 कोटींऐवजी ₹ 30.14 कोटी (GSTR-3B) गृहित धरले. परिणामी ₹ 4.63 कोटी परताव्याचे जास्त प्रदान झाले.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (ऑगस्ट 2021) सह-आयुक्त, विक्रीकर यांनी नमूद केले (ऑगस्ट 2021) की कर कालावधीसाठी GSTR-3B दाखल करताना कर दावेदाराकडे त्याची एकात्मिक वस्तू आणि सेवा कर इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये ज्यादा शिल्लक होती आणि परताव्याचा दावा फक्त एकात्मिक वस्तू आणि सेवा कराच्या शीर्षाखाली केला होता.

उत्तर स्वीकार्य नाही कारण संबंधित निर्धारण अधिकारी जोडपत्र-अ नुसार निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटची कमी रक्कम गृहित धरण्यात अयशस्वी झाले.

**(III) वस्तू आणि सेवा कर पूर्व कालावधीच्या क्रेडिट वगळण्याच्या चुकीच्या परिगणनेमुळे जादा परतावा**

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रकामध्ये स्पष्ट केले[88] की ट्रांन्झिशनल क्रेडिट प्रचलित कायद्यांतर्गत जसे, केंद्रीय उत्पाद अधिनियम 1944, आणि वित्त अधिनियम, 1994 च्या प्रकरण V अंतर्गत भुगतान करण्यात आलेल्या शुल्क आणि करा संबंधी आहे, जर त्याचा लाभ संबंधित कालावधीत घेतला गेला नाही तर त्याला निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटचा भाग मानला जाऊ शकत नाही आणि त्यामुळे न वापरलेल्या ट्रांन्झिशनल क्रेडिटचा परतावा अनुज्ञेय नाही.

---

[87] एल टी यु-01, पुणे विभागांतर्गत GSTN - 27AAACM3484F1Z1 असलेले मे. टेक महिंद्र लिमिटेड.

[88] केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रक क्र.125/44/2019-जीएसटी दिनांक 18.11.2019 चा परिच्छेद 50.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले (जुलै आणि नोव्हेंबर 2021) की सेवांच्या झिरो रेटेड निर्यातीच्या चाचणी तपासणी केलेल्या एकूण 992 प्रकरणांपैकी एका[89] (0.10 टक्के) परतावा प्रकरणांत 'निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट' परिगणित करतांना विभागाने पूर्व-वस्तू आणि सेवा कर कालावधीशी[90] संबंधित ₹ 1.66 कोटीचे इनपुट टॅक्स क्रेडिट वगळले आणि ₹ 8.29 कोटीच्या योग्य निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटच्या ऐवजी ₹ 9.94 कोटीची चुकीची परिगणना केली. परिणामी, लागू व्याजासह ₹ 0.66 कोटीचा वसुलीयोग्य अतिरिक्त परतावा प्रदान झाला.

आम्ही हे (नोव्हेंबर 2021) मध्ये निदर्शनास आणून दिले होते, उत्तर प्रतीक्षित आहे.

**(IV) भांडवली वस्तूंवर परताव्याचे अनियमित प्रदान**

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर नियमांच्या नियम 89 नुसार वस्तू आणि सेवा कराच्या झिरो रेटेड पुरवठयाच्या प्रकरणांत परतावा परिगणित करण्यासाठी निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट गृहित धरतांना भांडवली वस्तू वगळल्या पाहिजेत. करदात्याने, ज्याच्या आधारावर जोडपत्र-ब[91] मध्ये इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला गेला, अशा सर्व बीजकांचे तपशील ज्यामध्ये इनपुट, भांडवली वस्तू किंवा इनपुट सेवांचा समावेश आहे, अपलोड करावे.

वस्तू/सेवांच्या झिरो रेटेड निर्यातीच्या चाचणी तपासणी केलेल्या एकूण 992 प्रकरणांपैकी तीन प्रकरणांत असे निदर्शनास आले (फेब्रुवारी आणि मार्च 2021) की करदात्याने भांडवली वस्तूंवर क्रेडिटचा लाभ घेतला आहे. परिणामी, **(*परिशिष्ट 2.6.11*)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 0.24 कोटी जास्तीचा परतावा मिळाला. हा जास्तीचा परतावा त्यावर लागू व्याजासह वसूल करण्यात यावा.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी आणि मार्च 2021) एका प्रकरणांत[92] (मेसर्स ॲडनेट इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड) संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (मार्च 2021) आणि ₹ 18.05 लाख व ₹ 3.97 लाख व्याजाच्या वसुलीसाठी करदात्याला DRC-1A निर्गमित केले. अंतिम अनुपालन प्रतीक्षित आहे.

दुसऱ्या प्रकरणांत संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (जून 2021) आणि करदात्याला DRC-03 प्रपत्रामध्ये ₹ 0.66 लाख व्याजासह ₹ 2.15

---

89 एल टी यु-01 विभाग, मुंबई अंतर्गत GSTN - 27AAACW2598L1ZQ असलेले मे. WNS ग्लोबल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड.

90 इनपुट टॅक्स क्रेडिट रजिस्टर मधील अनु. क्र.1 ते 42301 जुलै 2017 पूर्वीच्या जीएसटी बीजकांवर इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ दर्शवितो.

91 परिपत्रक क्र.125/44/2019 - जीएसटी दिनांक 18.11.2019 च्या परिच्छेद 36 नुसार.

92 फ्लोरेंस परफ्युम्स प्रायव्हेट लिमिटेड, JCST नोडल 4 पुणे.

लाखाचा अतिरिक्त परतावा म्हणजे एकूण ₹ 2.81 लाखाचे प्रदान करण्यास सांगितले. अंतिम अनुपालन प्रतीक्षित आहे.

उर्वरित एका प्रकरणातील[93] उत्तर अद्यापही प्रतीक्षित आहे. ही बाब डिसेंबर 2021 मध्ये शासनाकडे सादर करण्यात आली; तथापि त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

### 2.6.7.5 चुकीचे घटक गृहित धरल्यामुळे इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चरच्या प्रकरणात जास्त परतावा

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर नियमांच्या नियम 89 (5) नुसार इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चर परतावा देतांना खालील सूत्रानुसार इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा मंजूर केला जाईल:

कमाल परताव्याची रक्कम={(वस्तू आणि सेवांच्या इन्व्हर्टेड रेटेड पुरवठयाची उलाढाल) x निव्वळ वस्तू आणि सेवा कर ÷ समायोजित एकूण उलाढाल}-अशा वस्तू आणि सेवांच्या इन्व्हर्टेड रेटेड पुरवठ्यावर देय कर.

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाने स्पष्ट केले[94] की समान इनपुट आणि आउटपुट पुरवठा असलेल्या प्रकरणांत सदर परतावा लागू होणार नाही.

लेखापरीक्षणाद्वारे इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चरच्या बाबतीत अतिरिक्त परतावा निदर्शनास आला, जो खाली सविस्तरपणे दिला आहे:

#### (I) विवरण पत्र-1अ/परिशिष्ट-ब/GSTR -3ब समवेत इन्व्हर्टेड टर्नओव्हर न जुळणे

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाने नोव्हेंबर 2019 मध्ये स्पष्ट केले[95] की वस्तू आणि सेवा कर परतावा अर्जासोबत विवरणपत्र/प्रतिज्ञापत्र आणि आवश्यक कागदपत्रे परताव्याच्या दाव्याच्या प्रक्रियेसाठी कॉमन पोर्टलवर अपलोड केली जातील. परताव्याचा अर्ज किंवा कोणतेही सहाय्यक दस्तावेज प्रत्यक्षपणे अधिकार क्षेत्रातील संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक नाही.

तसेच परिपत्रकाच्या परिच्छेद 36 नुसार, करदात्याने सर्व बीजकांचे तपशील, ज्यांच्या आधारावर जोडपत्र-ब मध्ये इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला गेला, ज्यामध्ये इनपुट, भांडवली वस्तू किंवा इनपुट सेवांचे तपशील समाविष्ट आहेत, अपलोड करावेत.

चाचणी तपासणी केलेल्या एकूण 661 पैकी पाच (0.75 टक्के) परतावा प्रकरणांत (स्वयंचलित प्रणाली पश्चात कालावधी) लेखापरीक्षेला आढळून आले की (फेब्रुवारी/मार्च

93 JCST एल टी यु-1, पुणे.

94 CBIC परिपत्रक क्र.135/05/2020- जीएसटी दिनांक 31.03.2020 च्या परिच्छेद 3.2.

95 परिपत्रक क्र.125/44/2019 - जीएसटी दिनांक 18.11.2019 च्या परिच्छेद 36 अनुसार.

2021) करदात्याने विवरणपत्र 1अ/GSTR-3ब मध्ये म्हणजे प्राप्त आणि निर्गमित केलेल्या बीजकांचे तपशील दर्शविणाऱ्या विवरणपत्रामध्ये किंवा यथास्थिती जोडपत्र-ब मध्ये प्रकट केल्यानुसार वस्तू आणि सेवांच्या इन्व्हर्टेड रेटेड पुरवठयाच्या उलाढालीचे मूल्य विभागाने गृहित धरण्याऐवजी करदात्याने परतावा अर्जात (RFD-01) दर्शविलेले उच्च मूल्य गृहित धरले. परिणामी ₹ 44.02 लाख जास्तीचा परतावा मंजूर झाला ***(परिशिष्ट 2.6.12).*** हा जास्त परतावा प्रचलित व्याजासह वसुलीयोग्य आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी आणि मार्च 2021) विभागाने[96] सांगितले (जानेवारी 2022) की करदात्याने चुकीने अपूर्ण विवरणपत्र अपलोड केले आणि भौतिक स्वरूपात पूर्ण विवरणपत्र सादर केले ज्याचा परताव्याच्या मंजुरीसाठी विचार केला गेला.

उत्तर स्वीकार्य नाही कारण स्वयंचलित प्रणाली पश्चात च्या कालावधीत विवरणपत्र/ प्रतिज्ञापत्र आणि कागदपत्रे भौतिक स्वरुपात सादर करण्याची परवानगी नव्हती. तसेच, विभाग अशा प्रकरणांमध्ये परिकल्पित केल्याप्रमाणे GST RFD 03 मध्ये कमतरता मेमो निर्गमित करण्यात अयशस्वी ठरला.

दुसऱ्या विभागाने[97] सांगितले (जून 2021) की त्यांत कोणतेही विचलन नाही. विभागाचे उत्तर बरोबर नाही कारण लेखापरीक्षणाला विवरणपत्र-1A आणि RFD-01 मध्ये नमूद केलेल्या मूल्यांमध्ये फरक आढळून आला आहे.

शासनाचे उत्तर अजूनही प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**(II) समायोजित एकूण उलाढालीचे चुकीचे निर्धारण**

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमांच्या नियम 89(4) नुसार समायोजित एकूण उलाढाल म्हणजे खालील अ आणि ब च्या एकूण मूल्याची बेरीज.

(अ) राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातील उलाढाल आणि

(ब) (i) झिरो रेटेड पुरवठया व्यतिरिक्त सूट दिलेल्या पुरवठयाचे मूल्य आणि (ii) एकूण उलाढाल ज्याकरीता परताव्याचा दावा केला आहे व्यतिरिक्त झिरो रेटेड आणि नॉन झिरो रेटेड सेवांच्या पुरवठयाची उलाढाल.

पाच विभागा[98] तील चाचणी तपासणी केलेल्या एकूण 661 प्रकरणांपैकी 11 परतावा प्रकरणांमध्ये (1.4 टक्के) लेखापरिक्षणास आढळून आले की समायोजित एकूण

---

96 सह-आयुक्त, राज्य कर, कोल्हापूर.

97 सह-आयुक्त, राज्य कर, औरंगाबाद.

98 सह-आयुक्त, राज्य कर, सोलापूर; सह-आयुक्त, राज्य कर, नोडल-1, पुणे, सह-आयुक्त, राज्य कर, फोर्ट, मुंबई, सह-आयुक्त, राज्य कर मुंबई एल टी यु -03 आणि सह-आयुक्त, राज्य कर, नाशिक.

उलाढालीच्या मूल्यांमध्ये वस्तूंच्या झिरो रेटेड/नॉन झिरो रेटेड पुरवठयाचे मूल्य समाविष्ट करण्यात विभाग अयशस्वी ठरला. यामुळे ₹ 0.79 कोटी ***(परिशिष्ट 2.6.13)*** जास्त परताव्याला मंजुरी मिळाली. हा जास्तीचा परतावा प्रचलित व्याजासह वसूल करावा.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी ते सप्टेंबर 2021) एका विभागाने[99] नमूद केले (नोव्हेंबर 2021) की ₹ 27.70 लाख जास्तीच्या भुगतानाची वसुली करण्यात आली आहे आणि सात प्रकरणांच्या बाबतीत ₹ 9.41 लाख व्याजाच्या रक्कमेसाठी नोटिस (DRC 01) निर्गमित करण्यात आली आहे. दुसऱ्या विभागाने[100] नमूद केले (सप्टेंबर 2021) की नोटिस (DRC-07) निर्गमित करण्यात आली आणि आणखी एका विभागाने[101] नमूद केले (ऑक्टोबर 2021) की नोटिस (DRC-01A) निर्गमित करण्यात आली आणि व्याजासह ₹ 10.67 लाख वसूल करण्यात आले.

उर्वरित दोन विभागांचे आणि शासनाचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**(III) निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट न जुळणे**

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाच्या सूचनांनुसार (नोव्हेंबर 2019) विवरणपत्र/प्रतिज्ञापत्र आणि दस्तावेज जसे विवरणपत्र 1अ, GSTR-2अ इत्यादी, ज्यात प्राप्त बीजकांचा आणि कर कालावधी दरम्यान वस्तू आणि सेवांचा इन्व्हर्टेड रेटेड पुरवठयाशी संबंधित निर्गमित केलेल्या बीजकांचा समावेश असतो, परतावा अर्जासोबत संलग्न असावयास हवे.

पाच विभागातील चाचणी तपासणी केलेल्या एकूण 661 प्रकरणांपैकी नऊ (स्वयंचलित प्रणाली पूर्व-5 आणि स्वयंचलित प्रणाली पश्चात-4) परतावा प्रकरणांत (1.36 टक्के) असे निदर्शनास आले की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने परतावा आदेश निर्गमित करताना विवरणपत्र 1अ/GSTR-2अ[102] /GSTR-9[103] आणि/किंवा खरीद नोंदवहीमध्ये दर्शविल्यानुसार निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटचे मूल्य गृहित धरण्याऐवजी RFD-1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिटचे उच्च मूल्य गृहित धरले. ह्याचा परिणाम ₹ 1.37 कोटी जास्तीचा परतावा मिळण्यात झाला ***(परिशिष्ट 2.6.14).*** हा जास्तीचा परतावा प्रचलित व्याजासह वसुलीयोग्य आहे.

---

[99] सह-आयुक्त, राज्य कर, सोलापूर.

[100] सह-आयुक्त, राज्य कर, नोडल-1, पुणे.

[101] सह-आयुक्त, राज्य कर, मुंबई एल टी यु-03.

[102] इनपुट टॅक्स क्रेडिटचे विवरण पत्र खरेदीदाराकडे जमा झाले.

[103] विक्रीच्या उलाढालीचे वार्षिक विवरणपत्र.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी ते सप्टेंबर 2021) एका विभागाने[104] वस्तुस्थिती मान्य केली (नोव्हेंबर 2021) आणि ₹ 49.16 लाख व्याजासह जास्तीचा परतावा वसूल केला. दुसऱ्या विभागाने[105] असे सूचित केले (जानेवारी 2022) की ₹ 18.71 लाख ही पूर्वीची वसुली लक्षात घेऊन आक्षेपाच्या अंतिम निपटाऱ्यात ₹ 34.47 लाख रकमेच्या (व्याजासह) अतिरिक्त परताव्यासाठी 13.12.2021 रोजी DRC-01A निर्गमित करण्यात आला.

उर्वरित विभागांकडून आणि शासनाकडून उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**उदाहरण:**

एका करदात्याने[106] एप्रिल 2018 ते मार्च 2019 या कालावधीसाठी इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चरच्या खात्यावर जमा झालेल्या ₹ 25.40 लाखांच्या इनपुट टॅक्स क्रेडिटच्या परताव्यासाठी 10.01.2020 रोजी परतावा अर्ज दाखल केला.

असे आढळून आले की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने करदात्याद्वारे दाखल केलेल्या अर्जानुसार (RFD-01) निव्वळ इनपुट टॅक्स क्रेडिट ₹ 52.58 लाख गृहित धरले (06.03.2020) आणि ₹ 25.40 लाख परताव्याचा मंजुरी आदेश निर्गमित केला.

GSTR-9[107] च्या तपासणीत हे उघड झाले की फक्त ₹ 41.95 लाखाची रक्कम इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून इनपुटच्या संदर्भात उपलब्ध होती आणि इनपुट सेवांकरिता ₹ 10.25 लाख रक्कम इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणून उपलब्ध होती.

इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चरचे प्रकरण असल्यामुळे इनपुट सेवांवरील इनपुट टॅक्स क्रेडिट परताव्यासाठी पात्र ठरत नाही.

तथापि, संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने इनपुट सेवा संदर्भातील इनपुट टॅक्स क्रेडिट गृहित धरले आणि ₹ 14.78 लाखांऐवजी ₹ 25.40 लाख परतावा मंजूर केला. याचा परिणाम ₹ 10.63 लाख रकमेच्या जास्तीचा परतावा मंजुरीत झाला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (मार्च 2021) सह आयुक्त, विक्रीकर यांनी नमूद केले (नोव्हेंबर 2021) की विक्रेत्याने ₹ 10.62 लाखांचा जास्तीचा परतावा आणि त्यावरील ₹ 2.99 लाख व्याजाचे भुगतान केले.

---

104 सह-आयुक्त, राज्य कर (फोर्ट), मुंबई.

105 एल टी यु-1, पुणे.

106 ठाणे शहर विभागांतर्गत GSTN-27AAECC4174G1ZP असलेले मेसर्स कॅपिटल नॉनवोव्हन प्रायव्हेट लिमिटेड.

107 GSTR-9 मध्ये उलाढालीसह संपूर्ण वर्षभर विविध कर शीर्षकांतर्गत केलेल्या आणि प्राप्त झालेल्या सर्व पुरवठ्यांचा तपशील असतो.

#### 2.6.7.6 चुकीचे किंवा अपात्र इनपुट टॅक्स क्रेडिटचे पुनःक्रेडिट/वसुली करतांना केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ निर्देशांचे पालन न करणे

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रक[108] (सप्टेंबर 2018) च्या परिच्छेद 4 मध्ये असे नमूद केले आहे की, संबंधित निर्धारण अधिकारी ह्या क्रेडिटच्या अपात्रतेच्या कारणास्तव न वापरलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटचा परतावा दावा नाकारलेल्या रकमेचे पुन्हा क्रेडिट करण्याचा आदेश देईल. त्यासोबतच, ह्या रकमेच्या वसुलीसाठी दावेदाराला डिमांड नोटीस (DRC-01) निर्गमित करायला पाहिजे होती. वैकल्पिकरित्या दावेदार ही रक्कम आवश्यक व्याज आणि दंडासह स्वेच्छेने भरू शकतो आणि प्रपत्र GST DRC-03 मध्ये संबधित निर्धारण अधिकाऱ्यास कळवू शकतो.

सहा विभागातील चाचणी तपासणी केलेल्या 1954 प्रकरणांपैकी 15 प्रकरणांत (एक टक्का) लेखापरीक्षेस असे आढळले की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने ₹ 2.78 कोटी रकमेचे दावे नाकारले ज्यात ₹ 1.34 कोटींच्या अपात्र बाबी जसे उपहारगृह खर्च इत्यादी अंतर्भूत होते. तथापि, ही रक्कम इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये पुन्हा क्रेडिट करण्याकरिता संबधित निर्धारण अधिकाऱ्याने कोणत्याही कारवाईस प्रारंभ केला नाही. तसेच ह्या रकमेच्या व्याज आणि शास्तिसह वसुलीकरिता कोणतीही डिमांड नोटिस निर्गमित केली नाही. यामुळे अयोग्य लाभ घेतलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिट ₹ 1.34 कोटींची वसुली झाली नाही ***(परिशिष्ट 2.6.15).*** हा जास्तीचा परतावा त्यावरील प्रचलित व्याजासह वसुलीयोग्य आहे.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (मार्च आणि जुलै 2021) एका विभागाने[109] नमूद केले (ऑगस्ट 2021) की अर्जदाराने अपील केल्यामुळे नाकारलेली अस्वीकार्य रक्कम पुन्हा जमा केली गेली नाही. दुसऱ्या विभागात[110] असे नमूद केले (जून 2021) की करदात्याने ऐच्छिक भुगतान केले आणि इनपुट टॅक्स क्रेडिट उलट करण्यात येईल. इतर दोन विभागांत[111] संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी प्रस्तुत केले की करदात्याद्वारे हमी सादर न केल्यामुळे ते पुन्हा क्रेडिट केले नाही. उर्वरित दोन विभागांनी[112] कोणतेही उत्तर सादर केले नाही.

ही बाब डिसेंबर 2021 मध्ये शासनाला सादर करण्यात आली. तथापि, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

---

[108] परिपत्रक क्र 59/33/2018- जीएसटी.

[109] एल टी यु-1, पुणे विभाग.

[110] औरंगाबाद विभाग.

[111] सह-आयुक्त, राज्य कर नोडल 1 पुणे आणि कोल्हापूर.

[112] सह-आयुक्त, राज्य कर नाशिक आणि ठाणे ग्रामीण.

**उदाहरण:**

झिरो रेटेड वस्तू किंवा सेवांच्या पुरवठया संदर्भात अथवा दोन्हीसाठी कराच्या भुगतानाविना एका करदात्याने[113] जून 2018 या महिन्यासाठी ₹ 55.23 कोटींच्या परताव्यासाठी अर्ज दाखल केला (04.11.2018). संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने ₹ 53.80 कोटींचा परतावा (RFD-06) मंजूर केला (06.01.2020) आणि ₹ 1.43 कोटींचा दावा नाकारला. नाकारलेल्या दाव्यामध्ये उपहारगृह खर्चाच्या इनपुट टॅक्स क्रेडिटची रक्कम ₹ 33.19 लाख अंतर्भूत होती.

तथापि, संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने करदात्याच्या इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये पुन्हा क्रेडिट करण्याकरिता आदेश दिला नाही तसेच अपात्र इनपुट टॅक्स क्रेडिटची रक्कम ₹ 33.19 लाख व्याज आणि दंडासह वसुलीसाठी डिमांड नोटिस निर्गमित केली नाही. हे निदर्शनास आणून दिल्यावर (ऑगस्ट 2021) असे नमूद करण्यात आले (ऑगस्ट 2021) की अर्जदाराने अपील दाखल केल्यामुळे नाकारलेली अपात्र रक्कम पुन्हा क्रेडिट केली नाही.

## 2.6.8 संकीर्ण बाबी

### 2.6.8.1 निर्यातीच्या पुराव्याशिवाय परताव्याची अनियमित मंजुरी

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमांच्या नियम 89(2)(b) नुसार मालाच्या निर्यातीच्या बाबतीत परताव्याच्या अर्जासोबत शिपिंग बिल क्रमांक आणि तारीख किंवा वस्तूंच्या निर्यातीची बिले असलेले विवरणपत्र जोडले पाहिजे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी सूचना दिल्या[114] की कर न भरता वस्तूच्या निर्याती संबंधातील परतावा दावा प्रकरणी शिपिंग बिलाचा तपशील संबंधित निर्धारण अधिकाऱ्यादवारे भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाइट (www.icegate.gov.in) मार्फत तपासण्यात यावा आणि निर्यात सामान्य मॅनिफेस्ट[115] चा तपशील आणि शिपिंग बिल, शिपिंग बिल क्रमांक आणि दिनांक सुद्धा तपासण्यात यावे.

स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीशी संबंधित 886 प्रकरणांपैकी एका प्रकरणात लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले (डिसेंबर 2020) की विभागाने विदेशी व्यापार महासंचालक (DGFT) यांनी निर्गमित केलेल्या बँक रिअलायझेशन प्रमाणपत्राच्या

[113] एल टी यु-1, पुणे विभागाच्या अंतर्गत GSTN27AADCB2923MIZL असलेले मेसर्स बजाज ऑटो लिमिटेड.

[114] परिपत्रक क्र. 125/44/2019- जीएसटी दिनांक 18.11.2019 चा परिच्छेद 18.

[115] निर्यात सामान्य मॅनिफेस्ट.

(eBRC) आधारावर करदात्याला[116] ₹ 30.38 लाख परतावा मंजूर केला (फेब्रुवारी 2020). तथापि, निर्यातीबाबतचा पुरावा म्हणून निर्यातदाराने शिपिंग बिलाचा तपशील असलेले विवरणपत्र-3 सादर केले नाही. अशा प्रकारे, संबंधित निर्धारण अधिकारी यांनी शिपिंग बिलाच्या पडताळणी शिवाय परतावा मंजूर केला, जो अनियमित होता.

स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीशी संबंधित 886 प्रकरणांपैकी दुसऱ्या प्रकरणात विवरणपत्र-3 मधील शिपिंग बिलांच्या सूचीच्या आधारावर करदात्याला[117] ₹ 0.48 कोटी (सप्टेंबर 2020) परतावा मंजूर करण्यात आला. लेखापरीक्षेने भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाइट वरून विवरणपत्र-3 ची फेर तपासणी/पडताळणी केली परंतु भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाईट वर परतावा आदेशातील ₹ 0.52 लाख परतावा अंतर्भूत असलेले ₹ 91.10 लाख किंमतीचे 107 शिपिंग बिल्स उपलब्ध नव्हते. निर्यातीबाबतचा पुरावा नसताना दोन प्रकरणांत शिपिंग बिलांची पडताळणी न करण्याच्या परिणामी ₹ 30.90 लाख अनियमित परतावा झाला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर दोन्ही प्रकरणांत उप-आयुक्त, राज्य कर, नागपूर यांनी सांगितले (डिसेंबर 2020 आणि फेब्रुवारी 2021) की निर्यात मुंबईतील भारतीय डाक घरांद्वारे केली गेली होती आणि म्हणून ती भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाईटवर उपलब्ध नव्हती कारण ही डाक घरे भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाईट सोबत जोडलेली नाहीत. उत्तरावरून निदर्शित होते की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याद्वारे भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेबसाईट मार्फत शिपिंग बिलाच्या पडताळणी संबंधात केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाच्या सूचनांचे पालन करण्यात आले नाही. विदेशी टपाल कार्यालयामार्फत निर्यात करण्याबाबतचे तपशील दस्तावेजात आढळले नाहीत. परिणामी, भारतीय सीमा शुल्क इलेक्ट्रॉनिक गेटवे वेब साईटवर निर्यातीबाबतच्या पुराव्याच्या पडताळणी अभावी ₹ 30.90 लाख अनियमित परतावा प्रदान करण्यात आला, जो लागू दरानुसार वसुलीयोग्य होता.

### 2.6.8.2 करदात्याद्वारे इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर अंतर्गत परताव्यासाठी बीजकांचे विवरण सादर न करणे

जेव्हा आऊटपुट किंवा अंतिम उत्पादनावरील कर, इनपुट वरील करांपेक्षा कमी असतो तेव्हा इनपुट टॅक्स क्रेडिटचा उलट संचय निर्माण होतो आणि बहुतेक प्रकरणांमध्ये तो परत करावा लागतो त्या वेळेस इन्व्हर्टेड ड्युटी परिस्थिती उद्भवते.

116 मे. LEEHPL व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर.

117 मे. एसएसडी फार्मा, नागपूर.

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमांच्या नियम 89(5) नुसार, इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चरमुळे भांडवली वस्तू आणि इनपुट सेवा, इनपुट टॅक्स क्रेडिटच्या परताव्यासाठी पात्र ठरत नाहीत.

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकात (नोव्हेंबर 2019) स्पष्ट केले[118] की ज्यांच्या आधारे संबंधित कालावधीत इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला गेला आहे, ज्यासाठी परतावा दावा जोडपत्र-ब मध्ये केला आहे, परतावा अर्जदारांनी त्या सर्व बीजकांचे तपशील कॉमन पोर्टलवर अपलोड केले पाहिजेत, म्हणजेच विवरणपत्र, जे व्यवहाराच्या प्रकाराचा तपशील दर्शवितात, ज्यावर इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतला जातो उदा. इनपुट्स, भांडवली वस्तू किंवा इनपुट सेवा.

तीन विभागांमध्ये[119] लेखापरीक्षणाला असे आढळून आले (फेब्रुवारी 2021) की विभागाने जोडपत्र-ब द्वारे स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधी[120] ***(परिशिष्ट 2.6.16)*** संबंधित इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चरच्या कारणास्तव ₹ 20.94 कोटींचे 95 परतावा आदेश निर्गमित केले होते, जे अर्जदाराने कॉमन पोर्टलवर अपलोड केले नव्हते.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी 2021) दोन विभागांनी[121] नमूद केले (फेब्रुवारी 2021) की तांत्रिक त्रुटींमुळे त्यावेळी जोडपत्र-ब अपलोड करणे शक्य झाले नाही परंतु परतावा दावेदारांनी ते भौतिकदृष्ट्या सादर केले होते, ज्याची परतावा मंजुरीपूर्वी रितसर पडताळणी करण्यात आली होती. बेलापूर-रायगड विभागाने कोणतेही उत्तर सादर केले नाही.

उत्तर स्वीकार्य नाही कारण संबंधित दस्तावेज सादर न केल्याबद्दल विभागाने अशा प्रकरणांमध्ये कमतरता मेमो निर्गमित करणे आवश्यक आहे.

#### 2.6.8.3 परताव्याचा दावा नाकारल्यानंतर तात्पुरत्या परताव्याची वसुली न होणे

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमाच्या कलम 54(6) नुसार, वस्तू किंवा सेवांच्या झिरो रेटेड पुरवठ्यासंदर्भात असा दावा केलेल्या एकूण रकमेच्या 90 टक्के रक्कम तात्पुरत्या आधारावर परतावा म्हणून मंजूर करावी. महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर नियमांच्या, नियम 91(2) मध्ये विनिर्दिष्ट आहे की संबंधित निर्धारण अधिकाऱ्याने दावा आणि त्याच्या समर्थनार्थ प्रस्तुत केलेल्या पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर, ज्या रकमेचा परतावा म्हणून दावा केला होता, तो अर्जदारास देय आहे ह्या बाबतीत प्रथमदर्शनी समाधान झाल्यास तात्पुरत्या आधारावर परतावा आदेश द्यावा.

---

118 परिपत्रक क्र. 125/44/2019 दिनांक 18.11.2019 चा परिच्छेद 36.

119 बेलापूर-रायगड (3), ठाणे ग्रामीण (10) आणि ठाणे शहर (82).

120 26.09.2019 नंतरचा कालावधी.

121 ठाणे शहर आणि ठाणे ग्रामीण.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीशी संबंधित 886 प्रकरणांपैकी एका प्रकरणात करदात्याने[122] ऑगस्ट 2018 ते नोव्हेंबर 2018 या कालावधीसाठी कराचे भुगतान न करता विशेष आर्थिक झोन (SEZ) घटक/SEZ विकासकाला केलेल्या पुरवठयाच्या संदर्भात ₹ 47.00 लाख परताव्यासाठी 09.01.2019 रोजी परतावा अर्ज (ARN-AA271118897558E) दाखल केला.

असे निदर्शनास आले (ऑगस्ट 2021) की संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी 90 टक्के म्हणजे ₹ 42.30 लाख तात्पुरता परतावा मंजूर केला (मार्च 2019). आवश्यक दस्तावेज (जसे बीजक क्रमांक आणि दिनांकाचा समावेश असलेले विवरणपत्र, विशेष आर्थिक झोनच्या विशेष अधिकाऱ्याद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला वस्तू किंवा सेवा प्राप्तीचा पुरावा, भुगतान केल्याचा तपशील, पुरवठादारांचे बीजक, घोषणा आणि करारनामा) सादर न केल्यामुळे परतावा अर्ज नाकारण्यासाठी संबधित निर्धारण अधिकाऱ्यांद्वारे नोटिस (RFD-08) निर्गमित करण्यात आली (सप्टेंबर 2020). त्यानंतर संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी ₹ 4.70 लाख उर्वरित परतावा रक्कम नाकारून 'निरंक' रकमेसाठी अंतिम परतावा आदेश निर्गमित केला (नोव्हेंबर 2020). तथापि, तात्पुरती मंजूर केलेली परतावा रक्कम वसूल करण्यासाठी कोणतीही कारवाई केली नाही. लेखापरीक्षेद्वारे निदर्शनास आणून दिल्यावर विभागाने पूर्वी मंजूर केलेल्या ₹ 42.30 लाख रकमेच्या तात्पुरत्या परतावा वसुलीसाठी नोटिस (ऑगस्ट 2021) निर्गमित केली.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (ऑगस्ट 2021) संबंधित निर्धारण अधिकाऱ्यांनी म्हटले (सप्टेंबर 2021) की सुरुवातीला करदात्याद्वारे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या आधारे तात्पुरता परतावा मंजूर करण्यात आला होता परंतु अंतिम परतावा प्रदान करतांना आणखी कागदपत्रे आवश्यक असल्याचे लक्षात आले. उर्वरित परतावा नाकारण्यात आला आणि लागू व्याजासह आधीच प्रदान करण्यात आलेल्या तात्पुरत्या परताव्याच्या वसुलीसाठी पुढील आदेश (DRC-01A) निर्गमित करण्यात आला (ऑगस्ट 2021).

### 2.6.8.4 कागदपत्रे सादर न करणे/अपूर्ण कागदपत्रे सादर करणे

#### (I) परतावा आदेश पाठविल्याची माहिती प्रतिपक्ष कर प्राधिकरणाला सादर न करणे

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रकानुसार[123] राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश कर प्राधिकरणाने निर्गमित केलेला परतावा आदेश संबंधित कर किंवा

[122] नोडल 7, अंधेरी, मुंबई विभागाच्या अंतर्गत GSTN27AAMCA4358EIZL असलेले मेसर्स एअरलिफ्ट ग्लोबल कॅरीअर्स प्रायव्हेट लिमिटेड.

[123] क्र 24/24/2017 जीएसटी दिनांक 21.12.2017.

उप कराच्या प्रकरणानुसार मंजूर रक्कम भरण्याच्या उद्देशाने सात कामकाजाच्या दिवसांच्या आत संबंधित प्रतिपक्ष कर प्राधिकरणाला पाठवावा लागतो.

लेखापरीक्षणाने आयुक्त, राज्य कर तसेच प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांना उपरोक्त डेटा/माहिती पुढील पडताळणीसाठी सादर करण्याची विनंती केली (ऑगस्ट तसेच सप्टेंबर 2021).

केंद्रीय वस्तू आणि सेवा कराच्या बाबतीत आयुक्त, राज्य कर यांनी जानेवारी 2022 मध्ये केंद्रीय कर प्राधिकरणाकडे पाठवलेल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कराच्या परतावा आदेशांचा डेटा पाठविला. परंतु त्यामध्ये अर्ज संदर्भ क्रमांक, अर्ज संदर्भ क्रमांक निर्गमित केल्याची तारीख, तात्पुरता आदेश (RFD-04) आदेश/अंतिम आदेश (RFD-06) इत्यादी तपशीलाचा समावेश नाही.

परिणामी, लेखापरीक्षेला परताव्याचे दावे केंद्रीय कर प्राधिकरणाकडे पाठविण्याच्या विविध टप्प्यांच्या विलंबाचे मूल्यांकन करता आले नाही.

तसेच, राज्य वस्तू आणि सेवा कराच्या बाबतीत आयुक्त, राज्य कर यांनी केंद्रीय कर प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या (जानेवारी 2022) राज्य वस्तू आणि सेवा कराच्या परतावा आदेशांचा डेटा प्रदान केला. परंतु त्यामध्ये अर्ज संदर्भ क्रमांक निर्गमित केल्याची तारीख, तात्पुरता (RFD-04) आदेश/अंतिम आदेश (RFD-06) आणि बँक खात्यात जमा झाल्याची तारीख, इत्यादी तपशीलाचा समावेश नाही.

अनेकदा विनंती करून देखील आवश्यक माहिती, जसे अर्ज संदर्भ क्रमांक निर्गमित केल्याची तारीख, RFD-04 आणि RFD-06 लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

परिणामी, लेखापरीक्षेला दावेदाराच्या बँक खात्यात परतावा दावा जमा करण्याच्या विविध टप्प्यांवरील विलंबाचे मूल्यांकन करता आले नाही.

**(II) परतावा दाव्यांचे उत्तर-लेखापरीक्षण आयोजित करण्यासंबंधीचा डेटा सादर न करणे**

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ[124] यांनी परिपत्रक निर्गमित केले आणि झिरो रेटेड पुरवठयाच्या परताव्यासाठी[125] मॅन्युअल प्रक्रियेची कार्यपद्धती विस्तृतपणे मांडली. परिपत्रकात असे नमूद केले आहे की स्वतंत्र तपशीलवार मार्गदर्शक तत्वे निर्गमित होईपर्यंत रक्कम विचारात न घेता मॅन्युअली प्रक्रिया केलेल्या परतावा अर्जांचे

[124] केंद्रीय राज्य कर आयुक्तांद्वारे निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्र. 17/17/2017-जीएसटी दिनांक 15.11.2017.

[125] कराचे भुगतान न करता निर्यात.

पूर्व लेखापरीक्षण आवश्यक नाही. तथापि, प्रचलित मार्गदर्शक तत्वांच्या आधारे परतावा आदेशांचे उत्तर लेखापरीक्षण सुरु राहू शकते.

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रक क्रमांक 24/24/2017 दिनांक 21 डिसेंबर 2017 नुसार सर्व प्रकारच्या मॅन्युअल परतावा अर्जांसाठी ही प्रक्रिया लागू करण्यात आली होती.

या संबंधातील माहिती (ऑगस्ट तसेच सप्टेंबर 2021) आयुक्त, राज्य कर तसेच प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांच्याकडून सुद्धा मागविण्यासाठी विनंती करण्यात आली होती (नोव्हेंबर 2021).

उत्तरादाखल, पडताळणीसाठी निवडलेल्या प्रकरणांची सूची लेखापरीक्षेला सादर करण्यात आली (ऑक्टोबर 2021) परंतु ती चुकवेगिरी प्रवण वस्तूंशी संबंधित होती आणि परतावा दाव्यांच्या उत्तर-लेखापरीक्षणाशी संबंधित नव्हती. आयुक्त, राज्य कर यांनी म्हटले (जानेवारी 2022) की 3,764 प्रकरणांची सूची सर्वसमावेशक लेखापरीक्षणासाठी निवडण्यात आली परंतु लेखापरीक्षणाचे परिणाम प्रलंबित आहेत.

परिणामी, विभागाने केलेल्या परतावा आदेशांच्या उत्तर-लेखापरीक्षण तपासणीची पर्याप्तता, प्रभाव आणि परिणामकारकतेचे मूल्यांकन (जर काही) लेखापरीक्षा करू शकली नाही.

**(III) वस्तू आणि सेवा कर परताव्याच्या प्रदानाचा डेटा उपलब्ध करून न देणे**

डिसेंबर 2017 मध्ये निर्गमित केलेल्या आंतरिक परिपत्रकानुसार[126] अतिरिक्त आयुक्त, राज्य कर (मूल्यवर्धित कर-2) मुंबई हे राज्य स्तरावरील प्रभारी आणि स्वयंचालित प्रणाली पूर्व कालावधीसाठी[127] राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाद्वारे (NEFT) वस्तू आणि सेवा कर परतावा संवितरित करण्यासाठी समन्वयक आहेत. त्याचप्रमाणे स्वयंचालित प्रणाली पश्चातच्या कालावधीच्या संदर्भात केंद्र आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशातील कर अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या वस्तू आणि सेवा कर परतावा रकमेचे संवितरण लेखा नियंत्रकाच्या सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे (PFMS) केले जाईल. कॉमन पोर्टल, संबंधित तपशील असलेली एक मास्टर फाइल तयार करेल. बँक खात्याच्या तपशीलाच्या प्रमाणीकरणासाठी मास्टर फाइल सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली सोबत जोडावी लागेल. बँक खात्याच्या प्रमाणीकरणानंतर संबंधित निर्धारण अधिकारी भुगतान आदेश निर्गमित करू शकतील. परताव्याची संवितरण स्थिती देखील सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे वस्तू आणि सेवा कर नेटवर्कच्या कॉमन पोर्टलवर कळविली जाईल.

---

126 राज्य कर आयुक्तांद्वारे निर्गमित वर्ष 2017 च्या दिनांक 30.12.2017 चा क्र. 27 A.

127 केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ परिपत्रक क्र. 125/44/2019 दिनांक 18.11.2019.

विभागाद्वारे संवितरीत केलेल्या परताव्याशी संबंधित **तक्ता 2.6.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील माहिती सादर करण्यासाठी लेखापरीक्षणाने आयुक्त, राज्य कर यांना (ऑगस्ट 2021 तसेच सप्टेंबर 2021) आणि प्रधान सचिव यांना देखील (नोव्हेंबर 2021) विनंती केली.

**तक्ता 2.6.5**

| अनु. क्र. | स्वयंचलित प्रणाली पूर्व आणि स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधी दरम्यान प्रक्रिया केलेल्या वस्तू आणि सेवा कर परताव्याचा तपशील | आयुक्त, राज्य कर यांना पत्र पाठवल्याची तारीख | स्मरण पत्र पाठवल्याची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाद्वारे स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीसाठी वस्तू आणि सेवा कर परताव्याचे संवितरण | 04.08.2021 | 14.09.2021 |
| 2 | सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली द्वारे राज्य वस्तू आणि सेवा कर परताव्याचे संवितरण | 04.08.2021 | 14.09.2021 |

उत्तरात (सप्टेंबर 2021), विभागाने स्वयंचलित प्रणाली पूर्व कालावधीचा (2017-18 आणि 2018-19) डेटा सादर न करता फक्त स्वयंचलित प्रणाली पश्चातच्या कालावधी (2019-20 आणि 2020-21) चा डेटा सादर केला (सप्टेंबर 2021). तथापि, त्यामध्ये अंतिम आदेश/भुगतान ॲडव्हाइस (RFD 05 आणि 06) निर्गमित केल्याची तारीख, संवितरणासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली सोबत मास्टर फाइल सामायिक करण्याची तारीख आणि बँक खात्यात जमा करण्याची तारीख या तपशीलाचा समावेश नव्हता.

अनेकदा विनंती करून देखील RFD-05, RFD-06 निर्गमित केल्याची तारीख, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली समवेत मास्टर फाइल सामायिक केल्याची तारीख आणि बँक खात्यात जमा करण्याची तारीख लेखापरीक्षणास सादर केली नाही.

परिणामी, लेखापरीक्षणाला दावेदाराच्या बँक खात्यामध्ये परतावा दाव्याची रक्कम जमा करण्यातील विविध टप्प्यांवरील (स्वयंचलित प्रणाली पूर्व आणि स्वयंचलित प्रणाली पश्चात) समयोचितपणाचे मूल्यांकन करता आले नाही.

***शिफारस 2: विभागाने लेखापरीक्षणासाठी आवश्यक नोंदी/विवरणांची उपलब्धता आणि सादरीकरण सुनिश्चित केले पाहिजे.***

***शिफारस 3: परतावा प्रकरणे योग्यरित्या आणि वेळेवर निकाली काढण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या संहिता तरतुदी आणि सूचनांचे पालन सुनिश्चित केले पाहिजे.***

## 2.7 कराची कमी आकारणी

***कराच्या चुकीच्या दराचा वापर केल्यामुळे कर आणि त्यावरील व्याज मिळून एकूण ₹ 11.72 लाख कमी आकारणी करण्यात आली.***

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 6 च्या तरतुदींनुसार संबंधित अनुसूची मध्ये नमूद केलेल्या दरांवर वेगवेगळ्या वेळापत्रकांमध्ये निर्दिष्ट केलेल्या वस्तूंच्या विक्रीच्या उलाढालीवर संबंधित वेळापत्रकांमध्ये नमूद केलेल्या दरांनुसार विक्रीकर आकारला जाईल. तसेच महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या अनुसूची अ, ब, क आणि ड मध्ये समाविष्ट नसलेल्या वस्तू अधिनियमाच्या अनुसूची ई च्या प्रविष्टी-1 मध्ये समाविष्ट करावयास पाहिजे आणि त्या 12.5 टक्के दराने करपात्र असतील. तसेच, ॲडव्हान्स रूलींग ॲथॉरिटी, मुंबई द्वारा निर्गमित केलेल्या आदेशांनुसार[128] (जानेवारी 2017) 'टॅबलेट्स' ला ई-1 अंतर्गत समाविष्ट करावयास पाहिजे आणि त्यावर 12.5 टक्के दराने कर आकारला पाहिजे.

उपायुक्त राज्य कर, PUN-VAT-E-706, पुणे कार्यालयाच्या दस्तावेजांच्या पडताळणीत (जानेवारी 2020) निदर्शनास आले की संगणक आणि संगणक उपकरणांच्या घाऊक विक्रेत्याचे[129] वर्ष 2014-15 या कालावधीसाठीचे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2005 अंतर्गतचे मूल्यांकन 2018-19 मध्ये करण्यात आले. दस्तावेजांमध्ये उपलब्ध असलेल्या नमूना बीजकांवरून लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की 'टॅबलेट्स' च्या ₹ 83.92 लाख विक्रीवर 12.5 टक्क्यांऐवजी पाच टक्के दराने महाराष्ट्र मूल्यवर्धित कर आकारण्यात आला त्यामुळे त्यावरील व्याजासह ₹ 11.72 लाख कर कमी आकारण्यात आला ***(परिशिष्ट 2.7.1).***

हे निदर्शनास आणून दिल्यावर (जानेवारी 2020) संबंधित मूल्यमापन प्राधिकरणाने सांगितले की मुद्दयाची पडताळणी केली जाईल आणि त्यानुसार त्याचे अनुपालन केले जाईल. ही बाब मे 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिली:

उत्तरदाखल, उपायुक्त राज्य कर (लेखापरीक्षा) यांनी संगितले (मार्च 2022) की मूल्यनिर्धारण प्राधिकाऱ्यांनी पुनःनिर्धारणांनंतर सुधारणा आदेश निर्गमित केला (ऑगस्ट 2022) आणि त्यानुसार व्याजासह ₹ 6.008 लाख देय रकमेच्या वसुलीसाठी डिमांड नोटीस निर्गमित केली.

वसुलीबाबतची प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

---

[128] आदेश क्रं. ARA मुंबई 126/2016-17/Disp. Reg. No. 10 दिनांक 21.01.2017.

[129] मेसर्स के. कॉंप सर्विसेस, TIN: 27710344344V, कालावधी 2014-15, AO दिनांकः 18.02.2019.

## 2.8 चुकीच्या परिगणनेमुळे व्याजाची कमी आकारणी

***महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 30(3) अंतर्गत चुकीची व्याज परिगणना केल्यामुळे ₹ 47.06 लाख व्याजाची कमी आकारणी झाली***

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 30(3) नुसार निर्धारण कालावधी संपल्यानंतर एक महिन्यापर्यंत कोणताही कर भरायचा राहिला असेल तर विक्रेता प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या काही भागांसाठी, ज्याकरिता विक्रेत्याचे निर्धारण करण्यात आले आहे त्या कालावधीच्या अंतिम तारखेच्या लगेचच आधीच्या तारखेपासून निर्धारण आदेशाच्या तारखेपर्यंत, अशा करावर वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार सरळ व्याज भरण्यास जबाबदार आहे. त्यानुसार, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, 2005 च्या नियम 88(1) मध्ये विहित केल्यानुसार विक्रेता 1.25 टक्के प्रतिमाह या दरानुसार व्याज प्रदान करण्यास जबाबदार आहे.

तसेच, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिसूचने[130] द्वारे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 30 च्या पोट कलम (1),(2) आणि (3) च्या उद्देशासाठी नियम 88(1) अंतर्गत व्याजाचे दर **तक्ता 2.8.1** मध्ये दर्शविल्यानुसार 01 डिसेंबर 2015 पासून सुधारित करण्यात आले:

**तक्ता 2.8.1**

| अनु. क्र. | व्याजासाठी जबाबदार कालावधी | व्याजाचा दर |
|---|---|---|
| 1 | एक महिन्यांपर्यंत | महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या सव्वा टक्के. |
| 2 | तीन महिन्यांपर्यंत | पहिल्या महिन्याच्या विलंबासाठी, तो महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या सव्वा टक्के आणि एक महिना ते तीन महिन्यांपर्यंतच्या विलंबासाठी प्रत्येक महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या दीड टक्का. |
| 3 | तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी | पहिल्या महिन्याच्या विलंबासाठी, तो महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या सव्वा टक्के आणि एक ते तीन महिन्यांपर्यंतच्या विलंबासाठी प्रत्येक महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या दीड टक्का आणि तीन महिन्यांपेक्षा जास्त विलंबासाठी प्रत्येक महिना किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेच्या दोन टक्के. |

राज्य कर उपायुक्त, PUN-VAT-E-607, एल टी यु, पुणे कार्यालयातील दस्तावेजांच्या पडताळणीत (फेब्रुवारी 2020) असे निदर्शनास आले की विक्रेत्याच्या निर्धारणा दरम्यान विभागाने परिगणना पत्रकात व्याजाचा सुधारित दर नमूद केला परंतु प्रत्यक्षात

[130] अधिसूचना क्र. मूल्यवर्धित कर 1515/सीआर-81/कर आकारणी-1 दिनांक 05 नोव्हेंबर 2015.

व्याजाची परिगणना पूर्व-सुधारित दरानुसार केल्यामुळे कलम 30(3) अंतर्गत ₹ 47.06 लाख व्याजाची कमी आकारणी झाली ***(परिशिष्ट-2.8.1).***

**(₹ लाखात)**

| अनु. क्र. | विक्रेत्याचे नाव | निर्धारण कालावधी<br>निर्धारणाची तारीख | च्या अंतर्गत आकारणी योग्य व्याज | च्या अंतर्गत आकारलेले व्याज | फरक |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **5** | **6** | **7(5-6)** |
| 1 | विक्रेता अ | 2014-15<br>28/03/2019 | 147.01 | 99.95 | 47.06 |
| **एकूण** | | | | | **47.06** |

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी 2020) संबंधित मूल्य निर्धारण प्राधिकाऱ्यांनी सांगितले की या मुद्दयाची पडताळणी करून अनुपालन सादर करण्यात येईल.

ही बाब मे 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिली, विभागाने वस्तुस्थिती स्वीकारल्या बाबत सूचित केले (फेब्रुवारी 2022) आणि ₹ 58.70 लाख व्याजाच्या वसुलीचे आदेश निर्गमित केले. वसुलीबाबतचा अहवाल प्राप्त झाला नाही (ऑगस्ट 2022).

## 2.9 महाराष्ट्र मूल्यवर्धित करांतर्गत परताव्याचे ज्यादा प्रदान

### कारखाना इमारतीच्या बांधकामात वापरल्या गेलेल्या इन्पुट्सवर अग्राह्य सेट-ऑफ दिल्यामुळे ₹ 21.56 लाख रकमेचा अतिरिक्त परतावा प्रदान झाला

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, 2005 च्या नियम 54(h) नुसार संयंत्र आणि यंत्रसामग्री व्यतिरिक्त स्थावर मालमत्तेच्या उभारणीसाठी वापरल्या जाणारी जी मालमत्ता कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीला विक्रेत्याद्वारे हस्तांतरित केली नाही, त्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीच्या संदर्भात कोणत्याही नियमांतर्गत सेट-ऑफ ग्राहय नसेल.

तसेच महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 51(6)(b) नुसार जर या अधिनियमांतर्गत पारित करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या परिणामी असे लक्षात आले की या कलमांतर्गत प्रदान करण्यात आलेला परतावा हया आदेशानुसार निर्धारित केलेल्या परताव्यापेक्षा अधिक आहे तर अतिरिक्त रक्कम विक्रेत्याकडून देय असलेल्या कराची रक्कम म्हणून वसूल करण्यात यावी आणि परताव्याच्या प्रदानाच्या तारखे पासून दरमहा किंवा त्याच्या भागासाठी विक्रेता विहित दरानुसार सरळ व्याज भरण्यास जबाबदार असेल.

विक्रीकर उपायुक्त, E-002, अमरावती कार्यालयामधील निर्धारणाच्या पडताळणी दरम्यान (जून 2018) लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की बेकरी उत्पादनांच्या उत्पादकाचे[131]

[131] मेसर्स विरेन्द्र फुड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड TIN: 27600328642V, कालावधी 2012-13, AO दिनांक: 28.03.2017.

2012-13 या कालावधीसाठीचे मूल्यांकन 2016-17 मध्ये करण्यात आले होते. निर्धारण आदेशानुसार कर परतावा ₹ 18.80 लाख इतका आणि त्यावर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 च्या कलम 52 अंतर्गत ₹ 2.26 लाख व्याज प्रदान करण्यात आले. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की ज्या खरेदीवर सेट-ऑफ प्रदान करण्यात आले होते त्यामध्ये कारखाना इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या सिमेंट, स्थापित करण्यात येणाऱ्या विद्युत प्रतिष्ठापन बाबी, इत्यादी चा समावेश होता, जो वरील नियमानुसार अग्राहय होता. त्यामुळे विक्रेत्याला ₹ 10.56 लाखाचा अतिरिक्त परतावा मिळाला. अशा प्रकारे, विक्रेत्याकडून कलम 51(6)(b) अंतर्गत ₹ 11.00 लाख व्याजाच्या रकमेचा समावेश असलेली ₹ 21.56 लाख रक्कम वसूल करावयाची आहे ***(परिशिष्ट 2.9.1).***

लेखापरीक्षणाद्वारे निदर्शनास आणून दिल्यावर (जून 2018) विभागाने सांगितले की बाबीची पडताळणी केली जाईल आणि अनुपालन सादर केले जाईल.

ही बाब ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिली; त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे.

## मुद्रांक शुल्क आणि नोंदणी विभाग

## मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी

### 2.10 भाडेपट्टा विलेखाच्या प्रकरणांत मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

अनुच्छेद 36(A)(b) नुसार जर भाडे करार (लीव अँड लायसंस करार) हा करार नूतनीकरणाच्या कलमासह किंवा त्याशिवाय, साठ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी असेल तर अनुच्छेद 36 च्या खंड (ii), (iii) किंवा (iv) यथास्थिती, अंतर्गत भाडेपट्टयावर शुल्क आकारणीयोग्य आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अनुच्छेद 36 (i), (ii), (iii) आणि (iv) नुसार आकस्मिक किंवा अन्यथा नूतनीकरण कलमासह भाडेपट्टा प्रकरणांत जेथे भाडेपट्टा कालावधी पाच वर्षांपर्यंत असेल तेथे मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या दहा टक्के रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल, जर भाडेपट्टा पाच वर्षांहून अधिक पण दहा वर्षांपर्यंत असेल तर या कालावधीसाठी मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या 25 टक्के रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल. जर भाडेपट्टा दहा वर्षांहून अधिक आणि 29 वर्षांपर्यंत असेल तर या कालावधीसाठी मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या 50 टक्के रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल आणि ज्या प्रकरणांत भाडेपट्टा कालावधी 29 वर्षांहून अधिक असेल तेथे मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या 90 टक्के रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल. तसेच, स्पष्टीकरण-II नुसार नूतनीकरण कालावधी नमूद केला असेल तर ते विद्यमान भाडेपट्टयाचा भाग असल्याचे समजण्यात येईल.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 60 नुसार भाडेपट्टपाचे हस्तांतरण वचनपत्राने केले असेल व कोणतेही दिवाणी न्यायालय किंवा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यादव्वारे मंजूर केलेल्या अंतिम भाड़ेपट्टा आदेश किंवा हुकूम/निवाड्यादव्वारे केले नसेल तर त्यावर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क हे भाडेपट्ट्याच्या उर्वरित कालावधीसाठी अनुच्छेद 36 च्या खंड (i) (ii) (iii) किंवा (iv) नुसार भाडेपट्ट्यावर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्काइतकेच असेल.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की (i) एका प्रकरणांत बांधकाम केलेले क्षेत्र गृहित न धरल्यामुळे ₹ 01.06 कोटी, (ii) दोन प्रकरणांत (दोन घटकांमध्ये) नूतनीकरणाचे कलम गृहित न धरल्यामुळे ₹ 38.19 लाख आणि (iii) 11 प्रकरणांत (तीन घटकांमध्ये) बाजार मूल्याच्या कमी मूल्यांकनामुळे ₹ 5.28 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करण्यात आली, जी खाली सविस्तरपणे दिलेली आहे.

**2.10.1** वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र. 7(d) नुसार शाळा आणि धार्मिक इमारतींचे मूल्य हे वार्षिक दर विवरणाच्या संबंधित मूल्यांकन झोनमधील निवासी सदनिकांना लागू असलेल्या दराने करावयास पाहिजे.

सह दुय्यम निबंधक, हवेली XVIII, जिल्हा पुणे यांच्या कार्यालयात भाडेपट्टादार[132] (lessee) आणि भाडेपट्टाकार[133] (lessor) यांच्यात मौजा म्हाळुंगे (प्रभाव क्षेत्र), तालुका मुळशी, जिल्हा पुणे सर्व्हे क्र.12/1 येथे स्थित 5576.20 चौरस मीटर बांधकाम क्षेत्रफळासह 42.05 R म्हणजे 4205 चौरस मीटर जमीन 30 वर्षांच्या म्हणजे 27 जून 2018 पासून 26 जून 2048 पर्यंतच्या कालावधीसाठी भाड़ेपट्टा संलेख (दस्तावेज़ क्र. 10503/2018) निष्पादित (ऑगस्ट 2018) करण्यात आला.

विभागाने खुल्या जमिनीचे (4,205 चौरस मीटर) क्षेत्रफळ विचारात घेऊन मालमत्तेचे बाजार मूल्य फक्त ₹ 5.15 कोटी परिगणित केले आणि दस्तावेजात 'निरंक' मोबदला नमूद करून ₹ 23.16 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले.

दस्तावेजांच्या तपासणीत असे निदर्शनास आले (जुलै 2019) की खंड 3 अनुसार भाडेपट्टाकाराने भाडेपट्ट्याखाली असलेल्या जमिनीवर शाळेसाठी प्रत्येकी 30,000 चौरस फूट बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या दोन इमारती त्यांच्या स्वतःच्या खर्चाने टप्याटप्यात बांधण्याचे व जमिनीच्या भाड्याचा खर्च करण्याचे मान्य केले. टप्पा-1 आणि टप्पा-II इमारतींचा ताबा भाडेपट्टाकाराकडून भाडेपट्टादारास अनुक्रमे 01 मार्च 2019 आणि 01 जून 2022 रोजी दिला जाईल.

---

[132] संत ज्ञानेश्वर एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई मार्फत त्यांचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निखील वाघ यांच्या मार्फत.

[133] मिस्टर अतुल भीमा पडाले आणि इतर 20, पुणे.

लेखापरीक्षेने मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 28.62 कोटी इतके परिगणित केले ज्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 25 अंतर्गत पाच टक्के दराने ₹ 1.29 कोटी मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते, ज्याच्या तुलनेत विभागाद्वारे ₹ 23.16 लाख मुद्रांक शुल्क वसूल करण्यात आले. परिणामी, ₹ 1.06 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (**परिशिष्ट-2.10.1).**

उत्तरादाखल, नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, कार्यालय पुणे यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (मार्च 2021). नोंदणी महानिरीक्षकांनी सांगितले की वसुलीची प्रक्रिया मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे शहर, पुणे यांच्या स्तरावर प्रगतीत आहे. वसुलीबाबतची पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब मे 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.10.2** वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र 7(b) अनुसार वरच्या मजल्यांवर असलेले दवाखाना/रुग्णालय/बँकाचे मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र.8 च्या खंड (c) आणि (d) नुसार करावयास पाहिजे. मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र.8(d) हे मॉल व्यतिरिक्त मोठ्या शॉपिंग कॉम्प्लेक्सचा समावेश असलेल्या इमारतीतील दुकानांच्या मूल्यांकनासाठी आहे जे खाली **तक्ता 2.10.2.1** मध्ये दिलेले आहे.

**तक्ता 2.10.2.1**

| अनु. क्र. | दुकानाचा समावेश असलेला मजला | वार्षिक दर विवरणामध्ये दिलेली दुकानाच्या दराची टक्केवारी विचारात घेतली पाहिजे |
|---|---|---|
| 1 | तळघर | 70 टक्के |
| 2 | खालचा तळमजला | 90 टक्के |
| 3 | तळमजला/वरचा तळमजला | 100 टक्के |
| 4 | पहिला मजला (तळ मजल्याच्या वरचा किंवा स्टिल्ट मजल्याच्या वरचा) | 90 टक्के |
| 5 | दुसरा मजला आणि त्यावरील मजले | 80 टक्के |

सह दुय्यम निबंधक, हवेली-XVII, जिल्हा पुणे कार्यालयात "बेअर शेल बिल्डिंग" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या प्रस्तावित रूग्णालयासाठी भाडेपट्टाकार[134] आणि भाडेपट्टादार[135] यांच्या दरम्यान बांधकाम आणि भाडेपट्ट्यासाठी (दस्तावेज क्र. 4481/2016) करार निष्पादित करण्यात आला (जुलै 2016). भाडेपट्याचा कालावधी 28 वर्षे आणि 11 महिन्यांचा होता. या प्रस्तावित इमारतीत 2 (दोन) तळघरं, तळमजला +7 (सात) वरचे मजले आणि टेरेस आहे. एकूण बांधकाम क्षेत्र किमान 2,50,000 चौरस फूट असावे

[134] मेसर्स एसी रिॲलिटी स्पेसेस एल एल पी, पुणे.

[135] मेसर्स कोलंबिया एशिया हॉस्पिटल प्रायव्हेट लिमिटेड, बंगलुरू.

परंतु त्याचे मोजणी करण्यायोग्य क्षेत्र 2,40,000 चौरस फूट म्हणजे 22,304.83 चौरस मीटर पेक्षा जास्त नसावे. पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतील बाणेर म्हाळुंगे मार्ग, बाणेर गाव, तहसील हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित सर्व्हे क्र. 111/11/1(pt) येथील 7965 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीवर भाडेपट्टाकाराद्वारे इमारत बांधली जाईल.

विभागाद्वारे मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 117.28 कोटी इतके परिगणित करण्यात आले आणि दस्तावेजात 'निरंक' मोबदला नमूद केला होता. विभागाद्वारे ज्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात आले त्याचा तपशील अभिलेखात उपलब्ध नव्हता.

मार्गदर्शक तत्व क्र.8(d) सह वर्ष 2016-17 साठी वार्षिक दर विवरणामध्ये नमूद केलेल्या दरांनुसार लेखापरीक्षेने मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 163.70 कोटी इतके परिगणित केले. त्यानुसार अधिनियमाच्या प्रावधाना 36(iii) नुसार बाजार मूल्याच्या 50 टक्के रकमेवर ₹ 4.09 कोटी इतके मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, विभागाने फक्त ₹ 2.93 कोटी मुद्रांक शुल्क वसूल केले. परिणामी, ₹ 1.16 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली **(*परिशिष्ट 2.10.2*).**

हे निदर्शनास आणून दिल्यावर (जानेवारी 2018) सह-दुय्यम निबंधक यांनी सांगितले की सह जिल्हा निबंधक, पुणे शहर कार्यालयाकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर अनुपालन सादर करण्यात येईल. ही बाब नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालयाला कळविण्यात आली, (ऑक्टोबर 2020 आणि जून 2021). उत्तरादाखल, नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी सांगितले (फेब्रुवारी 2022) की ही बाब कलम 32C अंतर्गत विचारात घेण्यात आली आहे आणि घेण्यात आलेला निर्णय लेखापरीक्षेला कळविण्यात येईल.

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.10.3** सह दुय्यम निबंधक (वर्ग-II) हवेली-V, जिल्हा पुणे कार्यालयाच्या दस्तावेजांच्या (दस्तावेज क्र. 570/2017) पडताळणीत निदर्शनास आले (एप्रिल 2018) की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील भोसरी गावामधील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या पिंपरी औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्र.S-36, टी ब्लॉक वर 2,957 चौरस मीटर क्षेत्रावर उभारण्यात आलेल्या 670 चौ.मी. (वर्ष 1989 मध्ये बांधण्यात आलेले) औद्योगिक शेडसह भाडेपट्ट्यावरील औद्योगिक प्लॉट वर अभिहस्तांकनकर्ता[136] आणि अभिहस्तांकिती[137] यांच्या दरम्यान भाडेपट्टा अभिहस्तांकन करार करण्यात आला

[136] मेसर्स लक्ष्मी अग्नी कम्पोनंट्स आणि फोर्जिंग्स प्रायव्हेट लिमिटेड.

[137] मेसर्स सचिन प्रोजेक्टस.

(जानेवारी 2017). विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 490.46 लाख इतके परिगणित केले. तथापि, संलेखामध्ये ₹ 506 लाख मोबदला नमूद केला होता. विभागाने ₹ 25.30 लाख मुद्रांक शुल्काची वसुली केली. ज्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात आले त्या परिगणनेचा तपशील अभिलेखात उपलब्ध नव्हता.

मूलतः हा भूखंड मूळ भूखंडधारकाला[138] मे 1988 मध्ये 95 वर्षांकरिता वाटप करण्यात आला होता. त्यानंतर त्या भूखंडधारकाने त्या भूखंडाचे शेड सहित अधिकार भाडेपट्ट्याच्या अभिहस्तांकनाच्या नोंदणीकृत करारामार्फत डिसेंबर 2001 मध्ये सध्याच्या अभिहस्तांकनकर्त्याला प्रदान केले. तसेच, भाडेपट्ट्याच्या अभिहस्तांकनाचा सध्याचा करार भाडेपट्ट्याच्या कालबाह्य न होणाऱ्या कालावधीसाठी अभिहस्तांकनकर्ता आणि अभिहस्तांकिती यांच्या दरम्यान निष्पादित करण्यात आला (जानेवारी 2017).

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले (एप्रिल 2018) की शेडसह भूखंडाचे बाजार मूल्य ₹ 8.35 कोटी होते. अशाप्रकारे, विभागाद्वारे वसूल करण्यात आलेल्या ₹ 25.30 लाखाच्या तुलनेत अधिनियमाच्या अनुच्छेद 25 अंतर्गत पाच टक्के दराने बाजार मूल्याच्या 90 टक्के म्हणजेच ₹ 37.59 लाख मुद्रांक शुल्क आकारणी देय होते. परिणामी, ₹ 12.29 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.10.3***).

उत्तरादाखल, नोंदणी महानिरीक्षक यांनी सांगितले की मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे कार्यालय स्तरावर वसुलीची प्रक्रिया चालू आहे.

ही बाब मे 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.10.4** सह-दुय्यम निबंधक, (वर्ग-II), हवेली-III, जिल्हा पुणे कार्यालयाच्या दस्तावेजांच्या (दस्तावेज क्र.3058/2019) पडताळणीत असे निदर्शनास (जानेवारी 2020) आले की साडेसतरानळी गाव, हडपसर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील घटक क्र. EB-6F-28 आणि 29 वरील 10104 चौरस फूट म्हणजे 939.03 चौरस मीटर शुल्क आकाराणीयोग्य क्षेत्रासाठी तळमजल्यावरील "ॲमनोरा टाउन सेंटर" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिटेल मॉल/शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी परवानादेयक[139] आणि परवानाधारक[140] यांच्या दरम्यान भाडे करार (लीव अँड लायसंस करार) निष्पादित करण्यात आला (फेब्रुवारी 2019). दस्तावेजांच्या खंड 3 नुसार भाडेपट्ट्याचा कालावधी नऊ महिन्यांचा होता. तथापि, खंड क्र 3(a) मध्ये असे नमूद आहे की प्रारंभिक मुदत संपल्यानंतर

---

[138] मेसर्स अशोका पावरलिंग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड.

[139] सिटी रिॲलिटी अँड डेवलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड पुणे मार्फत त्यांचे प्राधिकृत स्वाक्षरी करणारे मिस्टर रामेश्वर जटाले आणि मिस्टर रमेश कानगुडे.

[140] बार्बेक्यु नेशन हॉस्पिटॅलिटी लिमिटेड, बंगलुरू.

परवानाधारक परवाना देणाऱ्याच्या संमतीने पुढील चार वर्षांच्या मुदतीसाठी या कराराचे नूतनीकरण करू शकतो. विभागाने मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 13.29 कोटी इतके परिगणित केले आणि फक्त नऊ वर्षांचा भाडेपट्टा कालावधी गृहित धरुन ₹ 16.96 लाख इतके मुद्रांक शुल्क वसूल केले.

विभागाद्वारे वसूल करण्यात आलेल्या ₹ 16.96 लाख रकमेच्या तुलनेत लेखापरीक्षेने अनुच्छेद 36(iii) च्या तरतुदींनुसार बाजार मूल्याच्या 50 टक्क्यांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 25 अंतर्गत पाच टक्के दराने परिगणित केल्यानुसार ₹ 33.22 लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. परिणामी, ₹ 16.26 लाख कमी मुद्रांक शुल्काची आकारणी झाली (***परिशिष्ट 2.10.4***).

ऑक्टोबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षक यांनी लेखापरीक्षा निरिक्षण मान्य केले (जून 2021). नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी सांगितले की मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांना प्राधान्याने वसुली करण्याचे निर्देश दिले आहेत.

ही बाब मे 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.10.5** सह दुय्यम निबंधक, ठाणे VIII, जिल्हा- ठाणे यांच्या कार्यालयात भाडेपट्टाकार[141] आणि भाडेपट्टादार[142] यांच्यात सुसज्य नसलेले रूग्णालय, तळघर + खालचा मजला+7 मजली इमारतीच्या (जसे आहे, जिथे आहे या तत्वावर) आलेल्या परिस्थितीत भाडेतत्वावरील हक्कासाठी सेक्टर 3K, ऐरोली, मुंबई येथे स्थापित 990.27 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीवर 1,899.64 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या नवीन बांधकाम केलेल्या सार्वजनिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये रूग्णालय सुरू करण्यासाठी भाडेपट्टा विलेख (दस्तावेज क्र 3961/2015) निष्पादित करण्यात आला (मे 2015). या दस्तावेजांवर पूर्वी सह जिल्हा निबंधक, ठाणे शहर द्वारे निर्णय आदेश क्रमांक Adj/190/15/5297-98/15 दिनांक 06/05/2015 मार्फत अभिनिर्णय घेण्यात आला होता. विभागाद्वारे मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 17.54 कोटी इतके ठरविण्यात आले आणि मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या 25 टक्क्यांवर ₹ 21.93 लाख इतके मुद्रांक शुल्क वसूल केले. विभागाद्वारे ज्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात आले त्या परिगणनेचा तपशील अभिलेखात उपलब्ध नव्हता. दस्तावेजात ₹ 15.00 लाख मोबदला नमूद केला होता.

दस्तावेजांच्या पडताळणीत निदर्शनास आले (फेब्रुवारी 2017) की दस्तावेजांच्या खंड 1 नुसार भाडेपट्ट्याचा प्रारंभिक कालावधी 10 वर्षांसाठी होता. तथापि खंड क्र. 24 मध्ये

---

[141] श्रीमती सोनपत्ती देवी मेमोरिअल मेडिकल ट्रस्ट, नवी मुंबई.

[142] वेलकेअर हेल्थ सर्विसेस, नवी मुंबई.

असे नमूद केले आहे की "या भाडेपट्टा विलेखाची मुदत संपल्यानंतर दोन्ही पक्ष परस्पर संमतीने या भाडेपट्टा विलेखाची मुदत आणखी दहा वर्षांसाठी वाढविण्यास सहमत आहेत." अशा प्रकारे, एकूण भाडेपट्टा कालावधी 20 वर्षांचा झाला. मुद्रांक शुल्काची आकारणी करतांना विभागाद्वारे ही बाब गृहित धरण्यात आली नाही.

विभागाद्वारे वसूल करण्यात आलेल्या ₹ 21.93 लाख रकमेच्या तुलनेत लेखापरीक्षेने विभागाद्वारे ठरविण्यात आलेले ₹ 17.54 कोटीचे बाजार मूल्य गृहित धरून पाच टक्के दराने बाजार मूल्याच्या 50 टक्क्यांवर ₹ 43.85 लाख आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क परिगणित केले. परिणामी, ₹ 21.93 लाख मुद्रांक शुल्काची कमी वसुली झाली (***परिशिष्ट 2.10.5***).

ऑक्टोबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षक यांनी उत्तरादाखल सांगितले (जानेवारी 2021) की ही बाब महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53A अंतर्गत विचाराधीन आहे आणि त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यावर योग्य कारवाई करण्यात येईल.

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.10.6** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या ठरावानुसार (मे 2006) भोगवटा किंवा भाडेतत्वावर जमिनीचे वाटप करण्यासाठी आणि सर्व प्रकरणांमध्ये जेथे सरकारी जमिनीचे मूल्यांकन करायचे आहे, सरकारी जमिनीचा आदेश ज्या तारखेला पारित झाला किंवा मूल्यांकनाचा समावेश असलेले इतर आदेश पारित केले गेले त्या तारखेनुसार अशा जमीनीचे मूल्यांकन वार्षिक दर विवरणामध्ये विहित केलेल्या दरांनुसार केले जावे.

सह दुय्यम निबंधक-I, नागपूर यांच्या कार्यालयाच्या दस्तावेजांच्या (दस्तावेज क्र. 2978/2018, 3992/2018, 4753/2018, 3905/2018, 2465/2018, 5070/2018, 2468/2018, 4382/2018 आणि 3722/2018) पडताळणीत निदर्शनास आले (जुलै 2019) की नागपूर जिल्ह्यातील नगरपालिका अंतर्गत/नझुल[143] भूखंडाच्या भाडेपट्ट्याच्या नूतनीकरणाच्या

---

[143] स्वातंत्र्यापूर्वी, मध्य प्रांत आणि बेरार शासनाच्या आधी आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पुर्वी (महाराष्ट्र राज्य मे 1960 मध्ये निर्मित झाले) महाराष्ट्रातील विदर्भ क्षेत्रामधील नझुलच्या जमिनी निवासी, व्यावसायिक, शैक्षणिक आणि धर्मादाय प्रयोजनाकरीता काही अटी व शर्तींवर लोकांना मध्य प्रदेश शासनाद्वारे वाटप करण्यात आल्या. नझुलच्या जमिनी म्हणजे कोणत्याही प्रकारची शासनाची जमीन अकृषिक प्रयोजनाकरीता जसे इमारत,बाजार, खेळाचे मैदान किंवा इतर लोक प्रयोजनाकरीता किंवा नझुल जमिनी म्हणजे ज्यांचा वापर भविष्यात संभाव्य दीर्घ अथवा अल्प मुदतीच्या भोडपट्ट्यावर दिल्या जाणाऱ्या जमिनी आहेत. (स्त्रोत: 31 मार्च 2017 रोजी सपलेल्या वर्षाकरीता महसूल विभागाचा लेखापरीक्षा अहवाल परिच्छेद 4.4).

नऊ प्रकरणांचा बांधकामाच्या प्रयोजनासाठी भाडेपट्टेदार[144]आणि भाडेपट्टाकार[145] यांच्यात करार निष्पादित करण्यात आला. विभागाने मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 1.52 कोटी परिगणित केले आणि मोबदला निरंक दर्शविण्यात आला. या नऊ प्रकरणांत विभागाने ₹ 7.56 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले. विभागाद्वारे ज्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात आले त्या परिगणनेचा तपशील अभिलेखावर उपलब्ध नव्हता.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की वरील सर्व प्रकरणांत भाडेपट्टयाचा कालावधी 30 वर्षे होता. त्यामुळे मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या 90 टक्के रकमेवर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. संबंधित वार्षिक दर विवरणानुसार लेखापरीक्षेने मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 90.50 कोटी परिगणित केले. म्हणून, विभागाद्वारे वसूल करण्यात आलेल्या ₹ 7.56 लाख रकमेच्या तुलनेत मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या 90 टक्के रकमेवर पाच टक्के दराने ₹ 4.07 कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. परिणामी, ₹ 4.00 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.10.6***).

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

## 2.11 मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

### 2.11.1 विकसन करारनामा - उत्पन्न विभागणी

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-I च्या अनुच्छेद 5(g-a) अनुसार संलेख जर कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील बांधकाम, तिचा विकास किंवा तिची विक्री किंवा तिचे हस्तांतरण (मग ते कोणत्याही स्वरूपाचे असो) यासाठी प्रवर्तक किंवा विकासक, मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, यास प्राधिकार किंवा अधिकार देण्यासंबंधात असेल तर, अनुच्छेद 25 च्या खंड (a), (b) किंवा यथास्थिती (c) अंतर्गत अभिहस्तांतरणावर आकारणीयोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क मालमत्तेच्या बाजार मूल्यावर अकारावयास पाहिजे. तसेच, वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र. 33 नुसार, उत्पन्न विभागणीकरिता विक्री उत्पन्न संबंधित विकास कराराचे मूल्यांकन **(अ)** मालकाच्या हिश्श्याचे मोबदला मूल्य - त्याच्या अनुज्ञेय वापरकर्त्याचा विचार करून विक्री दराच्या संबंधात जमीन मालकाच्या हिश्श्याचे वर्तमान मूल्य x 0.85 + रोख किंवा त्याप्रकारचा मोबदला म्हणजे सुरक्षा ठेवीवरील व्याज इत्यादि **(ब)** वार्षिक दर विवरणाच्या जमीन दरानुसार संपूर्ण जमीन क्षेत्राचे बाजार मूल्य (अ) किंवा (ब) यापैकी जे अधिक असेल, त्यानुसार करावयास पाहिजे.

---

[144] संबंधित दस्तावेज क्रमांकामधील गणना पत्रकानुसार.

[145] महाराष्ट्र शासनाच्या वतीने, उपजिल्हाधिकारी, नागपूर.

तसेच, मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र.31 नुसार जेथे विकसन करारनामा/उत्पन्न विभागणीच्या संदर्भातील संलेख नमूद करतात की हस्तांतरणीय विकास हक्क क्षेत्रासह बांधकाम क्षेत्र/उत्पन्न विभागणी करायची आहे किंवा त्यामध्ये हस्तांतरणीय विकास अधिकार वापरावयाचा आहे, अशा जमिनीसाठी वार्षिक दर विवरणातील दरावर 25 टक्के वाढीसह निश्चित केलेला दर मूल्यांकनासाठी विचारात घेतला पाहिजे.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की उत्पन्न विभागणी विकसन करारनाम्यामध्ये वार्षिक दर विवरणाच्या लागू करण्यायोग्य तरतुदीनुसार मालमत्ता किंवा मोबदल्याचे योग्य बाजार मूल्य परिगणित न केल्यामुळे तीन प्रकरणांत (तीन घटकांमध्ये) (₹ 39.39 लाख + ₹ 55.13 लाख + ₹ 01.07 कोटी = ₹ 02.02 कोटी) रकमेच्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली जी खाली विस्तृतपणे मांडली आहेः

**2.11.1.1** सह दुय्यम निबंधक, वर्ग-II, औरंगाबाद-V, जिल्हा औरंगाबाद कार्यालयातील दस्तावेजांच्या (दस्तावेज 8654/2015) पडताळणीत असे निदर्शनास आले (डिसेंबर 2016) की औरंगाबाद महानगर पालिकेच्या हद्दीतील 1,486.98 चौरस मीटर (डिमाइस्ड भूखंड[146] म्हणून संदर्भित) क्षेत्रफळाच्या हस्तांतरणीय विकास हक्कासह तालुका आणि जिल्हा औरंगाबाद येथील चिकलठाणा गावाच्या गट क्र. 701 येथे असलेल्या 3,716.71 चौरस मीटर खुल्या भूखंड क्र.2 च्या वाढीव तुकडयासाठी मालक[147] आणि विकासक[148] यांच्या दरम्यान विकास करार निष्पादित करण्यात आला (डिसेंबर 2015). विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 3.57 कोटी इतके परिगणित केले. विभागाद्वारे ज्याच्या आधारे मालमत्तेचे मूल्यांकन करण्यात आले त्या परिगणनेचा तपशील अभिलेखात उपलब्ध नव्हता. दस्तावेजात ₹ 3.57 कोटी मोबदला नमूद करण्यात आला आणि विभागाने ₹ 18.37 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की दस्तावेजाच्या पृष्ठ क्रमांक 10 वर असे नमूद केले आहे की या प्रकल्पात भूखंड क्रमांक 2 वरील 3716.71 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या खुल्या जमिनीचा विकास आणि 1486.98 चौरस मीटर क्षेत्रफळाचा हस्तांतरणीय विकास हक्क समाविष्ट आहे. तसेच, दस्तावेजांच्या खंड 4 नुसार पक्षकारांनी डिमाइस्ड भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या प्रकल्पाची एकूण विक्री रक्कम 48:52[149] या गुणोत्तरात वाटून घेण्याचे मान्य केले. या व्यतिरिक्त, विकासकाने जमीन मालकांना ₹ 1.75 कोटीची परत करण्यायोग्य सुरक्षा ठेव देखील दिली.

---

146 येथे डिमाइस्ड भूखंडाचा संदर्भ प्लॉट क्षेत्रफळ 3,716.71 चौरस मीटर आणि हस्तांतरणीय विकास हक्क 1.486.98 चौरस मीटर असा आहे.

147 श्री राजेश लक्ष्मणदास पारसवंत यांचे सुपुत्र औरंगाबाद आणि इतर तीन.

148 मेसर्स सारा बिल्डर्स अँड डेवलपर्स, औरंगाबाद.

149 मालकाचा हिस्सा 48 टक्के आणि विकासकाचा हिस्सा 52 टक्के.

लेखापरीक्षेने जमीन मालकाचा हिस्सा ₹ 6.66 कोटी आणि विकासकाचा हिस्सा (हस्तांतरणीय विकास हक्क समवेत 5,203.69 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या डिमाइस्ड जमिनीचे बाजार मूल्य) ₹ 11.55 कोटी परिगणित केला आणि ₹ 39.39 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी निदर्शनास आणली (सप्टेंबर 2020) (***परिशिष्ट 2.11.1***).

सप्टेंबर 2020 मध्ये हे निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षक यांनी ₹ 39.39 लाख रकमेबाबतचे लेखापरीक्षा निरिक्षण मान्य केले (मार्च 2021). वसुलीबाबतची पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब मे 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.11.1.2** सह दुय्यम निबंधक वर्ग-II, अमरावती शहर-II, जिल्हा अमरावती कार्यालयाच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले (सप्टेंबर 2019) की अमरावती महानगरपालिका हद्दीतील मौजा बडनेरा, तालुका अमरावती येथील सर्व्हे क्र. 159/1, 159/2 आणि 162 असलेल्या 14600 चौरस मीटर क्षेत्रफळ मोजमापाची जमीन आणि सर्व्हे क्र. 160 आणि 164/2 असलेल्या 4,800 चौ मी क्षेत्रफळ मोजमापाची जमीन, म्हणजे एकूण 19,400 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीच्या विकासाकरिता जमीन मालक[150] आणि विकासक[151] यांच्यात सामान्य मुखत्यार पत्र (दस्तावेज क्रमांक 2586/2016) आणि संयुक्त विकास करार (दस्तावेज क्र 2587/2016) निष्पादित करण्यात आला (ऑगस्ट 2016). सामान्य मुखत्यार पत्रात विभागाने खुल्या जमिनीचा दर आकारून मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 2.28 कोटी इतके परिगणित केले आणि मोबदला ₹ 2.28 कोटी दर्शविला व ₹ 11.41 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले.

संयुक्त विकास कराराच्या कलम 4(i) नुसार जमीन मालक पूर्णपणे मूळ चटई क्षेत्र निर्देशांका मधून विकसित आणि बांधकाम केलेल्या विक्रीयोग्य जागेचे वाटप आणि विक्री आणि भाडेपट्टा किंवा परवान्यांतून प्राप्त झालेल्या निव्वळ विक्री किंमतीच्या 35 टक्क्यांचा हकदार असेल. तसेच, कलम 4(iii) नुसार, जमीन मालकाच्या प्राप्ती व्यतिरिक्त उर्वरित संपूर्ण खरेदी किंमत आणि वाटप आणि विक्रीयोग्य जागेच्या विक्री मधून प्राप्त झालेला मोबदला हा विकासकाचा राहील. तसेच संयुक्त विकास कराराच्या कलम 5 नुसार विकासक विकासाची संपूर्ण किंमत आणि जोखिम याकरिता जबाबदार असेल.

150 श्री निळकंठ बापुराव कात्रे आणि इतर 3, बडनेरा, जिल्हा अमरावती.

151 मेसर्स राज असोसिएट्स, नागपूर.

लेखापरीक्षणाने जमीन मालकाचा हिस्सा (मोबदला) ₹ 13.31 कोटी आणि विकासकाचा हिस्सा (संपूर्ण जमिनीचे बाजार मूल्य) ₹ 3.42 कोटी परिगणित केला. अशा प्रकारे, जमीन मालकाचा हिस्सा अधिक असल्यामुळे तो बाजार मूल्य म्हणून मानला पाहिजे आणि महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 25 अंतर्गत पाच टक्के दराने ₹ 66.5 लाख आकारणीयोग्य मुद्रांक शुल्काच्या तुलनेत विभागाने ₹ 11.41 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले. परिणामी, ₹ 55.13 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.11.2***).

सप्टेंबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षकांनी लेखापरीक्षा निरीक्षण[152] मान्य केले (फेब्रुवारी 2021). नोंदणी महानिरीक्षकांनी नमूद केले (फेब्रुवारी 2022) की ₹ 51.50 लाख रकमेची वसुली केली (ऑगस्ट 2022).

ही बाब मे 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.11.1.3** सह दुय्यम निबंध, वर्ग-II, हवेली-VIII, जिल्हा पुणे कार्यालयातील दस्तावेजांच्या (दस्तावेज क्र. 5469/2016) पडताळणीत असे निदर्शनास आले (जानेवारी 2018) की पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतील येवलेवाडी गाव, तालुका हवेली येथील सर्व्हे क्रमांक 15 भाग आणि 16 भाग येथील टप्पा-02 साठी 67,272 चौरस मीटर[153] क्षेत्रफळ असलेल्या जमिनीच्या विकासासाठी जमीन मालक[154] आणि विकासक[155] यांच्यात संयुक्त विकास करार निष्पादित करण्यात आला (जून 2016). विभागाने ₹ 12.04 कोटी बाजार मूल्य परिगणित केले आणि ₹ 33.51 कोटी मोबदला दर्शविण्यात आला. विभागाने मोबदला रकमेवर ₹ 1.68 कोटी मुद्रांक शुल्क वसूल केले.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की दस्तावेजांच्या परिच्छेद A आणि B अनुसार 3,79,971 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली जमीन "मोठी मालमत्ता" आहे आणि मोठी मालमत्ता एप्रिल 2009 मध्ये "बिगरशेती" म्हणून रूपांतरित करण्यात आली. तसेच, परिच्छेद E(ii) नुसार या मोठ्या मालमत्तेपैकी 74202.28 चौरस मीटर ची एकूण चटई

---

[152] IGR कार्यालयाच्या परिगणनेनुसार अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र 21010.71 चौरस मीटर गृहीत धरून ₹ 64.06 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली. मूळ चटई क्षेत्र निर्देशांकाऐवजी अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र गृहीत धरल्याबाबतचे कारण दस्तावेजात उपलब्ध नाही.

[153] अनु क्र. 15/1 (भागा) च्या 5,372 चौ.मी., अनु क्र. 16/1/4 चे 2300 चौ.मी., अनु क्र. 16/1/8A/1 चे 6800 चौ.मी., अनु क्र. 16/1/8A/2 चे 6800 चौ.मी., अनु क्र. 16/1/8B/1 चे 10,200 चौ.मी., अनु क्र. 16/1/8B/2 चे 3400 चौ.मी., अनु क्र. 16/1/9 चे 6100 चौ.मी., अनु क्र.16/1/10 चे 8300 चौ.मी., अनु क्र. 16/1/11 चे 3300 चौ.मी., अनु क्र. 16/1/12/2 चे 10,400 चौ.मी., आणि अनु क्र. 16/1/12/3 चे 4300 चौ.मी., एकूण- 67,272 चौ.मी.

[154] मेसर्स पुणे कोंढवा रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे.

[155] मेसर्स लेक डिस्ट्रिक्ट रिॲलिटी प्रायव्हेट लिमिटेड, पुणे.

क्षेत्र निर्देशांक उपलब्धता असलेल्या टप्पा-02 च्या विकासासाठी 67,272 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली जमीन ही विषयवस्तु आहे. उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांकापैकी विला आणि बंगल्यासाठी सर्व्हे क्र 15/1 (भाग) येथील 5372 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीवर 6,749.38 चौरस मीटर चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध आहे. परिच्छेद 3.1 नुसार, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च विकासकाद्वारे उचलला जाईल आणि त्याचे भुगतान केले जाईल आणि परिच्छेद 6.1 नुसार जमीन मालक, विकल्या न गेलेल्या युनिट्सच्या प्राप्तीच्या 28.2 टक्के, वाटप केलेल्या जागेच्या प्राप्तीच्या 12.9 टक्के आणि रो हाऊस आणि विलाच्या प्राप्तीच्या 43 टक्क्यांचा हक्कदार असेल.

त्यानुसार, लेखापरीक्षणाने वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्रमांक 16(c)[156] चा अवलंब करून ₹ 49.50 कोटी मोबदला आणि ₹ 54.97 कोटी जागेचे बाजार मूल्य परिगणित केले ज्यावर पाच टक्के दराने ₹ 2.75 कोटी मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. तथापि, विभागाने फक्त ₹ 1.68 कोटी मुद्रांक शुल्क वसूल केले. परिणामी, ₹ 1.07 कोटी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.11.3***).

नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी मान्य केली (जानेवारी 2021) आणि सूचित केले की ₹ 2.53 कोटीची कमी आकारणी परिगणित करण्यात आली. नोंदणी महानिरीक्षक यांनी सांगितले की वसुली प्रक्रिया प्रगतीत आहे.

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

### 2.11.2 विकसन करारनामा - बांधकाम क्षेत्राची विभागणी

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अनुसूची-। च्या अनुच्छेद 5(g-a) अनुसार संलेख जर कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील बांधकाम, तिचा विकास किंवा तिची विक्री किंवा तिचे हस्तांतरण (मग ते कोणत्याही स्वरूपाचे असो) यासाठी प्रवर्तक किंवा विकासक, मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, यास प्राधिकार किंवा अधिकार देण्यासंबंधात असेल तर, अनुच्छेद 25 च्या खंड (a), (b) किंवा यथास्थिती (c) अंतर्गत अभिहस्तांतरणावर आकारणीयोग्य असलेल्या शुल्काइतके शुल्क, हस्तांतरणाची विषयवस्तु असलेल्या, मालमत्तेचे बाजार मूल्य किंवा मोबदला यापैकी जे अधिक असेल, त्यावर अकारावयास पाहिजे. तसेच वार्षिक दर विवरणाच्या सूचना क्र 32 नुसार मालमत्तेचे बाजार मूल्य किंवा मोबदला, जे अधिक असेल, त्यावर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल, ही हस्तांतरणाची विषयवस्तु आहे, विकसन करारनाम्या संबंधात जमीन मालकाचा हिस्सा (बांधकाम केलेल्या क्षेत्राची किंमत अधिक सुरक्षा

[156] वार्षिक दर विवरणा अंतर्गत संबंधित अकृषक वापरकर्त्याला लागू असलेल्या 90 टक्के दरांचा विचार करून अकृषक वापरकर्ता म्हणून मूल्यांकन केलेल्या जमिनीचे/प्लॉटचे मूल्यांकन केले जाते.

ठेवीवर दहा टक्के दराने व्याज) आणि विकासकाचा हिस्सा परिगणित करून यापैकी जे अधिक असेल ते बाजार मूल्य म्हणून विचारात घेतले पाहिजे.

लेखापरीक्षणास एका विकसन करारनाम्यामध्ये मालकाचा हिस्सा आणि बाजार मूल्याच्या चुकीच्या परिगणनेमुळे ₹ 10.27 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी निदर्शनास आली, जी खाली दिल्याप्रमाणे आहे:

**2.11.2.1** सह दुय्यम निबंधक, हवेली-X, जिल्हा पुणे कार्यालयातील दस्तावेजांच्या (दस्तावेज क्र.2036/2015) पडताळणीत असे निदर्शनास आले (जानेवारी 2017) की गाव किरकटवाडी (प्रभाव क्षेत्र), तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील गट क्रमांक 637 वरील 3600 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीच्या तुकड्याच्या विकासाकरिता जमीन मालक[157] आणि विकासक[158] यांच्यात विकास करार निष्पादित करण्यात आला (फेब्रुवारी 2015). विभागाने मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 42 लाख परिगणित केले आणि मोबदला ₹ 44 लाख दर्शविण्यात आला. विभागाने मोबदल्याच्या रक्कमेवर ₹ 1.76 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की दस्तावेजांच्या परिच्छेद 4 (चार) मध्ये नमूद केल्यानुसार जमीन मालक प्रस्तावित बांधकाम क्षेत्राच्या 40 टक्के म्हणजे 18,480 चौरस फूट म्हणजे 1,717.47 चौरस मीटर जागा राखून ठेवेल. त्या व्यतिरिक्त दोन सह मालकांना प्रत्येकी बंगल्याचे 200 चौरस मीटर भूखंड मिळतील. तसेच, विकासक स्वतःच्या खर्चाने बांधकाम पूर्ण करेल. यासोबतच विकासकाने जमीन मालकास परत करण्यायोग्य ₹ 44 लाख व्याजमुक्त सुरक्षा ठेव प्रदान केली.

त्यानुसार, लेखापरीक्षणाने जमीन मालकाचा मोबदला ₹ 3.01 कोटी परिगणित केला ज्यावर चार टक्के दराने ₹ 12.03 लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, विभागाने फक्त ₹ 1.76 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले. परिणामी, ₹ 10.27 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.11.4***).

मार्च 2021 मध्ये हे निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षकांनी सांगितले की मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांना प्राथमिकतेने वसुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

[157] श्री दिगंबर बी. माटे, आणि इतर 33.

[158] मेसर्स मंत्रा बिल्डक्राफ्ट एलएलपी, पुणे मार्फत त्यांचे भागीदार श्री विशाल एन. गुप्ता.

### 2.11.3 विकसन करारनामा - सोसायटीचा पुनर्विकास

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 5(g-a) नुसार प्रवर्तक किंवा विकासक कोणत्याही नावाने संबोधलेले असेल, त्याला देण्यात आलेल्या प्राधिकार किंवा अधिकाराशी संबंधित संलेखाच्या प्रकरणांत, कोणत्याही स्थावर संपत्तीवर बांधकामासाठी, विकासासाठी किंवा, विक्री किंवा हस्तांतरणासाठी, (कोणत्याही प्रकारे) महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद 25 च्या खंड (a) किंवा (c), यथास्थिती नुसार मालमत्तेचे बाजार मूल्य किंवा मोबदला, यापैकी जे अधिक असेल, त्यावर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल, ही हस्तांतरणाची विषयवस्तु आहे.

विकास नियंत्रण नियमावली, बृहन्मुंबई 1991 च्या नियमन 33(7) अंतर्गत परिशिष्ट-III नुसार 'अ' श्रेणी उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाच्या बाबतीत चटई क्षेत्र निर्देशांक हे एकूण भूखंड क्षेत्राच्या 3.00 असावयास पाहिजे किंवा विद्यमान भोगवटाधारकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असलेले चटई क्षेत्र निर्देशांक अधिक प्रोत्साहन चटई क्षेत्र निर्देशांक[159], यांपैकी जे अधिक असेल ते बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय राहील. तसेच, विकास नियंत्रण नियमावलीचे नियमन 35(4) नुसार रहिवासी, औद्योगिक आणि वाणिज्यिक विकासासाठी अनुक्रमे रेडीरेकनर नुसार 60 टक्के, 80 टक्के आणि 100 टक्के दरानुसार अधिमूल्य लागू करून, अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक, रहिवासी विकासाकरिता 35 टक्क्यांपेक्षा अधिक नसलेला आणि औद्योगिक/वाणिज्यिक विकासाकरिता 20 टक्क्यांपेक्षा अधिक नसलेला फंजीबल चटई क्षेत्र निर्देशांक अभिप्रेत करते.

दोन प्रकरणांत (दोन घटकांमध्ये) बाजार मूल्य आणि मोबदल्याच्या चुकीच्या परिगणनेमुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले (₹ 91.43 लाख + ₹ 17.07 लाख = ₹ 1.08 कोटी) जी खालील परिच्छेदांमध्ये तपशीलवार दर्शविली आहेत.

**2.11.3.1** सह दुय्यम निबंधक, मुंबई-I कार्यालयाच्या दस्तावेजांच्या (दस्तावेज क्रमांक 7992/2015) पडताळणीत निदर्शनास आले (फेब्रुवारी 2017) की मलबार-कंबाला हिल विभागाच्या सीटीएस क्रमांक 540 च्या 56-62, A, ऑगस्ट क्रांती मार्ग येथे असलेल्या 648.83 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या तळमजला अधिक वरील तीन मजल्यांच्या "हार्डिंग हाऊस" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी मालक[160] आणि

[159] वार्षिक दर विवरण, 2015 (मुंबई आणि MSD) च्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्रमांक 2.2 सोबत संलग्न टिप्पणी (b) अनुसार अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राच्या परिगणनेसाठी विकास नियंत्रण नियमावली नुसार अनुज्ञेय प्रोत्साहन चटई क्षेत्र निर्देशांक गृहीत धरण्यात यावा.

[160] हार्डिंग हाऊस को-ऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी.

विकासक[161] यांच्यात विकास करार निष्पादित करण्यात आला. ही मालमत्ता आणि संरचना 'अ' श्रेणी उपकर इमारत आहे.

लेखापरीक्षणाने विकास नियंत्रण नियमावलीच्या नियमन 33(7) च्या परिशिष्ट-III आणि नियमन 35(4) च्या प्रावधानानुसार मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 32.30 कोटी परिगणित केले. लेखापरीक्षेने मोबदला ₹ 19.36 कोटी परिगणित केला. विभागाने वसूल केलेल्या ₹ 70.00 लाख रकमेच्या तुलनेत मालमत्तेच्या बाजार मूल्यावर पाच टक्के दराने ₹ 1.61 कोटी मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. परिणामी, ₹ 91.43 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली **(*परिशिष्ट 2.11.5*)** विभागाद्वारे करण्यात आलेल्या मूल्यांकनाचे विवरण अभिलेख्यांत उपलब्ध नव्हते.

हे निदर्शनास आणून दिल्यावर (फेब्रुवारी 2017) सह-दुय्यम निबंधक, मुंबई शहर-I यांनी उत्तरादाखल सांगितले की दस्तावेज अभिनिर्णित असल्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यावर अनुपालन सादर करण्यात येईल. ही बाब नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाला सूचित करण्यात आली (ऑगस्ट 2021).

उत्तरादाखल, नोंदणी महानिरीक्षकांनी सांगितले (ऑक्टोबर 2021) की ही बाब महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या खंड 53 A अंतर्गत विचाराधीन आहे आणि याबाबतीत निर्णय घेतल्यानंतरच योग्य कारवाई करण्यात येईल. याबाबतीत पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.11.3.2** सह दुय्यम-निबंधक, बोरीवली-VII, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या (दस्तावेज क्र 8840/2014) पडताळणीत निदर्शनास आले (सप्टेंबर 2015) की गाव एकसर, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हयाच्या सीटीएस क्र. 1404, 1404/1 ते 23 वरील 3359.58 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या खोटे जमिनीच्या तुकड्याच्या पुनर्विकासाकरिता मालक[162] आणि विकासक[163] यांच्यात विकास करार निष्पादित करण्यात आला. विभागाने मोबदला मूल्य ₹ 3.46 कोटी परिगणित केले आणि त्यावर ₹ 22.85 कोटी मुद्रांक शुल्क वसूल केले.

लेखापरीक्षणाने मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 9.96 कोटी आणि मोबदला मूल्य ₹ 20.21 कोटी परिगणित केले विभागाने वसूल केलेल्या ₹ 22.85 लाख मुद्रांक शुल्काच्या

---

161 संभवपार्श्व डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड.

162 श्री सरस्वती अपार्टमेंट को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड.

163 काग हायटेक-हफिझी बिल्डर्स.

तुलनेत पाच टक्के दराने ₹ 1.05[164] कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. परिणामी, ₹ 82.20 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.11.6***).

जुलै 2019 मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, बोरीवली यांनी अंशतः लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले आणि सांगितले की ₹ 58.50 लाख वसूल करण्यात आले. ₹ 75.57 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी आणि ₹ 17.07 लाख प्रलंबित उर्वरित वसुलीबाबत नोंदणी महानिरीक्षकांना कळविण्यात आले (ऑगस्ट 2021).

नोंदणी महानिरीक्षकांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (डिसेंबर 2021). वसुली बाबतची पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली; त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

## 2.12 महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम आणि वार्षिक दर विवरणाच्या चुकीच्या/लागू न केलेल्या प्रावधानांमुळे अभिहस्तांतरण पत्रामध्ये मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमांत परिकल्पित आहे की नोंदणीसाठी आणलेल्या संलेखावर मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्काच्या आकारणीच्या उद्देशासाठी मोबदला हा संलेखामध्ये नमूद केलेली रक्कम किंवा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-I च्या अनुच्छेदांनुसार ठरविण्यात आलेले मालमत्तेचे बाजारमूल्य किंवा त्या वर्षासाठी विहित वार्षिक दर विवरणामध्ये समाविष्ट असलेल्या सूचना आणि दर, यापैकी जे अधिक असेल, ते असते.

वार्षिक दर विवरणाच्या सूचना आणि महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या चुकीच्या/लागू न केलेल्या तरतुदींमुळे लेखापरीक्षेस दोन प्रकरणांत (दोन घटकांमध्ये) मुद्रांक शुल्काची कमी आकारणी (₹ 40.96 लाख + ₹ 56.06 लाख = ₹ 0.97 कोटी) निदर्शनास आली जी खाली विस्तृतपणे दर्शविली आहेः

**2.12.1** वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र.17 नुसार स्वतंत्र मूल्यांकन क्षेत्र प्रदान केले आहे अशा शहरी आणि प्रभाव क्षेत्रातील रस्त्याच्या आतील भागात स्थापित भूखंड, जे रस्त्यापासून 50 मीटर पेक्षा जास्त अंतरावर स्थापित आहेत, अशा भूखंडाचे मूल्यांकन रस्त्यासाठी लागू असलेल्या दराच्या 70 टक्के गृहित धरून करण्यात यावे.

---

[164] मोबदला मूल्यावर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क (₹ 1,01,05,122)+बँक हमी वर आकारणीयोग्य मुद्रांक शुल्क (₹ 4,00,000).

सह दुय्यम निबंधक, हवेली-II, जिल्हा पुणे कार्यालयातील अभिलेख्यांच्या (दस्तावेज क्र. 1571/2016) पडताळणीत निदर्शनास आले (ऑक्टोबर 2017) की पुणे महानगर पालिकेच्या हद्दीतील तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील धानोरी गावात स्थित सर्व्हे क्रमांक 90/B वरील 40 R म्हणजे 4000 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेली जमीन, सर्व्हे क्रमांक 90/A/2 वरील एक हेक्टर 42 एकर म्हणजे 14,200 चौरस मीटर आणि सर्व्हे क्रमांक 90/A/2 वरील 61 R म्हणजे 6100 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या म्हणजे एकूण 2 हेक्टर 43 R म्हणजे 24,300 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीसाठी विक्रेते[165] (प्रथम भागाची पार्टी) आणि खरेदीदार[166] (तृतीय भागाची पार्टी) यांच्या दरम्यान विक्री करार निष्पादित करण्यात आले (फेब्रुवारी 2016). विभागाने मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र 16B[167] चा अवलंब करून मालमत्तेचे बाजार मूल्य ₹ 22.79 कोटी परिगणित केले आणि दस्तावेजात नमूद मोबदला ₹ 8.62 कोटी होता. विभागाने ₹ 15.96 कोटींवर (वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्रमांक 17 अनुसार बाजार मूल्याच्या 70 टक्के) सहा टक्के दराने (पाच टक्के मुद्रांक शुल्क आणि एक टक्का स्वायत्त संस्था कर) ₹ 95.76 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की वर्ष 2015 च्या वार्षिक दर विवरणानुसार सर्व्हे क्रमांक 90 धानोरी गाव ते कळस मार्गावर स्थित आहे. तसेच, अभिहस्तांतरणाच्या अनुसूची A नुसार ही मालमत्ता पश्चिम बाजूने विकास आराखडा मार्ग/कळस गावाची सीमा आणि पूर्वेकडून सर्व्हे क्र. 90 च्या उर्वरित भागाने वेढलेली आहे. प्रस्तावित प्रारूप प्रादेशिक योजना (1990-2011)[168] देखील याबाबत पुष्टी करते की मालमत्ता रस्त्यावर स्थापित आहे. अशाप्रकारे, मूल्यांकन मार्गदर्शक तत्व क्र 17 चा अवलंब करून वार्षिक दर विवरणाच्या 70 टक्के दराने मालमत्तेचे मूल्यांकन बरोबर नाही.

मालमत्तेच्या खऱ्या बाजार मूल्यावर विभागाद्वारे वसूल करण्यात आलेल्या ₹ 95.76 लाख मुद्रांक शुल्काच्या तुलनेत लेखापरीक्षणाने ₹ 1.37 कोटी मुद्रांक शुल्क परिगणित केले. परिणामी, ₹ 40.96 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.12.1***).

ऑक्टोबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षकांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले (ऑगस्ट 2021). नोंदणी महानिरीक्षकांनी सांगितले की मुद्रांक

---

165 श्री बाबू राव नवलु देवकर, पुणे आणि इतर 13.

166 मेसर्स लुंकड रिॲलिटी, पुणे मार्फत त्याचे भागीदार श्रीमती पुष्पा कांतिलाल लुंकड आणि इतर दोन.

167 मूल्यांकन मार्गदर्शक तत्व 16(b) अनुसार उजाड जमिनीच्या वर्गवारीत येणाऱ्या एकत्रित क्षेत्राचे मूल्यांकन तक्त्यामध्ये दिलेल्या स्लॅब्स नुसार केले जाईल.

168 विकास योजना विभाग, पुणे महानगर पालिके द्वारे निर्गमित.

नियंत्रक, पुणे शहर यांना प्राथमिकतेने वसूली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वसुली बाबतची पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

**2.12.2** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या खंड 14 A नुसार जर एखाद्या पक्षाने संलेखामध्ये केलेल्या भौतिक बदलांमुळे, इतर पक्षांच्या संमतीने किंवा त्याशिवाय, संलेखाचे स्वरूप भौतिकदृष्टया किंवा लक्षणीय बदलले असेल, तर अशा संलेखाला त्याच्या बदललेल्या स्वरूपानुसार नवीन स्टॅम्प पेपरची आवश्यकता असेल.

सह दुय्यम निबंधक, अंधेरी-1 कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या (दस्तावेज क्र.9353/2018) पडताळणीत असे निदर्शनास आले (जानेवारी 2020) की विले पार्ले (पश्चिम), तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्ह्यात स्थित सीटीएस क्रमांक 434, 435, 435/1 च्या 3922 चौरस मीटर पासून 4,934.80 चौरस मीटर पर्यंतच्या जमिनीच्या क्षेत्राच्या दुरूस्तीकरिता जून 2005 मध्ये निष्पादित करण्यात आलेल्या अभिहस्तांतरण पत्राकरिता विक्रेता[169] आणि खरेदीदार[170] यांच्यात सुधारणा करार निष्पादित करण्यात आला (जुलै 2018). नगर रचना कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या मूल्यांकन अहवालाच्या आधारावर विभागाने मालमत्तेचे बाजारमूल्य ₹ 4.69 कोटी इतके गृहित धरले आणि ₹ 23.45 लाख मुद्रांक शुल्काची वसुली केली.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की जून 2005 मध्ये निष्पादित करण्यात आलेल्या अभिहस्तांतरण कराराच्या वेळी संपूर्ण जमिनीचे मालमत्ता कार्ड्स उपलब्ध नव्हते. परिणामी, मालमत्ता कार्डस उपलब्ध असलेल्या आणि त्यावर योग्य मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या सीटीएस क्र. 435, 435/1 ते 24 वर स्थित 3,922 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीसाठी अभिहस्तांतरण करार (दस्तावेज क्र 6299/2005) निष्पादित करण्यात आला. आता संपूर्ण जमिनींचे मालमत्ता कार्डस आढळले आहेत आणि या मालमत्ता कार्ड्स वरील नोंदणीनुसार आता जमिनीच्या क्षेत्रफळात 3,922 चौरस मीटर ऐवजी 4,934.80 चौरस मीटर अशी दुरूस्ती करण्यात आली आहे. परिणामी, तेथे 1,012.80 चौरस मीटर (4,934.80 चौरस मीटर - 3,922.00 चौरस मीटर) क्षेत्रफळाचा फरक होता ज्याकरिता दुरुस्ती करार निष्पादित करण्यात आला आणि 1,012.80 चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीवर मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात आली.

दिनांक 31 मार्च 2018 च्या नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रकांच्या परिपत्रकानुसार वर्ष 2017-18 चे वार्षिक दर विवरणाचे दर लागू होते आणि वर्ष

---

169 श्री इग्नाटीस फ्रांसिस गोन्सालाविस आणि इतर सात, मुंबई.

170 मेसर्स अमुम बिल्डर्स मार्फत त्यांचे भागीदार श्री मुकेश निशार, मुंबई.

2018-19 साठी सुद्धा तेच दर कायम होते. त्यानुसार, लेखापरीक्षेने 2017-18 च्या दरानुसार जमिनीच्या विभेदक क्षेत्राचे बाजार मूल्य ₹ 15.90 कोटी इतके परिगणित केले आणि त्यावर पाच टक्के दराने ₹ 79.50 लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, विभागाने फक्त ₹ 23.44 लाख मुद्रांक शुल्क वसूल केले. परिणामी, ₹ 56.06 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली ***(परिशिष्ट 2.12.2)***.

डिसेंबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने सांगितले (जुलै 2021) की ही बाब महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53 A अंतर्गत विचाराधीन आहे आणि या बाबतीत निर्णय घेतल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल. या बाबतीतील पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब जुलै 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

### 2.13 एका संलेखात भिन्न बाबींचा विचार न करणे आणि गहाण खताचे एकत्रीकरण यामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 (अधिनियम) च्या खंड 5 नुसार अनेक भिन्न बाबींचा समावेश असलेले किंवा संबंधित असलेला कोणताही संलेख शुल्काच्या एकूण रकमेसह आकारला जाईल, ज्याकरिता स्वतंत्र संलेख, ज्यामध्ये अशा बाबींपैकी एकाचा समावेश असेल किंवा संबंधित असेल, या अधिनियमांतर्गत आकारणीय असेल. तसेच, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-I च्या अनुच्छेद 40 च्या खंड (b) नुसार “[डिपाझिट ऑफ टायटल डीड्स, पॉन किंवा प्लेज किंवा गहाण (अनुच्छेद 6)], बॉटमरी बॉण्ड (अनुच्छेद 14) मॉर्ट्गेज ऑफ क्रॉप (अनुच्छेद 41) प्रतिसादक बॉण्ड (अनुच्छेद 53) किंवा प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाण खताशी (अनुच्छेद 54) संबंधित करार नसतांना गहाण खताचे संलेख”, जेव्हा ताबा दिला जात नाही किंवा देण्याचे मान्य केले जाते या संलेखाद्वारे संरक्षित केलेल्या रकमेसाठी प्रत्येक एक हजार किंवा त्याच्या भागासाठी ₹ पाच दराने किमान ₹ शंभर आणि जास्तीत जास्त ₹ दहा लाख शुल्क आकारणीयोग्य आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हयाच्या दस्तावेजांच्या पडताळणीत निदर्शनास आले (मे 2019) की चार[171] विविध करारांमार्फत ₹ 625 कोटी ऋणाची एकूण रक्कम सुरक्षित ठेवण्यासाठी गहाण देणारा[172] आणि गहाण ठेवणारा[173] यांच्या

---

[171] (1) ₹ 145 कोटी दिनांक 28 फेब्रुवारी 2018, (2) ₹ 200 कोटी दिनांक 22 डिसेंबर 2017, (3) ₹ 160 कोटी दिनांक 26 जून 2018 आणि (4) ₹ 120 कोटी दिनांक 12 सप्टेंबर 2018, एकूण ₹ 625 कोटी

[172] मेसर्स नीपा रिअल इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई.

[173] मेसर्स इंडिया बुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, नवी दिल्ली.

दरम्यान निष्पादित न केलेले गहाण खत निर्णय केस क्र.ADJ/1100900/1108/2018 दिनांक 11.10.2018 मार्फत अभिनिर्णित केले आणि ₹ 10,01,100 (अनुच्छेद 40(b) च्या खंड 6 अंतर्गत दहा लाख आणि 48 (d), 5(b)B आणि 35 अंतर्गत ₹ 1100) वसूल केले.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की दोन विभिन्न कंपन्यांसाठी[174] वेगवेगळ्या तारखांना[175] मंजूर करण्यात आलेल्या ऋण कराराचे चार वेगळे संलेख आहेत. तसेच, व्याजाचे निरनिराळे दर असलेल्या चार विविध मंजुरी पत्रांद्वारे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. तात्काळ गहाण ठेवीमध्ये चार वेगळया बाबींचा विचार केला गेला असल्यामुळे मुद्रांक शुल्काच्या आकारणीसाठी दहा लाखांच्या कमाल मर्यादेचा लाभ देणारे अनुच्छेद 40 (b) (खंड 6 वाचा), 48(d), 5h(B) आणि 35 चा अवलंब चुकीचा आहे आणि तो महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या खंड 5 च्या प्रावधानांच्या विरुद्ध आहे. परिणामी, ₹ 30 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.13.1***).

सप्टेंबर 2020 मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर उत्तरादाखल नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने सांगितले की खंड 53A अंतर्गतच्या ठरावानुसार ₹ 40 लाख मुद्रांक शुल्क आणि ₹ 32 लाख शास्तीच्या वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत. वसुलीबाबतची पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब जुलै 2021 आणि ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली, त्यांचे उत्तर प्रतीक्षित होते (ऑगस्ट 2022).

## 2.14 हक्क सोड विलेखावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, 1958 (अधिनियम) च्या अनुसूची-I च्या अनुच्छेद 52(b) नुसार सोडलेला हिस्सा, व्याज, भाग किंवा दाव्याच्या बाजार मूल्यावर, अनुच्छेद 25 च्या खंड (a), (b) [किंवा यथास्थिती (c)] अंतर्गत अभिहस्तांतरणावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क हक्क सोड विलेखावर आकारणीयोग्य आहे. तसेच, अधिनियमाच्या कलम 2(na) अंतर्गतच्या व्याख्येनुसार एखादया संलेखाची विषयवस्तु असणाऱ्या मालमत्तेच्या संदर्भातील "बाजार मूल्य" याचा अर्थ असा संलेख ज्या तारखेस निष्पादित करण्यात आला असेल त्या तारखेस ती मालमत्ता खुल्या बाजारात विकली असता जी किंमत आली असती, ती किंमत किंवा संलेखात नमूद करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती, असा आहे. तसेच, अभिहस्तांतरण/विक्रीच्या वेळी भाडेकरूसह असलेल्या जुन्या मालमत्तेच्या मूल्यांकनासाठी देण्यात आलेल्या वार्षिक दर विवरणाच्या मूल्यांकन मार्गदर्शक क्रमांक 1 अंतर्गत उदाहरण 2 नुसार

174 मेसर्स शेठ क्रिएटर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स नीपा रिअल इस्टेट्स प्रायव्हेट लिमिटेड.

175 21 फेब्रुवारी 2018, 15 डिसेंबर 2017, 20 जून 2018 आणि 10 सप्टेंबर 2018.

जर भाडेकरूने व्यापलेले एकूण क्षेत्र स्वीकृत चटई क्षेत्र निर्देशांकानुसार एकूण मान्य करण्यायोग्य क्षेत्रापेक्षा कमी असेल तर

म्हणजेच, जर Z<XY तर बाजार मूल्य खालीलप्रमाणे राहील[176]

=112B +[(XY-Z-H) x (वार्षिक दर विवरणानुसार जमिनीचा दर)] + (H x मालमत्तेचे वय आणि वापर यानुसार घटलेले मूल्य)

सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर-I कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या (दस्तावेज क्र 13461/2015) पडताळणीत असे निदर्शनास आले की "प्रथम हक्क सोडणारा"[177] आणि पुष्टी करणारा पक्ष/द्वितीय हक्क सोडणारा[178] आणि "प्राप्तकर्ता (Releasee)"[179] यांच्या दरम्यान हक्क सोड विलेख निष्पादित करण्यात आले (डिसेंबर 2015). (i) 2170.58 चौरस मीटर (हस्तांतरण पत्र दिनांक 8 जुलै 2002 नुसार) आणि 1781.79 चौरस मीटर (शहर आणि मुंबई बेटासाठी असलेल्या सर्वेक्षण रजिस्टर नुसार) क्षेत्रफळ असलेल्या कुलाबा विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हे क्रमांक 64 असलेल्या वार्ड क्रमांक A 206, (1,1A) मार्ग क्रमांक 147 आणि 5 आणि 7A कोलाबा मार्ग, ससून डॉक, कोलाबा मार्ग आणि तसेच (i) 388.80 चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या मार्ग क्र 147 वार्ड "ए" मधील कॅडस्ट्रल सर्वेक्षण क्र 1/64 असलेला जमिनीचा पट्टा यांच्या जंक्शनवर स्थित दीर्घ मुदतीसाठी भाड्याने घेतलेल्या जमिनीच्या अशा सर्व तुकड्यांच्या संदर्भात हक्क सोडणारा "प्राप्तकर्त्या" च्या बाजूने प्रथम रिलीजकर्त्याच्या ""प्रथम हक्क सोडणारा" च्या 30 टक्के व्याजाच्या मुक्ततेसाठी हक्कसोड विलेख आहे. वरील संपूर्ण मालमत्तेवर वर्ष 1931 पूर्वी बांधण्यात आलेल्या संरचनेचे एकूण बांधकाम केलेले क्षेत्र 2,504.22 चौरस मीटर (बांधकाम केलेले क्षेत्र) आहे त्यापैकी 423.60 चौरस मीटर (बांधकाम केलेले क्षेत्र) वाणिज्यिक प्रयोजनासाठी आणि 2,080.62 चौरस मीटर (बांधकाम केलेले क्षेत्र) रहिवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येत आहे. हक्क सोडणारा आणि प्राप्तकर्ता हे भूखंडाचे शाश्वत भाडेपट्टाधारक आहेत. विभागाने रिलीजकर्त्याच्या 30 टक्के भागाचे बाजार मूल्य ₹ 39.32 कोटी आणि मोबदला मूल्य ₹ 3.70 कोटी इतके परिगणित केले आणि मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या पाच टक्के दराने ₹ 1.97 कोटी मुद्रांक शुल्क

[176] जिथे 1. एकूण जमिनीचे क्षेत्रफळ= X चौरस मीटर्स, 2. अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक= Y, 3. या प्लॉटसाठी एकूण परवानगीयोग्य क्षेत्रफळ=(X)x(Y)=XY चौरस मीटर्स, 4. भाडेकरुद्वारे व्यापलेले एकूण क्षेत्रफळ=Z चौरस मीटर्स, 5. जमीन मालकाद्वारे व्यापलेले एकूण क्षेत्रफळ=H चौरस मीटर्स, 6. सर्व भाडेकरुंकडून एकूण मासिक भाडे = ₹ B.

[177] श्री सायरस सोली नल्लासेठ.

[178] श्री सोराब फळी मेहता.

[179] डॉक्टर कैकी आर. मेहता.

आकारले. विभागाद्वारे करण्यात आलेल्या मालमत्तेच्या मूल्यांकनाचे विवरण दस्तावेजांत उपलब्ध नाही.

लेखापरीक्षेने वार्षिक दर विवरणच्या मार्गदर्शक तत्व क्र.1 चा अवलंब करून मालमत्तेच्या बाजार मूल्याच्या 30 टक्के ₹ 43.94 कोटी आणि मोबदला मूल्य ₹ 3.70 कोटी इतके परिगणित केले. अशा प्रकारे, विभागाद्वारे आकारण्यात आलेल्या ₹ 1.97 कोटीच्या तुलनेत बाजार मूल्यावर पाच टक्के दराने ₹ 2.20 कोटी मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. परिणामी ₹ 23.12 लाख मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली (***परिशिष्ट 2.14.1***).

हे निदर्शनास आणून दिल्यावर उत्तरादाखल सह-दुय्यम निबंधक, मुंबई शहर-I यांनी सांगितले (फेब्रुवारी 2017) की दस्तावेज मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याद्वारे अभिनिर्णित केल्यामुळे त्या कार्यालयाद्वारे टिप्पणी प्राप्त झाल्यावर अनुपालन सादर करण्यात येईल. ही बाब नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाला सूचित करण्यात आली (ऑगस्ट आणि ऑक्टोबर 2021). उत्तरादाखल नोंदणी महानिरीक्षकांनी सांगितले (नोव्हेंबर 2021) की ही बाब महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 53A अंतर्गत विचाराधीन आहे आणि त्याबाबत निर्णय घेण्यात आल्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. पुढील प्रगती प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

ही बाब ऑक्टोबर 2021 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

# <u>प्रकरण III</u>

## व्यवहारांचे लेखापरीक्षण
## राज्य सार्वजनिक उपक्रम

# प्रकरण III

## व्यवहारांचे लेखापरीक्षण: सार्वजनिक उपक्रम

शासकीय विभागांच्या सार्वजनिक उपक्रमांच्या व्यवहारांच्या लेखापरीक्षणात संसाधनांच्या व्यवस्थापनातील त्रुटी आणि नियमितता, औचित्य व मितव्ययता या बाबतीत मानदंडांचे पालन करण्यात अपयश आल्याची उदाहरणे निदर्शनास आली आहेत.

## ऊर्जा विभाग

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### 3.1 महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजनेच्या (उदय) पूर्वीची आणि नंतरची कामगिरी

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) ला उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजनेंतर्गत, त्यांच्या जास्त किंमतीच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ₹ 4,960 कोटी रक्कम मिळाली असली तरी विविध कार्यचालनात्मक मापदंड साध्य करण्यासाठी त्यांना इतर कोणताही समर्पित निधी मिळाला नाही. परिणामी, महावितरणला त्याच्या स्वतःच्या संसाधनांद्वारे किंवा इतर केंद्रीय/राज्य योजनांतर्गत कार्यचालनात्मक मापदंड सुधारणे भाग पडले. महावितरणने (मार्च 2017) ₹ 1,653 कोटींची बंधपत्रे उभारण्याच्या हमीसाठी महाराष्ट्र शासनाकडे संपर्क साधला. परंतु महाराष्ट्र शासनाने निधी उभारण्यासाठी महावितरणला हमी देण्यास सहमती नाकारली. महावितरणची थकबाकी जलद गतीने भरून काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही दृढ वचनबद्धता नव्हती.**

**एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा इच्छित पातळीवर खाली आणण्याचे उद्दिष्ट महावितरणला साध्य करता आले नाही. याउलट तो 2018-19 मधील 16.94 टक्क्यांवरून 2020-21 मध्ये 20.73 टक्के इतका वाढला. अशाप्रकारे, उदय योजना राबवूनही महावितरणचे वित्तीय आणि कार्यचालनात्मक प्रत्यावर्तन प्राप्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट साध्य झाले नाही.**

#### 3.1.1 प्रस्तावना

वीज क्षेत्रातील सुधारणांचा एक भाग म्हणून तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात महावितरणचा समावेश (जून 2005) करण्यात आला. बृहन्मुंबई आणि काही उपनगरी भाग वगळता महाराष्ट्र राज्यासाठी वीज वितरण परवानाधारक म्हणून महावितरण आहे. महावितरणला, 2020-21 या आर्थिक वर्षात अंदाजे 2.85 कोटी ग्राहकांना केलेल्या वीज विक्रीतून ₹ 73,041.61 कोटी महसूल प्राप्त झाला.

राज्याच्या मालकीच्या डिस्कॉम्सची स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने, उर्जा मंत्रालय, भारत सरकारने (नोव्हेंबर 2015) उज्वल डिस्कॉम ॲश्युरन्स योजना (उदय) सुरू केली. उदय ही सर्वांना परवडणारी आणि 'सर्वांसाठी 24X7 वीज' पुरवठा साकारण्यासाठी एक सुधारणा म्हणून परिकल्पित करण्यात आली होती.

उदय योजनेत परिकल्पित केलेली मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे होती:

- डिस्कॉम्सचे वित्तीय प्रत्यावर्तन; आणि
- डिस्कॉम्सच्या कार्यचालन कार्यक्षमतेत सुधारणा करणे.

महाराष्ट्र शासनाने उदय योजनेत सहभागी होण्यासाठी ऊर्जा मंत्रालयाला आपली तत्वतः सहमती दिली (जानेवारी 2016).

उदय योजनेत नमूद केल्याप्रमाणे[1] ऊर्जा मंत्रालय (भारत सरकार), महाराष्ट्र शासन आणि महावितरण यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला (ऑक्टोबर 2016). सामंजस्य करारात उदय योजनेसाठी आवश्यक वित्तीय आणि कार्यचालनात्मक टप्पा गाठण्यासाठी ऊर्जा मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि महावितरण यांची दायित्वे/ वचनबद्धता नमूद केलेली आहेत.

सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणाऱ्या प्रत्येक पक्षाची काही प्रमुख दायित्वे/ वचनबद्धता खाली दर्शविली आहेत:

**I. उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांची दायित्वे/वचनबद्धता**

- दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, एकात्मिक ऊर्जा विकास योजना आणि/किंवा या योजनेत नमूद केल्यानुसार ऊर्जा मंत्रालयाच्या किंवा नवीन व अक्षय ऊर्जा मंत्रालयाच्या इतर योजनांद्वारे अतिरिक्त आणि प्राधान्य निधी मिळवण्यासाठी राज्याला सुविधा प्रदान करणे.
- कोळसा मंत्रालयामार्फत महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या देशांतर्गत कोळसा पुरवठ्यात वाढ करणे.
- अधिसूचित किंमतीवर राज्याला कोळसा जोडणीचे वाटप करावे जेणेकरून राज्य शासन दर-आधारित बोली लावू शकेल.
- कोळसा जोडणीचे तर्कशुद्धीकरण सुनिश्चित करणे.
- कोल इंडियाकडून 100 टक्के क्रश कोळशाचा पुरवठा सुनिश्चित करणे.
- ग्रॉस कॅलरीफिक व्हॅल्यू (GCV) वर आधारित कोळशाच्या किंमती तर्कसंगत करणे.

---

[1] उर्जा मंत्रालय, भारत सरकारने 20 नोव्हेंबर 2015 रोजी प्रसिद्ध केलेले कार्यालय ज्ञापन.

- महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितची कार्यचालनात्मक कार्यक्षमता सुधारण्याकरिता हातभार लावण्यासाठी राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळातर्फे सुविधा प्रदान करणे.

**II. महाराष्ट्र शासनाची दायित्वे/वचनबद्धता**

- महाराष्ट्र शासन, 2016-17 ते 2020-21 या पाच वर्षांच्या कालावधीत मध्यम आणि अल्प मुदतीच्या ₹ 4,960 कोटी ऋणाचा (30 सप्टेंबर 2015 रोजी असलेल्या ₹ 6,613 कोटींच्या मध्यम आणि अल्प मुदतीच्या ऋणाच्या 75 टक्के) ताबा घेणार होते.
- महाराष्ट्र शासन हे महावितरणकडे शिल्लक राहिलेल्या 25 टक्के मध्यम आणि अल्प मुदतीच्या ऋणासाठी मुद्दल आणि व्याजाची परतफेड करण्याची हमी देणार होते.
- राज्य शासनाच्या विभागांची थकबाकी डिस्कॉमला त्वरित देणे.
- महाराष्ट्र शासन 2016-17 ते 2020-21 या कालावधीत भविष्यातील नुकसान श्रेणीबद्ध पद्धतीने ताब्यात घेणार होते.

**III. महावितरणची दायित्वे/वचनबद्धता**

- महावितरणकडे शिल्लक असलेल्या मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जाच्या 25 टक्के, महावितरण राज्य शासनाचे हमी असलेले बंधपत्र किंवा त्यांचे बँका/वित्तीय संस्थांद्वारे कर्ज/बंधपत्रांमध्ये रूपांतरित करायचे होते ज्याचा व्याज दर हा मूळ व्याज दर अधिक 0.1 टक्के यापेक्षा जास्त नसावा.
- एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा हा आर्थिक वर्ष 2014-15 मधील 20.79 टक्क्यांवरून वित्तीय वर्ष 2018-19 पर्यंत 14.98 टक्क्यांपर्यंत कमी करणे.
- सरासरी पुरवठा खर्च आणि महसूल प्राप्ती यामधील अंतर आर्थिक वर्ष 2018-19 पर्यंत दूर करणे.
- मार्च 2018 पर्यंत भौतिक फीडर पृथक्करण साध्य करणे.
- 31 डिसेंबर 2016 पर्यंत फीडरचे मीटरिंग 100 टक्के पूर्ण करणे.
- 30 जून 2018 पर्यंत वितरण रोहित्रांचे मीटरिंग 100 टक्के करणे.
- कृषी ग्राहकांव्यतिरिक्त इतर सर्व ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविणे.
- 'सर्वांसाठी 24X7 वीज' दस्तावेजात नमूद केल्याप्रमाणे जोडल्या न गेलेल्या कुटुंबांना वित्तीय वर्ष 2019 पर्यंत वीज उपलब्ध करून देणे.

- घरगुती आणि इतर श्रेणीतील ग्राहकांसाठी LED पुरवून मागणी व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी उपाययोजना करणे.
- मार्च 2019 पर्यंत विद्यमान कृषी पंपांपैकी किमान 10 टक्के ऊर्जा कार्यक्षम पंपामध्ये बदलणे.
- दर (Tariff) याचिका वेळेवर दाखल करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे.
- एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा कमी करणे आणि मीटर/बिलिंग/संकलन कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी प्रत्येक प्रभारी अधिकाऱ्याला मुख्य कार्यनिष्पादन निर्देशक (KPI) तयार करून देणे.
- तक्रारींचे वेळेवर निराकरण करण्यासाठी केंद्रीय ग्राहक कॉल सेंटर तयार करणे आणि बिल भरणे, इत्यादीसाठी ग्राहकांना ई-पेमेंट मार्गाची सुविधा करून देणे.

### 3.1.2 लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

पुढील बाबी तपासण्यासाठी लेखापरीक्षण करण्यात आले:

- उदय योजना आणि सामंजस्य करारामध्ये परिकल्पित केलेल्या वित्तीय मापदंडांशी संबंधित निर्देशांचे पालन केले गेले आणि डिस्कॉमच्या वित्तीय प्रत्यावर्तनाचे एकूण उद्दिष्ट साध्य झाले; व
- त्रिपक्षीय सामंजस्य करार आणि योजनेत परिकल्पित केलेल्या कार्यचालनात्मक कार्यक्षमतेची अंमलबजावणी करून लक्ष्यित कार्यचालनात्मक सुधारणा आणि इच्छित परिणाम साध्य केले गेले आहेत.

### 3.1.3 लेखापरीक्षेचे निकष

लेखापरीक्षण निकष खालील स्त्रोतांकडून काढले गेले:

- ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारद्वारे निर्गमित केलेले उदय योजनेचे कार्यालयीन ज्ञापन.
- ऊर्जा मंत्रालय, राज्य शासन आणि डिस्कॉम यांच्यात स्वाक्षरी झालेला सामंजस्य करार आणि परिशिष्ट.
- विद्युत कायदा, 2003 आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि इतर पुरवठ्याच्या अटी) विनियम, 2005 आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने जारी केलेल्या इतर सूचना.
- महावितरणच्या संचालक मंडळाच्या बैठकीची कार्यसूची आणि कार्यवृत्त.
- उदय अंतर्गत महावितरणचा बँकांसोबत कर्ज करार.

- ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार आणि राज्य शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले दिशानिर्देश/सूचना.

### 3.1.4 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

2014-15 ते 2020-21 या कालावधीसाठी उदयच्या पूर्वी व नंतरच्या अंमलबजावणीमधील महावितरणच्या परिणामकारकता आणि कार्यक्षमतेचे विश्लेषण करण्यासाठी सप्टेंबर 2020 ते ऑक्टोबर 2021 दरम्यान लेखापरीक्षण करण्यात आले. यामध्ये मुख्य कार्यालय आणि नऊ[2] मंडळ कार्यालये (45 पैकी) ज्यामध्ये एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा जास्त असलेल्या तसेच एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोट्यात घट झालेल्या मंडळांमधून निवड करण्यात आली होती.

उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अवलंबिलेली लेखापरीक्षण व्याप्ती आणि पद्धती ऑक्टोबर 2020 मध्ये झालेल्या प्रवेश परिषदेमध्ये शीर्ष व्यवस्थापनाला समजावून सांगितली होती. त्यात मुख्य कार्यालय आणि महावितरणच्या निवडलेल्या मंडळ कार्यालयांच्या संबंधित अभिलेख्यांची पडताळणी/तपासणी, डेटा विश्लेषण, व्यवस्थापनाशी संवाद आणि प्राथमिक लेखापरीक्षण चौकशी महावितरणच्या व्यवस्थापनाकडे देणे यांचा समावेश होता. तसेच, उदय पूर्वी आणि नंतर जनरेटिंग युनिटची कार्यक्षमता आणि पारेषण युनिटचा तोटा तपासण्यासाठी, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचेकडून माहिती आणि अभिलेखे प्राप्त केले गेले.

दिनांक 20 डिसेंबर 2021 रोजी महावितरणचे अधिकारी आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रतिनिधींसोबत निर्गमन परिषद आयोजित करण्यात आली. कंपनी आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त उत्तरांचा अहवालात योग्यरित्या समावेश करण्यात आला आहे.

### लेखापरीक्षण निष्कर्ष

### 3.1.5 महाराष्ट्रातील उदय योजनेची अंमलबजावणी

राज्य डिस्कॉमची वित्तीय आणि परिचालनात्मक कार्यक्षमता सुधारण्याच्या उद्देशाने ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारद्वारे उदय योजनेला मंजुरी (नोव्हेंबर 2015) देण्यात आली होती. वर म्हटल्याप्रमाणे, सामंजस्य कराराचे तिन्ही पक्ष, म्हणजेच ऊर्जा मंत्रालय (भारत सरकार), महाराष्ट्र शासन आणि महावितरण यांना काही दायित्वे/वचनबद्धता पार पाडायची होती.

---

[2] भिवंडी, बुलढाणा, नंदुरबार, पालघर (मिनी), परभणी, पेण, पुणे (ग्रामीण), सोलापूर, वाशी.

महाराष्ट्र शासनाने महावितरणच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीनंतर (डिसेंबर 2015) उदय योजनेत सहभागी होण्यासाठी महावितरणला तत्वतः मान्यता दिल्याचे ऊर्जा मंत्रालयाला कळविले (04 जानेवारी 2016).

प्रारंभी, महावितरणने, महाराष्ट्र शासनाला त्यांचे एकूण ₹ 22,097 कोटी ऋण (सप्टेंबर 2015 पर्यंत थकबाकी) आणि ₹ 6,597 कोटी कार्यचालनात्मक निधीची आवश्यकता (म्हणजेच एकूण ₹ 28,694 कोटी) योजनेंतर्गत ताब्यात घेण्याचा प्रस्ताव दिला होता (15 जानेवारी 2016). महावितरणने कोणत्याही आर्थिक मदतीशिवाय, केवळ कार्यचालनात्मक मापदंड समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावात सुधारणा केली (14 मार्च 2016). महाराष्ट्र शासनासोबतच्या आढावा बैठकीत (24 जून 2016), या योजनेच्या अंमलबजावणीची आर्थिक मापदंडांसह पुनर्तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रारूप प्रस्ताव पुन्हा सुधारित करण्यात आला (20 सप्टेंबर 2016) आणि ₹ 22,097 कोटींच्या एकूण ऋणाच्या 75 टक्के रक्कम ताब्यात घेण्यासाठी आणि उर्वरित 25 टक्के ऋणाची पुनर्रचना शासनाच्या हमीसह बंधपत्र करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आला.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की ₹ 22,097 कोटींच्या संपूर्ण ऋणाचा समावेश असलेल्या प्रारूप प्रस्तावाच्या तुलनेत त्रिपक्षीय सामंजस्य करारा[3] मध्ये (07 ऑक्टोबर 2016) केवळ ₹ 6,613 कोटी मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जाचा समावेश होता. परिणामी, महाराष्ट्र शासनाने ₹ 6,613 कोटी मध्यम आणि अल्प मुदतीच्या 75 टक्के, म्हणजेच ₹ 4,960 कोटी रक्कम ताब्यात घेऊन उर्वरित 25 टक्के (₹ 1,653 कोटी) महावितरणद्वारे राज्य हमीसह डिस्कॉम बंधपत्रे म्हणून वितरित करण्याचा निर्णय घेतला. परिणामी, महावितरणने, दीर्घ मुदतीच्या कर्जावर 9.75 ते 12.19 टक्के प्रतिवर्ष व्याज आणि खेळत्या भांडवल कर्जावरील 7.02 ते 10.15 टक्के प्रतिवर्ष व्याज उर्वरित[4] कर्जावर देणे सुरू ठेवले.

महावितरणने लेखापरीक्षणाचे निष्कर्ष तथ्यात्मक होते हे मान्य केले (जानेवारी 2022). महाराष्ट्र शासनाने (जुलै 2022) सांगितले की 04 ऑक्टोबर 2016 रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत संपूर्ण ऋणाऐवजी केवळ ₹ 6,613 कोटींची मध्यम आणि अल्प मुदतीची कर्जे ताब्यात घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

हा निधी उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष सिक्युरिटीज जसे, 7.33 टक्क्यांची ₹ 2,000 कोटींची महाराष्ट्र शासन विशेष बंधपत्रे, 2022 आणि 7.38 टक्क्यांची ₹ 2,959.75 कोटींची महाराष्ट्र शासन विशेष बंधपत्रे, 2022 जारी केली (10 फेब्रुवारी 2017) आणि प्राप्त निधी, 13 फेब्रुवारी 2017 रोजी महावितरणला कर्ज म्हणून

---

[3] ऊर्जा मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि महावितरणद्वारे त्रिपक्षीय सामंजस्य करार.

[4] सप्टेंबर 2015 रोजी थकबाकी ₹ 22,097 कोटी वजा उदय अंतर्गत ₹ 6,613 कोटी = ₹ 15,484 कोटी.

हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने सामंजस्य करारातील वेळापत्रकानुसार ₹ 4,960 कोटी (वार्षिक ₹ 992 कोटी) कर्ज महावितरणला अनुदान म्हणून रुपांतरित केला.

### 3.1.6 योजनेच्या अंमलबजावणीतील कमतरता

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महावितरणला, त्याच्या जास्त किमतीच्या कर्जाची परतफेड करून व्याजाचा बोजा कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ₹ 4,960 कोटी प्राप्त झाले (13 फेब्रुवारी 2017). परंतु, उदयसाठी सामंजस्य करारात नमूद केल्यानुसार विविध कार्यचालनात्मक मापदंड, जसे की 100 टक्के फीडर सेग्रीगेशन, डीटी मीटरिंग इत्यादि साध्य करण्यासाठी कोणताही इतर समर्पित निधी प्राप्त झाला नाही. परिणामी, महावितरणला स्वतःच्या संसाधनांद्वारे किंवा इतर केंद्र/राज्य योजनांतर्गत निधीद्वारे कार्यचालनात्मक मापदंड सुधारणे भाग पडले.

लेखापरीक्षणात असेही निदर्शनात आले की, जरी या सामंजस्य करारामध्ये ₹ 22,097 कोटींच्या संपूर्ण ऋणाचा समावेश करण्याच्या पूर्वीच्या प्रस्तावाच्या तुलनेत केवळ ₹ 6,613 कोटी मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जांचा समावेश होता तरी सामंजस्य करारामध्ये समाविष्ट असलेले विविध कार्यचालनात्मक मापदंड साध्य करण्यासाठी निर्धारित परिमाणात्मक उद्दिष्टे तशीच राहिलीत.

उत्तरात महाराष्ट्र शासनाने सांगितले की वित्तीय प्रत्यावर्तन साध्य करण्यासाठी आणि डिस्कॉमची कार्यक्षमता सुधारण्यासाठी योजना तयार करण्यात आली होती. वित्तीय प्रत्यावर्तनाच्या अंतर्गत 30 सप्टेंबर 2015 पर्यंतचे संपूर्ण ऋण राज्य शासनाने ताब्यात घ्यायचे होते. नेमका वितरण तोटा शोधणे आणि तोटा कमी करण्यासाठी योग्य ती कारवाई करणे हे कार्यचालनात्मक मापदंडांतर्गत उद्दिष्ट संपूर्णपणे महावितरणच्या अखत्यारीत होते आणि महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या ऋणाची रक्कम कमी केली असली तरी ते अंशतः सुद्धा कमी करू शकले नाही.

उदयच्या सामंजस्य करारांतर्गत ठरविलेल्या प्रत्येक आर्थिक आणि कार्यचालनात्मक मापदंड/दायित्वांच्या विरुद्ध महावितरणच्या उपलब्धींची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे:

### वित्तीय मापदंड

### 3.1.7 मध्यम आणि अल्प मुदतीच्या 75 टक्के कर्जाचा ताबा घेणे

**तक्ता 3.1.1** मध्ये दर्शविल्यानुसार सप्टेंबर 2015 पर्यंत, महावितरणचे एकूण थकित कर्ज ₹ 22,097 कोटी होते:

**तक्ता 3.1.1: सप्टेंबर 2015 पर्यंत महावितरणचे एकूण थकित कर्ज**

| अनु. क्र. | कर्जाचा प्रकार | रक्कम (₹ कोटी मध्ये) |
|---|---|---|
| 1 | दीर्घ मुदतीचे | 13,090 |
| 2 | अल्प मुदतीचे (₹ 6,156 कोटी)/मध्यम मुदतीचे (₹ 458 कोटी) | 6,613 |
| 3 | खेळते भांडवल | 2,394 |
| | **एकूण** | 22,097 |

***(स्त्रोत: महावितरणने दिलेली माहिती)***

सामंजस्य करारानुसार महाराष्ट्र शासनाने ₹ 4,960 कोटी रकमेचे मध्यम आणि अल्प मुदतीचे ऋण ताब्यात घेतले (30 सप्टेंबर 2015 रोजी असलेल्या मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जाच्या 75 टक्के) आणि हा निधी उभारण्यासाठी नॉन एसएलआर बंधपत्रे (नॉन-स्टॅच्युटरी लिक्विडिटी रेशिओ बॉन्ड्स) जारी केलेत (फेब्रुवारी 2017).

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की सप्टेंबर 2015 मध्ये असलेल्या मध्यम आणि अल्प मुदतीच्या ऋणाची रक्कम (₹ 4,960 कोटी) ताब्यात घेण्याचे मान्य केले असले तरी सामंजस्य करार ऑक्टोबर 2016 मध्ये करण्यात आला आणि निधी शासनाकडून महावितरणकडे प्रत्यक्षात फेब्रुवारी 2017 मध्ये हस्तांतरित करण्यात आला. या मधल्या काळात (ऑक्टोबर 2015 ते जानेवारी 2017 म्हणजे 16 महिने) महावितरणने मध्यम आणि अल्प मुदतीच्या ऋणावरील व्याजासाठी ₹ 661 कोटी[5] भरले. परिणामी, मध्यम आणि अल्प मुदतीच्या ऋणाचा बोजा आधीच ₹ 5,621 कोटी इतका वाढला होता ज्याच्या तुलनेत केवळ ₹ 4,960 कोटींचा ताबा घेतला.

महावितरणने उत्तरात म्हटले की महाराष्ट्र शासनाकडून सप्टेंबर 2015 मध्ये निधी प्राप्त झाला असला तरीही कर्जाचा बोजा 7.36 टक्के वार्षिक दराने कायम राहील.

खालील **तक्ता 3.1.2** उदयच्या अंमलबजावणीच्या कालावधीत महावितरणच्या ऋणातील बदल, संचित तोटा आणि थकबाकीची स्थिती दर्शविते.

[5] ऑक्टोबर 2015 ते जानेवारी 2017 (16 महिने) या कालावधीसाठी व्याजाचा किमान कर्ज दर वार्षिक 10 टक्के विचारात घेता.

**तक्ता 3.1.2: महावितरणचे वर्ष-निहाय एकूण कर्ज, संचित तोटा आणि थकबाकीची स्थिती**

| अनु क्र. | वर्ष | महावितरण चे एकूण ऋण | एकूण ऋणा मध्ये टक्के बदल | संचित तोटा कोटी मध्ये | तोट्या मध्ये टक्के बदल | थकबाकी[6] | थकबाकी मध्ये टक्के बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 17,021 | - | (-) 7,087 | - | 14,135 | - |
| 2 | 2015-16 | 21,111 | 24.03 | (-) 28,165 | 297.42[7] | 17,817 | 26.05 |
| 3 | 2016-17 (प्राप्त उदय निधी) | 27,264 | 29.15 | (-) 27,380 | -2.79 | 22,133 | 24.22 |
| 4 | 2017-18 | 29,242 | 7.25 | (-) 26,887 | -1.80 | 27,569 | 24.56 |
| 5 | 2018-19 | 35,197 | 20.36 | (-) 24,001 | -10.73 | 35,279 | 27.97 |
| 6 | 2019-20 | 39,089 | 11.06 | (-) 23,317 | -2.85 | 44,825 | 27.06 |
| 7 | 2020-21 | 42,910 | 9.78 | (-) 24,638 | 5.67 | 44,680 | (-) 0.32 |

***(स्त्रोतः ही माहिती महावितरणने त्याच्या लेख्यांमधून दिली)***

पुढे, असे निदर्शनास आले की मध्यम आणि अल्प मुदतीचे ऋण ताब्यात घेतल्यानंतरही महावितरणची एकंदर कर्ज स्थिती सतत बिकट होत गेली, हे खालील **आलेख 3.1.1** वरून दिसून येते.

**आलेख 3.1.1 : महावितरणची वित्तीय स्थिती**




***(स्त्रोतः ही माहिती महावितरणने त्याच्या लेख्यांमधून दिली)***

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की महावितरणचे एकूण ऋण 2014-15 मध्ये ₹ 17,021 कोटींवरून 2020-21 मध्ये ₹ 42,910 कोटी झाले. विविध श्रेणीतील ग्राहकांकडून अत्यंत कमी संकलनामुळे महावितरणची एकूण ऋण स्थिती बिकट झाली. मार्च 2021 पर्यंत ही वीज बिलांची थकबाकी (₹ 44,680 कोटी) एकूण ऋणापेक्षा (₹ 42,910 कोटी)

6 सार्वजनिक जलप्रदाये, पथदिवे यांची थकबाकी आणि कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांना वगळून.

7 वीज कंपन्यांच्या हस्तांतरण योजनेला अंतिम रूप दिले (मार्च 2016) याचा परिणाम, 2005 ते 2016 या कालावधीसाठी पुनर्मूल्यांकन केलेल्या मालमत्तेवर घसारा द्यावा लागला.

अधिक होती. या थकबाकीचा काही भाग वसूल केला असता तर ऋणाचा काही भाग परत करता आला असता. त्यामुळे, महाराष्ट्र शासनाने मध्यम आणि अल्प मुदतीची कर्जे स्विकारल्यानंतरही महावितरणचे वित्तीय प्रत्यावर्तन साध्य होऊ शकले नाही.

महावितरणने मान्य केले की प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी त्यांना मध्यम मुदतीचे कर्ज तसेच दीर्घ मुदतीचे कर्ज घ्यावे लागले. शिवाय, वित्तीय वर्ष 2020-21 मध्ये, कोविड-19 महामारीमुळे महावितरणला बिल सवलत सुविधेचा अवलंब करावा लागला त्यामुळे कर्जे वाढली. शासनाने हे मान्य केले की, 2014-15 ते 2019-20 या कालावधीत थकबाकी न भरलेल्या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित न करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्यामुळे सुमारे ₹ 45,000 कोटींची थकबाकी जमा झाली होती, त्यामुळे महावितरणचा कॅश फ्लो बिघडला. महाराष्ट्र शासनाने मान्य केले की ठरविल्याप्रमाणे वित्तीय प्रत्यावर्तन साध्य करणे शक्य झाले नाही.

### 3.1.8 राज्य शासनाच्या विभागांची थकबाकी

सामंजस्य करारानुसार, महावितरणचे वित्तीय प्रत्यावर्तन सुलभ करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने राज्य शासनाच्या विभागांची वीज पुरवठ्याची संपूर्ण थकबाकी महावितरणला त्वरित देणे आवश्यक होते.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की ऑक्टोबर 2016 मध्ये झालेल्या अंतिम सामंजस्य करारानुसार, महावितरणला शासन विभागांची थकबाकी कोणत्या विशिष्ट तारखेपर्यंत भरावी याचा उल्लेख नव्हता. अशा प्रकारे, महावितरणची थकबाकी जलदगतीने भरून काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही दृढ वचनबद्धता नव्हती. परिणामी, 30 सप्टेंबर 2015 रोजी महाराष्ट्र शासनाच्या काही विभागांची[8] ₹ 2,828.25 कोटी असलेली थकबाकी वाढून मार्च 2021 पर्यंत ₹ 8,381 कोटी झाली. परिणामी, महावितरणला खेळते भांडवल कर्जाचा अवलंब करावा लागला जे ₹ 2,735 कोटी (मार्च 2021 पर्यंत) होते, ज्यामुळे त्याची आर्थिक स्थिती आणखी ढासळली.

महावितरणने उत्तर दिले की थकबाकी भरण्यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. महाराष्ट्र शासनाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना महावितरणची थकबाकी प्राधान्याने भरण्याचे निर्देश दिले (जून 2021). पुढे, महाराष्ट्र शासनाने असेही निर्देश दिले की पथदिवे आणि जल प्रदायशी संबंधित महावितरणची थकबाकी वेळेवर भरण्याच्या अटीवर स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान दिले जाईल. अशाप्रकारे, महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या पुढाकारामुळे सरकारी विभागांच्या थकबाकीमध्ये आणखी वाढ होणार नाही.

---

[8] सार्वजनिक जलप्रदाय आणि पथदिवे यांच्याशी संबंधित थकबाकी.

महाराष्ट्र शासनाने मान्य केले की राज्य शासनाची देयके मुख्यतः शहरी तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वजनिक जलप्रदाय आणि पथदिवे जोडणीची आहेत. पुढे असे म्हटले आहे की हे सर्व विभाग महाराष्ट्र शासनांतर्गत असले तरी देयकांसाठी प्राधिकारी वेगळे असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने सामंजस्य करारात विशिष्ट तारीख नमूद केलेली नाही.

महाराष्ट्र शासनाचे उत्तर मान्य नाही कारण दृढ वचनबध्द्तेनुसार, महावितरणचे वित्तीय प्रत्यावर्तन सुलभ करण्यासाठी शासकीय विभागांची थकबाकी त्वरीत चुकती करणे हे महाराष्ट्र शासनाचे दायित्व होते.

***शिफारस क्रमांक 1: संबंधित विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सार्वजनिक जलप्रदाय आणि पथदिव्यांची महावितरणची सर्व वीज देयके कालबद्ध पद्धतीने चुकती केली जातील याची महाराष्ट्र शासनाने खात्री करावी.***

### 3.1.9 महावितरणच्या 25 टक्के ऋणाला कर्ज किंवा बंधपत्रांमध्ये रूपांतरित करण्याची सुविधा

सामंजस्य करारानुसार महाराष्ट्र शासन हे महावितरणद्वारे बंधपत्रे किंवा इतर योग्य यंत्रणेमार्फत उभारण्यात येणाऱ्या ₹ 1,653 कोटी (मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जाच्या ₹ 6,613 कोटींच्या 25 टक्के शिल्लक असल्याने) निधीसाठी मुद्दल आणि व्याजाच्या परतफेडीची हमी देणार होते. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय जारी केला (डिसेंबर 2016) ज्यामध्ये महावितरणद्वारे उभारण्यात येणाऱ्या ₹ 1,653 कोटींच्या बंधपत्रांची हमी देण्याचे मान्य केले होते. महावितरणने हमी शुल्काच्या माफीसह शासन निर्णयानुसार हमी मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे संपर्क केला (मार्च 2017). तथापि, महाराष्ट्र शासनाने उत्तर दिले (ऑगस्ट 2018) की महावितरणने 30 सप्टेंबर 2015 रोजी शिल्लक असलेले कर्ज आधीच परत केले असल्यामुळे उर्वरित निधी उभारण्यासाठी महावितरणला हमी देणे महाराष्ट्र शासनाला शक्य नव्हते.

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की महाराष्ट्र शासनाने दोन वर्षांपर्यंतचा कालावधी असलेली केवळ मध्यम मुदतीची आणि अल्प मुदतीची कर्जे ताब्यात घेतली. सामंजस्य करारामध्ये (ऑक्टोबर 2016) 30 सप्टेंबर 2015 रोजी असलेल्या मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जांचा समावेश होता आणि ही रक्कम फेब्रुवारी 2017 मध्ये प्राप्त झाली, परंतु मध्यम मुदतीची आणि अल्प मुदतीची ही कर्जे आधीच मधल्या कालावधीत देय असल्यामुळे महावितरणद्वारे अदा केली गेली. त्यामुळे महावितरणला प्राप्त झालेली ₹ 4,960 कोटी रक्कम, ओव्हरड्राफ्ट (अंदाजे ₹ 3,500 कोटी) आणि अल्प मुदतीचे कर्ज (₹ 1,450 कोटी) द्वारे निर्माण झालेल्या खेळत्या भांडवलाच्या मागणीची परतफेड करण्यासाठी वापरले.

परिणामी, सामंजस्य करारामध्ये सहमती झाली असली तरीही उर्वरित 25 टक्के म्हणजेच ₹ 1,653 कोटींची बंधपत्रे उभारता येऊ शकली नाहीत. त्यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती आणखी कमकुवत झाली.

महावितरणने मान्य केले की महाराष्ट्र शासनाने महावितरणला ₹ 1,653 कोटी शिल्लक ऋणासाठी बंधपत्रे उभारण्यासाठी हमी देण्यास नकार दिल्यामुळे महावितरणने बाजार दरानुसार निधी उभारला. महाराष्ट्र शासनाने सांगितले की फेब्रुवारी 2017 मध्ये अनुदान वितरणाच्या वेळेपर्यंत महावितरणद्वारे मध्यम आणि अल्प मुदतीच्या कर्जाची परतफेड करण्यात आली होती.

महावितरणद्वारे थकित कर्जाची परतफेड करण्यात आल्याचे कारण देत महाराष्ट्र शासनाने हमी देण्यास दिलेला नकार (ऑगस्ट 2018) हा महाराष्ट्र शासनाने स्वत: निर्गमित केलेल्या (डिसेंबर 2016) शासन निर्णयाशी सुसंगत नव्हता कारण सामंजस्य करार करतांना मध्यम आणि अल्प मुदतीची कर्जे ऑगस्ट 2017 मध्येच परिपक्व होत आहेत हे माहित होते.

## कार्यचालनात्मक मापदंड

### 3.1.10 फीडर आणि वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंग

वितरण ट्रान्सफॉर्मरचे[9] मीटरिंग हे विद्युत वितरण प्रणाली आणि भार संतुलन सुधारण्यास मदत करते. होणाऱ्या नुकसानाचा मागोवा घेण्यासाठी आणि सुधारात्मक कारवाईसाठी ते रियल टाईम इनपुट आणि वापरलेल्या युनिटचा आउटपुट डेटा पुरवतात.

#### 3.1.10.1 वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंग

सामंजस्य करारानुसार महावितरणद्वारे 30 जून 2018 पर्यंत सर्व वितरण ट्रान्सफॉर्मरचे मीटरिंग करावयाचे होते आणि वितरण ट्रान्सफॉर्मरचे 100 टक्के मीटरिंग साध्य करायचे होते. वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंगची स्थिती खालील **तक्ता 3.1.3** मध्ये दर्शविली आहे.

[9] वितरण ट्रान्सफॉर्मर हे एक विद्युत उपकरण आहे जे पुरवठा व्होल्टेज कमी करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी वापरले जाते. हे 11 KV किंवा 33 KV चे प्राथमिक वितरण व्होल्टेज कमी करते.

**तक्ता 3.1.3: 31 मार्च 2021 रोजी वितरण ट्रान्सफॉर्मर मीटर केल्याची स्थिती**

| अनु. क्र. | तपशील | शहरी | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | आधार वर्षात (2015-16) मीटरिंग केलेल्या वितरण ट्रान्सफॉर्मर्सची संख्या | 77,875 | 46,119 | 1,23,994 |
| 2 | 2016-2021 या कालावधीत मीटरिंग करावयाचे वितरण ट्रान्सफॉर्मर्स **(अ)** | 1,85,448 | 2,01,589 | 3,87,037 |
| 3 | 2016-2021 या कालावधीत प्रत्यक्षात मीटरिंग केले गेलेले वितरण ट्रान्सफॉर्मर्स **(ब)** | 3,998 | 1,760 | 5,758 |
| **एकूण** | **टक्क्यामध्ये उपलब्धी (ब X 100/अ)** | **2.15** | **0.87** | **1.48** |

**(*स्त्रोत:- उदय डॅशबोर्ड नुसार महावितरणचा 2020-21 चा प्रगती अहवाल*)**

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की 30 जून 2018 पर्यंत 100 टक्के वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंगच्या लक्ष्याच्या तुलनेत लक्ष्यित तारखेपासून दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी उलटून देखील महावितरणला केवळ 1.48 टक्के लक्ष्य साध्य करता आले. तथापि, महावितरणने उदय डॅशबोर्डवर मार्च 2021 रोजी महाराष्ट्रातील वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंगची स्थिती चित्रित करताना शहरी आणि ग्रामीण भागासाठी अनुक्रमे 31 टक्के आणि 19.33 टक्के कामगिरी दर्शविली. लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की महावितरणने आधार वर्षापर्यंत आधीच मीटरींग केलेले वितरण ट्रान्सफॉर्मर चुकीने समाविष्ट केल्यामुळे हे झाले.

तसेच, लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की मीटरिंग केलेल्या वितरण ट्रान्सफॉर्मर्सचे सुद्धा मीटर रिडींग घेतले गेले नाही ज्यामुळे वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंगची संपूर्ण प्रक्रिया अपरिणामकारक ठरली.

| **छायाचित्र 3.1.1: उप विभाग, मुळशी घेरा, सिंहगड, महाराष्ट्र (07.09.2021-11.49 AM)** | **छायाचित्र 3.1.2: उप विभाग, मुळशी घेरा, सिंहगड, महाराष्ट्र (07.09.2021-11.36 AM)** |
|---|---|
|  |  |

| **छायाचित्र 3.1.3: उप विभाग, मुळशी घेरा, सिंहगड, महाराष्ट्र (07.09.2021-11.48 AM)** | **छायाचित्र 3.1.4: उप विभाग, मुळशी गिरीनगर, पुणे, महाराष्ट्र (07.09.2021-11.38 AM)** |
|---|---|
|  |  |

*(स्त्रोतः लेखापरीक्षण दलाने लेखापरीक्षणाच्या दरम्यान काढलेले छायाचित्र)*

पुणे (ग्रामीण) मंडळातील वरील काही छायाचित्रांवरून असे दिसून येते की वितरण ट्रान्सफॉर्मर्सचा योग्य प्रकारे रखरखाव करण्यात आला नव्हता. अनेक ठिकाणी वितरण ट्रान्सफॉर्मर्स पुरेशा सुरक्षित बंदिस्त जागेत नव्हते.

महावितरणने मान्य केले की मीटरींग केलेले वितरण ट्रान्सफॉर्मर्स बहुधा कम्युनिकेटिंग नव्हते. कृषी फीडर्सवर वितरण ट्रान्सफॉर्मर्स मीटर्स बसविण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता आणि रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम (RDSS) अंतर्गत कम्युनिकेशन मीटर्सचा वापर करून अकृषक वितरण ट्रान्सफॉर्मर मीटर्स लावण्याचा प्रस्ताव होता.

### 3.1.10.2 फीडर मीटरिंग

सामंजस्य करारानुसार महावितरणला 31 डिसेंबर 2016 पर्यंत 100 टक्के फीडर मीटरिंग[10] साध्य करायचे होते. लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की महावितरण विहित कालावधीत हे लक्ष्य साध्य करु शकले.

## 3.1.11 भौतिक फीडर पृथक्करण

फीडर वेगळे करणे म्हणजे कृषी (कृषक) आणि गैर-कृषी ग्राहकांना (अकृषक) समर्पित फीडरद्वारे वीज पुरवठा करणे, ज्यामुळे महावितरणला प्रभावी डिमांड साइड व्यवस्थापनाद्वारे कृषी ग्राहकांना वीज पुरवठयाचे नियमन करता येईल.

सामंजस्य करारानुसार महावितरणला मार्च 2018 पर्यंत 100 टक्के फीडर पृथक्करण पूर्ण करायचे होते. ग्रामीण विद्युतीकरणासाठी असलेल्या दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत महावितरणने भौतिक पृथक्करणासाठी 837 फीडर्स प्रस्तावित केले होते. त्यापैकी फक्त 636 फीडर्स स्थापित करण्यात आले (मार्च 2021 पर्यंत). पुढे, लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की महावितरणकडील 956 फीडर्स, मार्च 2021

10 फीडरमधून वीजेचे आउटपुट मोजण्यासाठी फीडरवर स्थापित केलेले मीटर.

मध्येही मिक्स फिडर्स (म्हणजेच 25 टक्क्यांपेक्षा जास्त कृषी भार) म्हणूनच कार्यरत होते. हे लक्षात घेणे योग्य आहे की, महावितरणने 100 टक्के फीडर पृथक्करण साध्य केले असल्याचे उदय डॅशबोर्डने मार्च 2021 मध्ये दर्शविले होते.

महावितरणने मान्य केले की मिश्र फीडर्सच्या पृथक्करणासाठी जरी तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता तरी निधीच्या कमतरतेमुळे त्यांचे पृथक्करण करणे बाकी आहे. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की उर्वरित फिडरचे पृथक्करण आता भारत सरकार द्वारे सुरू करण्यात आलेल्या रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम अंतर्गत प्रस्तावित आहे.

### 3.1.12 स्मार्ट मीटर्स स्थापित करणे

सामंजस्य करारानुसार महावितरणद्वारे सर्व ग्राहकांसाठी (कृषी ग्राहकांव्यतिरिक्त); 80,065 स्मार्ट मीटर्स; 500 युनिट्स/महिन्या पेक्षा जास्त वापर असलेल्या ग्राहकांसाठी 15,385 स्मार्ट मीटर्स 30 जून 2018 पर्यंत आणि 200 युनिट्स/महिन्या पेक्षा जास्त वापर असलेल्या ग्राहकांसाठी 64,680 स्मार्ट मीटर्स जून 2020 पर्यन्त स्थापित करावयाचे होते.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की सामंजस्य करारांतर्गत अभिप्रेत असलेल्या स्मार्ट मीटरच्या स्थापनेचे कार्य वरील ग्राहकांच्या संदर्भात साध्य झाले नाही कारण उदय योजनेंतर्गत महावितरणद्वारे कोणतेही स्मार्ट मीटर स्थापित करण्यात आले नाहीत.

महावितरणने सांगितले की रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम अंतर्गत अंदाजे 1.66 कोटी ग्राहकांसाठी (कृषी ग्राहक आणि विखुरलेल्या ग्राहकांव्यतिरिक्त) स्मार्ट मीटर्स स्थापित करण्याचा प्रस्ताव आहे.

### 3.1.13 डिमांड साईड व्यवस्थापनासाठी उपाययोजना

सामंजस्य करारानुसार महावितरणने डिमांड साईड व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी उपाययोजना म्हणून मार्च 2019 पर्यंत डोमेस्टिक एफिशियंट लायटिंग प्रोग्राम (DELP) अंतर्गत तीन कोटी ऊर्जा कार्यक्षम LED बल्ब देणे आणि त्याबरोबरच किमान 10 टक्के विद्यमान कृषी पंप्स बदलवून ऊर्जा कार्यक्षम पंप्स देणे अंतर्भूत होते.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की, महावितरणने डोमेस्टिक एफिशियंट लायटिंग प्रोग्राम अंतर्गत मार्च 2021 पर्यंत ग्राहकांना फक्त 2.20 कोटी LED बल्ब पुरविले.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की महावितरणने 40.16 लाख कृषी ग्राहकांपैकी किमान 4.02 लाख (एकूण पंपांच्या 10 टक्के) कृषी पंप बदलणे अभिप्रेत होते. तथापि, एप्रिल 2017 ते मार्च 2021 दरम्यान फक्त 2,209 पंप बदलण्यात आले.

### 3.1.14 ऊर्जा लेखापरीक्षण

ऊर्जा लेखापरीक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे, जे ऊर्जा पुरवठा आणि ऊर्जा बिल यांच्यात संतुलन ठेवते. गळती, अपव्यय आणि अकार्यक्षम ऊर्जेच्या वापराची क्षेत्रे ओळखण्याची ही पहिली पायरी आहे जेणेकरून हानी रोखण्यासाठी पावले ऊचलता येतात.

वितरण ट्रान्सफॉर्मर मीटर रिडींग घेतले नसल्यामुळे वितरण ट्रान्सफॉर्मर स्तर ऊर्जा लेखापरीक्षण अहवाल निर्मित करणे शक्य झाले नाही. त्यामुळे, महावितरणकडून फीडर स्तरावर ऊर्जा लेखापरीक्षण करण्यात आले. फीडर स्तर लेखापरीक्षण करताना विशिष्ट फीडर कडून विकलेल्या/बिल केलेल्या एकूण युनिट्सची तुलना फीडरमधील इनपुट युनिट्सशी केली गेली. यामुळे एक चुकीचे चित्र निर्माण झाले कारण विकलेल्या/ बिल केलेल्या एकूण युनिट्स मध्ये सरासरी वापराच्या आधारावर बिल केलेले ग्राहक, सुधारित/दुरुस्त बिजके, निरनिराळी बिलिंग चक्रे इत्यादिचा समावेश होता.

महावितरणने मान्य केले की वितरण ट्रान्सफॉर्मर मीटर रीडिंग मध्ये विविध समस्या होत्या आणि एंबेडेड मॉडेम्ससह मीटर बसविण्याचा प्रस्ताव दिला होता जेणेकरून मीटर रिडींग आपोआप उपलब्ध होईल आणि वितरण ट्रान्सफॉर्मर स्तरावर ऊर्जा लेखापरीक्षण करता येईल.

### 3.1.15 तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा कमी करणे

एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटयाची संकल्पना, वीज वितरण कंपनीच्या तोट्याच्या स्थितीचे वास्तववादी चित्र दर्शविते. हे तांत्रिक तोटा (11 KV आणि DT तोटा, LT लाईन तोटा, इत्यादि) आणि वाणिज्यिक तोटा (बिलींग मधील अकार्यक्षमता, चोरी, संकलनातील अकार्यक्षमता, इत्यादि) यांचे संयोजन आहे.

**3.1.15.1** ऑक्टोबर 2016 च्या सामंजस्य करारानुसार महावितरणला त्यांचा 2014-15 मधील 18.71 टक्के एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा हा 2018-19 मध्ये 14.39 टक्क्यांपर्यंत कमी करायचा होता. त्यानंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या मल्टी इयर टॅरीफ ऑर्डरमध्ये एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा पुन्हा स्थापित केला (नोव्हेंबर 2016) आणि सामंजस्य कराराचे परिशिष्ट दाखल केले (ऑक्टोबर 2017) आणि एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोट्याचे लक्ष्य आर्थिक वर्ष 2014-15 मधील 20.79 टक्क्यांवरून आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये 14.98 टक्के असे सुधारण्यात आले. वित्तीय वर्ष 2019-20 नंतरची उद्दिष्टे सामंजस्य करारामध्ये समाविष्ट केलेली नाहीत.

एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोट्याचे वर्ष-निहाय लक्ष्य आणि उपलब्धी **तक्ता 3.1.4** मध्ये दर्शविले आहे:

**तक्ता 3.1.4: एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक लक्ष्याची उपलब्धी**

| वर्ष | लक्ष्य | उपलब्धी |
|---|---|---|
| 2014-15 | 20.79 | 20.79 |
| 2015-16 | 21.51 | 21.51 |
| 2016-17 | 18.88 | 18.88 |
| 2017-18 | 17.51 | 17.41 |
| 2018-19 | 14.98 | 16.94 |
| 2019-20 | 14.98 | 21.32 |
| 2020-21 | 14.98 | 20.73 |

*(स्त्रोतः महावितरण आणि त्रिपक्षीय सामंजस्य कराराच्या परिशिष्टाद्वारे सादर केलेली माहिती)*

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की महावितरणने 2014-15 ते 2017-18 या वर्षांसाठी एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटयाचे उद्दिष्ट साध्य केले. असे निदर्शनास आले की ऑक्टोबर 2017 मध्ये परिशिष्ट दाखल करण्यात आल्यामुळे 2014-15 ते 2016-17 या वर्षांसाठीचे उद्दिष्ट वास्तविकतेच्या आधारावर सुधारित करण्यात आले. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की महावितरणने नंतर एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा इच्छित पातळीवर कमी करण्याचे उद्दीष्ट साध्य केले नाही. याउलट, मुख्यत: कृषी ग्राहक आणि राज्य शासनाच्या विविध विभागांकडून अत्यंत कमी संकलनामुळे महावितरणचा एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा 2018-19 मधील 16.94 टक्क्यांवरून 2020-21 मध्ये 20.73 टक्क्यांपर्यंत वाढला होता. 31 मार्च 2021 रोजी कृषी ग्राहकांकडे एकूण ₹ 44,680 कोटींपैकी ₹ 36,827 कोटी (म्हणजे एकूण प्राप्तीच्या 82.42 टक्के) प्रलंबित देय होते.

महावितरणने मान्य केले की त्यांच्या एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोट्यामध्ये वाढ झाली आणि कृषी ग्राहकांकडून खराब संकलन, औद्योगिक ग्राहकांद्वारे मागणी मध्ये घट, कोविड-19 मुळे मार्च 2020 पासून खराब संकलन कार्यक्षमता आणि सरकारी विभागांकडून उच्च देणी यांसारख्या विविध घटकांमुळे 14.98 टक्क्यांचे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

### 3.1.15.2 चोरीची प्रकरणे आणि त्यांचा पाठपुरावा याबाबत अपुरे संनियंत्रण

सामंजस्य करारानुसार वीज चोरी नियंत्रित करण्यासाठी महावितरणने मोहिम हाती घेऊन तोटा कमी करावयाचा होता. महावितरणमध्ये मंडळ कार्यालय स्तरावर फ्लाइंग स्वाड द्वारे आणि उपविभागीय कार्यालय स्तरावर उपविभागीय कार्यालय कर्मचाऱ्यांद्वारे मोहिम हाती घेऊन चोरीच्या घटनांवर नियंत्रण ठेवले जाते.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की सर्व नऊ मंडळांच्या उपविभागीय कार्यालयातील चोरी प्रकरण रजिस्टरमध्ये केवळ चोरी उघडकीस आलेल्या प्रकरणांची माहिती आहे. तथापि, भेट दिलेल्या/तपासणी केलेल्या एकूण प्रकरणांच्या संख्येच्या तुलनेत प्रत्यक्षात उघडकीस आलेल्या चोरीच्या प्रकरणांची संख्या याबाबतच्या नोंदी रजिस्टरमध्ये नमूद करण्यात आल्या नव्हत्या.

महावितरणने मान्य केले की सध्या चोरीच्या घटनांची देखरेख मॅन्युअली केली जाते. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की केंद्रीकृत देखरेखीसाठी माहिती तंत्रज्ञान मोड्यूल विकसित केले जात आहे, जे चोरीच्या प्रकरणांच्या प्रभावी निरीक्षणासाठी लवकरच लागू केले जाईल.

**शिफारस 2: महावितरणने वितरण ट्रान्सफॉर्मर मीटरिंग आणि फिडर पृथक्करण जलद गतीने पूर्ण केले पाहिजे आणि बिलिंग आणि संकलन क्षमता सुधारून तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा 15 टक्के किंवा त्यापेक्षा कमी केला पाहिजे.**

### 3.1.16 महावितरणच्या इतर वचनबद्धतेच्या तुलनेत उपलब्धी/उणीवा

**3.1.16.1 वित्तीय** वर्ष 2019 पर्यंत, 'सर्वांसाठी 24x7 वीज' दस्तावेजानुसार महावितरणने न जोडलेल्या कुटुंबांना वीज प्रदान करणे आवश्यक होते. लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की उदय अंतर्गत महावितरणला 2017-18 पर्यंत 14.80 लाख ग्रामीण कुटुंबे जोडायची होती. महावितरणला 2018-19 मध्ये महाराष्ट्रातील जोडली नसलेली सर्व घरे जोडण्याचे 100 टक्के लक्ष्य गाठण्यात यश आले.

**3.1.16.2** महावितरणला आर्थिक वर्ष 2018-19 पर्यंत पुरवठयाचा सरासरी खर्च[11] आणि सरासरी महसूल प्राप्ती[12] मधील अंतर दूर करायचे होते. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, महावितरणला 2017-18 पासून पुढे 2019-20 पर्यंत पुरवठयाचा सरासरी खर्च आणि सरासरी महसूल प्राप्ती यामधील अंतर दूर करणे शक्य झाले. तथापि, 2020-21 दरम्यान ₹ 0.04 प्रति युनिट्स अंतर होते जे खालील **तक्ता 3.1.5** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.1.5: पुरवठयाचा सरासरी खर्च आणि सरासरी महसूल प्राप्ती मधील अंतर**

| वर्ष | पुरवठयाचा सरासरी खर्च आणि सरासरी महसूल प्राप्ती मधील अंतर (प्रति घटक ₹ मध्ये) | |
|---|---|---|
| | लक्ष्य | वास्तविक |
| 2015-16 | सेट केले नाही | -0.30 |
| 2016-17 | 0.30 | 0.28 |
| 2017-18 | 0.01 | -0.07 |
| 2018-19 | -0.39 | -0.04 |
| 2019-20 | - | -0.06 |
| 2020-21 | - | 0.04 |

*(स्त्रोतः महावितरणाद्वारे सादर माहिती/डेटा)*

11 पुरवठ्याचा सरासरी खर्च हा वीज पुरवठ्याशी संबंधित सर्व खर्च जसे की विविध जनरेटर्सकडून वीज खरेदीची किंमत, वितरण जाळे चालविण्याचा आणि देखरेखीचा खर्च, कर्मचारी खर्च, घसारा आणि वित्त खर्च यांची बेरीज भागिले ग्राहकांना एकूण विक्री.

12 सरासरी महसूल प्राप्ती म्हणजे वीज पुरवठ्यासाठी ग्राहकांकडून विनिर्दिष्ट दरानुसार शुल्क आकारून केलेली कमाई आणि राज्य शासनाकडून मिळालेल्या सबसिडीची एकूण बेरीज भागिले ग्राहकांना एकूण विक्री.

**3.1.16.3** महावितरणला एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा कमी करणे आणि मीटर/बिलिंग संकलन कार्यक्षमतेत सुधारणा करणे यासाठी एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक क्षेत्रावरील प्रत्येक प्रभारी अधिकाऱ्यांकरिता प्रमुख कामगिरी निर्देशक तयार करावे लागतात. लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की महावितरणने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रमुख कामगिरी निर्देशक निर्धारित केले नाहीत. 2017-18 आणि 2018-19 या वर्षांसाठी महावितरणच्या विभाग कार्यालयांसाठी एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोट्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते आणि वास्तविक कामगिरीवर आधारित कोणतेही प्रोत्साहन/दंड नव्हते. 2018-19 मध्ये केवळ 50 विभाग (148 विभागांपैकी) निर्धारित लक्ष्य साध्य करू शकले. तथापि, ही संख्या 2019-20 आणि 2020-21 साठी अनुक्रमे फक्त 14 आणि 32 विभाग इतकी घसरली. परिणामी, महावितरण त्यांचा एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा 14.98 टक्क्यांच्या लक्ष्यापर्यंत खाली आणू शकले नाही.

महावितरणने सांगितले की, एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक तोटा कमी करावयाचे लक्ष्य दरवर्षी दिले जाते, ज्याचे नियंत्रण अधिकाऱ्यांद्वारे वेळोवेळी निरीक्षण आणि पुनरावलोकन केले गेले. प्रमुख कामगिरी निर्देशक मापदंडांमध्ये बिलिंग आणि संकलन कार्यक्षमता समाविष्ट होती आणि या प्रमुख कामगिरी निर्देशक मापदंडांच्या आधारावर कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची श्रेणी ठरविली गेली.

महावितरणचे हे उत्तर मान्य नाही कारण सामंजस्य करारांतर्गत केवळ विभागीय कार्यालयासाठी लक्ष्य निश्चित करण्यात आले होते आणि प्रत्येक अधिकाऱ्यासाठी नव्हते.

**3.1.16.4** तक्रारींचे वेळेवर निराकरण करण्यासाठी महावितरणला केंद्रीकृत ग्राहक कॉल सेंटर स्थापन करावे लागले आणि बिल इत्यादींचा भरणा करण्यासाठी ग्राहकांना ई-भुगतानची सोय करून देण्यात आली. महावितरणद्वारे केंद्रीकृत ग्राहक कॉल सेंटर स्थापित करण्यात आले. केंद्रीकृत ग्राहक कॉल सेंटरचा 2020-21 चा तपशील **तक्ता 3.1.6** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 3.1.6: केंद्रीकृत ग्राहक कॉल सेंटरमधील तक्रारींची स्थिती**

| अनु. क्र. | तक्रारीचा प्रकार | प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या | विहित कालावधीत निराकरण केलेल्या तक्रारींची संख्या | ज्या कालावधीत तक्रारींचे निराकरण करावयाचे होते | विहित वेळेत निकाली निघालेल्या तक्रारींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वीज पुरवठा खंडित | 19,42,994 | 6,07,376 | 0 तास ते 48 तास | 31.26 |
| 2 | बिलिंग | 16,22,542 | 13,59,527 | 1 ते 30 दिवस | 83.79 |
| 3 | इतर तक्रारी | 2,25,969 | 1,17,906 | 0 तास ते 30 दिवस | 52.18 |

(*स्त्रोत: महावितरणने सादर केलेली माहिती*)

असे निदर्शनास आले की, महावितरणने त्यांच्या बिलिंगशी संबंधित तक्रारींपैकी 83.79 टक्के तक्रारींचे निराकरण त्यांच्या मानक कार्यचालन पद्धतीमध्ये नमूद केलेल्या वेळेत केले असले तरी ते वीज पुरवठा खंडित झालेल्या तक्रारींचे निराकरण फक्त 31.26 टक्केच करू शकले.

महावितरणने नमूद केले की, खंडित वीज पुरवठा साधारणपणे मानक कार्यचालन पद्धती कालावधीत पूर्ववत केला जातो. तथापि, कर्मचारी काही वेळा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात व्यस्त असतात, त्यामुळे वास्तविक तक्रारींचे निराकरण करण्यात विलंब होतो. तसेच, 2020-21 मध्ये विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात निसर्ग चक्रीवादळ, पूर यासारख्या नैसर्गिक आपत्ती दरम्यान भरपूर प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि विद्‌युत पुरवठा पूर्ववत करण्यासाठी मानक कार्यचालन पद्धतीपेक्षा जास्त कालावधी लागला.

# परिवहन विभाग

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## पाठपुरावा लेखापरीक्षण

### 3.2 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ई-तिकिटींग प्रणालीचे संगणकीकरण' यावरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाचे पाठपुरावा लेखापरीक्षण

**'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील संगणकीकरण ई-तिकीटिंग प्रणाली' वरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाच्या पाठपुरावा लेखापरीक्षणातून असे दिसून आले आहे की सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींचे दोन महिन्यांच्या विहित कालावधीत पूर्णपणे अनुपालन केले गेले नाही. लेखापरीक्षणात हे देखील उघड झाले की तिकीटांवरील जाहिरातीचा करार निश्चित करण्यात विलंब झाल्यामुळे संभाव्य महसूल तोटा आणि इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन[13] (ETIM) द्वारे विविध सवलतींशी संबंधित समस्यांचे निराकरण केले गेले नाही. इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी पूर्ण आणि विश्वासार्ह डेटा ठेवण्यासाठी पुरेशी इनपुट नियंत्रणे आणि प्रमाणीकरण तपासण्या नाहीत.**

#### 3.2.1 प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात किफायतशीर, कार्यक्षम, पर्याप्त आणि योग्यरित्या समन्वयित मार्ग परिवहन व्यवस्था प्रदान करण्यासाठी जुलै 1961 मध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, 1950 च्या कलम 3 अंतर्गत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (महामंडळ) स्थापना करण्यात आली.

मार्च 2021 च्या अखेरीस राज्यात महामंडळाची 30 विभागीय कार्यालये आणि 251 डेपो होते. महामंडळाच्या माहिती तंत्रज्ञानाच्या (आयटी) गरजा मुंबईतील इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग (EDP) केंद्राद्वारे उप महाव्यवस्थापकांच्या नेतृत्वाखाली पाहिल्या जात होत्या, ज्यांना वरिष्ठ व्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) आणि व्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) हे मदत करीत होते.

मे 2009 ते ऑक्टोबर 2014 या कालावधीसाठी 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील ई-तिकिटींग प्रणालीचे संगणकीकरण' यावरील कार्यनिष्पादन लेखापरीक्षा

[13] इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन याद्वारे वाहकाने बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांना जारी केलेल्या सर्व तिकीटांचा तपशील संकलित करण्यासाठी प्रणाली (ॲप्लिकेशन) विकसित केली आहे.

अहवाल हा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या 31 मार्च 2014 रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट करण्यात आला होता. कार्यनिष्पादन लेखापरीक्षणाने ई-तिकिटिंग प्रणाली आणि महामंडळाच्या नियंत्रणाखालील विविध प्राधिकरणांच्या कामकाजातील कमतरता अधोरेखित केल्या. वर्ष 2017-18 दरम्यान सार्वजनिक उपक्रम समितीद्वारे लेखापरीक्षा अहवालावर चर्चा करण्यात आली. डिसेंबर 2017 मध्ये सार्वजनिक उपक्रम समितीने राज्य विधानसभेत मांडलेल्या 2017-18 च्या पंधराव्या अहवालात सहा मुद्दयांवर शिफारशी केल्या होत्या.

आम्ही सप्टेंबर 2021 आणि ऑक्टोबर 2021 दरम्यान केवळ ई-तिकिटींगच्या संदर्भात सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या व्याप्तीचे मूल्यांकन करण्यासाठी पाठपुरावा लेखापरीक्षण आयोजित केले. पाठपुरावा लेखापरीक्षणात उप-महाव्यवस्थापक (EDP) यांचे कार्यालय, 106 डेपोज आणि नागपूर विभागीय व्यवस्थापक आणि नागपूर ग्रामीण-2 डेपो यांचा समावेश केला होता. जानेवारी 2016 ते मार्च 2021 या कालावधीतील अभिलेखे आणि डेटाबेसेसची पूर्वीच्या लेखापरीक्षा अहवालात दिसून आलेल्या निरीक्षणाच्या आणि त्यावर सार्वजनिक उपक्रम समितीने दिलेल्या शिफारशींच्या व्याप्तीनुसार या कार्यालयांमध्ये चाचणी तपासणी करण्यात आली.

अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन आणि बंदरे), महाराष्ट्र शासन यांच्या समवेत 18 जानेवारी 2022 रोजी लेखापरीक्षणोत्तर बैठक आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये लेखापरीक्षा मुद्दयांवर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र शासनाद्वारे सादर करण्यात आलेले उत्तर (फेब्रुवारी 2022) अहवालात योग्यरित्या अंतर्भूत करण्यात आले आहे.

## 3.2.2 ई-तिकिटींग प्रणाली

ऑनलाइन/वेब-आधारित आरक्षण प्रणाली सुलभ करण्यासाठी आणि दैनंदिन व्यवहारामध्ये सॉफ्टवेअर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी महामंडळाद्वारे इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनचा पुरवठा, संगणकीकरण, अंमलबजावणी आणि देखरेख आणि वेब सुविधा असलेल्या ऑनलाइन आरक्षण प्रणाली[14] प्रकल्पांसाठी इच्छुक पार्टीकडून बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या आधारावर प्रस्तावासाठी विनंती मागविण्यात आली (जून 2008 आणि सप्टेंबर 2014).

[14] ऑनलाइन तिकीट आरक्षित करणाऱ्या प्रवाशांचे नाव, वय, लिंग, पत्ता, सवलत, मोबाईल/फोन नंबर इत्यादि संकलित करण्यासाठी प्रणाली (ॲप्लिकेशन) विकसित केली आहे.

**लेखापरीक्षा निष्कर्ष**

### 3.2.3 जाहिरातीचे अधिकार विकून महसूल निर्माण करण्यात अपयश

कार्यनिष्पादन लेखापरीक्षण अहवालात (2014) असे निदर्शनास आणून दिले होते की मुख्य सेवा करार अटींनुसार ट्रायमॅक्स[15] ने तिकीट रोलचा विनामूल्य पुरवठा करणे आवश्यक होते आणि अतिरिक्त महसुलाची पूर्तता करण्यासाठी महामंडळाने तिकीट रोलच्या मागील बाजूस जाहिरातीचे अधिकार राखून ठेवले होते. ट्रायमॅक्सने जाहिरातीच्या हक्कासाठी प्रति तिकिट एक पैसा देऊ केला होता (ऑगस्ट 2011) परंतु स्वतंत्रपणे व्यवहार केला जाईल या कारणास्तव ऑफरचा विचार केला गेला नाही (नोव्हेंबर 2011). तथापि, डिसेंबर 2014 पर्यंत असे कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत आणि त्यामुळे सप्टेंबर 2011 आणि ऑक्टोबर 2014 दरम्यान प्रत्यक्षात दिल्या गेलेल्या 417.15 कोटी तिकिटांचा विचार करता महामंडळाने गमावलेला संभाव्य महसूल ₹ 4.17 कोटी परिगणित करण्यात आला.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.7.1 वरील 1.5)**

महामंडळ तोट्यात होते आणि महसूल निर्माण करण्याची संधी होती परंतु त्यांनी तीन वर्षांपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. महामंडळाने तत्परतेने कारवाई केली असती तर त्यातून निर्माण झालेल्या महसुलाचा फायदा झाला असता आणि या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी, अशी शिफारस करण्यात आली होती. केलेल्या कारवाईचा अहवाल दोन महिन्यात, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता.

**महामंडळाने केलेली कारवाई**

तिकीटांच्या मागील बाजूस जाहिरात छापण्यास विलंब झाल्याने महसुलीच्या नुकसानीसाठी, सार्वजनिक उपक्रम समितीची शिफारस असूनही कोणताही अधिकारी जबाबदार नाही या कारणास्तव अधिकाऱ्यांची कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की केलेल्या कारवाईचा अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीला दोन महिन्यात, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता, तो सार्वजनिक उपक्रम समितीला डिसेंबर 2020 मध्ये सादर करण्यात आला. नोव्हेंबर 2014 आणि जून 2018 या कालावधी दरम्यान झालेल्या

---

[15] इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणाली प्रदान करणे, संगणकीकरण करणे, कार्यान्वित करणे आणि देखभाल करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे नियुक्त केलेले अभिकरण.

395.48 कोटी तिकीटांच्या विक्रीचा विचार केला असता, महामंडळाला झालेला संभाव्य महसूल तोटा ₹ 3.95 कोटी परिगणित केला गेला. तसेच, महामंडळ ट्रायमॅक्ससोबत केलेल्या पुढील करारात (2015) पेपर रोल पुरवठ्यासंबंधी योग्य कलम समाविष्ट करण्यात अपयशी ठरले.

महामंडळाने म्हटले (जानेवारी 2022) की तिकिटांच्या मागील बाजूस छापल्या जाणाऱ्या जाहिरातींसाठी ऑगस्ट 2018 पर्यंत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही आणि त्यानंतर प्रति रोल एक रुपयाची ऑफर स्वीकारण्यात आली.

शासनाने म्हटले (फेब्रुवारी 2022) की महामंडळाला जाहिरातींचा महसूल वेळेवर जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### 3.2.4 प्रणाली संकल्पचित्र

ॲप्लिकेशन कंट्रोल्स ही डेटाची पूर्णता राखण्यासाठी ज्या प्रभावांद्वारे विकसित केलेली इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणाली नियंत्रित केली जाते त्या प्रभावांना संतुलित करण्याची पद्धती आहे. ॲप्लिकेशन कंट्रोल्समध्ये इनपुट कंट्रोल, प्रोसेसिंग कंट्रोल आणि आउटपुट कंट्रोल्स यांचा समावेश असतो आणि यापैकी कोणत्याही कंट्रोल्सच्या अनुपस्थितीमुळे किंवा अपर्याप्ततेमुळे डेटाबेसच्या अखंडतेवर आणि विश्वासार्हतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.8.5 वरील 2.5)**

इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीनला श्रेणीवर्धनाची आवश्यकता होती परंतु लेखापरीक्षणाने निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे महामंडळाने जुनी प्रणाली चालू ठेवल्यामुळे नुकसान झाले. या प्रकरणाची चौकशी करून यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे आणि केलेल्या कारवाईचा तपशील दोन महिन्यांच्या आत, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत समितीकडे सादर करणे आवश्यक होते.

### महामंडळाने केलेली कारवाई

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की कारवाईचा अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीला दोन महिन्यात, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता, तो सार्वजनिक उपक्रम समितीला डिसेंबर 2020 मध्ये सादर करण्यात आला. या अहवालानुसार इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन प्रणालीच्या तरतुदींनुसार वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल समाविष्ट करण्यात आले होते. तथापि, जानेवारी 2016 ते मार्च 2021 दरम्यान ग्रामीण क्षेत्रातील 12,272 पैकी 9,761

इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणारे मशीन जुन्या आवृत्तीमध्ये कार्यरत होते असे निदर्शनास आले.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींना प्रभाव देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीनचे टप्प्याटप्प्याने परंतु अंशत:च श्रेणीवर्धन केले गेले. विविध सवलतींशी संबंधित समस्यांचे निराकरण केले गेले नाही. सात अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू केली.

**3.2.4.1** ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटा बेसमध्ये अर्जुन पुरस्कर्ते, दृष्टिदोष असलेले, द्रोणाचार्य पुरस्कर्ते आणि इतर पुरस्कर्ते, स्वातंत्र्य सैनिक, शारीरिक दृष्टया अपंग, क्षय रोग/कर्करोग/कुष्ठरोग यांसारख्या आजारांनी ग्रस्त रोगी, ज्येष्ठ नागरिक इत्यादिंसारख्या विविध श्रेणीतील प्रवाशांना महामंडळ मर्यादित घटकां[16] सह किंवा मर्यादित घटकांशिवाय प्रवास भाड्यात सवलत देत होते. अशा अनुमती दिलेल्या सवलतींच्या रकमेवर महामंडळाद्वारे ठराविक काळात राज्य शासनाकडे दावा केला जात होता.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.10.5 वरील 3.5)**

महामंडळाने आरक्षणाच्या वेळी प्रवाशांना सर्व संबंधित माहिती भरायला लावावी आणि चुकीच्या पद्धतीने सवलतीचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांकडून वास्तविक तिकिट दराच्या दुप्पट दर आकारण्यात यावेत आणि केलेल्या कारवाईचा अहवाल दोन महिन्यांत, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता.

**महामंडळाने केलेली कारवाई**

महामंडळाच्या कारवाई केलेल्या अहवालानुसार चुकीची ओळख पत्रे/तपशील देऊन तिकीट बुक करणाऱ्या प्रवाशांकडून सार्वजनिक उपक्रम समितीने शिफारस केल्यानुसार (डिसेंबर 2017) वास्तविक तिकिट दराच्या दुप्पट दराने नाही, तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नियम आणि विनियमानुसार दंड आकारला जाईल. तथापि, या प्रणालीमध्ये बदल प्रस्तावित करण्यात आले होते जेणेकरून सवलतीच्या भाड्याचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांसाठी रिक्त आरक्षित कोट्यातील तिकिटे उपलब्ध होतील.

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की कारवाई केल्याचा अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीला दोन महिन्यात, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर

[16] सवलतधारक किती वेळा प्रवास करू शकतो आणि/किंवा परवानगी दिलेल्या एकूण किलोमीटर्सच्या प्रवासावर आणि/किंवा एकूण सवलतीची रकम यावर मर्यादित घटक ठेवले जातात.

करावयाचा होता परंतु तो सार्वजनिक उपक्रम समितीला डिसेंबर 2020 मध्ये सादर करण्यात आला.

लेखापरीक्षेच्या असेही निदर्शनास आले (सप्टेंबर-ऑक्टोबर 2021) की अधिकृत बुकींग अभिकर्त्यांनी 1,91,16,593 प्रकरणांपैकी 9,199 प्रकरणांमध्ये ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमध्ये संकलित करण्यासाठी असलेल्या रकान्यामध्ये सवलतीच्या दरासाठी पात्र प्रवाशांचे ओळख पुरावे तपशील प्रविष्ट केले नाहीत. तसेच, लेखापरीक्षणात समाविष्ट असलेल्या कालावधीत असे सुद्धा निदर्शनास आले की 'सवलत पुरावा' असा आणखी एक रकाना निर्माण करण्यात आला होता; परंतु 339 प्रकरणांमध्ये तो रकाना 'रिक्त' होता आणि 95 प्रकरणांमध्ये रकान्यामध्ये 'काहीही नाही' असे दर्शविले होते.

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की सवलत पुरावा, प्रवाशाचे नाव आणि ओळख पुरावा या संबंधीचा डेटा संकलित न केल्यामुळे त्याची अचूकता लेखापरीक्षणात निश्चित करता आली नाही.

महामंडळाने नमूद केले (जानेवारी 2022) की प्रकल्प सुरू करण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात अधिकृत बुकींग अभिकर्त्यांनी ओळख पत्र पुरावे तपशील भरले नाही. ऑनलाइन आरक्षण प्रणाली अंतर्गत गट बुकिंगच्या बाबतीत किमान एका प्रवाशाचे नाव अनिवार्य होते आणि लेखापरीक्षणाद्वारे निदर्शनास आणून दिलेली विसंगती ऑक्टोबर 2016 मध्ये सुधारण्यात आली.

आमच्या डेटा विश्लेषणामध्ये उघड झाले की 14,513 प्रकरणांपैकी 9,473 प्रकरणांमध्ये जरी एका प्रवाशाला तिकिट जारी केले असले तरीही प्रवाशाचे नाव हा रकाना रिक्त होता आणि ही सर्व प्रकरणे ऑक्टोबर 2016 नंतरच्या कालावधीशी संबधित आहेत.

या मुद्दयावर शासनाने कोणतेही उत्तर सादर केले नाही.

### 3.2.5 व्यवस्थापन माहिती प्रणाली

कार्यनिष्पादन लेखापरीक्षण अहवालात (2014) हे निदर्शनास आणून दिले होते की अहवाल, डॅशबोर्ड इत्यादी प्रदान करणारी सर्वसमावेशक व्यवस्थापन माहिती प्रणाली स्थापित करण्यासाठी मुख्य सेवा करार करण्यात आला होता. व्यवस्थापन माहिती प्रणाली ही कर्मचारी, महामंडळाचे अधिकारी आणि महामंडळाद्वारे अधिकृत केलेल्या कोणत्याही घटकासाठी ग्राफीकल डिसप्लेद्वारे वापरकर्ता अनुकूल अहवाल, दिवसाअखेर माहितीवर प्रक्रिया करण्याची क्रिया आणि व्यवस्थापन माहिती प्रणाली अहवाल स्वरूपात निर्माण करणे, एका विशिष्ट कालावधीसाठी सर्व कार्यचालनात्मक व्यवस्थापन माहिती प्रणाली आणि महसूल अहवाल, केंद्र-निहाय, सेवा-निहाय, कार्यचालन-निहाय, डेपो-निहाय, अभिकर्ता-निहाय बुकींग इत्यादि प्रदान करते.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.11 वरील 4.5)**

महामंडळाकडे चांगल्या दर्जाची व्यवस्थापन माहिती प्रणाली असणे आवश्यक आहे आणि त्यासाठी माहिती तंत्रज्ञान आणि सांख्यिकी तज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकतात आणि केलेल्या कारवाईचा अहवाल दोन महिन्याच्या आत, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर केला जाऊ शकतो.

**महामंडळाद्वारे केलेली कारवाई**

महामंडळाने केलेल्या कारवाईच्या अहवालानुसार विविध प्रवासी मार्गांवर धावणाऱ्या बसेसच्या उत्पन्नाशी संबंधित सर्व माहिती, प्रवासी संख्या इत्यादी, महामंडळाला इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीद्वारे प्राप्त होते ज्याचा उपयोग नफा/तोटा विश्लेषणासाठी आणि निर्णय घेण्यासाठी केला जातो. तसेच, व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन माहिती प्रणाली अंतर्गत डॅशबोर्ड तयार करण्यात आला. तथापि, अपूर्ण डेटा संकलित केल्यामुळे आणि अपूर्ण तक्त्यांमुळे तयार झालेले व्यवस्थापन माहिती प्रणाली अहवाल विश्वसनीय नाहीत.

महामंडळाने (डिसेंबर 2020) माहिती तंत्रज्ञान व सांख्यिकी तज्ञ यांचेकडून मार्गदर्शन घेतले याबद्दल कुठलेही विधान केले नाही.

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की केलेल्या कारवाईचा अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीला दोन महिन्यांच्या आत, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता परंतु तो सार्वजनिक उपक्रम समितीला डिसेंबर 2020 मध्ये सादर करण्यात आला.

### 3.2.6 प्रणाली लेखापरीक्षण

मास्टर सेवा करार प्रदान करते की प्रभावी तारखेनंतर वाजवी रितीने व्यवहार्य होईल तितक्या लवकर प्रकल्प अंमलबजावणी टप्प्यात आणि कार्यचालन आणि व्यवस्थापनाच्या टप्प्यात नियमित लेखापरीक्षणाच्या वेळापत्रकाशी सहमत होण्यासाठी पार्टीनी सर्वोत्तम प्रयत्न करायला हवा. तसेच, प्रस्तावासाठी विनंतीमध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकल्प प्रक्रियेसाठी महामंडळाने चाचणी योजनेचा आढावा घेणे या अटीच्या अधीन राहून आवश्यक होते की प्रणाली समाकलकने खात्री करावी की त्याद्वारे वितरित अंतिम उत्पादन कार्यात्मक आणि तांत्रिक आवश्यकतांसह सर्व आवश्यकता पूर्ण करते.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.13 वरील 5.5)**

मेसर्स ट्रायमॅक्सला प्रदान केलेल्या ₹ 125 कोटींचे लेखापरीक्षण महामंडळाने निर्धारित कालमर्यादेत करणे आवश्यक आहे, जेणेकरून अनावश्यक खर्च टाळता येईल आणि त्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल आणि केलेली कारवाई दोन महिन्यांच्या आत म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत समितीकडे सादर केली जाईल.

**महामंडळाने केलेली कारवाई**

महामंडळाने प्रणाली लेखापरीक्षण आणि चाचण्यांसाठी मानकीकरण चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन, भारत सरकारच्या संचालनालयाची नियुक्ती केली होती. त्यानंतर मेसर्स अर्नेस्ट आणि यंग एल एल पी यांची प्रणाली कार्यनिष्पादन लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केली आणि त्यांच्याकडून मासिक आधारावर अहवाल सादर करण्यात येत होता. अर्नेस्ट आणि यंगची भूमिका ट्रायमॅक्सला केलेले भुगतान तपासण्यावर केन्द्रित आहे.

सार्वजनिक उपक्रमावरील समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी महामंडळाने जबाबदारी निश्चित केली होती आणि उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांद्वारे एका अधिकाऱ्याला बडतर्फ करण्यात आले होते (डिसेंबर 2012).

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की मास्टर सेवा करारानुसार आणि विनंती प्रस्तावानुसार प्रणाली कार्यनिष्पादन चाचण्या घेण्यात आल्या आहेत. सुरूवातीला वापरकर्ता स्वीकृती चाचणी देखील घेण्यात आली.

### 3.2.7 व्यवसाय सातत्य योजना

ट्रायमॅक्स सोबत सध्याच्या करारानुसार 14 जून 2022 पर्यंत वेब सुविधेसह इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची अंमलबजावणी आणि देखभाल करणे आवश्यक होते. त्यामध्ये महामंडळाद्वारे विनिर्दिष्ट केले जाईल तेव्हा महामंडळाच्या विविध कर्मचारी सदस्यांना जसे की वाहक, लेखा अधिकारी, बस डेपो/स्थानके/विभागीय/प्रादेशिक/केंद्रीय कार्यालयातील इतर, इत्यादिंना संबंधित नवीन प्रणाली संदर्भात आवश्यक प्रशिक्षण, सामग्री आणि प्रशिक्षण प्रशिक्षक इत्यादी देणे देखील समाविष्ट होते. प्रणाली समाकलक संपूर्ण प्रकल्प संकल्पनेपासून ते कार्यचालन आणि देखभालीपर्यंतचे व्यवस्थापन करेल तसेच त्यानंतरच्या पायाभूत सुविधा/ कार्यक्रम आणि हॅंडहोल्डिंग आणि प्रणाली समाकलकने खरेदी केलेल्या हार्डवेअर आणि प्रणाली सॉफ्टवेअरसह सर्व मालमत्ता महामंडळाकडे हस्तांतरित करायला पाहिजे. कराराच्या

अवधी दरम्यान प्रत्येक वेळेस निर्गमन व्यवस्थापन कालावधीसहित समाविष्ट सेवेचे सातत्य सुनिश्चित करण्यासाठी प्रणाली समाकलक जबाबदार होता.

**सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी (कार्यनिष्पादन लेखापरीक्षेच्या परिच्छेद 3.15 वरील 6.5)**

महामंडळ मेसर्स ट्रायमॅक्सवर व्यवसायाच्या सातत्यासाठी पूर्णपणे अवलंबून होते आणि भविष्यात समस्या उद्भवल्यास आपत्ती व्यवस्थापनाचाही विचार करावयास हवा होता. या समस्येचे निराकरण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ञांचा समावेश असलेली समिती नियुक्त करून दोन महिन्यांच्या आत म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत अहवाल सादर करण्याची शिफारस देखील करण्यात आली.

**महामंडळाने केलेली कारवाई**

कारवाई अहवालानुसार महामंडळाने मेसर्स अर्नेस्ट आणि यंग यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त केले होते, जे प्रकल्प नियंत्रणाचे काम पाहतात. भविष्यात प्रकल्प संचालनातील अडथळे टाळण्यासाठी आणि आपत्ती व्यवस्थापनासह मेसर्स ट्रायमॅक्स वरील अवलंबन कमी करण्यासाठी, सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींनुसार त्वरित निराकरणासाठी मेसर्स अर्नेस्ट आणि यंग यांच्याकडून एक प्रस्ताव मागविण्यात येईल.

महामंडळाने एक समिती देखील नियुक्त केली होती, ज्यामध्ये माहिती तंत्रज्ञान आणि परिवहन विभागांचे प्रतिनिधी सदस्य आहेत. समितीने मेसर्स के पी एम जीला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त केले होते, जे प्रकल्पाच्या सुरळीत क्रियाकलाप, आपत्ती व्यवस्थापनासह प्रकल्प अवलंबित्व कमी करण्यासाठी सल्ला देतील.

पाठपुरावा लेखापरीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की केलेल्या कारवाईचा अहवाल सार्वजनिक उपक्रम समितीला दोन महिन्यांच्या आत, म्हणजेच फेब्रुवारी 2018 पर्यंत सादर करावयाचा होता परंतु तो सार्वजनिक उपक्रम समितीला डिसेंबर 2020 मध्ये सादर करण्यात आला.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की मॉक ड्रील्स दोन प्रसंगी आयोजित करण्यात आल्या होत्या आणि आपत्तीच्या वेळी प्रणालीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लावलेली उपकरणे आणि केबल सुस्थितीत राहण्यासाठी प्रणाली समाकलक जबाबदार होते.

असे निदर्शनास आले (नोव्हेंबर 2021) की प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तैनात केलेली प्रणाली/उपकरणे/केबल आणि पेरीफेरल्स सुस्थितीत आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणतीही आपत्ती उद्भवल्यास यंत्रणा पुनर्संचयित करण्यासाठी प्रणाली

समाकलकद्वारे वेळोवेळी मॉक ड्रील्स आयोजित न करता फक्त एक मॉक ड्रील आयोजित केली गेली (जानेवारी 2019). त्यामुळे महामंडळाने व्यवसाय सातत्य/संकट व्यवस्थापनासाठी प्रणाली स्थापित केलेली नाही. सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी असतांनाही व्यवसाय सातत्य/आपत्ति व्यवस्थापनासाठी ते ट्रायमॅक्सवर अवलंबून राहिले. तसेच आपत्कालीन परिस्थितीत किंवा ऑनलाइन प्रणाली अयशस्वी झाल्यास प्रणालीची बॅकअप योजना सुस्थितीत राहण्यासाठी प्रणालीची वेळोवेळी चाचणी करणे आवश्यक आहे आणि प्रणाली सुरळीतपणे चालण्यासाठी प्रणाली समाकलक जबाबदार असले तरी बॅकअप योजनेचे कार्य आणि चाचणी सुनिश्चित करण्याची जबाबदारी महामंडळाची आहे.

### 3.2.8 इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची[17] अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी डेटा विश्लेषण

**3.2.8.1** सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशी आणि त्यानंतर महामंडळाने केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने 250 डेपोंपैकी 106 डेपोंच्या संदर्भात इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या डेटाचे विश्लेषण केले ज्यावरून निदर्शनास येते (सप्टेंबर-ऑक्टोबर 2021) की

- ऑनलाइन आरक्षण प्रणाली अंतर्गत व्यवहाराच्या तक्त्यामध्ये 1,91,16,593 प्रकरणांपैकी 14,477 प्रकरणांत आगाऊ बुकींग करणाऱ्या प्रवाशांची नावे संकलित करण्यासाठी तयार केलेला प्रवासी नाव रकाना रिक्त होता आणि 36 प्रकरणात रकान्यामध्ये ‘,’ अथवा ‘+’ अशी चिन्हे आहेत.

- इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेस मध्ये 12[18] डेपोंमध्ये सवलतीसाठी पात्र असलेल्या 8.05 कोटी प्रवाशांपैकी 7.82 कोटी प्रवाशांचा ओळख पुरावा रकाना (97 टक्के प्रकरणांमध्ये) रिक्त होता.

---

17 नाव, वय, लिंग, पत्ता, सवलत, मोबाईल/फोन नंबर इत्यादिसारख्या ऑनलाइन तिकीट आरक्षित करणाऱ्या प्रवाशांचे तपशील संकलित करण्यासाठी अनुप्रयोग (ॲप्लिकेशन) विकसित केले आहे.

18 औरंगाबाद-।, बीड, भंडारा, बुलढाणा, धुळे, कोल्हापूर, कुर्ला नेहरू नगर, नागपूर ग्रामीण-1, नागपूर ग्रामीण-2, नाशिक CBS, रत्नागिरी आणि यवतमाळ.

➢ ऑडिट ट्रेलच्या अनुपस्थितीत व्यवहार तक्त्यांमध्ये केलेल्या बदलांवर नियंत्रण ठेवले जाऊ शकत नाही. तथापि, ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमधील 449 तक्त्यांच्या तुलनेत केवळ 15[19] तक्त्यांसाठी ऑडिट ट्रेल उपलब्ध होते.

➢ बारा डेपोंमध्ये सवलतीसाठी पात्र असलेल्या प्रवाशांसाठी जानेवारी 2016 ते 31 मार्च 2021 या कालावधीत इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीनद्वारे 8.06 कोटी तिकिटे निर्मित करण्यात आली होती. या तिकिटांच्या आधारावर महामंडळाने महाराष्ट्र शासनाकडे प्रतिपूर्तीचा दावा केला होता. विश्वसनीय आणि अचूक डेटाच्या अभावी महामंडळाने महाराष्ट्र शासनाकडे उपस्थित केलेल्या प्रतीपूर्ती दाव्यांची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. शासनाने म्हटले (फ्रेब्रुवारी 2022) की महामंडळाला योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

**3.2.8.2** गृह विभागाच्या सूचनेनुसार (नोव्हेंबर 2008 आणि ऑक्टोबर 2018) अपंग/दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांना साधारण/सेमी लक्झरी बसेस आणि शिवशाही बसेसने केल्या गेलेल्या प्रत्येक प्रवासासाठी दरात अनुक्रमे 75 टक्के आणि 70 टक्के सवलत देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, अपंग/दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांसह प्रवास करणाऱ्या सोबत्याला साधारण/सेमी लक्झरी बस आणि शिवशाही बसेसच्या दरात अनुक्रमे 50 टक्के आणि 45 टक्के सवलत देण्यात येते.

➢ अपंग प्रवाशांसोबत (कोड-19) प्रवास करणाऱ्या सोबत्याचे तपशील संकलित करण्यासाठी 'कन्सेशन कोड-20' देण्यात आला. अपंग प्रवाशांसाठी आणि त्यांच्या सोबतच्या प्रवाशांसाठी वेगवेगळे कोड तयार करण्यात आल्यामुळे प्रत्येक कोडसाठी फक्त एक सवलतीचे तिकिट तयार केले जावे आणि अपंग प्रवासी आणि त्याच्या सोबत प्रवास करणाऱ्या सोबताच्या तिकीटात त्याने/तिने प्रवास केला होता अशा अपंगांचा क्रॉस संदर्भ असणे आवश्यक आहे.

➢ प्रत्यक्ष प्रवास करणाऱ्या 20,36,122 प्रवाशांच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीनने अपंग प्रवाशांची 9,77,578 तिकिटे निर्माण केली. त्यामुळे 10,58,544 अपात्र प्रवाशांना सवलत दिल्याने महामंडळाचे ₹ 5.54 कोटींचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे, सोबत्यांसाठी निर्मित झालेल्या 12,871 तिकिटांच्या तुलनेत सोबती श्रेणी अंतर्गत 30,184 प्रवाशांनी प्रवास केला. परिणामी महामंडळाचे ₹ 0.08 कोटींचे नुकसान झाले. अशा प्रकारे, जास्त संख्येत अपंग प्रवाशी आणि त्यांच्या सोबत्यांना दिल्या गेलेल्या सवलतीमुळे महामंडळाचे एकूण ₹ 5.62 कोटींचे नुकसान झाले.

---

[19] api_log, bus_services_insert_update_log, bus_stops_insert_update_log, flat_fare_log, payment Gateway Cron_log, Procedure Book Ticket_log, Procedure release Quota Seats_log, Procedure Cancel Rebook Ticket_log, Procedure Temporary Lock Unlock Seats_log, Procedure release Seats_log, route_master_copy_log, session_log, SLA_etim Breakdown_logs, Third party_alert_logs, WS_logs.

➢ इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनने दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांसाठी निर्मित केलेल्या 92,731 तिकिटांच्या तुलनेत प्रत्यक्ष 1,94,137 प्रवाशांनी प्रवास केला. परिणामी 1,01,406 अपात्र प्रवाशांना सवलत दिल्यामुळे महामंडळाला ₹ 0.49 कोटींचे नुकसान झाले. तसेच 2,661 तिकिटांच्या तुलनेत सोबती श्रेणी अंतर्गत 6,994 प्रवाशांनी प्रवास केला. परिणामी, महामंडळाला ₹ 0.02 कोटींचे नुकसान झाले. अशाप्रकारे जास्त संख्येतील दृष्टिदोष असलेले प्रवाशी आणि त्यांच्या सोबत्यांना अस्वीकार्य सवलत दिल्यामुळे महामंडळाला एकूण ₹ 0.51 कोटींचे नुकसान झाले.

➢ ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमध्ये जरी मूळ तिकिटाची आणि संदर्भ तिकिटाची तरतूद होती तरी इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेसमध्ये ते गहाळ होते. तिकीट क्रमांकाच्या क्रॉस संदर्भाअभावी पात्र प्रवाशांना दिलेल्या सवलतीच्या भाड्याची सत्यता पडताळता आली नाही.

➢ शारीरिकदृष्ट्या अपंग प्रवाशांच्या 5.35 कोटी प्रकरणांमध्ये आणि त्यांच्या सोबत्यांच्या 0.15 कोटी प्रकरणांमध्ये तिकिट दरात विहित[20] टक्क्यांपेक्षा जास्त सवलत देण्यात आली होती. परिणामी ₹ 17.89 कोटी कमी महसूल प्राप्ती झाली. त्याचप्रमाणे, दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांच्या 0.47 कोटी प्रकरणांमध्ये आणि त्यांच्या 2.51 लाख सोबत्यांच्या प्रकरणांमध्ये विहित टक्क्यांपेक्षा जास्त सवलतीच्या दरामुळे महसूल प्राप्ती ₹ 1.28 कोटींनी कमी झाली.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की नऊ प्रवासी एकाच तिकीटावर प्रवास करू शकतात म्हणून अपंग प्रवाशांच्या बाबतीत त्यांच्या सोबत्यांचे क्रॉस संदर्भ करणे व्यवहार्य नव्हते. तसेच, ऑनलाइन तिकीट बुक करणारी अपंग व्यक्ती प्रत्यक्षात सोबत्यांबरोबर प्रवास करू शकते त्यामुळे इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन प्रणालीमध्ये अशा प्रकरणात देखील क्रॉस संदर्भ शक्य नव्हते. पुढे, शासनाने महामंडळाला प्राधान्याने स्मार्ट कार्ड प्रणाली लागू करण्याच्या आणि योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

**3.2.8.3** स्वातंत्र्य सैनिकांना[21] फक्त एका सोबत्यासह तिकीट दरात 100 टक्के सवलत देण्याच्या शासनाच्या सूचना (मे 1989 आणि ऑक्टोबर 2018) आहेत. आमचे डेटा विश्लेषण निदर्शित करते की:

➢ ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमध्ये स्वातंत्र्य सेनानी श्रेणी अंतर्गत ऑनलाइन बुक केलेल्या 19,902 तिकीटांपैकी 17,091 तिकिटे ही ऑनलाइन तिकीटे

---

[20] शारीरिकदृष्ट्या अपंग प्रवाशांसाठी साधारण सेमी-लक्झरी बसेसच्या भाड्यात 75 टक्के सवलत आणि शिवशाही बसच्या भाड्यात 70 टक्के सवलत तर त्यांच्या सोबत्यांना साधारण/सेमी-लक्झरी बसच्या भाड्यात 50 टक्के सवलत आणि शिवशाही बसच्या भाड्यात 45 टक्के सवलत.

[21] अलोकप्रिय सरकारपासून देशाला मुक्त करण्याच्या चळवळीत भाग घेणाऱ्या गटाशी संबंधीत व्यक्ती.

बुक करण्याच्या वेळेस 70 वर्षांपेक्षा कमी वय दर्शविण्यात आलेल्या प्रवाशांची होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर 74 वर्षांहून अधिक काळ लोटला असल्याने ऑनलाइन आरक्षण प्रणालीसाठी अप्लिकेशनची रचना करतांना पुरेसे इनपुट वय नियंत्रण प्रदान करावयाला पाहिजे होते. स्वातंत्र्य सैनिक श्रेणी अंतर्गत बुक केलेल्या तिकीटांचे वय-निहाय विश्लेषण खालील **तक्ता 3.1** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.1: अपात्र प्रवाशांना दिली गेलेली सवलत (ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेस)**

| च्या दरम्यान वय असलेल्या प्रवाशांसाठी बुक केलेली तिकिटे | | | | |
|---|---|---|---|---|
| **12-20 वर्षे** | **21-30 वर्षे** | **31-40 वर्षे** | **41-50 वर्षे** | **50 वर्षांवरील परंतु 70 वर्षा खालील** |
| 274 | 2,398 | 3,089 | 4,533 | 6,797 |
| *स्त्रोत: महामंडळाकडून प्राप्त माहिती* | | | | |

महामंडळाने नमूद केले (जानेवारी 2022) की शासनाकडून स्पष्टीकरण/मार्गदर्शन मिळाल्यानंतर प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल समाविष्ट केले जातील. शासनाने महामंडळाला योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.4** इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनने स्वातंत्र्य सैनिक श्रेणी अंतर्गत 24,468 तिकीटांची निर्मिती केली ज्याच्या तुलनेत प्रत्यक्षात 70,242 प्रवाशांनी प्रवास केला होता. परिणामी, 45,774 अपात्र प्रवाशांना सवलत दिल्याने महामंडळाला ₹ 0.21 कोटींचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे सोबती श्रेणी अंतर्गत 28,470 तिकिटे जारी केल्यानंतर 72,084 प्रवाशांनी प्रवास केला, परिणामी महामंडळाला ₹ 0.27 कोटींचे नुकसान झाले. अशाप्रकारे, जास्त संख्येतील स्वातंत्र्य सैनिक प्रवाशी आणि त्यांच्या सोबत्यांना अस्वीकार्य सवलत दिल्यामुळे महामंडळाला एकूण ₹ 0.48 कोटी नुकसान झाले.

➢ लेखापरीक्षणात समाविष्ट केलेल्या कालावधी दरम्यान, प्रत्यक्ष प्रवास केलेल्या 65,443 स्वातंत्र्य सैनिक प्रवाशांच्या तुलनेत 73,097 सोबत्यांनी सवलतीच्या दराचा लाभ घेतला होता. ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमध्ये मूळ तिकिट आणि संदर्भ तिकिटांची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली होती; तथापि इलेक्ट्रॉनिक तिकिट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेसमध्ये सोबत्यांच्या तिकीटांसह स्वातंत्र्य सैनिकांच्या मूळ तिकिटांचा क्रॉस संदर्भ केला गेला नाही. स्वातंत्र्य सैनिकांना जारी केलेली 43,145 तिकिटे अशी होती की त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांसोबत प्रवास केलेला नव्हता; तरीही त्यांना सवलत देण्यात आली होती.

शासनाने महामंडळाला प्राधान्याने स्मार्ट कार्ड प्रणाली लागू करण्याच्या सूचना दिल्या (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.5** महामंडळाचे परिपत्रका (ऑगस्ट 2000) सह शासन निर्णय (फेब्रुवारी 2000) द्वारे आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांसोबत त्याच्या एका सोबत्याला

साधारण, सेमी-लक्झरी आणि लक्झरी बसमध्ये प्रत्येक प्रवासासाठी दरात 100 टक्के सवलत दिली आहे. 106 डेपोमधील इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनच्या डेटाबेसच्या पडताळणीत उघडकीस आले (नोव्हेंबर 2021) की;.

➢ 106 डेपोंच्या इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनच्या डेटाबेसच्या तपासणीत असे निदर्शनास आले की आदिवासी सेवक पुरस्कृत प्रवाशांना आणि त्यांच्या सोबतच्या सोबत्यांना जारी केलेल्या 19,671 तिकीटांच्या तुलनेत 81,843 प्रवाशांना सवलत दिली गेली होती. परिणामी 62,172 प्रवाशांना ₹ 0.19 कोटी सवलतीची अनियमित परवानगी देण्यात आली.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की एकाच तिकिटावर नऊ प्रवासी प्रवास करू शकत असल्यामुळे आदिवासी सेवक पुरस्कर्ते आणि संरक्षक प्रवाशांच्या संख्या, विकल्या गेलेल्या तिकिटांच्या संख्येशी जुळणार नाही. तसेच, ऑनलाइन तिकीट बुक करणारी आदिवासी सेवक पुरस्कर्ती व्यक्ती प्रत्यक्षात सोबत्यांसह प्रवास करू शकते म्हणून अशा प्रकरणात क्रॉस संदर्भ देखील इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन प्रणालीमध्ये व्यवहार्य नव्हते.

**3.2.8.6** महाराष्ट्र शासनाने (फेब्रुवारी 1998) राज्याच्या अर्जुन, द्रोणाचार्य आणि छत्रपती पुरस्कर्त्यांना सार्वजनिक मार्ग परिवहनातून मोफत प्रवास करण्याची परवानगी दिली आहे आणि माफ केलेले भाडे महाराष्ट्र शासनाद्वारे परत केले जाईल. ऑनलाइन आरक्षण प्रणाली अंतर्गत तिकिटांच्या तपशीलांचा डेटा संकलित करणाऱ्या तक्त्याच्या तपासणीत असे उघडकीस आले की;

➢ अर्जुन आणि द्रोणाचार्य पुरस्कर्त्यांना 215 आणि 26 तिकीटे जारी करण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात अनुक्रमे 258 आणि 28 प्रवाशांनी प्रवास केला. तसेच इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेस अंतर्गत तिकीट तपशील संकलित करणाऱ्या तक्त्याच्या तपासणीत असे उघडकीस आले की अर्जुन आणि द्रोणाचार्य पुरस्कर्त्यांना अनुक्रमे 8,399 आणि 6,778 तिकिटे जारी करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात 27,894 आणि 42,356 प्रवाशांनी प्रवास केला होता. अशाप्रकारे, 55,073 (19,495+35,578) प्रवाशांना अनियमितपणे सवलत दिली गेली, परिणामी ₹ 10.23 लाख महसुलाचे नुकसान झाले. छत्रपती पुरस्कर्त्यांच्या बाबतीत अशा 7,129 प्रवाशांच्या तुलनेत प्रत्यक्षात 8,644 प्रवाशांनी सवलतीचा लाभ घेतला. परिणामी ₹ 1.19 लाख महसुलाचे नुकसान झाले.

शासनाने महामंडळाला स्मार्ट कार्ड प्रणाली प्राधान्याने लागू करण्याच्या सूचना दिल्या (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.7** महामंडळाने (डिसेंबर 1976 आणि मार्च 1978 मध्ये जारी करण्यात आलेली परिपत्रके) कर्करोगाच्या रुग्णांना 1,500 किमी अंतरापर्यंतच्या प्रत्येक प्रवासासाठी

भाड्यामध्ये 50 टक्के सवलत मान्य केली होती. ती सुधारित (ऑक्टोबर 2018) करून 75 टक्के करण्यात आली होती. क्षयरोग आणि कुष्ठरोगाच्या रुग्णांना प्रत्येक प्रवासासाठी 50 किमी अंतरापर्यंत 75 टक्के सवलत देण्यात आली आहे.

डेटा विश्लेषणादरम्यान असे निदर्शनास आले की:

➢ कर्करोग, क्षयरोग आणि कुष्ठरोग श्रेणी अंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनद्वारे जारी केलेल्या 5,309 तिकिटांच्या तुलनेत 11,990 प्रवाशांनी प्रवास केला. परिणामी, 6,681[22] अपात्र प्रवाशांना सवलतीची परवानगी दिल्यामुळे महामंडळाला ₹ 3.60 लाखांचे[23] नुकसान झाले. 1,34,559 कॅन्सर रुग्ण प्रवाशांच्या बाबतीत 75 टक्क्यांपेक्षा जास्त सवलत दिल्याने ₹ 5.93 लाखांची महसूल हानी झाल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे 8,431 क्षय रोग रुग्ण आणि 3,706 कुष्ठ रोग रूग्णांच्या बाबतीत 50 कि.मी. च्या विहित मर्यादेपेक्षा जास्त सवलत देण्यात आली होती ज्यामुळे अनुक्रमे ₹ 1.62 लाख आणि ₹ 1.05 लाख इतकी महसूल हानी झाली. शासनाने महामंडळाला स्मार्ट कार्ड प्रणाली प्राधान्याने लागू करण्याच्या सूचना दिल्या (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.8** 'तिकीट' तक्त्यातील तिकीट ओळख असलेल्या 'तिकीट_ओळखपत्रे' रकान्याच्या संदर्भात 12 डेपोंच्या इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेसच्या डेटा विश्लेषणातून उघडकीस आले (ऑक्टोबर 2021) की;

➢ 34.37 कोटी तिकीटांपैकी 0.64 कोटी तिकिटांच्या संदर्भात 01 ऑक्टोबर 2016 ते 31 मार्च 2021 या कालावधीत 'तिकीट_ओळखपत्रे' नव्हते. अशाप्रकारे, लेखापरीक्षणामध्ये डेटाची विश्वासार्हता निश्चित करता आली नाही.

➢ पूर्वीच्या लेखापरीक्षणात निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे सप्टेंबर 2011 ते ऑक्टोबर 2014 या कालावधीत 417.15 कोटी तिकिटांची विक्री 'तिकिट तक्त्या' मध्ये दर्शविण्यात आली होती. तथापि, चालू विश्लेषणादरम्यान त्याच कालावधीतील तिकिटांची संख्या 417.20 कोटी दर्शविली गेली जी पूर्वीच्या आणि सध्याच्या पडताळणीमध्ये अशा पाच लाख तिकिटांचा फरक दर्शविते. अशाप्रकारे, कालांतराने डेटा बदलला होता त्यामुळे डेटाची विश्वासार्हता आणि व्यवस्थापन माहिती प्रणालीच्या उद्देशांसाठी त्याचा वापर याबद्दल शंका निर्माण होते.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की डेटाची अचूकता आणि अखंडता सुस्थितीत ठेवण्यासाठी संबधित डेटाबेस व्यवस्थापन प्रणाली (RDBMS) चे रोल बॅक वैशिष्टय वापरले गेले.

---

[22] कर्करोग - 4768 प्रकरणे, कुष्ठरोग - 889 प्रकरणे आणि क्षयरोग - 1024 प्रकरणे.

[23] कर्करोग - ₹ 2.91 लाख, कुष्ठ रोग - ₹ 0.30 लाख आणि क्षयरोग - ₹ 0.39 लाख.

**3.2.8.9** सवलतीसह सर्व प्रकारची तिकिटे हाताळण्यासाठी इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन प्रोग्राम केलेले होते. तथापि, आवश्यकतेनुसार आणि वेळोवेळी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार यामध्ये सुधारणा करण्यात आल्या नाही. विविध सवलतींबाबत येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी महामंडळाने स्वतंत्रपणे स्मार्ट कार्ड प्रकल्प सुरू केला. महामंडळाने डेपोतून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण इत्यादिंसाठी विविध श्रेणींमध्ये सवलतीच्या भाडयासाठी पात्र असलेल्या प्रवाशांना पासच्या बदल्यात स्मार्ट कार्ड देण्यास सुरुवात केली. ही कार्डे केवळ इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनद्वारे वाचली आणि संकलित केली जातात आणि त्यासाठी वापरकर्त्याला ते जारी करण्यापूर्वी प्रणालीमध्ये स्मार्ट कार्ड वापरकर्त्याच्या तपशीलाची प्रविष्टी करणे आवश्यक आहे. डेस्कटॉपला लागू होणारे स्मार्टकार्ड रीडर/रायटरही बस डेपो आणि स्थानकांना पुरविण्यात आले होते. आमच्या डेटा विश्लेषणादरम्यान असे निदर्शनास आले की:

- 2019-2021 या कालावधीत सवलतीसाठी पात्र प्रवाशांना 32,55,714 स्मार्ट कार्ड जारी करण्यात आले. तथापि, इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनला हे स्मार्ट कार्ड वाचता आले नाही कारण मशीनमध्ये कार्ड ठेवल्यानंतर ही मशीन हँग झाली. अशाप्रकारे, वाहकाला अशा प्रवाशांचा डेटा मॅनुअल पद्धतीने इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनमध्ये प्रविष्ट करणे आवश्यक ठरले.

- पूर्व मुद्रित पासेसच्या विक्रीची जुनी प्रथा अजूनही चालू राहिली कारण प्रणाली समाकलक स्मार्ट कार्ड प्रदान करण्यात अयशस्वी ठरले आणि या पासेसमधून मिळणारा महसूल संबधित तक्ता तयार करून डेटाबेसमध्ये संकलित केला गेला नाही. त्याच्या अभावी मानवी हस्तक्षेपाशिवाय प्रवासाच्या वेळी पासेसची वैधता यंत्रणेद्वारे सुनिश्चित करण्यासाठी महामंडळ असमर्थ ठरले.

मार्च 2019, मार्च 2020 आणि मार्च 2021 मध्ये नागपूर डेपोतील (ग्रामीण-2) सर्व प्रवासी श्रेणींद्वारे दावा केलेल्या सवलतींशी संबधित लेखापरीक्षणात पडताळण्यात आलेल्या डेटाची स्थिती खालील **तक्ता 3.2** मध्ये दर्शविली आहे:

**तक्ता 3.2: ETIM आणि मॅन्युअल संगणनेच्या आकड्यांमधील फरक**

| महीने → | मार्च 2019 | | मार्च 2020 | | मार्च 2021 | |
|---|---|---|---|---|---|---|
| बाबी ↓ | इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन | मॅन्युअल | इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन | मॅन्युअल | इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन | मॅन्युअल |
| प्रवाशांची संख्या | 47,158 | 50,010 | 30,859 | 33,353 | 14,927 | 14,937 |
| वास्तविक भाडे | 46,26,370 | 57,67,513 | 28,69,066 | 35,44,228 | 14,43,705 | 14,75,304 |
| वसूल केलेले भाडे (A) | 22,32,185 | 26,94,884 | 13,29,690 | 15,79,646 | 6,44,785 | 6,56,839 |
| प्रतिपूर्ती रक्कम (B) | 23,85,411 | 30,72,629 | 15,38,124 | 19,64,582 | 7,95,758 | 8,18,465 |
| **एकूण रक्कम (A+B)** | **46,17,596** | **57,67,513** | **28,67,814** | **35,44,228** | **14,40,543** | **14,75,304** |
| *स्त्रोत: महामंडळाकडून प्राप्त माहिती* | | | | | | |

वरील तक्त्यावरुन सूचित होते की, इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन प्रणालीद्वारे तयार केलेले अहवाल आणि मॅन्युअली तयार केलेले अहवाल जुळत नव्हते कारण सवलतीचे भाडे, प्रत्यक्ष भाडे, प्रतिपूर्ती केलेली रक्कम आणि एकूण रकमेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय तफावत होती. अशा प्रकारे या आकडेवारीचे समायोजन होणे गरजेचे आहे. यावरून असे सूचित होते की ई-तिकिटिंग प्रणालीच्या संगणकीकरणाचा उद्देश विफल झाला.

शासनाने महामंडळाला स्मार्ट कार्ड प्रणाली प्राधान्याने लागू करण्याच्या सूचना दिल्या (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.10** वेबिल फेरी तपशील प्राप्त करण्यासाठी तक्त्याची निर्मिती फेरी-निहाय महसुलावर विश्लेषणात्मक अहवाल तयार करण्याच्या निर्णय प्रक्रियेसाठी केली होती. बारा डेपोंच्या संदर्भात इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन्सच्या डेटाबेसच्या पडताळणीतून असे उघड झाले (ऑक्टोबर 2021) की:

➢ 1.23 कोटी अभिलेख्यांपैकी 2,909 अभिलेख्यांमध्ये मार्ग क्रमांक “0” च्या नावे ₹ 82.25 लाखांचे उत्पन्न निर्माण झाल्याचे नोंदवले गेले, जे मार्गांच्या मास्टर तक्त्यामध्ये उपलब्ध नव्हते.

➢ 1.23 कोटी अभिलेख्यांपैकी 4.56 लाख अभिलेख्यांमध्ये “00000000” अनुरूप फेरी क्रमांकाच्या नावे ₹ 96.95 कोटींचे एकत्रित महसूल उत्पन्न नोंदवले गेले जे फेरी असलेल्या मास्टर तक्त्यामध्ये देखील उपलब्ध नव्हते.

➢ नऊ डेपोंमध्ये 227 रिक्त फेरी क्रमांक निर्माण केले गेले, जे मानवी हस्तक्षेप आणि डेटा अखंडतेशी तडजोड दर्शवितात.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की ह्यावर मात करण्यासाठी महामंडळाला प्रस्तावित तिकीट प्रणालीमध्ये सुचविलेले बदल समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**3.2.8.11** अधिकृत बुकींग अभिकर्त्यांना बुकिंग खिडकीवर बुक केलेल्या प्रवाशांप्रमाणे संभाव्य प्रवाशांसाठी त्यांचेकडून भाडे वसूल करून आगाऊ तिकिटे बुक करण्याची परवानगी आहे. कराराच्या अटींनुसार अधिकृत बुकींग अभिकर्त्याला क्रेडिट मर्यादेची परवानगी दिली होती, ज्याने विकलेल्या तिकीटांच्या किंमती इतके पैसे ठेवण्याची तरतूद केली होती आणि वसूल केलेले पैसे पुढील दिवसापर्यंत नियुक्त केलेल्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक होते.

ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसच्या तपासणीत उघडकीस आले (ऑक्टोबर 2021) की:

➢ लेखापरीक्षण कालावधीशी संबधित अधिकृत बुकींग अभिकर्त्यांच्या 973 प्रकरणांपैकी 237 प्रकरणांत कराराच्या अटींमध्ये निर्दिष्ट केलेल्या पैशाच्या मूल्याच्या

मर्यादेवरील डेटा मास्टर तक्त्यात असलेल्या मर्यादा रकान्यामध्ये 'शून्य' म्हणून दर्शविला गेला होता आणि त्यामुळे पैशाच्या मूल्याच्या मर्यादेचे निरीक्षण करता आले नाही.

- 58 प्रकरणांत जेथे महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना बुकींग अभिकर्ता म्हणून अधिकृत करण्यात आले होते, त्याच अभिकर्ता कोडमध्ये अनेक वेगवेगळ्या ठिकाणी एकापेक्षा जास्त बुकींग केंद्र आढळून आले; आणि

- इतर 83 प्रकरणांत, एकाच ठिकाणी एकाच अभिकर्त्यासाठी वेगवेगळे बुकींग केंद्र कोड तयार केले गेले होते ज्यामुळे अधिकृत बुकींग अभिकर्त्याला विहित रक्कमेच्या पलीकडे क्रेडिट मर्यादा मिळणे सुकर झाले. हे प्रणालीमधील इनपुट नियंत्रणाची अपर्याप्तता दर्शविते.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की टॉप-अप सुरू करण्यापूर्वी खाजगी अभिकर्त्यांना 'शून्य' शिल्लक असतांना देखील कार्यचालन करण्याची परवानगी होती. असे असूनही 205 सक्रिय अधिकृत बुकींग अभिकर्ते होते, ज्यांची क्रेडिट मर्यादा 'शून्य' म्हणून दर्शविली गेली.

**3.2.8.12** इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमध्ये डेपोत उपलब्ध बसेसचे तपशील, हस्तलिखित पास संकलन डेटा, डीजीटाईज्ड मार्ग आणि बस स्टॉप, पासधारकांच्या डेटाचे डिजिटायझेशन, अधिकृत बुकींग अभिकर्त्यांकडून रोख संकलन आणि वित्त प्रेषण डेटा, विविध प्रकारच्या सवलतींसाठी पात्र असलेल्या सर्व प्रवाशांशी संबंधित डेटा इत्यादी दर्शविणाऱ्या तक्त्यांचा समावेश नव्हता.

प्रस्तावित प्रणालीमध्ये लेखापरीक्षणाच्या सूचना समाविष्ट केल्या जातील असे शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022).

**3.2.8.13** प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संबंधित राज्य मार्ग परिवहन महामंडळांसोबत परस्पर वाहतूक करारा[24] अंतर्गत महामंडळ आपल्या बसेस राज्याबाहेर (आंध्रप्रदेश, छत्तीसगड, गोवा, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि राजस्थान) चालवत आहेत.

डेटा विश्लेषणात निदर्शनास आले (ऑक्टोबर 2021) की, महामंडळाने वर नमूद केलेल्या सात शेजारच्या राज्य मार्ग परिवहन महामंडळासोबत आंतर-राज्य करार निष्पादित केला असला तरीही इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन आणि

---

[24] आंतरराज्य प्रवासासाठी दोन राज्यांच्या मार्ग परिवहन महामंडळांमधील कराराच्या अभावी संबंधित राज्य शासन असे करार निष्पादित करतात आणि अशा मार्ग परिवहन महामंडळांवर अटी व शर्ती लादतात. अशा करारांमध्ये महसूल वाटप हा प्रमुख घटक आहे.

ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमधील तिकीट तपशील समाविष्ट असलेल्या तक्त्यामध्ये केवळ पाच राज्यांसाठी डेटा फिल्ड तयार करण्यात आले होते.

शासनाने नमूद केले की (फेब्रुवारी 2022) लेखापरीक्षणाच्या सूचना प्रस्तावित प्रणालीमध्ये समाविष्ट केल्या जातील.

**3.2.8.14** मास्टर तक्ता "डेपो" मध्ये, 251[25] विद्यमान डेपोंच्या तुलनेत ऑनलाइन आरक्षण प्रणाली डेटाबेसमधील 297 डेपो आणि इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणारे मशीन डेटाबेसमधील 294 डेपोंचे तपशील संकलित केले गेले. जोपर्यंत त्रुटी निर्माण करण्याव्यतिरिक्त अचूक डेटा संबंधित तक्त्यांमध्ये आणि अचूक फिल्डमध्ये संकलित केला जात नाही, भविष्यात नवीन प्रणालीमध्ये स्थलांतर करण्यात अडचणी येण्याची शक्यता अंतर्निहित होती. यापूर्वीच्या अहवालात (डिसेंबर 2014) हे निदर्शनास आणून देखील या उणीवा लक्षात आल्या.

➢ डेटा पडताळणीवरून (ऑक्टोबर 2021) निदर्शनास आले की, इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीन डेटाबेस अंतर्गत 411 तक्त्यांपैकी 135 तक्ते आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीच्या डेटाबेस अंतर्गत 449 तक्त्यांपैकी 58 तक्ते रिक्त होते आणि डेटा विरहित होते. तसेच, इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनमध्ये तयार केलेले 65 मास्टर तक्ते रिक्त होते आणि डेटा विरहित होते.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की डेटाबेस तक्ते कार्यरत डेपोंसाठी मुद्दाम तयार केले गेले होते. काही तक्त्यांमध्ये प्रवाशांच्या मागणी अभावी खिडकी बुकींग कार्य प्रणाली समाकलक संचालित नव्हते आणि काही तक्ते केवळ चाचणीच्या उद्देशाने तयार करण्यात आले होते.

**3.2.8.15** इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनच्या डेटाबेसमध्ये एकूण 34,37,29,142 तिकिटांपैकी 3,46,176 मध्ये 16 जानेवारी 2016 ते 25 फेब्रुवारी 2018 या कालावधीत विभागाचे नाव, विभाग कोड, डेपोचे नाव आणि डेपो कोड संकलित करण्यासाठी तयार केलेल्या फिल्डस रिक्त होत्या. महामंडळाने केवळ विद्यमान कालावधीसाठी त्रुटीत सुधारणा केली होती आणि 16 जानेवारी 2016 ते 25 फेब्रुवारी 2018 या कालावधीतील डेटा अद्याप दुरुस्त केला नव्हता.

शासनाने नमूद केले (फेब्रुवारी 2022) की प्रणालीच्या प्रारंभीच्या एकत्रीकरणाच्या टप्प्यात लेखापरीक्षणाने निदर्शनास आणून दिलेल्या फिल्डस रिक्त होत्या.

अशाप्रकारे इलेक्ट्रॉनिक तिकीट जारी करणाऱ्या मशीनची आणि ऑनलाइन आरक्षण प्रणालीची अंमलबजावणी आणि देखरेख करण्यासाठी पूर्ण आणि विश्वासार्ह डेटा मिळविण्यासाठी पुरेसे इनपुट नियंत्रण आणि प्रमाणीकरण तपासण्या नाहीत.

---

[25] 250 डेपो आणि एक भुगतान गेटवे.

## परिवहन विभाग

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

### 3.3 ₹ 4.05 कोटींचा निष्फळ खर्च

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मंचर येथे स्वतःच्या धोरणाविरुद्ध विद्यमान दोन डेपोंपासून 30 किमीच्या आत एका डेपोचे बांधकाम केल्यामुळे ₹ 4.05 कोटींचा निष्फळ खर्च झाला**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (महामंडळ) बस डेपो बांधण्यासाठी (फेब्रुवारी 1981 आणि मार्च 1999) मंजूर झालेल्या ठरावाद्वारे एक धोरण तयार केले. या धोरणानुसार या उद्देशासाठी निवडलेल्या ठिकाणी फक्त ते तालुक्याचे ठिकाण आहे म्हणून एका डेपोपासून 30 किलोमीटरच्या अंतरावर दुसरा डेपो उभारू नये. तथापि, जर वाजवी वाहतूक घनता/न्याय्य रहदारी घनता असेल आणि आर्थिकदृष्टया व्यवहार्य असेल किंवा क्रियात्मक गरजांनुसार योग्यरित्या समर्थित असेल आणि 100 पेक्षा जास्त बस-शेड्यूल चालवत असेल तर डेपोची स्थापना केली जाऊ शकते.

महामंडळाने पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तहसिलीतील मंचर येथे डेपो बांधण्याचा निर्णय घेतला (जून 2012). मंचरच्या 30 किलोमीटरच्या परिघात आधीच दोन डेपो 14 किलोमीटर अंतरावर नारायणगांव (93 बस-शेड्यूलसह) आणि 20 किलोमीटर अंतरावर राजगुरूनगर (90 बस-शेड्यूलसह) अस्तित्वात असतांनाही मंचर येथे डेपोची आवश्यकता आणि महत्व[26] यावर आधारित हा निर्णय होता. या डेपोची व्यवहार्यता त्यांच्याद्वारे ₹ 0.44 कोटीच्या प्रक्षेपित वार्षिक नफ्यावर आधारित होती. हे काम ₹ 4.05 कोटी[27] खर्च करून पूर्ण झाले (जून 2017).

लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले (डिसेंबर 2020) की जून 2017 मध्ये जरी डेपो पूर्ण झाला असला तरी आजपर्यंत (नोव्हेंबर 2021) त्याचा कोणताही उपयोग झालेला नाही. अशाप्रकारे, डेपो कार्यान्वित केला नसल्यामुळे ₹ 4.05 कोटीचा निष्फळ खर्च झाला.

उत्तरादाखल, विभागीय नियंत्रक, पुणे यांनी सांगितले (डिसेंबर 2020) की डेपोचा वापर आणि त्याच्या कामकाजासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची परवानगी महाव्यवस्थापक (कार्मिक) यांच्याकडून मागविली होती (मे 2018) परंतु प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी आणि 30 किलोमीटरच्या परिसरातील डेपोच्या कामकाजात

---

[26] आर्थिक घडामोडींचे केंद्र, राष्ट्रीय महामार्गावर स्थित भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या सान्निध्यात आणि मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक आकर्षित करणारे अभयारण्य, साखर कारखाना आणि अभियांत्रिकी महाविद्यालय, नवी मुंबईच्या बाजारपेठेत कृषी उत्पादनाची वाहतूक आणि आंबेगाव तालुका हा आदिवासी असलेला डोंगराळ प्रदेश.

[27] (₹ 4.05 कोटी = बांधकामांसाठी ₹ 3.60 कोटी + विद्युत कामांसाठी ₹ 27.80 लाख + जमिनीच्या किंमतीसाठी ₹ 17.50 लाख).

सुसूत्रता/एकरूपता आणण्यासाठी ती नाकारण्यात आली (जुलै 2018). त्यामुळे सक्षम अधिकाऱ्यांनी मंचर डेपो कार्यान्वित न करण्याचा निर्णय घेतला.

उत्तर या वस्तुस्थितीच्या तुलनेत पहावे लागेल की मंडळाचा निर्णय त्यांच्या धोरणाच्या विरुद्ध होता आणि तो मंचर डेपोच्या 30 किलोमीटरच्या परिघात दोन डेपो अस्तित्वात असल्याची माहिती घेतल्यानंतर घेण्यात आला होता. तसेच, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ हे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसह डेपोचा बांधकामावरील सर्व खर्चाच्या मान्यतेसाठी अधिकृत असूनही मंचर येथे नव्याने बांधण्यात आलेल्या डेपोचे काम पूर्ण झाल्यापासून (जुलै 2017) तो कार्यान्वित करण्यासाठी महामंडळाने कोणतीही उपाययोजना केली नाही. परिणामी, त्याच्या बांधकामावर ₹ 4.05 कोटींचा निष्फळ खर्च झाला.

ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली (ऑगस्ट 2021); त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (ऑगस्ट 2022).

नागपूर
दिनांक: 25 एप्रिल 2023

**(रा. तिरुपति वेंकटसामी)**
महालेखाकार (लेखापरीक्षा)-II,
महाराष्ट्र, नागपूर

प्रतिहस्ताक्षरित

नवी दिल्ली
दिनांक: 26 एप्रिल 2023

**(गिरीश चंद्र मुर्मू)**
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

# परिशिष्टे

**परिशिष्ट 1.1**

**(*संदर्भ: परिच्छेद 1.1; पृष्ठ: 1*)**

**महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रांतर्गत क्लस्टर-निहाय विभागांची, स्वायत्त संस्थाची आणि सार्वजनिक उपक्रमांची यादी दर्शविणारे विवरण**

| क्लस्टरचे नाव | विभागाचे नाव | स्वायत्त संस्थेचे नाव | सार्वजनिक उपक्रमाचे नाव |
|---|---|---|---|
| ऊर्जा व वीज | ऊर्जा | 1) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग<br>2) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण | 1) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (सहाय्यक)<br>2) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (सहाय्यक)<br>3) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (सहाय्यक)<br>4) औरंगाबाद वीज कंपनी मर्यादित (सहाय्यक)<br>5) धोपावे सागरी किनारा ऊर्जा मर्यादित (सहाय्यक)<br>6) महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस मर्यादित (सहाय्यक)<br>7) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ होल्डिंग कंपनी मर्यादित<br>8) महाराष्ट्र ऊर्जा विकास महामंडळ मर्यादित |
| उद्योग आणि वाणिज्य | उद्योग | 3) महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ | 9) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित<br>10) महागुज कॉलरीज मर्यादित (सहाय्यक)<br>11) महा तामीळ कॉलरीज मर्यादित<br>12) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ अडकोली नैसर्गिक संसाधने मर्यादित (सहाय्यक)<br>13) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ वरोरा कॉलरीज मर्यादित (सहाय्यक)<br>14) कोंकण विकास महामंडळ मर्यादित<br>15) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित<br>16) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित<br>17) कृपानिधी मर्यादित (सहाय्यक)<br>18) मराठवाडा दुग्धविकास महामंडळ मर्यादित (सहाय्यक)<br>19) एलोरा दुग्ध उत्पादने मर्यादित (सहाय्यक)<br>20) परभणी कृषी गो-संवर्धन मर्यादित (सहाय्यक)<br>21) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित<br>22) विदर्भ गुणवत्ता बियाणे मर्यादित[1]<br>23) गोंडवाना पेंट्स आणि मिनरल्स मर्यादित[2]<br>24) विदर्भ टॅनरीज मर्यादित[3]<br>25) महाराष्ट्र औद्योगिक वायु वितरण कंपनी लिमिटेड<br>26) मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित<br>27) गोदावरी गारमेंट्स मर्यादित (सहाय्यक)<br>28) किनवट रूफिंग टाइल्स मर्यादित (सहाय्यक)<br>29) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित<br>30) मराठवाडा सिरॅमिक कॉम्प्लेक्स मर्यादित (सहाय्यक)<br>31) मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ मर्यादित (सहाय्यक)<br>32) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित<br>33) औरंगाबाद औद्योगिक टाउनशिप मर्यादित<br>34) एआयटीएल ऑरिक स्कील फाउंडेशन (सहाय्यक) |

1 सार्वजनिक उपक्रम नंतर 2021-22 मध्ये विसर्जित केले गेले

2 सार्वजनिक उपक्रम नंतर 2021-22 मध्ये विसर्जित केले गेले

3 सार्वजनिक उपक्रम नंतर 2021-22 मध्ये विसर्जित केले गेले

| परिशिष्ट 1.1 (पुढे..) | | | |
|---|---|---|---|
| **क्लस्टरचे नाव** | **विभागाचे नाव** | **स्वायत्त संस्थेचे नाव** | **सार्वजनिक उपक्रमाचे नाव** |
| | वस्त्रोद्योग | -- | 35) महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ<br>36) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ<br>37) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित<br>38) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित<br>39) प्रताप कताई, विणकाम आणि उत्पादन कंपनी मर्यादित (सहाय्यक)<br>40) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित |
| वाहतूक | सामान्य प्रशासन विभाग | 4) महाराष्ट्र मेरिटाइम मंडळ, मुंबई | -- |
| | गृह | -- | 41) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ<br>42) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी<br>43) नागपूर जन परिवहन कंपनी<br>44) पुणे (पुरंदर) आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित<br>45) मिहान इंडिया मर्यादित<br>46) नागपूर फ्लाइंग क्लब |
| पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान | पर्यावरण | 5) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | 47) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित |
| | वन | 6) राज्य पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधिकरण | 48) एफडीसीएम एसेल वर्ल्ड गोरेवाडा झू प्रायव्हेट मर्यादित (जेवी ऑफ एफडीसीएम आणि एसेल वर्ल्ड) |
| | वन | -- | 49) महाराष्ट्र बांबू संवर्धन प्रतिष्ठान<br>50) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित |
| सार्वजनिक बांधकाम | पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग (सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी) | 7) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई | 51) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित |
| | सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते व पूले) | -- | 52) महाराष्ट्र सातारा कागल पायाभूत सुविधा मर्यादित (सहाय्यक)<br>53) ठाणे क्रीक ब्रिज पायाभूत सुविधा मर्यादित<br>54) नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन द्रुतगती मार्ग मर्यादित<br>55) वरसोवा बांद्रा सी लिंक मर्यादित (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची सहाय्यक कंपनी)<br>56) मुंबई पुणे एक्सप्रेस वे मर्यादित (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची सहाय्यक कंपनी)<br>57) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ बोगदे मर्यादित (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची सहाय्यक कंपनी) |

| परिशिष्ट 1.1 (पुढे...) | | | |
|---|---|---|---|
| **क्लस्टरचे नाव** | **विभागाचे नाव** | **स्वायत्त संस्थेचे नाव** | **सार्वजनिक उपक्रमाचे नाव** |
| | | | 58) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ सी लिंक मर्यादित (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची सहाय्यक कंपनी)<br>59) महाराष्ट्र समृद्धि अक्षय ऊर्जा मर्यादित (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची सहाय्यक कंपनी) |
| वित्त | वित्त | -- | 60) मॅफ्को मर्यादित<br>61) महाराष्ट्र विक्रीकर रोखे प्राधिकरण मर्यादित |
| | योजना | -- | 62) छत्रपती शाहू जी महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था, पुणे (सारथी) |
| माहिती तंत्रज्ञान व दळणवळण | माहिती तंत्रज्ञान | -- | 63) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई |
| कायदा व सुव्यवस्था | गृह | -- | 64) महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई |
| कायदा व सुव्यवस्था | विधी व न्याय विभाग | 8) महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग<br>9) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई | -- |

## परिशिष्ट 1.2

(*संदर्भ: परिच्छेद 1.6.1; पृष्ठ: 4*)

### डिसेंबर 2020 पर्यंत निर्गमित परंतु 30 जून 2021 रोजी विभाग निहाय प्रलंबित असलेले निरीक्षण अहवाल/परिच्छेद

| अनु. क्र. | विभागाचे नाव | क्षेत्राचे नाव | 2015-16 पर्यन्त | | 2016-17 | | 2017-18 | | 2018-19 | | 2019-20 | | 2020-21 | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद |
| 1 | क्लस्टर 9 (वाहतूक) | पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मुंबई | 66 | 135 | 24 | 85 | 22 | 120 | 11 | 77 | 13 | 106 | 0 | 0 | 136 | 523 |
| 2 | | मराठवाडा | 28 | 60 | 8 | 23 | 1 | 5 | 9 | 50 | 2 | 14 | 1 | 4 | 49 | 156 |
| 3 | | विदर्भ | 35 | 72 | 8 | 17 | 3 | 8 | 5 | 19 | 7 | 26 | 0 | 0 | 58 | 142 |
| 4 | | एमएमबी विभाग सर्व जिल्हे | 11 | 18 | 2 | 4 | 3 | 11 | 2 | 9 | 0 | 0 | 0 | 0 | 18 | 42 |
| **एकूण** | | | **140** | **285** | **42** | **129** | **29** | **144** | **27** | **155** | **22** | **146** | **1** | **4** | **261** | **863** |
| 1 | सामान्य प्रशासन विभाग | विमान चालन संचालक | 3 | 4 | 1 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 15 | 0 | 0 | 5 | 22 |
| 2 | | नागपूर फ्लाइंग क्लब | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| 3 | | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी | 4 | 21 | 1 | 8 | 1 | 14 | 1 | 19 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 62 |
| 4 | | मिहान इंडिया लिमिटेड | 1 | 4 | 0 | 0 | 1 | 7 | 1 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 16 |
| 5 | | नागपूर जन परिवहन महामंडळ मर्यादित | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **एकूण** | | | **10** | **32** | **2** | **11** | **2** | **21** | **2** | **24** | **1** | **15** | **0** | **0** | **17** | **103** |
| 1 | क्लस्टर 10 (वन, पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान) | वन, पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान | 273 | 744 | 22 | 78 | 30 | 146 | 31 | 160 | 29 | 151 | 6 | 46 | 391 | 1325 |
| 2 | क्लस्टर 11 (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक आरोग्य, अभियांत्रिकी, रस्ते आणि पूल | 398 | 1040 | 67 | 211 | 70 | 339 | 92 | 525 | 91 | 637 | 8 | 67 | 726 | 2819 |
| **एकूण** | | | **671** | **1784** | **89** | **289** | **100** | **485** | **123** | **685** | **120** | **788** | **14** | **113** | **1117** | **4144** |
| **एकूण बेरीज (अ)** | | | | | | | | | | | | | | | **1395** | **5110** |

## परिशिष्ट 1.2 (पुढे..)

| अनु क्र. | विभागाचे नाव | क्षेत्राचे नाव | 2015-16 पर्यन्त | | 2016-17 | | 2017-18 | | 2018-19 | | 2019-20 | | 2020-21 | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद | निरीक्षण अहवाल | परिच्छेद |
| 1 | क्लस्टर-ऊर्जा व वीज | ऊर्जा व वीज | 88 | 233 | 20 | 84 | 21 | 105 | 39 | 166 | 56 | 303 | 16 | 83 | 240 | 974 |
| 2 | क्लस्टर-उद्योग आणि वाणिज्य | उद्योग | 89 | 373 | 20 | 146 | 12 | 75 | 17 | 116 | 8 | 51 | 5 | 37 | 151 | 798 |
| 3 | क्लस्टर-उद्योग आणि वाणिज्य | वस्त्रोद्योग | 46 | 151 | 2 | 3 | 1 | 12 | 1 | 6 | 2 | 13 | 1 | 5 | 53 | 190 |
| **एकूण बेरीज (ब)** | | | **223** | **757** | **42** | **233** | **34** | **192** | **57** | **288** | **66** | **367** | **22** | **125** | **444** | **1962** |

## परिशिष्ट 1.2 (पुढे..)

*(₹ कोटी मध्ये)*

| अनु क्र. | विभागाचे नाव | प्राप्तींची नावे | प्रलंबित निरीक्षण अहवालांची संख्या | प्रलंबित परिच्छेद/ निरिक्षणांची संख्या | अंतर्भूत मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गृह | राज्य उत्पादन शुल्क | 97 | 172 | 11.52 |
| 2. | कायदा व सुव्यवस्था | गृह | 279 | 1153 | 0.00 |
| | | कायदा आणि न्याय | 81 | 262 | 0.00 |
| 3. | माहिती तंत्रज्ञान व दळणवळण | माहिती तंत्रज्ञान | 5 | 31 | 0.00 |
| 4. | महसूल व वन | करमणूक कर | 181 | 268 | 17.59 |
| | | मुद्रांक आणि नोंदणी शुल्क | 1250 | 2523 | 811.99 |
| 5. | वित्त | विक्री, व्यापार कर इत्यादि | 1002 | 2714 | 826.06 |
| | | व्यवसायांवरील कर इत्यादि | 82 | 104 | 13.6 |
| 6. | कोषागार | स्थानिक निधी, लेखा व कोषागार संचालक, इत्यादि | 23 | 86 | 0.00 |
| 7. | नियोजन | अर्थ व सांख्यिकी, सांख्यिकीय अधिकारी इत्यादि | 9 | 35 | 00.00 |
| **एकूण (क)** | | | **3009** | **7348** | **1680.76** |
| **एकूण बेरीज (अ+ब+क)** | | | **4848** | **14,420** | |

# परिशिष्ट 1.3

(*संदर्भः परिच्छेद 1.6.4; पृष्ठः 6*)

**प्रलंबित स्पष्टीकरणात्मक ज्ञापन/अनौपचारिक संदर्भांची स्थिती**

| लेखापरीक्षा अहवालाचे वर्ष | वाहतूक | | वन | | सार्वजनिक बांधकाम विभाग | | ऊर्जा व वीज | | उद्योग व वाणिज्य | | वित्त | | माहिती तंत्रज्ञान व संचार | | गृह | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या | परिच्छेदांची संख्या | प्रलंबित परिच्छेदांची संख्या |
| 2014-15 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 5 | 4 | 2 | 0 | 16 | 15 | 1 | 1 | 1 | 0 | 26 | 20 |
| 2015-16 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 5 | 2 | 2 | 18 | 18 | 2 | 2 | 3 | 2 | 32 | 31 |
| 2016-17 | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 7 | 7 | 1 | 1 | 27 | 25 | 0 | 0 | 1 | 1 | 41 | 34 |
| 2017-18 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 2 | 2 | 5 | 5 | 14 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 29 | 17 |
| 2018-19 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 3 | 2 | 2 | 0 | 0 | 11 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 17 | 10 |
| **एकूण** | **7** | **4** | **2** | **2** | **9** | **4** | **21** | **20** | **10** | **8** | **86** | **66** | **4** | **4** | **6** | **4** | **145** | **112** |

# परिशिष्ट 1.4

(*संदर्भ: परिच्छेद 1.6.4; पृष्ठ: 7*)

**लोक लेखा समिती/सार्वजनिक उपक्रम समितीच्या शिफारशींची क्लस्टर-निहाय स्थिती, ज्यावर कारवाई केलेल्या टिप्पण्यांची प्रतीक्षा होती**

| क्लस्टर | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | 2015-16 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वित्त | 0 | 14 | 14 | 6 | 83 | 12 | 129 |
| गृह | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 11 |
| परिवहन/वाहतूक | 6 | 67 | 6 | 0 | 10 | 8 | 97 |
| पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान | 0 | 0 | 0 | 0 | 12 | 0 | 12 |
| सार्वजनिक बांधकाम | 1 | 0 | 25 | 0 | 19 | 8 | 53 |
| ऊर्जा व वीज | 1 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 6 |
| उद्योग आणि वाणिज्य | 4 | 4 | 0 | 1 | 2 | 0 | 11 |
| **एकूण** | **12** | **87** | **57** | **8** | **127** | **28** | **319** |

## परिशिष्ट 2.1.1

(*संदर्भ: परिच्छेद 2.1.1; पृष्ठ: 10*)

### नमुना घेतलेल्या विभागांची यादी

| अनु क्र. | क्षेत्राचे नाव | परिमंडळांची संख्या | नमुना घेतलेल्या विभागांचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | नागपूर | नागपूर | सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग एकात्मिक (वैद्यकीय) युनिट, नागपूर |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 2, नागपूर |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 2, गोंदिया |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 3, नागपूर |
| | | गडचिरोली | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 2, गडचिरोली |
| | | चंद्रपूर | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र 1, चंद्रपूर |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी, वर्धा |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा |
| 2 | अमरावती | अकोला | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा |
| | | अमरावती | सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती |
| | | यवतमाळ | सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2, यवतमाळ |
| 3 | औरंगाबाद | नांदेड | सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर |
| | | औरंगाबाद | सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद |
| 4 | कोंकण | रत्नागिरी | सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण |
| | | ठाणे | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, ठाणे |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर |
| 5 | मुंबई | मुंबई | सार्वजनिक बांधकाम विभाग प्रेसिडेंसी, मुंबई |
| | | | एकात्मिक (वैद्यकीय) युनिट, मुंबई |
| 6 | नाशिक | नाशिक | सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगांव |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |
| | | अहमदनगर | सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर |
| 7 | पुणे | पुणे | सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण), पुणे |
| | | | सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे |
| | | कोल्हापूर | सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर |

## परिशिष्ट 2.1.2

*(संदर्भ: परिच्छेद 2.1.2.1; पृष्ठ: 12)*

### निधीचे अल्प विमोचन

*(₹ कोटी मध्ये)*

| अनु क्र. | वापरकर्त्या विभागाचे नाव | कामांची संख्या | कामाची किंमत | प्राप्त ठेवी | झालेला खर्च | निधीचे अल्प विमोचन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | सार्वजनिक आरोग्य | 02 | 23.17 | 16.97 | 19.11 | 6.20 |
| 2 | उच्च व तंत्र शिक्षण आणि रोजगार | 02 | 5.35 | 2.75 | 2.76 | 2.60 |
| 3 | उद्योग, ऊर्जा आणि कामगार | 77 | 11.55 | 1.45 | 1.45 | 10.10 |
| 4 | विधी व न्याय | 01 | 0.91 | 0.91 | 0.93 | 0.00 |
| 5 | योजना | 09 | 52.92 | 24.38 | 41.91 | 28.54 |
| 6 | सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य | 85 | 16.08 | 8.27 | 7.42 | 7.81 |
| 7 | क्रिडा | 01 | 1.26 | 1.00 | 1.04 | 0.26 |
| 8 | पर्यटन व संस्कृती | 11 | 29.26 | 19.25 | 20.09 | 10.01 |
| 9 | आदिवासी विकास | 01 | 57.85 | 4.23 | 5.48 | 53.62 |
| 10 | नगर विकास | 02 | 9.20 | 4.30 | 4.41 | 4.90 |
| 11 | ग्रामीण विकास (मुख्य शीर्ष 2515) | 1043 | 122.44 | 74.28 | 42.02 | 48.16 |
| 12 | महसूल व वन | 02 | 0.37 | 0.28 | 0.34 | 0.09 |
| 13 | गृह | 04 | 0.80 | 0.05 | 0.47 | 0.75 |
| **एकूण** | | **1240** | **331.16** | **158.12** | **147.43** | **173.04** |

## परिशिष्ट 2.1.3

(*संदर्भ: परिच्छेद 2.1.3.2(ii); पृष्ठः 18*)

## अपूर्ण कामे आणि निधीची कमतरता यामुळे थांबलेली कामे

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु. क्र. | विभागाचे नाव | कामाचे नाव | झालेला खर्च | टिप्पण्या |
|---|---|---|---|---|
| | | **निधीची कमतरता यामुळे थांबलेली कामे** | | |
| 1 | एकात्मिक (वैद्यकीय) युनिट, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर | गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, नागपूर येथील सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल विंग 'अ' मध्ये 3 वॉर्डांचे बांधकाम | 4.78 | एम्स, नागपूरच्या अर्थसंकल्पीय कामासाठी ₹ 1.60 कोटीचा निधी वळविल्याने काम अपूर्ण. |
| 2 | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2, यवतमाळ | जिल्हा यवतमाळ, तालुका आर्णी, पिंपळनेर गावातील अप्पा स्वामी मंदिराचा विकास | 0.52 | निधी उपलब्ध नसल्याने काम अपूर्ण आहे. |
| 3 | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2, यवतमाळ | खातेश्वर (भाग नं. 4, घाट विस्तार), कळंब, जिल्हा-यवतमाळ येथील श्री खातेश्वर महाराज संस्थान (क वर्ग तीर्थ क्षेत्र) चे सौंदर्यीकरण व तलाव परिसराचा विकास | 0.13 | ₹ 0.49 कोटीच्या निधीची गरज असल्याने काम अपूर्ण राहिले. |
| 4 | सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | पैठण, औरंगाबाद येथे निवासी इमारत आणि दोन प्रशिक्षण केंद्रे | 2.34 | निधीची कमतरता आणि कामाच्या व्याप्तीत बदल. |
| 5 | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, ठाणे | मुंब्रा कौसा, मुंबई येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारत | 3.64 | निधीची कमतरता असल्यामुळे काम अपूर्ण. |
| 6 | एकात्मिक (वैद्यकीय) युनिट, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई | जेजे हॉस्पिटल मुंबईच्या आवारात प्रशासकीय इमारत | 1.72 | निधीची गरज असल्याने विजेचे काम अपूर्ण सोडले. |

*स्त्रोत: विभागाद्वारे दिलेली माहिती*

## परिशिष्ट 2.1.4

(*संदर्भ: परिच्छेद 2.1.3.2(v); पृष्ठ: 23*)

**सिमेंट कॉन्क्रीट क्यूब्सच्या तपासणीला झालेल्या विलंबाचा तपशील**

| अनु क्र. | विभागाचे नाव | कामाचे नाव | काँक्रिटचा प्रकार | क्यूब कास्टिंगची तारीख | क्यूब चाचणीची तारीख | क्यूबचे वय (दिवसात) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा | नगर परिषद, देऊळगाव राजा (जाफराबाद रोड ते बगीचा) येथे सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकाम | सीसीएम-15 | 10.01.2019 | 28.03.2019 | 77 |
| | | | सीसीएम-20 | 20.01.2019 | 28.03.2019 | 67 |
| | | | सीसीएम-40 | 11.01.2019 | 28.03.2019 | 76 |
| 2 | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा | बुलढाणा नगर परिषदेच्या तहसील चौक ते बाळ शिवाजी कॉन्व्हेंट पर्यन्तच्या आंतरिक रस्त्याची सुधारणा | सीसीएम-20 | 21.06.2018 | 27.09.2018 | 98 |
| 3 | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा | सिविल हॉस्पिटल बुलढाणा येथील आंतरिक रस्त्याचे बांधकाम | सीसीएम-20 | 18.10.2019 | 07.08.2020 | 294 |
| | | | सीसीएम-20 | 22.11.2019 | 07.08.2020 | 259 |
| 4 | सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा | सिवील हॉस्पिटल बुलढाणा परिसरात आंतरिक भुयारी गटाराचे बांधकाम | सीसीएम-20 | 17.03.2020 | 06.08.2020 | 142 |

*स्त्रोत: विभागाद्वारे दिलेली माहिती*

## परिशिष्ट 2.2.1

(*संदर्भ: परिच्छेद 2.2; पृष्ठ: 31*)

**जोखीम आणि खर्चावर केलेली सामान्य दुरूस्ती दर्शविणारे विवरण**

| अनु. क्र. | करार क्रमांक | कार्य आदेशाची तारीख | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | दिलेली रक्कम (₹ मध्ये) | व्हाउचर क्रमांक आणि तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 46/2017-18 | 05.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 607/250 ते 608/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 281571 | 40/03/2018 |
| 2 | 47/2017-18 | 05.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 593/750 ते 594/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 280495 | 41/03/2018 |
| 3 | 48/2017-18 | 06.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 599/750 ते 600/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 272163 | 72/03/2018 |
| 4 | 49/2014-18 | 06.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 592/250 ते 593/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 276217 | 43/03/2018 |
| 5 | 50/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 608/00 ते 608/750 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 267914 | 44/03/2018 |
| 6 | 51/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 605/750 ते 606/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 282037 | 45/03/2018 |
| 7 | 52/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 602/750 ते 603/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 274380 | 46/03/2018 |
| 8 | 53/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 597/500 ते 598/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 278714 | 47/03/2018 |
| 9 | 54/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 610/250 ते 611/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 273667 | 48/03/2018 |
| 10 | 55/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 603/500 ते 604/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 269966 | 49/03/2018 |
| 11 | 58/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 590/500 ते 591/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 281288 | 50/03/2018 |
| 12 | 59/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 604/250 ते 605/000 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 271907 | 51/03/2018 |
| 13 | 60/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 595/250 ते 596/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 268617 | 52/03/2018 |
| 14 | 61/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 595/250 ते 596/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 270652 | 53/03/2018 |
| 15 | 62/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 611/750 ते 612/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 270310 | 54/03/2018 |
| 16 | 63/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 612/500 ते 613/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 281141 | 55/03/2018 |
| 17 | 64/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 608/750 ते 609/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 275521 | 56/03/2018 |
| 18 | 65/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 587/00 ते 588/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 289517 | 57/03/2018 |
| 19 | 66/2017-18 | 07.12.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 606/500 ते 607/205 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 270496 | 77/03/2018 |
| 20 | 67/2017-18 | 07.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 589/500 ते 590/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 285335 | 78/03/2018 |
| 21 | 68/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 593/00 ते 593/750 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 277256 | 79/03/2018 |
| 22 | 69/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 596/00 ते 596/750 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 279479 | 80/03/2018 |
| 23 | 70/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 591/500 ते 592/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 279194 | 81/03/2018 |

| परिशिष्ट 2.2.1 (पुढे..) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | करार क्रमांक | कार्य आदेशाची तारीख | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | दिलेली रक्कम (₹ मध्ये) | व्हाउचर क्रमांक आणि तारीख |
| 24 | 71/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 600/500 ते 601/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 285660 | 82/03/2018 |
| 25 | 72/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 594/500 ते 595/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 274825 | 83/03/2018 |
| 26 | 73/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 602/00 ते 602/750 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 269113 | 84/03/2018 |
| 27 | 74/2017-18 | 13.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 598/250 ते 599/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 281206 | 85/03/2018 |
| 28 | 75/2017-18 | 15.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 588/500 ते 589/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 277110 | 86/03/2018 |
| 29 | 76/2017-18 | 15.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 596/750 ते 597/500 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 274980 | 87/03/2018 |
| 30 | 77/2017-18 | 15.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 599/00 ते 599/750 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 267666 | 88/03/2018 |
| 31 | 78/2017-18 | 18.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 609/500 ते 610/250 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 277532 | 89/03/2018 |
| 32 | 79/2017-18 | 18.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 601/250 ते 602/00 | मे. शारदा कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 271591 | 90/03/2018 |
| 33 | 85/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 559/400 ते 560/600 | मे. ग्लोबल इंटरप्राइझेस, नांदेड | 297950 | 15/03/2018 |
| 34 | 86/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 558/200 ते 559/400 | मे. ग्लोबल इंटरप्राइझेस, नांदेड | 290585 | 160/03/2018 |
| 35 | 90/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 564/00 ते 565/00 | मे. ग्लोबल इंटरप्राइझेस, नांदेड | 296709 | 157/03/2018 |
| 36 | 91/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 563/00 ते 564/00 | मे. ग्लोबल इंटरप्राइझेस, नांदेड | 295397 | 159/03/2018 |
| 37 | 92/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 560/600 ते 561/800 | मे. ग्लोबल इंटरप्राइझेस, नांदेड | 296010 | 161/03/2018 |
| 38 | 103/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 581/00 ते 583/000 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 298302 | 132/03/2018 |
| 39 | 104/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 613/250 ते 614/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 270282 | 135/03/2018 |
| 40 | 105/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 565/00 ते 569/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 291831 | 138/03/2018 |
| 41 | 106/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 585/00 ते 587/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 294231 | 133/03/2018 |
| 42 | 107/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 573/00 ते 577/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 297520 | 139/03/2018 |
| 43 | 108/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 569/00 ते 573/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 297981 | 131/03/2018 |
| 44 | 109/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 611/00 ते 611/750 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 277829 | 134/03/2018 |
| 45 | 110/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 577/00 ते 579/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 293882 | 140/03/2018 |
| 46 | 111/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 614/00 ते 615/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 276949 | 136/03/2018 |
| 47 | 112/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 583/00 ते 585/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 298977 | 141/03/2018 |
| 48 | 113/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 579/00 ते 581/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 299063 | 137/03/2018 |

| परिशिष्ट 2.2.1 (पुढे..) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | करार क्रमांक | कार्य आदेशाची तारीख | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | दिलेली रक्कम (₹ मध्ये) | व्हाउचर क्रमांक आणि तारीख |
| 49 | 114/2017-18 | 08.03.2018 | ओआर ते एनएच 222 किमी. 561/800 ते 563/00 | मे. जी.जे कन्स्ट्रक्शन्स, नांदेड | 298935 | 156/03/2018 |
| 50 | 32/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 444/00 ते 446/500 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 276618 | 596/03/2018 |
| 51 | 33/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 446/500 ते 449/00 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 272855 | 597/03/2018 |
| 52 | 34/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 458/00 ते 463/550 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 274996 | 63/03/2018 |
| 53 | 35/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 452/00 ते 455/00 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 271956 | 61/03/2018 |
| 54 | 36/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 455/00 ते 458/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 272440 | 65/03/2018 |
| 55 | 37/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 498/00 ते 503/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 274908 | 70/03/2018 |
| 56 | 38/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 481/00 ते 485/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 274976 | 66/03/2018 |
| 57 | 39/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 449/00 ते 452/00 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 272471 | 60/03/2018 |
| 58 | 40/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 485/00 ते 489/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 273817 | 67/03/2018 |
| 59 | 41/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 489/00 ते 493/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 275411 | 68/03/2018 |
| 60 | 42/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 503/00 ते 508/00 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 275479 | 62/03/2018 |
| 61 | 43/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 495/500 ते 498/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 274270 | 71/03/2018 |
| 62 | 44/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 508/00 ते 514/500 | मे. पल्लवी कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 270894 | 64/03/2018 |
| 63 | 45/2017-18 | 02.12.2017 | ओआर ते एनएच 222 किमी. 493/00 ते 495/00 | मे. साई कन्स्ट्रक्शन्स, परभणी | 279076 | 69/03/2018 |
| **एकूण रक्कम** | | | | | **17650120** | |

**परिशिष्ट 2.4.1**

**(*संदर्भ: परिच्छेद 2.4.1; पृष्ठः 37*)**

**निवडलेल्या 15 जिल्ह्यांमध्ये निर्मितीसाठी हाती घेतलेल्या जैव-विविधता उद्यानांचा तपशील**

| अनु क्रं | जिल्ह्यांचे नाव | उद्यानांचे स्थान | तपशीलवार प्रकल्प अहवाल खर्च (₹ लाखात) | 2015-21 दरम्यान झालेला खर्च (₹ लाखात) | पूर्ण झाले की नाही | पूर्ण झाल्यास सुपूर्द केले (कोणाला) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरावती | उपटखेडा | 272.5 | 261.93 | होय | होय (प्रादेशिक वन विभाग) |
| 2 | चंद्रपूर | गोंदेडा | 151.41 | 140.93 | होय | होय (प्रादेशिक वन विभाग) |
| 3 | चंद्रपूर | गोंडपिंपरी | 153.47 | 146.06 | होय | होय (प्रादेशिक वन विभाग) |
| 4 | चंद्रपूर | चंद्रपूर | 380.68 | 375.92 | होय | होय (प्रादेशिक वन विभाग) |
| 5 | जालना | जालना | 199.30 | 214.94 | होय | नाही |
| 6 | नांदेड | बोंधर | 259.85 | 192.00 | होय | नाही |
| 7 | नांदेड | वाडेपुरी | 197.55 | 143.25 | होय | नाही |
| 8 | उस्मानाबाद | ढोकी | 150.00 | 142.15 | होय | होय (विश्वस्त) |
| 9 | उस्मानाबाद | तीर्थ (बु) | 128.84 | 99.01 | होय | होय (विश्वस्त) |
| 10 | सोलापूर | मालोली | 170.11 | 163.35 | होय | नाही |
| 11 | सोलापूर | कुंभारी | 109.97 | 101.15 | होय | होय (ग्राम पंचायत) |
| 12 | ठाणे | कानविंदे | 583.85 | 463.89 | होय | होय (प्रादेशिक वन विभाग) |
| 13 | अकोला | काटीपाटी | 256.62 | 67.41 | पूर्ण घोषित करूनही अपूर्ण | होय (ग्राम पंचायत) |
| 14 | धुळे | जामखेळ | 214.30 | 96.78 | पूर्ण घोषित करूनही अपूर्ण | होय (ग्राम पंचायत) |
| 15 | जालना | दहीपूरी | 190.94 | 95.35 | पूर्ण घोषित करूनही अपूर्ण | नाही |
| 16 | वर्धा | एमआयडीसी | 219.52 | 117.77 | नाही | - |
| 17 | वर्धा | राजनी | 172.54 | 97.61 | नाही | - |
| 18 | यवतमाळ | जोंधळणी | 105.00 | 96.80 | नाही | - |
| 19 | यवतमाळ | आंबवन | 122.00 | 97.63 | नाही | - |
| 20 | अकोला | वाशिम्बा | 254.45 | 191.35 | नाही | --- |
| 21 | अकोला | कुरुम | 478.82 | 308.49 | नाही | - |
| 22 | अमरावती | मादलाबाद | 275.49 | 148.44 | नाही | - |
| 23 | भंडारा | डोंगरला | 201.2 | 93.23 | नाही | - |
| 24 | गोंदिया | अर्जुनी मोरगांव | 178.12 | 104.11 | नाही | - |
| 25 | गोंदिया | नवाटोला | 178.32 | 116.30 | नाही | - |
| 26 | गोंदिया | कुडवा | 190.80 | 161.84 | नाही | - |
| 27 | गोंदिया | गराडा | 184.93 | 104.97 | नाही | - |
| 28 | नागपूर | वेणा निमजी | 296.44 | 178.51 | नाही | - |
| 29 | नाशिक | पारेगांव | 196.77 | 71.16 | नाही | - |
| 30 | नाशिक | माणिकपुंज | 201.61 | 69.27 | नाही | - |
| 31 | नाशिक | कंधाणे | 206.31 | 108.22 | नाही | - |
| 32 | ठाणे | माजीवाडे | 738.45 | 641.33 | नाही | - |
| | | **एकूण** | **7620.16** | **5411.15** | | |

*स्त्रोत: विभागाद्वारे दिलेली माहिती*

**परिशिष्ट 2.5.1**

***(संदर्भ: परिच्छेद : 2.5.8.1; पृष्ठ: 60)***

**तक्ता 5 c नुसार कलम 140(1), 140(4)(a) अंतर्गत अग्रेषित जास्त क्रेडिट**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | वस्तू व सेवाकर ओळख संख्या (GSTIN) | करदात्याचे नाव | मूळ विवरणाची तारीख | मूळ विवरण अग्रेषित रक्कम | मूळ विवरण वापसी रक्कम | सुधारित विवरण तारीख | सुधारित विवरण अग्रेषित रक्कम | सुधारित विवरण परतावा रक्कम | इलेक्ट्रॉनिक क्रेडिट लेजरमध्ये घेतलेले क्रेडिट | स्वीकार्य क्रेडिट | अनियमित/ जास्तीचे क्रेडिट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| **विभागाचे नाव: सह आयुक्त, बांद्रा** | | | | | | | | | | | |
| 1 | 27AAACM5967F1ZA | मेसर्स मनेका एजेंसीज प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई | 18.07.2017 | 0.01 | 0 | 05.12.2018 | 0.013 | 0 | 0.08 | 0.01 | **0.07** |
| 2 | 27AAFCM2002G1ZZ | मातोश्री इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड | 22.05.2018 | 0 | 0 | दाखल केले नाही | दाखल केले नाही | दाखल केले नाही | 0.1 | 0 | **0.1** |
| 3 | 27AABCD8397D1ZG | मे. दोषी मेटल प्रॉडक्शन प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई | 31.07.2017 | 0 | 0.09 | 27.03.2019 | 0 | 0.09 | 0.09 | 0 | **0.09** |
| 4 | 27AAOCS1655A1ZF | मे. सन स्टार स्पेसेस प्रायव्हेट लिमिटेड | 31.07.2017 | 0 | 0 | 18.02.2019 | 0 | 0 | 0.08 | 0 | **0.08** |
| 5 | 27AAFCT7961D1Z4 | मे. टोटल मार्केटिंग सपोर्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई | 27.09.2017 | 0 | 0.79 | 27.12.2017 | 0 | 0.83 | 0.86 | 0 | **0.86** |
| **विभागाचे नाव: सह आयुक्त, बोरीवली** | | | | | | | | | | | |
| 6 | 27AADCP7469G1Z1 | प्रशांती लँड डेव्हलपर्स | 20.07.2017 | 0 | 0 | दाखल केले नाही | दाखल केले नाही | दाखल केले नाही | 0.09 | 0 | **0.09** |
| 7 | 27AAHFR5520P1ZQ | मे. रिलायन्स एंटरप्रायझेस | 27.07.2017 | 0 | 0 | दाखल केले नाही | 0 | 0 | 0.48 | 0 | **0.48** |
| 8 | 27ACPPS1273C1ZH | मे. मार्क इंजीनियरिंग | 27.10.2017 | 0.07 | 0 | 14.12.2018 | 0.01 | निरंक | 0.07 | 0.01 | **0.06** |
| 9 | 27ABTFS6605H1Z0 | मे. स्कायलाईन इलेक्ट्रिकल कंट्रोल | 10.08.2018 | 0 | 0.14 | 02.10.2018 | 0 | 0.15 | 0.15 | 0 | **0.15** |
| **विभागाचे नाव: सह आयुक्त, गोरेगांव** | | | | | | | | | | | |
| 10 | 27AAACR4919G1ZD | राहुल इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड | 28.10.2017 | 0 | 0.12 | 10.01.2019 | 0 | 0.0075 | 0.12 | 0 | **0.12** |

| परिशिष्ट 2.5.1 (पुढे..) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
